# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः—
१५/९/२०१७

उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. १५/९/२०१७ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

५

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा दिनांक १५/९/२०१७ रोजी दुपारी ३.३० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत महापौर, श्रीमती मिना कुमार आयलानी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१. श्रीम. मिना कुमार आयलानी —— महापौर

२. श्री. जीवन चंद्रभान इदनानी —— उप—महापौर

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीमती अर्चना गोकुळ करणकाळे | ३५ | श्री. गजानन प्रल्हाद शेळगे |
| ४ | श्रीमती ज्योती दिलीप गायकवाड | ३६ | श्रीमती ज्योती प्रकाश (पिंटो) बठिजा |
| ५ | श्री. हरेश परमानंद जग्यासी | ३७ | श्री. दिपक लक्ष्मणदास सिरवानी |
| ६ | श्रीमती पंचम उमेश कालानी | ३८ | श्री. सुमित सागर सोनकांबळे |
| ७ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | ४९ | श्रीमती ज्योत्स्ना सुरेश जाधव |
| ८ | श्रीमती आशा नाना बिराडे | ४० | श्रीमती ज्योती शामराव माने |
| ९ | श्री. रविंद्र दशरथ बागुल | ४१ | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| १० | श्रीमती चरणजितकौर राजेंद्रसिंह भुल्लर | ४२ | श्री. चंद्रशेखर केशव यादव |
| ११ | श्री. राजेंद्रसिंह विरसिंग भुल्लर | ४३ | श्रीमती मिताली राजेश चान्पूर |
| १२ | श्री. स्वप्नील मिलींद बागुल | ४४ | श्रीमती लिलाबाई लक्ष्मण आशान |
| १३ | श्रीमती सुरेखा हनुमंत आव्हाड | ४५ | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे |
| १४ | श्रीमती अंजना अंकुश म्हस्के | ४६ | श्रीमती संगिता नितीन सपकाळे |

| | | | |
|---|---|---|---|
| १५ | श्री. कलवंतसिंग गुरुदेव सोहटा | ४७ | श्रीमती शीतल चंद्रकांत कदम |
| १६ | श्री. अशोक बच्चुमल छाप्रु | ४८ | श्रीमती वसुधा धनंजय बोडारे |
| १७ | डॉ. प्रकाश घनश्यामदास नाथानी | ४९ | श्रीमती दिप्ती नविन दुधानी |
| १८ | श्रीमती सरोजिनी मुरलीधर टेकचंदानी | ५० | श्रीमती ज्योती रमेश चैनानी |
| १९ | श्रीमती जया प्रकाश माखिजा | ५१ | श्रीमती सुनिता बाबुराव बगाडे |
| २० | श्री. महेश पहिलराज सुखरामनी | ५२ | श्रीमती पुजाकौर श्यामसिंग लबाना |
| २१ | श्रीमती अपेक्षा भगवान भालेराव | ५३ | श्री. भारत रामचंद राजवानी (गंगोत्री) |
| २२ | श्रीमती शुभांगीनी निकम | ५४ | श्री. सतरामदास पुतनदास जेसवानी |
| २३ | श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग | ५५ | श्रीमती कविता सुधिर बागुल |
| २४ | श्री. भगवान शंकर भालेराव | ५६ | श्री. प्रमोद नामदेव टाले |
| २५ | श्रीमती ज्योती प्रशांत पाटील | ५७ | श्रीमती सविता प्रविण तोरणे (रगडे) |
| २६ | श्री. राजेश नानिकराम वदारिया | ५८ | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| २७ | श्री. अजित प्रभुनाथ गुप्ता | ६९ | श्री. किशोर नारायणदास वनवारी |
| २८ | श्रीमती पुष्पा नाना बागुल | ६० | कु. कविता सुरेश गायकवाड |
| २९ | श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी | ६१ | श्री. आकाश परशुराम पाटील |
| ३० | श्रीमती शुभांगी मनोहर बेहनवाल | ६२ | श्री. विकास परशुराम पाटील |
| ३१ | श्री. राजेंद्र शांताराम चौधरी | ६३ | श्री. प्रदिप अर्जुनदास रामचंदानी |
| ३२ | श्री. रवी किशनचंद जग्यासी | ६४ | श्री.सुरेंद्र बाळकृष्ण सावंत |
| ३३ | श्रीमती इंदिरा जमनादास उदासी | ६५ | श्री. अरुण लक्ष्मण आशान |
| ३४ | श्रीम. कविता लाल पंजाबी | ६६ | श्रीमती आशा जीवन इदनानी |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१. श्रीमती पुजा सचिन भोईर, २. श्रीमती जयश्री ज्ञानेश्वर पाटील, ३. श्रीमती मिनाकौर अजितसिंग लबाना, ४. श्रीमती गीता लालचंद साधनानी, ५. श्रीमती रेखा अशोक ठाकुर, ६. श्रीमती छाया सुजित चक्रवर्ती उर्फ अडसुळ, ७. श्रीमती डिम्पल नरेंद्र ठाकुर (कुमारी), ८. श्रीमती दिपा नारायण पंजाबी, ९. श्री. धनंजय बाबुराव बोडारे, १०. श्रीमती कांचन अमर लुंड, ११. श्री. शंकर गोविंदराम लुंड, १२. श्रीमती अंजली चंद्रकांत साळवे, १३. श्रीमती मिना चंद्रगुप्त सोनेजी, १४. श्रीमती मिनाक्षी रवी पाटील, १५. श्री. विजय चाहु पाटील, १६. श्री. मनोज दिलीपकुमार सयानी १७) श्रीम. चंद्रा आयोध्याप्रसाद सिंग

खालील अधिकारी सभेत उपस्थित होते.

१.श्री. राजेंद्र निंबाळकर, आयुक्त

२.डॉ. विजया कंठे, अतिरिक्त आयुक्त

३.श्री. संतोष देहेरकर, उप आयुक्त (मुख्यालय)

४.श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी, प्र. महापालिका सचिव

५.श्री. राम जैसवार, शहर अभियंता

६.श्री. दादा पाटील, मुख्य लेखाधिकारी

७.श्री. राजा रिझवानी, प्र. वैद्यकिय अधिकारी

८.श्री. एस. के. सेलवन, कार्यकारी अभियंता

९.श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी

१०.महेश शितलानी, कनिष्ठ अभियंता

११. श्री. महेंद्र धिंडे, कनिष्ठ अभियंता

१२. श्री. हनुमंत खरात, कनिष्ठ अभियंता

१३. श्री. ढोले, कनिष्ठ अभियंता

१४ श्री. नंदलाल समतानी, प्र. सहाय्यक आयुक्त

१५. श्री. गणेश शिंपी, प्र. सहाय्यक आयुक्त

१६. श्री. भगवान कुमावत, प्र. सहाय्यक आयुक्त

१७. श्री. यशवंत सगळे, प्र. वाहन व्यवस्थापक

१८. श्रीमती अलका पवार, प्र. सहाय्यक आयुक्त

१९. श्री. भास्कर मिरपगार, प्र. अग्निशमन अधिकारी

२०. श्रीमती विशाखा सावंत, प्र. मालमत्ता व्यवस्थापक

२१. श्री. मनीष हिवरे, प्र. सहाय्यक आयुक्त

२२. श्री. दगडू वानखेडे, शाखा अभियंता

२३. श्री. पाटील, शाखा अभियंता

२४. श्री. सोनावणे, शाखा अभियंता

२५. श्री. तिजोरे, शाखा अभियंता

२६. श्रीमती छाया अडांगळे, प्र. सहाय्यक आयुक्त

२७. श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक

२८. श्री. एकनाथ पवार, प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक

२९. श्रीम. श्रदा सपकाळे, प्रोग्रामर

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.

१. श्रीमती मनिषा महाजन

२. श्रीमती नर्गिस खान

३. श्री. अशोक रामरख्यानी

४. श्री. बाळु भांगरे

महापालिका सचिव:— आता दुसरी सभा दिनांक १५/०९/२०१७ रोजीची ही सर्व साधारण महासभा सुरू होत आहे.

महापौर तथा पिठासिन अधिकारी:— कल्याण जिल्हा शिवसेना प्रमुख श्री. लांडगे साहेबांचे एक पत्र मिळाले आहे. मी सचिव मॅडमला सांगते की, त्यांनी ते वाचून दाखवावे.

महापालिका सचिव :— हे पत्र मा. पिठासिन अधिकारी यांच्या आदेशान्वये वाचून

दाखवत आहे. मा. महोदया, उल्हासनगर महापालिकेमध्ये विरोधी पक्ष म्हणून शिवसेना सर्वात मोठा पक्ष आहे. तरी

शिवसेना पक्षातर्फे सन्माननिय सदस्य, श्री. धनंजय बोडारे यांची उल्हासनगर महापालिकेच्या आज दिनांक १५/९/२०१७ रोजी

होणा—या महासभेमध्ये विरोधी पक्षनेते पदी निवड जाहीर करण्यात यावी.

महापालिका सचिव:— आता दुसरी सभा ६.१२ मिनीटांनी सभा सुरू होत आहे, अर्धा तास प्रश्नोत्तरासाठी असेल.

प्रश्नोत्तरे.........

**प्रश्न क्र. २:—** १) प्रलंबित प्रश्न क्रमांक २ हा श्री. भारत राजवानी यांचा आहे.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** मॅडम महापौरांकडून घोषणा तर करा. आपण फक्त पत्र वाचले आहे.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** तुम्ही फक्त पत्र वाचले आहे, महापौर घोषणा करतील.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:—** कल्याण जिल्हा शिवसेना प्रमुख, श्री. लांडेगे साहेबांकडून जो आदेश आलेला आहे, मला श्री. शिंदे साहेबांचा पण फोन आला होता. तर मी महासभेमध्ये घोषित करीत आहे की, श्री. धनंजय बोडारे, विरोधी पक्ष नेता म्हणून निवडून आले आहेत.

**महापालिका सचिव :—** प्रश्न क्र. २ हा श्री. भारत राजवानी यांचा आहे, परंतु त्याचे उत्तर आमच्या कार्यालयात प्राप्त झाले नाही.

**प्रश्न क्र. २** महापालिका सेवा मे कार्यरत सफाई कांमगार श्री. राजेंद्र अढांगळे इन्होने शासन और प्रशासन दोनो की दिशाभूल करके सेवा हस्तगत कि है । उनके उपर की गई कारवाई की विस्तृत जानकारी दि जाये।

अ. सफाई कांमगार श्री. राजेंद्र अढांगळे इन्होने बेकायदेशिर तरिको से सेवा प्राप्त की है इस बात के सभी कागद पत्र और पुरावे पालिका प्रशासन के पास उपलब्ध होते हूऐ आज तक उनके उपर निलंबन और फौजदारी गुन्हा दाखल करने की कारवाई नही की गई इसका कारण क्या है?

शासन राजपत्र में नाम बदल कर एक व्यक्ती राज्यसरकार के अलग अलग दो विभाग मे काम कर सकता है ऐसी कानून तजविज पालिका प्रशासन व्दारा की गई हो तो उस बारे में विस्तृत पूरावे के साथ जानकारी दि जाये ।

**सदस्य, श्री. भारत राजवानी:—** अजून किती वेळ लागेल, एप्रिल महीन्यापासून पेंडींग आहे. शेवटच्या महासभेमध्ये आपण सांगितले होते की, या महासभेमध्ये घेणार आहेत. परंतु खुप मोठा भ्रष्टाचार दिसत आहे. आमच्या कुठल्याही प्रश्नाचे उत्तर दिले नाही, सगळेच पेंडींग आहेत. माहीती नाही की, कोण दबाव टाकत आहे.

**उप आयुक्त (मुख्यालय), श्री. संतोष देहेरकर:—** मा. महापौर, उप महापौर, मा. आयुक्त साहेब, सन्माननिय सदस्य, या प्रकरणी ज्या फाईलची छाननी केली असता, असे दिसून आले आहे की, सन्माननिय सदस्यांनी यांच्या विरूध्द तक्रार केलेली होती.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:—** जरा जोरात बोला, ऐकायला येत नाही.

उप आयुक्त (मुख्यालय), श्री. संतोष देहेरकर:— सन्माननिय सदस्यांनी अडांगळे विरूध्द तक्रार केलेली होती, त्या चौकशी संदर्भात तत्कालिन अतिरिक्त आयुक्त, श्री. पाटणकर यांनी चौकशी केलेली होती. परंतु त्यांनी देखील त्या संदर्भात स्पष्ट अभिप्राय दिलेले नव्हते, फाईलमध्ये असे नमुद कलेले आहे की, हे पोलिस विभागाकडे चौकशीसाठी पाठवायचे आहे. पोलिस विभागाकडे आमचे मुख्य लिपीक गेले होते. त्यांनी ते घेण्यास नकार दिला होता आणि त्यांनी सांगितले आहे की, सदर विभागा मार्फत आम्हांला सादर करावा. या संदर्भात आम्ही लेखी स्वरूपात पोलिस स्टेशनला कळवतो की, हे असे आहे आणि आम्हांला चौकशी करून कळवावे. या संदर्भात ही जी कारवाई आहे, ती पुढील दोन दिवसात करण्यात येईल.

सदस्य, श्री. भारत राजवानी:— पोलिसांनी तुम्हांला सांगितले की, हे बरोबर नाही.

उप–आयुक्त (मुख्यालय), श्री. संतोष देहेरकर:— पोलिसांनी आम्हांला फक्त तोंडी सांगितलेले आहे, कोणतेही लेखी स्वरूपात दिलेले नाही.

सदस्य, श्री. भारत राजवानी:— तर आपण रिपोर्ट बरोबर पाठवला नाही.

उप–आयुक्त (मुख्यालय), श्री. संतोष देहेरकर:— त्यांना आम्ही जे काही पत्र दिले होते, त्यावर त्यांनी तोंडी सांगितले आहे. आम्ही त्यांच्याकडून लेखी स्वरूपात मागितले आहोत.

सदस्य, श्री. भारत राजवानी:— मग या विषयाला खुप टाईम पास होईल.

उप–आयुक्त (मुख्यालय), श्री. संतोष देहेरकर:— नाही त्यांनी जर आपल्याला आठ दिवसात दिला तर आम्ही त्वरीत करू.

सदस्य, श्री. भारत राजवानी:— मागच्या वेळेला आयुक्त साहेबांच्या समोर हा विषय आम्ही घेऊन आलो होतो. आयुक्त साहेबांनी याच्यावर चौकशी लावली होती. श्री. मनिष हिवरेला संपुर्ण केस दिली होती. त्यांनी संपुर्ण चौकशी करून आणले होते. त्याचे काय झाले?

उप–आयुक्त (मुख्यालय), श्री. संतोष देहेरकर:— जरी याच्यामध्ये जो कोणी व्यक्ती आहे, रमेश अडांगळे व्यक्तिी आहे, त्यांची चौकशी करण्याची अत्यंत आवश्यक आहे आणि याची पोलिस विभागा मार्फत झाली तर....

सदस्य, श्री. भारत राजवानी:— चौकशी करण्याची काय गरज आहे, जर त्यांचे दुस–या विभागाकडून महाराष्ट्र सरकारकडून आलेले जे पेपर आहेत.

उप–आयुक्त (मुख्यालय), श्री. संतोष देहेरकर:— नाही नाही, या संदर्भात जे...

सदस्य, श्री. भारत राजवानी:— इथे मी स्वत: पेपर दिले आहेत, अजून किती चौकशी करणार आहेत, दोन वर्षे झाली आहेत. आपली हिम्मत होत नाही का त्यांच्यावर कारवाई करण्याची.

उप–आयुक्त (मुख्यालय), श्री. संतोष देहेरकर:— जो पर्यंत ते पुर्ण सिध्द होत नाही, कारण की,तत्कालीन अतिरिक्त आयुक्त यांनी जो काही अहवाल दिलेला आहे.

सदस्य, श्री. भारत राजवानी:— सारखे अधिकारी बदली होत राहतील तर चौकशी पुर्ण होणारच नाही. असे का होत आहे?

उप—आयुक्त (मुख्यालय), श्री. संतोष देहेरकर:— या संदर्भात पोलिस विभागाकडून आल्या नंतर तात्काळ कारवाई करण्यात येईल.

सदस्य, श्री. भारत राजवानी:—जर त्याच्याकडे जातच नाही, चार महीने झाले इथेच पडलेला आहे, आपण सांगत आहेत की, पोलिस स्टेशनला पाठवत आहे.

उप—आयुक्त (मुख्यालय), श्री. संतोष देहेरकर:— हा विषय उदयाच पोलिस स्टेशनला लेखी स्वरूपात पाठविला जाणार आहे आणि त्यांच्याकडून लेखी स्वरूपातच उत्तर घेतले जाईल.

सदस्य, श्री. भारत राजवानी:— हे कधी होईल. आपण सांगितले होते की, नंतरच्या महासभेमध्ये मी देतो. तर मग दोन महीने आपण काय केले?

उप—आयुक्त (मुख्यालय), श्री. संतोष देहेरकर:— सन्माननिय सदस्य, मी आपल्याला सांगितले आहे की, या संदर्भात पोलिस विभागाकडे आमचे मुख्य लिपीक स्वत: तिथे गेलेले आहेत.

सदस्य, श्री. भारत राजवानी:— शेवटच्या महासभेत जेव्हा हा मुद्दा आला होता, त्याच्या पहीले ते पोलिस स्टेशनमध्ये जाऊन आले आहेत. हे काय होत आहे, दोन महीने आपण काय केले? पत्र का लिहीले नाही? त्याचे उत्तर दया.

उप—आयुक्त (मुख्यालय), श्री. संतोष देहेरकर:— या संदर्भात आपल्याला मी बोललेलो आहे, की पोलिस विभागाकडून आम्ही देतो.

सदस्य, श्री. भारत राजवानी:— विषय असा आहे की, एक माणूस दोन ठिकाणी नोकरी करीत आहे, महाराष्ट्र सरकारमध्ये, एक महाराष्ट्र सरकारमध्ये आहे आणि एक आपल्या महापालिकेमध्ये पण आहे आणि इथे त्याचा भाऊ नोकरीला लागला आहे, नाव बदली करून आणि दोन्ही जागी सरकारी नोकरीचा फायदा घेत आहेत. हा विषय आहे.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:— यामध्ये पोलिस चौकशी करणे गरजेचे आहे. यांनी पोलिस स्टेशनमध्ये जाऊन स्वत: ही केस फक्त ओरली सांगितले आहे. त्यांनी सांगितले की, ही केस आमच्या कक्षेमध्ये येत नाही. कालच माझी त्यांच्याशी बोलणे झाले, पोलिस असे ओरली बोलू शकत नाही, आपण तिथे जाणार तर कोणतीही जबाबदारी झटकून देतील. लिखीत जर दिले तर आपल्याला लिखीत उत्तर मिळेल आपण बोलू शकतो की, जो मुद्दा आमच्या विभागाशी निगडीत आहे, ते त्यांचे काम आहे. त्यांचे काम फक्त क्राईम डिटेक्शनचा नाही. असे जे फसवणारे विषय, रिक्रुटमेंटचे विषय आणि महत्वपुर्ण विषय आहेत, त्यामध्ये त्यांची पण जबाबदारी आहे. त्यांचा संबंध फक्त क्राईमशीच नाही, म्हणजे आपण त्यांना बोलू, त्यांना लिखीत देवू की ही चुकी झाली आहे, ती आम्ही मान्य करतो, आपण त्वरीत लिखीत देवू आणि आठ दिवसामध्ये आपण त्याचे उत्तर घेऊ.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:–** मे महीन्यामध्ये पोलिसांकडून काय झाले. आज सप्टेंबर आहे, ४ महीने झाले.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:–** पुढच्या महासभे पर्यंत याचे काहीना काही परिणाम आपल्याला मिळेल.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:–** आपण आठ दिवसात बोलत होते आणि आता तुम्ही नंतरच्या महासभे पर्यंत बोलत आहेत.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:–** आठ दिवसाच्य आत आम्ही पोलिसांना पत्र लिहून पाठवू आणि त्यांचे उत्तर घेऊ. परंतु पोलिसांना चौकशी करण्यासाठी वेळ लागेल.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:–** ठिक आहे, एकदा कारवाई चालू झाली तर, तो स्वत: चौकशीत येईल.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:–** बरोबर आहे. बकरीची आई पण ज्यास्त दिवस खैर करू शकत नाही

**सदस्य, श्री. भारत राजवानी:–** घन्यवाद.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:–** साहेब बकरा कोण आणि आई कोण सांगा?

**सदस्य, श्री. भारत राजवानी:–** सचिव मॅडम, माझा प्रश्न मागच्या वेळेस जो पेडींग होता, तो आला नाही.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:–** साहेब कृपया करून खुलासा व्हावा की, बकरा कोण आणि आई कोण?

**महापालिका सचिव:–** खरे तर त्याच दिवशी मा. आयुक्त साहेबांनी आपल्याला याचे उत्तर दिले आहे. संबधित नगररचाना विभागाचा प्रश्न आहे आणि त्यावर आपण चर्चा केली आहे. तर नियमानुसार मौखिक किंवा लेखी उत्तर दिले आहे. जर आपल्याला अजून प्रश्न असतील तर नगररचना विभागातून संबंधितांना बोलवावे लागेल.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:–** इतिवृत्तात दिले आहे, आले आहे की, नंतरच्या महासभेमध्ये परत यायला पाहीजे आणि आयुक्त साहेबांनी सांगितले की ठिक आहे, ११ नंबर पानावर आहे.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:–** या प्रश्नाचे संबंधित जे अधिकारी आहेत, ते इथे नाहीत, त्यांना दुसरे पण चार्ज आहेत. परंतु कल्याण अंबरनाथ रोडच्या विषय मी मागच्या वेळेस डिटेल चर्चा केली आहे. त्याचे जे अलायमेंट आम्ही जे फायनल करणार आहेत आणि रोड डिव्हाईड त्यानुसार करणार आहेत आणि त्याच विषयी कोर्टात केस दाखल झाली आहे आणि त्यामध्ये कोर्टने सांगितले की, जेव्हा डि.पी. फायनल होईल, तेव्हा त्याचे जजमेंट आपल्याला मिळेल. तर आता प्रत्येक महीन्याला असे वाटते की, या महीन्याच्या शेवटी डि. पी. आपल्याला मिळेल. काही दिवसा नंतर आपल्याला मिळेल. त्याच्या नंतर कोर्टाची केस निकाली निघेल आणि त्याच्या नंतर जर कोर्ट आपले म्हणणे मान्य करेल तर त्या डिव्हाइडरच्या नुसार चालेल. जर कोर्ट सांगेल की आपल्याला डि.पी. फॉलो करायचा आहे. तर आज जे २५ ते ३० लोक कोर्टात गेले आहेत, ते लोक वाचतील, परंतु नविन आणखी दोन लोक धोक्यात येतील.

सदस्य, श्री. भारत राजवानीः— दुसरा आपण बोलले होते की, मी आयुक्तांचे जेवढे पावर वापरून ते काम करील.

या वेळी सदस्य, श्री. रविंद्र बागुल व सदस्या श्रीम. जया माखिजा सभागृहातून बाहेर गेल्या.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकरः— तेच केले मी.

सदस्य, श्री. भारत राजवानीः— परंतु कोर्टामध्ये महाराष्ट्र सरकारच्या सरेंडरने सांगितले आहे की, आयुक्तांना कोणतेच पावर नाहीत, डि.पी. मध्ये अलायमेंट चेंज करण्याची त्याची एक प्रत मी आपल्याला देतो.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकरः— त्याचा असा अर्थ नाही, त्यांनी वेगळे लिहीले आहे, मी पण वाचले आहे.

सदस्य, श्री. भारत राजवानीः— पहील्या याच्यातच आहे.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकरः— इन यूअर दि अभव अ पर्चेस सबमिशन आय से दॅट कमिशनर हॅज नो पॉवर अॅज दि ऑथोरिटी टू अमेंड ऑर मॉडीफाईड दि डेव्हलपमेंट प्लॅान ते मला सुध्दा माहीत आहे. आई कॉन नॉट मॉडीफाय दि डेव्हलपमेंट प्लॅान व्हिच इज अप्रुल फॉर दि जनरल बॉडी ऑफ कॉरपोरेशन हॉओएवर इन अकार्डिग विथ दि रूल ६.६.२.१ ऑफ दि सॅन्शन डेव्हलपमेंट प्लॅान रेग्युलेशन दि कमिशनर ऑफ दि चिफ ऑफिसर मे इंटर प्रेट दि प्रोव्हिजन ऑफ रूल इन केसेस वेयर स्ट्रीट ले आऊट ऍक्च्युअल ऑन दि ग्राउंड वेअर इज फ्रॉम स्ट्रीट ले आऊट एज इफ्क्टेड ऑन दि डेव्हलपमेंट प्लॅान तेच केले आहे. इंटरप्रिटेशन ऑफ दि ईलायमेंट, मी सांगितले आहे की, माझ्या माहीती प्रमाणे डिव्हायडर ही होईला पाहीजे. डि.पी.च्या हिशोबाने २५ लोकांना वाचवण्यासाठी आपल्याला अजून १०० लोकांना धोक्यात येतील आणि अजून प्रेशर वाढेल आणि कल्याण आणि अंबरनाथ रोडचा हा जो डि.पी. प्लॅान आहे, त्याला परिणाम देण्यासाठी आणखी वेळ लागेल.

सदस्य, श्री. भारत राजवानीः— त्या वेळेस विचार करायला पाहिजे होता की, सगळयांना एकाच नजरेने बघायला पाहीजे होते. परंतु असे झाले नाही.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकरः— पहिलेचे गाडलेले मुडदे किती खोदून काढणार?

सदस्य, श्री. भारत राजवानीः— मग प्रत्येक वेळेस लोक बोलत राहतील आणि प्रशासन आपली मर्जी चालवेल.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकरः— प्रशासनाच्या मर्जीनुसार नाही तर आम्ही त्रास कमी होईल, समस्या कमी होतील असा रस्ता निवडला आहे. जर मी डि.पी. ला स्ट्रिकली फॉलो करायला जातो तर जे लोक माझ्याकडे ऑब्जेक्शन घेऊन आले आहेत, ते आनंदीत होतील. परंतु लाईन परत तिकडे सरकून जाईल. ५ किंवा १० फुट तर मग ते लोक कोर्टात जातील. पहीले रोड डिव्हाईडर फायनल केले होते. आता या

लोकांच्या प्रेशरमध्ये हे करत आहे. तर कोर्ट पण गोंधळून जाईल की, खरे काय आहे? काही लोकांना फेवर करण्यासाठी जास्त लोकांना त्रास होत आहे, कोर्ट परत स्टे देईल.

सदस्य, श्री. भारत राजवानी:— साहेब जी बाजु कटींगसाठी देत आहेत....

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:— जी पण मी ऑर्डर पास केली आहे, मी आपल्याला सांगतो, जर त्यामध्ये मुलभुत चुक होत असेल तर कोर्ट त्याच वेळी केस स्विकार करून माझी ऑर्डर रद्द करेल. कोर्टाने माझी ऑर्डर सबजेक्ट टू डि.पी.ॲप्रुव्ल ठेवले आहे, त्यामुळे माझी ऑर्डर बरोबर आहे. फक्त कोर्ट यासाठी थांबले आहे की, यामध्ये डि.पी. फायनली जी पोझीशन आहे, ते माझ्या ऑर्डर प्रमाणे होत आहे. या डि.पी.मध्ये त्यांनी डिव्हायडरच्या बदल्यात डि.पी.लाच फायनल केले तर माझी ऑर्डर चुकीची होईल.

सदस्य, श्री. भारत राजवानी:— ठिक आहे.

महापालिका सचिव:— आपल्या या प्रश्नाचे उत्तर म्हणून मा.आयुक्त साहेबांनी उत्तर दिले आहे, हा प्रश्न पुढच्या महासभेत ....

सदस्य, श्री. भारत राजवानी:— बाकीच्या विभागांचे, नगररचना विभागाचे आहेत त्यांचे उत्तर यायला पाहीजेत.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:— कोणाची सनद आहे, कोणाचे यु आहे, माझ्या जवळ पण ऑर्डर आहे. एबस्ट्रेक्स सगळे आहे. फक्त किती लोकांना ओरीजनल नोटीस दिली होती त्याचे माझ्या जवळ नंबर नाही. फक्त फायनल ज्यांचे अपिल माझ्याकडे आले होते, त्यांचीच मी हियरींग घेतली होती. बाकी टोटल कल्याण अंबरनाथा रोडमध्ये उजव्या बाजूला किती आहे आणि डाव्या बाजूला किती आहे, ते बघावे लागेल.

सदस्य, श्री. भारत राजवानी:— ठिक आहे, नंतरच्या महासभेमध्ये उत्तर दया.

महापालिका सचिव:— उत्तर देण्यासाठी किंवा पेडींग ठेवायचा.

सदस्य, श्री. भारत राजवानी:— उत्तर दया.

महापालिका सचिव:— हा प्रश्न परत समावेश केला जाईल,

महापालिका सचिव :— प्रश्न क्र. १० हा श्री. भगवान भालेराव यांचा आहे.

प्रश्न क्र. १०:— उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा दिनांक २०/८/२०१६ रोजी झाली होती. सदर सभेमध्ये नगररचनाकार श्री. कर्पे यांनी चुकीच्या पध्दतीने वाढीव मजल्याचे (सुधारीत) चटईक्षेत्र निर्देशांकाचे उल्लंघन करुन विकासकाच्या आर्थिक हिताचे प्लॅन मंजूर केले आहेत, अशी चर्चा घडवून आणली. त्या चर्चेच्या शेवटी महापौर तथा मा. पीठासीन अधिकारी यांनी उत्तर देतांना मंजूर

केलेला प्लॅन नियमानुसार तपासला किंवा नाही.  तसेच उच्च नगररचना विभागामार्फत जोपर्यंत श्री. कर्पे साहेब यांनी केलेल्या प्लॅनची छाननी होत नाही तोपर्यंत स्थगिती दयावी असे आदेश दिले असतांना मग त्या प्लॅनची कामे कोणत्या आदेशाने व कोणाच्या देखरेखीखाली सुरु आहेत याचे उत्तर येणा—या महासभेत मिळावे, जेणेकरुन सदनीका विकत घेणा—याची कोणतीही फसवणूक होणार नाही, ही विंती.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u>** नगररचनाकार, श्री. करपे यांच्या कालावधीमध्ये ३८ प्लॉन, नगररचना विभागाची लोकच नाहीत, तरी हा प्रश्न राखून ठेवावा. पुढच्या महासभेत घ्यावा.

**<u>महापालिका सचिव :—</u>** प्रश्न क्र. ११ हा श्री. भारत राजवानी यांचा आहे.

**?** **<u>प्रश्न क्र. ११</u>** उल्हासनगर मनपा के गत कार्यालय में कार्यरत जिन मनपा सदस्योंने पार्टी बदलकर फरवरी, २०१७ का चुनाव लढा, उनकी पक्षांतर को लेकर अपात्रता हो सकती है क्या?

अ. उल्हासनगर मनपा के गत कार्यकाल में कौनकौनसे सदस्योंने फिरसे चुनाव लडा? कौनकौनसे कितने सदस्योंने अपनी गत कार्यकाल की पार्टी बदलकर चुनाव लडा?

ब. इनमेंसे कितने सदस्योंने अपने गत कार्यकाल के पद का इस्तिफा आयुक्त महोदय को सौंपा था और आयुक्त महोदय ने उसपर क्या कारवाई की?

क. इन सदस्यों के अपात्र घोषित करने हेतू मनपा को शिकायते प्राप्त हुई है क्या? उनकपर मनपा प्रशासन ने क्या कारवाई की?

ड. फरवरी और मार्च माह में कितने सदस्यों को नगरसेवक मानधन की राखी दी गई?  उनके नाम क्या?

<u>उत्तर:—</u> उल्हासनगर महानगरपालिका नियम १९९७ महापालिका, स्थायी समिती, परिवहन समिती इत्यादीचे कामकाजा विषयी नियम ५ ब) अन्वये पुढील प्रकारचा कोणताही प्रश्न विचारता कामा नये. एक) ज्यात मत व्यक्त करण्याविषयी किंवा तात्विक कायदे विषयक प्रश्नावर निर्णय देण्याविषयी मागणी  करण्यात आली असेल किंवा जो गृहत गोष्टींच्या अनुषंगाने असेल असा कोणताही प्रश्न. आपल्या अवलोकनार्थ सादर.

अ. यामध्ये एकुण ३१ सदस्यांनी परत निवडणूक लढविली. सोबत यादी जोडली आहे. तसेच कोणकोणत्या सदस्यांनी पार्टी बदलुन निवडणूक लढविली त्याची यादी सोबत जोडली आहे.

ब. आयुक्त महोदयांकडे राजीनामा दिला जात असतो.  परंतु त्याबाबतचा कोणताही अहवाल या कार्यालयास आयुक्त महोदयांकडुन प्राप्त झालेला नाही.

क. श्री. राज असरोंडकर, संस्थापक, कायदयाने वागा यांच्याकडुन मा. आयुक्त महोदयांकडे तक्रार प्राप्त झाली होती. परंतु सदर पत्रात अनेक मुद्दयांपैकी ही एक तक्रार होती. परंतु सदर बाब ही मा. आयुक्तांच्या कार्यकक्षेत येत नाही.

ड. फेब्रुवारी व मार्च महिन्यातील मानधन सर्व सदस्यांना देण्यात आले आहे.  त्याची यादी सोबत जोडली आहे.

| अ.क्र. | या वर्षी निवडून आलेले | २०१२ नंतर २०१७ मध्ये पक्ष बदलला |
|---|---|---|
| | | |

| | मागील वर्षाचे सदस्य | असेल तर तो पक्ष |
|---|---|---|
| १ | श्रीमती अर्चना गोकुळ करनकाळे | |
| २ | श्रीमती जयश्री पाटील | साई पक्षातुन भारतीय जनता पक्ष |
| ३ | श्री. हरेश जग्यासी | |
| ४ | श्रीमती मिनाकौर लबाना | |
| ५ | श्री. जमनादास पुरस्वानी | |
| ६ | श्रीमती आशा बि–हाडे | आरपीआय पक्षातुन भारतीय जनता पक्ष |
| ७ | श्रीमती मिना आयलानी | |
| ८ | श्रीमती रेखा ठाकुर | राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षतुन भारतीय जनता पक्ष |
| ९ | श्रीमती जया माखिजा | |
| १० | श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग | राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षातुन भारतीय जनता पक्ष |
| ११ | श्री. राजेश वदारिया | कॉंग्रेस पक्षातुन भारतीय जनता पक्ष |
| १२ | श्री. राजेश वानखेडे | अपक्षातुन भारतीय जनता पक्ष |
| १३ | श्रीमती मिना सोनेजी | कॉंग्रेस पक्षातुन भारतीय जनता पक्ष |
| १४ | श्री. विजय चाहु पाटील | अपक्षातुन भारतीय जनता पक्ष |
| १५ | श्रीमती ज्योती दिलीप गायकवाड | |
| १६ | श्री. राजेंद्रसिंह भुल्लर | |
| १७ | श्रीमती चरणजितसिंहकौर भुल्लर | |
| १८ | श्रीमती पुष्पा बागुल | आरपीआय पक्षातुन शिवसेना पक्ष |
| १९ | श्रीमती राजश्री चौधरी | |
| २० | श्रीमती शुभांगी बेहनवाल | राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षतुना शिवसेना पक्ष |
| २१ | श्री. रमेश चव्हाण | |

| | | |
|---|---|---|
| २२ | श्रीमती लिलाबाई आशान | |
| २३ | श्री. सुनिल सुर्वे | अपक्षातुन शिवसेना पक्ष |
| २४ | श्री. धनंजय बोडारे | |
| २५. | श्रीमती वसुधा बोडारे | |
| २६. | श्री. भगवान भालेराव | |
| २७ | श्रीमती इंदिरा उदासी | साई पक्षातुन अपक्ष |
| २८ | श्री. दिपक सिरवानी | |
| २९ | श्रीमती कांचन लुंड | कॉंग्रेस पक्षातुन साई पक्ष |
| ३० | श्रीमती दिप्ती दुधानी | कॉंग्रेस पक्षातुन साई पक्ष |
| २१ | श्री. सतरामदास जेसवानी | |

## माहे फेब्रुवारी २०१७ मध्ये मानधन दिलेल्या सदस्यांची यादी

| अ. क्र. | प्रभाग क्र. | पालिका सदस्यांचे नाव |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | १ | श्रीमती बेबी उर्फ नेहा नंदकूमार भोईर |
| २ | | श्री. राजेश रामसिंग कंडारे |
| ३ | २ | श्रीमती जयश्री ज्ञानेश्वर पाटील |
| ४ | | श्री. राम (चार्ली) पारवाणी |
| ५ | ३ | श्रीमती अर्चना गोकूळ करणकाळे |
| ६ | | श्रीमती ज्योती दिलीप गायकवाड |
| ७ | ४ | श्रीमती मीना कौर अजित सिंग लबाना |
| ८ | | श्री. जमनादास खुबचंद पुरसवाणी |
| ९ | ५ | श्रीमती आशा नाना बिराडे |
| १० | | श्री. भुल्लर राजेंद्रसिंग विरसिंग |

| | | |
|---|---|---|
| ११ | ६ | सौ. वंदना युवराज भदाणे उर्फ वंदना पाटील |
| १२ | | श्रीमती चरणजितकौर राजेंद्रसिंग भुल्लर |
| १३ | ७ | श्रीमती पुष्पा मिलींद (नाना) बागुल |
| १४ | | डॉ. महेश गजानन गावडे |
| १५ | ८ | श्रीमती अनिता संतोष तरे ——— **(अनर्ह मानधन दिले नाही.)** |
| १६ | | श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के ——— **(अनर्ह मानधन दिले नाही.)** |
| १७ | ९ | श्री. विजय खंडु सुपाळे |
| १८ | | श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी |
| १९ | १० | श्रीमती शुभांगी मनोहर बेहनवाल |
| २० | | श्री. नरेंद्र वामन (रवीभाऊ) दवणे |
| २१ | ११ | श्री. दिलीपकुमार देवीदास जग्यासी |
| २२ | | श्रीमती आशा जीवन इदनानी |
| २३ | १२ | डॉ. नीना प्रकाश नाथानी |
| २४ | | श्रीमती मीना कुमार आयलानी |
| २५ | १३ | श्रीमती रेखा ए. ठाकुर |
| २६ | | श्री. राजेश नानिकराम वधरिया |
| २७ | १४ | श्री. हरेश परमानंद जग्यासी |
| २८ | | श्रीमती जया प्रकाश माखीजा |
| २९ | १५ | श्री. पृथ्वी व्यापारीलाल वलेचा |
| ३० | | श्रीमती ज्योती सुरेश कालानी |
| ३१ | १६ | श्री गणपत गोविंद एडके |
| ३२ | | श्रीमती शशिकला शिवाजी आवारे |
| ३३ | १७ | श्री भगवान शंकर भालेराव |
| ३४ | | श्रीमती लक्ष्मी सुरेद्र सिंग |

| | | |
|---|---|---|
| ३५ | १८ | श्रीमती मिनू राजकुमार दासानी |
| ३६ | | श्री उमेश (ओमी) सुरेश कालानी |
| ३७ | १९ | श्रीमती विनिता संजय भटिजा |
| ३८ | | श्री. नरेंद्र ठाकुर (कुमारी) |
| ३९ | २० | श्रीमती आशा प्रभुनाथ गुप्ता |
| ४० | | श्री सुजीतकुमार के. चक्रवर्ती |
| ४१ | २१ | श्री गोदुमल नारायणदास किशनानी |
| ४२ | | श्रीमती कमला गोदुमल किशनानी |
| ४३ | २२ | श्रीमती इंदिरा जमनादास उदासी |
| ४४ | | श्री दिपक लछमनदास सिरवानी |
| ४५ | २३ | श्रीमती पंचशीला नाना पवार |
| ४६ | | श्रीमती इसरद सऊद खान |
| ४७ | २४ | श्री राजकुमार जग्यासी |
| ४८ | | श्रीमती सोनिया राजकुमार जग्यासी |
| ४९ | २५ | श्रीमती लिलाबाई लक्ष्मण आशान |
| ५० | | श्रीमती वसुधा धनंजय बोडारे |
| ५१ | २६ | श्रीमती शकुंतला जग्यासी |
| ५२ | | श्री धनंजय बाबूराव बोडारे |
| ५३ | २७ | श्रीमती जयश्री जीवनलाल जग्यासी |
| ५४ | | श्री सुभाष मलन्ना मनसुलकर |
| ५५ | २८ | श्रीमती जयश्री गजानन कांबळी (मयत)( मानधन दिले नाही.) |
| ५६ | | श्री सुनिल मुकुंद सुर्वे |
| ५७ | २९ | श्रीमती मंदा सागर सोनकांबळे |
| ५८ | | श्री सुरेश मधुकर जाधव |

| | | |
|---|---|---|
| ५९ | ३० | रौला पांडुरंग सोनताटे |
| ६० | | श्री विजय रामभाऊ तायडे |
| ६१ | ३१ | श्रीमती अनिता सचिन भानुशाली |
| ६२ | | श्री रमेश महादेव चव्हाण |
| ६३ | ३२ | श्रीमती पिंकी मुरलीधर उदासी **(सदस्यांच्या मागणीनुसार माहे फेब्रुवारीचे मानधन याच महिन्यात देण्यात आले..)** |
| ६४ | | श्रीमती कांचन अमर लुंड |
| ६५ | ३३ | श्रीमती दिप्ती नवीन दुधानी **((सदस्यांच्या मागणीनुसार माहे फेब्रुवारीचे मानधन याच महिन्यात देण्यात आले..)** |
| ६६ | | श्री सतराम फ. जेसवानी |
| ६७ | ३४ | श्रीमती जया मोहन साधवानी |
| ६८ | | श्रीमती पुष्पा रामचंद (गंगोत्री) राजवानी |
| ६९ | ३५ | श्रीमती अंजली चंद्रकांत साळवे |
| ७० | | श्री राजेश देवेंद्र वानखेडे |
| ७१ | ३६ | श्रीमती मीना दिपक सोनेजी (सोंडे) |
| ७२ | | श्री गुरूनो भिकोमल वलेचा |
| ७३ | ३७ | श्री विजय चाहु पाटील |
| ७४ | | श्रीमती माया हरेश चावला |
| ७५ | ३८ | श्रीमती समिधा आदिनाथ कोरडे |
| ७६ | | श्री जयेंद्र चंद्रकांत मोरे |
| ७७ | ३९ | श्रीमती अपेक्षा विकास पाटील |
| ७८ | | श्री प्रधान धर्मा पाटील |
| | नामनिर्देशित सदस्य | श्री. मनोज दिलीप सयानी |
| ८० | | श्री. सन्मुख ग्यानचंद मनवानी |
| ८१ | | श्री. राजु (जीवन) चंद्रभान इदनानी |

| | | |
|---|---|---|
| ८२ | | श्री. प्रदिप अर्जुनदास रामचदांनी |
| ८३ | | श्री. बी. बी. मोरे |

## माहे मार्च २०१७ मध्ये मानधन दिलेल्या सदस्यांची यादी

| अ. क्र. | प्रभाग क्र. | पालिका सदस्यांचे नाव |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | १ | श्रीमती बेबी उर्फ नेहा नंदकूमार भोईर |
| २ | | श्री. राजेश रामसिंग कंडारे |
| ३ | २ | श्रीमती जयश्री ज्ञानेश्वर पाटील |
| ४ | | श्री. राम (चार्ली) पारवाणी |
| ५ | ३ | श्रीमती अर्चना गोकूळ करणकाळे |
| ६ | | श्रीमती ज्योती दिलीप गायकवाड |
| ७ | ४ | श्रीमती मीना कौर अजित सिंग लबाना |
| ८ | | श्री. जमनादास खुबचंद पुरसवाणी |
| ९ | ५ | श्रीमती आशा नाना बिराडे |
| १० | | श्री. भुल्लर राजेंद्रसिंग विरसिंग |
| ११ | ६ | सौ. वंदना युवराज भदाणे उर्फ वंदना पाटील |
| १२ | | श्रीमती चरणजितकौर राजेंद्रसिंग भुल्लर |
| १३ | ७ | श्रीमती पुष्पा मिलींद (नाना) बागुल |
| १४ | | डॉ. महेश गजानन गावडे |
| १५ | ८ | श्रीमती अनिता संतोष तरे **(अनर्ह मानधन दिले नाही.)** |
| १६ | | श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के **(अनर्ह मानधन दिले नाही.)** |
| १७ | ९ | श्री. विजय खंडु सुपाळे |

| | | |
|---|---|---|
| १८ | | श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी |
| १९ | १० | श्रीमती शुभांगी मनोहर बेहनवाल |
| २० | | श्री. नरेंद्र वामन (रवीभाऊ) दवणे |
| २१ | ११ | श्री. दिलीपकुमार देवीदास जग्यासी |
| २२ | | श्रीमती आशा जीवन इदनानी |
| २३ | १२ | डॉ. नीना प्रकाश नाथानी |
| २४ | | श्रीमती मीना कुमार आयलानी |
| २५ | १३ | श्रीमती रेखा ए. ठाकुर |
| २६ | | श्री. राजेश नानिकराम वधरिया |
| २७ | १४ | श्री. हरेश परमानंद जग्यासी |
| २८ | | श्रीमती जया प्रकाश माखीजा |
| २९ | १५ | श्री. पृथ्वी व्यापारीलाल वलेचा |
| ३० | | श्रीमती ज्योती सुरेश कालानी |
| ३१ | १६ | श्री गणपत गोविंद एडके |
| ३२ | | श्रीमती शशिकला शिवाजी आवारे |
| ३३ | १७ | श्री भगवान शंकर भालेराव |
| ३४ | | श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग |
| ३५ | १८ | श्रीमती मिनू राजकुमार दासानी |
| ३६ | | श्री उमेश (ओमी) सुरेश कालानी |
| ३७ | १९ | श्रीमती विनिता संजय भटिजा |
| ३८ | | श्री. नरेंद्र ठाकुर (कुमारी) |
| ३९ | २० | श्रीमती आशा प्रभुनाथ गुप्ता |
| ४० | | श्री सुजीतकुमार के. चक्रवर्ती |
| ४१ | २१ | श्री गोदुमल नारायणदास किशनानी |

| | | |
|---|---|---|
| ४२ | | श्रीमती कमला गोदुमल किशनानी |
| ४३ | २२ | श्रीमती इंदिरा जमनादास उदासी |
| ४४ | | श्री दिपक लछमनदास सिरवानी |
| ४५ | २३ | श्रीमती पंचशीला नाना पवार |
| ४६ | | श्रीमती इसरद सऊद खान |
| ४७ | २४ | श्री राजकुमार जग्यासी |
| ४८ | | श्रीमती सोनिया राजकुमार जग्यासी |
| ४९ | २५ | श्रीमती लिलाबाई लक्ष्मण आशान |
| ५० | | श्रीमती वसुधा धनंजय बोडारे |
| ५१ | २६ | श्रीमती शकुंतला जग्यासी |
| ५२ | | श्री धनंजय बाबूराव बोडारे |
| ५३ | २७ | श्रीमती जयश्री जीवनलाल जग्यासी |
| ५४ | | श्री सुभाष मलन्ना मनसुलकर |
| ५५ | २८ | श्रीमती जयश्री गजानन कांबळी **(मयत)( मानधन दिले नाही.)** |
| ५६ | | श्री सुनिल मुकुंद सुर्वे |
| ५७ | २९ | श्रीमती मंदा सागर सोनकांबळे |
| ५८ | | श्री सुरेश मधुकर जाधव |
| ५९ | ३० | ौला पांडुरंग सोनताटे |
| ६० | | श्री विजय रामभाऊ तायडे |
| ६१ | ३१ | श्रीमती अनिता सचिन भानुशाली |
| ६२ | | श्री रमेश महादेव चव्हाण |
| ६३ | ३२ | श्रीमती पिंकी मुरलीधर उदासी |
| ६४ | | श्रीमती कांचन अमर लुंड |
| ६५ | ३३ | श्रीमती दिप्ती नवीन दुधानी |
| ६६ | | श्री सतराम फ. जेसवानी |

| | | |
|---|---|---|
| ६७ | ३४ | श्रीमती जया मोहन साधवानी |
| ६८ | | श्रीमती पुष्पा रामचंद (गंगोत्री) राजवानी |
| ६९ | ३५ | श्रीमती अंजली चंद्रकांत साळवे |
| ७० | | श्री राजेश देवेंद्र वानखेडे |
| ७१ | ३६ | श्रीमती मीना दिपक सोनेजी (सोंडे) |
| ७२ | | श्री गुरूनो भिकोमल वलेचा |
| ७३ | ३७ | श्री विजय चाहु पाटील |
| ७४ | | श्रीमती माया हरेश चावला |
| ७५ | ३८ | श्रीमती समिधा आदिनाथ कोरडे |
| ७६ | | श्री जयेंद्र चंद्रकांत मोरे |
| ७७ | ३९ | श्रीमती अपेक्षा विकास पाटील |
| ७८ | | श्री प्रधान धर्मा पाटील |
| | नामनिर्देशित सदस्य | श्री. मनोज दिलीप सयानी |
| ८० | | श्री. सन्मुख ग्यानचंद मनवानी |
| ८१ | | श्री. राजु (जीवन) चंद्रभान इदनानी |
| ८२ | | श्री. प्रदिप अर्जुनदास रामचदांनी |
| ८३ | | श्री. बी. बी. मोरे |

महापालिका सचिव :— आयुक्त साहेब, उत्तर देवू शकतात, जर साहेबांच्या उत्तरांनी तुम्ही समाधानी नसाल तर घेण्यात येईल.

सदस्य, श्री. भारत राजवानी:— यामध्ये नगरसेवकांनी पार्टी बदलून निवडणूक लढवली त्यांच्यावर काय कारवाई केली.

महापालिका सचिव :— आपण हा जो प्रश्न विचारला आहे, जे नगरसेवक पक्षांतर्गत करून गेले,त्यांच्येवर काय कार्यवाही केला आपला प्रश्न असा आहे. पक्षांत्तर, अर्नह निर्णय,घेण्याचा अधिकार मा. विभागीय आयुक्त यांना

आहे. त्यामुळे इथून कार्यवाही अपेक्षित नाही. आपण तिथे जर अपिल केले आणि तेथून जर काही आमच्याकडे आले तर मग आम्ही पुढची कारवाई करू.

सदस्य, श्री. भारत राजवानी:– ठिक आहे, यामध्ये श्री. राज असरोंडकर यांनी जी तक्रार केली होती. त्यांच्याकडे विभागीय आयुक्तांचे एक पत्र आले आहे, आयुक्तच यावर कारवाई करतील.

महापालिका सचिव :– ते पत्र आम्हांला प्राप्त झाले नाही, त्यामुळे आम्ही...

सदस्य, श्री. भारत राजवानी:– त्याची प्रत मी आपल्याला देतो.

महापालिका सचिव:– आपण हे पत्र आयुक्त साहेबांना दयायचे, त्यांनी हा निर्णया घ्यायचा आणि नंतर महासभेकडे येईल.

सदस्य, श्री. भारत राजवानी:– विभागीय आयुक्तांनी, आयुक्त साहेबांना लिहीले आहे.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:– हे पत्र माझ्या माहीती प्रमाणे में महीन्यामध्ये आले आहे. मधल्या काळामध्ये पण माझ्याशी बोलले नाही, मी पनवेलला असतांना त्या कालावधीमध्ये आलेले आहे. हा विषय मला माहीत नाही, मी बाघून सांगेल.

सदस्य, श्री. भारत राजवानी:– ठिक आहे, नंतरच्या महासभेमध्ये सांगा. मॅडम राखून ठेवा प्रश्न

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:– डिटेल्स मला माहीत नाही, परंतु आपण पहीले मला भेटा.

सदस्य, श्री. भारत राजवानी:– ठिक आहे, मी तुम्हांला भेटतो.

महापालिका सचिव:– हा प्रश्न पण राखून ठेवण्यात येत आहे, पुढच्या महासभेत घेण्यात येईल.

प्रश्न क्र. १२ हा श्री. सतरामदास जेसवानी यांचा आहे.

प्रश्न क्र. १२:– सफाई विभाग की ओर से मिले सफाई कामगार कब रिटायर हुए? कब मुत्यु हुए? या कब से गैरहजिर है? इसकी जानकारी महासभा में दिलाये ताकी उसपर चर्चा हो। हिरामन राजू आनंदा कब रिटायर हुए।लक्ष्मीबाई सफाई कामगार की कब मृत्यू हूई दिपक लोखंडे कब से गैरहाजिर रहा है।इनको मिला हुआ काम किये जाने के लिये सफाई विभाग में कोई अन्य सफाई कामगार भेजा हुआ है क्या या नही?

**उत्तर:—** _सदर उक्त कर्मचाऱ्यांच्या जागेवर अन्य कोणतेही कामगार उपलब्ध झालेले नाही. तरी प्रभागातील सफाई कामगारामार्फत प्रभागातील साफ—सफाईचे काम करून घेण्यात येत असतेहिरामन राजु आनंदा नावाचा कोणताही सफाई कार्मचारी नाही सदर कर्मचारी यांचे नांव हिरामण कोंडीबा वालेकर असे असुन हा कर्मचारी दिनांक ३१/०३/२०१५ रोजी स्वेच्छा सेवानिवृत्त झाले आहे.लक्ष्मी राजु लोखंडे सफाई कामगार यांचा दिनांक १८/०२/२०१६ रोजी मृत्यु झाला आहे दिपक बबन लोखंडे सफाई कामगार दिनांक २१/१०/२०१५ रोजी पासुन टि.बी. लिव्ह वर आहे.सदर उक्त कर्मचाऱ्यांच्या जागेवर अन्य कोणतेही कामगार उपलब्ध झालेले नाही. तरी प्रभागातील

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:—** कृपया करून माझ्या लक्षात आणून दया, कोणता प्रश्न आहे. खुप उशिर झाला आहे. वाचून दाखवला तर बरे होईल.

**महापालिका सचिव :—** सफाई विभागामध्ये सफाई कामगार कब रिटायर हुए, कब मुंत्यू हुए या कबसे गैरहजर है। इनकी जानकारी महासभेमध्ये दिलाए। की उस पर चर्चा हो।

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:—** त्याचे उत्तर दिले आहे.

**महापालिका सचिव:—** उत्तर आहे, राजू आनंदा वाघमारे, सफाई कामगार दिनांक २९/४/२०१५ रोजी वैद्यकीय सेवानिवृत्त झाले आहेत. दुसरा आहे हिरामण राजू आनंदा कधी सेवानिवृत्त झाले, हिरामण राजू आनंदा नावाचा कोणताही कर्मचारी नाही. सदर कर्मचा—याचे नाव कोंडीराम वालेकर असून हा कर्मचारी दिनांक ३१/०३/२०१५ रोजी स्वेच्छा सेवानिवृत्त झाले आहेत. आपला प्रश्न आहे, लक्ष्मीबाई सफाई कामगाराची मुंत्यू कधी झाली लक्ष्मीबाई राजू लोखंडे, सफाई कामगार दिनांक १८ जुन, २०१६ रोजी मुंत्यू झाला. नंतर आहे, दिपक लोखंडे कधीपासून गैरहजर आहे. श्री. दिपक बबन लोखंडे सफाई कामगार दिनांक २१/१०/२०१५ रोजी पासून टी.बी. लिव्ह वर आहे. त्याच्या जागेवर काम करण्यासाठी अन्य दुसरा सफाई कामगार पाठवला आहे का नाही? सदर कर्मचा—याच्या जागेवर अन्य कोणतेही कामगार उपलब्ध झालेले नाहीत. तरी प्रभागातील सफाई कामगारां मार्फत प्रभागातील साफसफाईचे काम करून घेण्यात येत असते, हे उत्तर आहे.

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:—** ज्या सफाई कामगाराचा मुत्यू झाला आणि जे सेवानिवृत्त झाले, त्यांच्या जागी दुसरे कोणी कामगार मिळाले नाही. तर साफसफाई कोणी केली. कृपया याचा खुलासा करा. साफसफाई कशी झाल? कोणाी केली? कोणताही सफाई कामगार त्याच्या मनानुसार काम करेल का? जर त्यांच्या जागेवर दुसरा कोणी सफाई कामगार दिला नाही तर जनते बरोबर अन्याय का होत आहे? नगरसेवकांना त्रास का दिला? असे निर्णय उशिरा का घेतले जातात? असे ठोस निर्णय तर त्वरीत व्हायला पाहीजेत. संबंधित अधिकारी काय करतात? कारण सेवानिवृत्ती होतच राहतील, काही वय जास्त झाल्याने, आजारी असल्यामुळे कामगार मुंत्यू होत जातील. तर मग तिथे काम कोण करणार. नाही तर नगरसेवकांना अशी माहीती दया की, ते झाडू मारायला शिकतील. फावडा चालवायला शिकेल, त्या साठी एक नियम बनविण्यात यावे. नगरसेवक स्वत: उभे राहतील, ज्यांना हे काम येते. परंतु लोकांना काम पाहीजे, लोकांना साफसफाई पाहीजे. साफसफाई करून घेणे हे नगरसेवकाचे कर्तव्य आहे. बाहेरच्या कामगारांची मदत घेतलेलीच नाही तर साफसफाईचे काम कसे झाले? आयुक्त साहेब, ज्यांचे मुंत्यू झाले आहे, मी त्यांच्यासाठी रडत नाही. आता समोर जे भविष्य येणार आहे, त्याच्यासाठी काय मार्ग आहे? आम्ही सारखे

हात जोडत आहेत, न्यायालयाचे आदेश असतांना सुध्दा ३०५ कर्मचारी भरले जात नाहीत, खाडा बदली कामगार भरले जात नाही. तर काम कसे होईल. एका नगरसेवकाने स्वत: झाडू मारला आहे, याच्या पेक्षा आम्ही काय करणार. आपले कर्तव्य काय निभवायचे? तरी कृपया.....

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—** पहीले मी सांगितले आहे, आपल्या जेवढया पण जागा रिक्त आहेत, सगळयात जास्त रिक्त जागा सफाई कर्मचा—यांच्या आहेत. फक्त २२ टक्के, आउट ऑफ १५५० मधून फक्त ३४१ रिक्त जागा आहेत. हया रिक्त जागा भरल्या पाहीजेत ही खरी गोष्ट आहे, परंतु आपला सफाईचा जो ठेका दिला आहे, तो पण आउट ऑफ दिला आहे. जर १५५० आपण कर्मचारी जर समजतो तर संपुर्ण काम त्यांच्यावर येते. ३४१ लोक नाही, परंतु आपण रोज ५ लाख रूपये रोजचे आउट साईड एजेन्सीवर खर्च करीत आहेत. तर मग १५५० मधून ३४१ गेलेत, शिल्लक राहीलेल्या लोकांना काम कमी आहे, त्यांनी व्यवस्थित काम केले तर त्यांनी फिल्डमध्ये यायला पाहीजे, आजच मी दोन दिवस मला असे वाटते की रिक्त मुददा पेक्षा हा जास्त अहम मुददा आहे ज्यावर आपण लक्ष देत आहेत. जो लोक येणार नाही त्यांच्यावर कडक कार्यवाही करण्यात येईल. आणि त्यांना मदत करण्यासाठी तुम्ही कृपया लक्ष देऊ नये. आणि त्यांना खूप गंभीरपणे बघितले पाहिजे. हा एकदम गंभीर प्रश्न होत आहे तुम्हा लोकांनापण अनुभव आला असेल काही कर्मचारी तर दुस—या पाळी मध्ये तर येतच नाही. मी तर असे ऐकलेले आहे की काही कर्मचारी आपल्या ऐवजी दुस—यांना चार हजार पाच हजार रूपये देऊन तिथे भरती केलेले आहे ही गंभीर बाब आहे. ३४१ पण भरणार आपण परंतु जेव्हा आपण आऊट सेल करणार तेव्हा हे ३४१ आणि ५०० लोक कमी केले पाहिजे आणि बाकी लोकांनी काम केले पाहिजे

**सदस्य श्री. सतरामदास जेसवानी:—** साहेब जी, मी तुम्हाला सांगितलेल आहे की सर्व नगरसेवक तुमच्या सोबत आहेत पण सफाई पाहिजे आरोग्य पाहिजे आम्ही सर्व आजारी नाही झाले पाहिजेत आम्हाला ते सर्व सोय पाहिजे आमचा तुमच्यावर विश्वास आहे परंतु ज्या लोकांचा हक्क आहे त्या लोकांना न्याय मिळाला पाहिजे. काही दिवसा अगोदर मी तुमच्या समोर काही मुददा ठेवला होता ती गोष्ट किती मोठी आहे दररोज प्रत्येक वॉर्ड मध्ये एक जनावर मरतो ती जनावर उचलून खत्तावर टाकतात, खत्यावर टाकलेले जनावर कच—याच्या नविन डंम्पिग ग्राउडवर टाकतात जो आमच्या बरच वॉर्डच्या समक्ष आहे हा तुम्ही विचार करा की ही किती मोठी गोष्ट आहे. एक जनावर मेले एक डुक्कर मेले आणि वेळेवर जर सफाईकामगार मिळत नाही तर त्याला उचलायला दोनशे ते तीनशे रूपये पर्यत खर्च करावा लागतो, माणूस आपल्या घरा पासून खत्यावर टाकण्यासाठी दोनशे ते तीनशे रूपये खर्च करतात परंतु जे लोक खत्ताचा आजूबाजूला राहतात आणि कच—याच्या खत्यावर टाकलेला जनावराला किती जंतु उत्पन झाले असेल आणि ते जन्तु हवेमध्ये पसरले असतील आणि त्या जंतुमुळे किती लोक आजारी झाले असतील हे कोणालातरी समजले पाहिजे. हे गेल्या वेळासाठी नाही भविष्यात येणारा वेळेसाठी पण मी बोलत आहे. जसा एक माणूस मेला तर त्याला उचलून आपण अग्निसंस्कारासाठी लाकडे घेवून जातात आणि जे गरीब आहे त्यांना आपण फ्री मध्ये लाकडे देतो त्याप्रकारे जनावरामुळे आजार पसरले नाही पाहिजे त्याच्यातून जंतु उत्पन नाही झाले पाहिजे त्याच्यासाठी काही न काही आपल्याला मार्ग काढला पाहिजे जसा की आजार पसरला नाही पाहिजे. माझे जे काही मुददे असतात साहेब प्रशासनाला त्रास देण्यासाठी नसतात कधी ही नाही, कोणता ही मुददा असू दया हात जोडून प्रशासनाला विनंती करतो तुमच्याकडे कोणते ही पत्र मी देतो त्यांचा पहिला शब्द माझी विनंती असते.जर एक पालिका सदस्य हात जोडून विनंती करतात, नम्र विनंती करतात तर तेव्हा त्याच्या उददेश असा आहे की जनतेच्या आरोग्य नीट राहिले पाहिजे तुमचे पण कतर्व्य आहे मा. महापौर मॅडम तुमचेपण आणि सर्व पालिका सदस्यांचे पण कतर्व्य आहे. ही जी सर्वात महत्वपूर्ण गोष्ट आहे हया सर्व गोष्ट लक्षात घेऊन आम्हाला मदत करावी, न्याय देण्यात यावा, आमचे आरोग्य अबाधित रहावे. कारण की लाखो रूपये खर्च होतात साहेब हॉस्पिटल मध्ये जाऊन लाखो रूपये,आणि

लहान लहान मुलांचे मृत्यु होऊन जातात साहेब. जो निरागस जो जन्माला आला आणि दोन तीन वर्षाचा झाला आणि आजार पसरला आणि आजारमुळे लहान मुलांचा मृत्यु झाला तर त्याच्यांवर किती अन्याय होईल. हे अन्यायचे ओझे पाप आमच्यावर येते कारण आम्ही इथे येऊन बसणार झोपणार आणि गरम चहा पिऊन जाणार ते कतर्व्य आमचे नाही आहे कृपया हात जोडून तुमच्याकडे विनंती करतो काही विशेष मुददयांवर जसे की दैनंदिन सफाई झाली पाहिजे जेवढे तुमचे नियमामध्ये बसेल तेवढे तरी तुम्ही करा, आम्ही कोणत्याही कामगारांचे पक्षामध्ये नाही,कधी ही नाही आम्हाला काम पाहिजे. त्याना कोणत्याही काम दया. धन्यवाद.

महापालिका सचिवः— प्रश्न क. १३ हा श्री. सुनिल सुर्वे यांचा आहे.

सदस्य श्री. प्रदीप रामचंदानीः— वेळ संपली मॅडम. ६.४० झाले. मॅडम वेळ संपली.

महापालिका सचिवः— ६.४३ ला वेळ संपणार आहे

सदस्य श्री. सुनिल सुर्वेः— ठीक आहे तीन मिनटात होणार नाही मॅडम.

महापालिका सचिवः— थोडे बोलून घ्या साहेब जेवढा वेळ आहे

सदस्य श्री. सुनिल सुर्वेः— राखून ठेवा मॅडम तीन मिनटात होणार नाही.प्रश्न कुठला आहे ते सांगा.पण हा किती तारखेच्या

प्रश्न आहे ते सांगा. बाकी जणांना बोलू दया, त्यांचे म्हणणे बरोबर आहे.

महापालिका सचिवः— पुढचा प्रश्न पण तुमचा आहे परंतु त्याचे उत्तर प्राप्त नाही.

सदस्य श्री. सुनिल सुर्वेः— म्हणून दोन्ही प्रश्न राखून ठेवा पुढच्या मिटींगमध्ये घ्या.६.४३ मिनटात होणार नाही

सदस्य श्री. राजेश वदारियाः— वेळ संपवा मॅडम

सदस्य श्री. सुनिल सुर्वेः— तीन मिनटात काही फरक पडत नाही मॅडम म्हणून म्हणतो.

महापालिका सचिवः— असे नाही प्रश्नोत्तराचा कालावधी अर्धा तास आहे

सदस्य श्री. सुनिल सुर्वेः— हो कालावधी आहे पण प्रश्न पूर्ण होणार नाही म्हणून म्हणतो मला कालावधीचा अट नाही प्रश्न पूर्ण होणार नाही.

महापालिका सचिवः— ठीक आहे पुढचा प्रश्न क्रमांक १५ हा प्रश्न श्री. भारत राजवानी यांचा आहे. त्यांचे पण उत्तर प्राप्त नाही हा पण प्रश्न राखून ठेवण्यात येत आहे.

सदस्य श्री. राजेश वदारियाः— मॅडम प्रश्न उत्तरे तास संपवा आणि पुढे चला

**महापालिका सचिवः—** प्रश्न क्रमांक १६ हा प्रश्न भारत राजवानी यांचा आहे. नियमानुसार अर्धा तास प्रश्नाचा आहे प्रश्नोत्तरे अर्धवट ठेवू शकत नाही, नियमानुसार साहेब, महासभेला

**सदस्य श्री. भारत राजवानी—** प्रश्न क्रमांक १५ चे उत्तर मिळाले नाही माझा प्रश्न क्रमांक १५ होता त्याचे काय झाले. कोण आहे कोणाला विचारायचे,उत्तर मिळाले नाही.

**महापालिका सचिवः—** प्रश्न क्रमांक १५ चे उत्तर आले नाही आणि प्रश्न क्रमांक १६ तुमचे आहे. आणि १५ चे उत्तर आले नाही मी प्रश्न १६ चे म्हणत आहे

**सदस्य श्री. भारत राजवानी :—** १५ चे उत्तर का नाही आले

**सदस्य श्री. राजेश वदारिया:—** ठीक आहे मॅडम ६.४२ झाले .

**सदस्य श्री. भारत राजवानी—** का नाही आले उत्तर मॅडम कधी उत्तर मिळणार कधी येणार उत्तर?

**महापालिका सचिवः—** ते तर संबंधित विभाग सांगणार की कधी देणार उत्तर. प्रश्न क्रमांक १५ पण प्रलंबित राखून ठेवण्यात येत आहे. प्रश्न क्रमांक १६ हा प्रश्न भारत राजवानी याचा आहे |

**?** **प्रश्न क्र. १६:—** अ) आमरण अनशन के वक्त दिऐ गऐ निवेदन में उल्लेखित अवैध निर्माण के उपर पालिका प्रशासन के ओर से कितने दिन के अंदर निष्काशन की कारवाई की जाऐगी.
१) प्रभाग समिती क्र.४, उल्हासनगर महानगरपालिका के कार्यक्षेत्र में किए गऐ अवैध निर्माण के उपर कारवाई न किऐ जाने पर दिनांक १६/९/२०१६ को शुरू किया गया आमरण उपोषण पिदे लेने हेतू प्रभाग समिती कार्यालय से सहाय्यक आयुक्त श्री. गणेश शिंपी इनोने दि.१८/९/२०१५ को दिऐ हुऐ पत्र के आधार पर आज तारिख तक पालिका प्रशासन के ओर से क्या कारवाई कि गयी है

**उत्तर:—** अ) सदर बांधकामांबाबत श्री. भारत राजवानी यांनी मा. उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. सदर याचिकेमध्ये मा. उच्च न्या१) श्री. भारत राजवानी यांनी ज्या बांधकामांबाबत तक्रारी केल्या होत्या, त्या ठिकाणी रहिवासी व वाणिज्य वापर सुरू असून बांधकामे जुनी असल्याने त्यांना दस्तऐवज सादर करणेसाठी नोटीसा बजावण्यात आलेल्या होत्या.यालयाने तक्रारी अर्जाच्या अनुषंगाने सुनावणी घेवून नियमानुसार कारवाई करणेचे आदेश दिलेले आहेत. याबाबतची सुनावणी अद्याप पूर्ण झाली नसून सुनावणीचा निर्णय होताच नियमानुसार कारवाई करण्यात येईल

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—** माझा पण प्रश्न १३ आणि १४ प्रलंबित आहे ना

**महापालिका सचिवः—** प्रश्न क्रमांक १६ चे उत्तर तर आले आहे दिले आहे तुम्हाला.

**सदस्य श्री. भारत राजवानी—** ठीक आहे ना १५ चे उत्तर कधी मिळणार कोण देणार उत्तर आधी त्याचे तर सांगा. नतंर १६ वर जाऊन

**<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–</u>** राखून ठेवा मॅडम

**<u>महापालिका सचिव:–</u>** राखून ठेवणार पण...

**<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–</u>** बरोबर आहे, बरोबर आहे, चला एक मिनिटाचा वेळ असााच घालवू आपण. प्रश्नाचे उत्तर येत नाही हयाला जबाबदार कोण मॅडम? पहिले हा खुलासा पाहिजे उत्तरे जर सात दिवसात येत नसेल तर .....

**<u>सदस्य श्री. भारत राजवानी–</u>** एका प्रश्नाचे उत्तर मिळण्यासाठी सहा– सहा महिने लागतात.

**<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–</u>** साहेब उत्तरे मिळत नाही आहे.

**<u>सदस्य श्री. भारत राजवानी–</u>** हा पण सहा–सहा महिने लागतात का?

**<u>महापालिका सचिव:–</u>** आपला हा प्रश्न पण राखून ठेण्यात येत आहे जे आज झाले नाही त्याचे उत्तर प्राप्त झाले नाही. आता प्रश्न उत्तराच्या तास संपला आहे. मा. महापौरकडे काही स्थगन प्रस्ताव आले आहेत आणि लक्षवेधी आल्या आहे ते सामावून घ्यावे लागतील आधी मी वाचते नंतर जर सामावून घ्यायचे आहे की नाही ते तुम्ही ठरवायचे आहे.

<u>स्थगन प्रस्ताव क्र. १</u>

सुचकाचे नाव :– श्रीमती पंचम ओमी कालानी
अनुमोदकाचे नाव :–श्री. राजेश वदारिया

विषय:– खेमाणी नाला वळविण्याचे कार्यादेश देवून देखील मुदतीत व वेळेत काम न करणा–या संबंधित कंपनीस व ठेकेदारास काळया यादीमध्ये टाकून बॅक गारंट जप्त करणेबाबतचा स्थगन प्रस्ताव

<u>स्थगन प्रस्ताव क्र. २</u>

सुचकाचे नाव :– श्री. भगवान भालेराव
अनुमोदकाचे नाव :–श्री. दिपक सिरवानी

**विषय:–** जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुननिर्माण अभियान अंतर्गत उल्हासनगर पाणी ुरवठा वितरण व्यवस्था पुर्ण करु शकणा–या संबंधित कंपनीस व ठेकेदारास काळया यादीमध्ये टाकून बॅक गॅरंटीजप्त करणेबाबतचा स्थगन प्रस्ताव

<u>लक्षवेधी सूचना क्र. १</u>

सुचकाचे नाव :– श्री. राजेंद्र चौधरी
अनुमोदकाचे नाव :– श्री. सुनिल सुर्वे

**विषय:–**कल्याण अंबरनाथ रस्ता रुंदीकरणामध्ये बाधीत झालेल्या लोकांवर महापालिकेकडून होत

असलेला अन्याय दूर करण्यात यावा याबाबतची लक्षवेधी सूचना

**लक्षवेधी सूचना क्र. २**

सुचकाचे नाव :– श्री. सुनिल सुर्वे
अनुमोदकाचे नाव :– श्री. कलवंतसिंग सोहटा

**विषय**:–महाराष्ट्र सफाई कर्मचारी आयोगाच्या सन १९९८–९९च्या अहवालानुसार सफाई कामगारांना त्यांच्या शैक्षणिक अर्हतेनुसार नेमणूक करणेबाबची लक्षवेधी सूचना

**लक्षवेधी सूचना क्र. ३**

सुचकाचे नाव :– श्री.भगवान भालेराव
अनुमोदकाचे नाव :– श्री. कलवंतसिंग सोहटा

**विषय**:– महासभेत दिनांक २८/४/२०१७ रोजीचा ठराव क्र. १२ विखंडित करुन १२८सदनिका मधून ५० टक्के सदनिका ज्या सफाई कामगारांच्या २५ वर्ष सेवा पूर्ण झालेल्या आहेत त्या सफाई कामगारांना मोफत मालकी हक्काने देण्याबाबतची लक्षवेधी सूचना.

**लक्षवेधी सूचना क्र. ४**

सुचकाचे नाव :–श्रीमती शुभांगीनी निकम
अनुमोदकाचे नाव :–श्रीमती सविता तोरणे

**विषय**:– सन २००३ मध्ये झालेल्या सरळसेवा/मागासवर्गीय भरतीमध्ये भ्रष्टाचार करण्यात आल्याबाबतची लक्षवेधी सूचना.

या लक्षवेधी सुचना पैकी लक्षवेधी सुचना क्रं:१सुचकाचे नाव श्री. राजेंद्र चौधरी अनुमोदकाचे नाव श्री. सुनिल सुर्वे लक्षवेधी सूचना क्र. ४ सुचकाचे नाव श्रीमती शुभांगीनी निकम अनुमोदकाचे नाव श्रीमती सविता तोरणे या दोन्ही लक्षवेधी मा. महापौरांनी स्विकारली आहे.आता आधी स्थगन प्रस्तावनेवर निर्णय घ्यायचा आहे. स्थगन प्रस्ताव १, खेमाणी नाला वळविण्याचे कार्यादेश देवून देखील मुदतीत व वेळेत काम न करणा–या संबंधित कंपनीस व ठेकेदारास काळया यादीमध्ये टाकून बॅक गारंट जप्त करणेबाबतचा स्थगन प्रस्ताव सर्वांना मिळूण निर्णय घ्यायचा आहे.

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव:–</u> मा. महापौर मॅडम स्थगन प्रस्ताव माझा पण आहे. कोर्णाक कंपनी अत्यावश्यक स्थगन प्रस्तावाची व्याख्या जरा समजावून सागितल तर जरा बरे हाईल मॅडम, स्थगन प्रस्ताव कुठल्या पध्दतीने घेतले जातात आणि कशा आधारावर पहिले प्राधान्य दिले पाहिजेत. ते जरा समजावून सागितले तर बरे होईल.

<u>महापालिका सचिव:–</u> मा. सभागृह स्थगन प्रस्ताव हा नियम २ (टं )अन्वये घ्यावा लागते नियम २(ट) खालील प्रमाणे

२ (ट) <u>निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या निश्चित प्रश्नावर चर्चा व्हावी म्हणून स्थगन प्रस्ताव</u>

प्रश्नोत्तराचा तास संपल्यावर परंतु सभेच्या कामकाजाच्या क्रमातील कामाची इतर कोणतीही बाब विचारार्थ घेण्यात येण्यापूर्वी, उल्हासनगर शहर किंवा त्यातील रहिवाशी यावर परिणाम होईल अशा अत्यंत निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या निश्चित गोष्टींवर चर्चा घडवून आणण्याच्या प्रयोजनार्थ, पालिका सदस्यास, पीठासीन प्राधिका—याच्या संमतीने, महानगरपालिकेचे कामकाज स्थगित करण्यासाठीचा प्रस्ताव मांडता येईल.

२ २(यु)<u>निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या निश्चित प्रश्नावर चर्चा व्हावी म्हणून स्थगन प्रस्ताव मांडण्याच्या अधिकारांवर निर्बंध</u>

नियम २ ट खालील प्रस्ताव मांडण्याचा अधिकार हा पुढील निर्बंधाधीन असेल **(एक)** एकाच बैठकीत

एकापेक्षा अधिक प्रस्ताव मांडता कामा नये.

**(दोन)** त्याच प्रस्तावावर एकापेक्षा अधिक गोष्टींची चर्चा होता कामा नये.आणि असा प्रस्ताव,

नुकत्याच घडलेल्या विशिष्ट गोष्टी पुरताच मर्यादित असेल.

**(तीन)** मागील तिमाहिमध्ये, कोणत्याही वेळी, ज्यावर महानगरपालिकेच्या बैठकीत चर्चा झाली असेल

अशा कोणत्याही गोष्टीवरील चर्चा, अशा प्रस्तावामुळे पुन्हा सुरु होता कामा नये.

२ (व्ही) <u>परवानगी घेण्याची वेळ व कार्यरीती</u>

(१) नियम २ ट अन्वये प्रस्ताव मांडण्याची इच्छा असणारा पालिका सदस्य, ज्या सभेत त्याला आपला प्रस्ताव मांडण्या संबंधात महानगरपालिकेची परवानगी घ्यावयाची असेल त्या सभेस प्रारंभ होण्याच्या कमीत कमी दोन तास आधी लेखी निवेदन, महापौर, आयुक्त व नगरपालिका सचिव यांजकडे सुपूर्द करील व सभेस प्रारंभ होण्यापूर्वी, नियोजित प्रस्तावास महापौरांची संमती घेईल.

(२) जर महापौरानी आपली सम्मती दिली तर प्रश्नोतरानंतर व त्या दिवसाचे इतर कामकाज सुरु होण्यापूर्वी प्रस्ताव मांडण्याची परवानगी मागता येईल. महापौरांनी आपली संमती दिली नाही तर तो किंवा महापौर पीठासीन अधिकारी नसतील तर पीठासीन अधिकारी यास योग्य वाटेल तर प्रस्तावाची नोटीस वाचून दाखविता येईल व संमती नाकारण्या साठीची कारणे नमूद करता येतील.

(३) पालिका सदस्याने प्रस्ताव मांडण्यासाठी, महानगरपालिकेची परवानगी मागितल्यानंतर, पीठासीन अधिकारी, महानगरपालिकेपुढे प्रस्ताव वाचील व पालिका सदस्यास, महानगरपालिकेची परवानगी आहे किंवा कसे ते विचारील, आक्षेप घेण्यात आला तर, पीठासीन अधिकारी स्थगन प्रस्तावावर पाठींबा देत असतील त्या पालिका सदस्यास हात वर करण्यास सांगेल, सभेस उपस्थित सदस्यांपैकी दोन तृतीयांश सदस्य त्यानुसार हात वर करतील तर, पीठासीन अधिकारी, त्या दिवशी, प्रस्तावावर चर्चा करण्यासाठी त्यास योग्य वाटेल अशा वेळेपर्यंत महानगरपालिकेचे कामकाज स्थगित होईल असे सुचित करील. सभेत उपस्थित अशा दोन तृतीयांशापैक्षा कमी सदस्य उठतील तर (हात वर करतील तर) पीठासीन अधिकारी महानगरपालिकेची परवानगी नसल्याचे, पालिका सदस्यास कळवील.

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव:—</u> दोन प्रस्ताव आहे दोन्ही मधील ज्या प्रस्तावाचा बाजूने बहुमत असेल तो प्रस्ताव बहुमताने गृहित धरला जाईल आणि ज्या प्रस्तावाला बहुमत नाही तो प्रस्ताव बाद करण्यात येईल.

**सदस्य श्री. राजेश वदारिया:—** मा. महापौर या स्थगन प्रस्तावा मध्ये श्रीम. पंचम ओमी कालानी सुचक आणि अनुमोदक मी श्री. राजेश वदारिया आहे स्थगन प्रस्ताव जो आहे तो पिण्याचे पाण्याचा संदर्भामध्ये आहे नॅशनलझोनसीजनलला १५ करोडचा दंड लावलेला आहे ज्या उल्हासनदीमध्ये दररोज घाण पाणी सोडले जाते त्या पाण्याना थांबून ट्रीटमेंट करून सोडले जाणार होते ही प्रकिया महानगरपालिकाने आधीच केली पाहिजे होते परंतु आर्थिक स्थितीमुळे किवा दुस—या काही कारणामुळे या प्रोजेक्टचे वर्क ऑडर देण्यामध्ये उशीर झाला यानी ही प्रोजेक्टची मंजूरी वर्क ऑर्डर ६ फेब्रुवारी २०१६ मध्ये दिली गेली यांना १५ महिनेची वेळ मिळाला त्यावेळेमध्ये काम पूर्ण केले पाहिजे होते पण १५ महिनेचा कालावधी पूर्ण झाला आणि काम पूर्ण झाले नाही आणि उल्हासनगरच्या जनतेस तिथून घाण पाणी घेवून एम.आई.डी.सी आम्हाला प्यायला देते. त्याचेसाठी लाचार आहोत. तुम्हाला माझी विनंती आहे की हा स्थगन प्रस्ताव स्विकारला पाहिजे.

**.सदस्य श्री. भगवान भालेराव:—** एक गोष्ट मी आयुक्त साहेबांच्या निर्दशनांस आणून दयायची आहे की साहेब माझे मित्र राजेश वदारिया यांनी सागितले आहे की १५ कोटीचा दंड साहेब आता तुम्ही मला सांगा वालधुनी नदीचा दुषित पाण्याला १५ कोटीचा दंड झाला का? खेमाणी नाल्याला दुषित पाणी जाते त्याचेसाठी १५ कोटीचा दंड झाला आहे? वालधुनी नदीला

या वेळी सदस्य श्री. राजेश वानखेडे, श्री. गजानन शेळगे हे सभागृहातून बाहेर गेले.

**सदस्य श्री. राजेश वदारिया:—** चर्चा नंतर होईल पहिले हे ठरवायचे आहे की कोणत्या स्थगन प्रस्ताव स्विकारला जाईल. चर्चा नंतर होईल.

**महापौर तथा पिठासन अधिकारी :—** या विषयवर मी मतदानासाठी आदेश देत आहेत.

**महापालिका सचिव:—** ठीक आहे, आधी स्थगन प्रस्ताव पहिला जो आला आहे,सदस्य श्रीम. पंचम कालानी आणि श्री. राजेश वदारिया यांच्या खेमाणी नाला वळविण्याचे कार्यादेश देवून देखील मुदतीत व वेळेत काम न करणा—या संबंधित कंपनीस व ठेकेदारास काळया यादीमध्ये टाकून बॅक गारंटी जप्त करणेबाबतचा स्थगन प्रस्ताव आहे जो हा प्रस्ताव दाखल करण्याचा वाजूने आहे कृपया आपल्या हात वर करावे. हा खेमाणी नालाचा स्थगन प्रस्ताव महासभेत दाखल करणेसाठी

## प्रस्तावाचा वाजूने २५ मते

१) श्रीम. मिना आयलानी
२) श्री. जीवन इदनानी
३) श्री. अजित गुप्ता
४) श्रीम. कविता पंजाबी
५) श्रीम. इदिरा उदासी
६) श्रीम. दिप्ती दुधानी
७) श्रीम. ज्योती भठिजा
८) श्रीम. ज्योती चैनानी
९) श्रीम. सरोजनी टेकचंदानी

१०)डॉ. प्रकाश नाथानी
११) श्रीम. सविता तोरणे
१२) श्रीम. आशा बिराडे
१३) श्रीम. कविता गायकवाड
१४) श्रीम. लक्ष्मी सिंह
१५) श्रीम. अर्चना करणकाळे
१६) श्री. हरेश जग्यासी
१७) श्री. महेश सुखरामनी
१८) श्री. जमनादास पुरस्वानी
१९) श्री. किशोर वनवारी
२०) श्री. राजेश वदारिया
२१) श्रीम. पंचम कालानी
२२) श्री. रवि जग्यासी
२३) श्री. अशोक छाप्रू
२४) श्रीम. ज्योती पाटील
२५) श्रीम. शुभागीनी निकम
एकूण २५मतदान झाले आहे आणि दिपक सिरवानी तुम्ही तुमचा काय आहे?

**सदस्य श्री. दिपक सिरवानी:—** तटस्थ

**महापालिका सचिव:—** ठीक आहे, आणि एकूण २५मतदान आहे आपल्याला एकूण ३९ मते पाहिजेत. दोन तृतियांक्ष मत पाहिजे.म्हणजे हा प्रस्ताव आपल्याला दाखल करता येणार नाही. आता दुसरा प्रस्ताव आहे सुचकाचे नाव श्री. भगवान भालेराव आणि अनुमोदकाचे नाव श्री दिपक सिरवानी जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियान अंतर्गत उल्हासनगर पाणी पुरवठा वितरण व्यवस्था पुर्ण करु शकणा—या संबंधित कंपनीस व ठेकेदारास काळया यादीमध्ये टाकून बॅक गॅरंटीजप्त करणेबाबतचा स्थगन प्रस्ताव आहे या प्रस्ताव दाखल करण्याचा वाजूने जे आहेत....

**.सदस्य श्री. भगवान भालेराव:—** मी माझा प्रस्ताव मागे घेत आहे

**महापालिका सचिव:—** मागे घेत आहोत तर हा एक प्रस्ताव दाखल....

**सदस्य श्री. राजेश वदारिया:—** हा प्रस्ताव मागे घेतला तर आमचा प्रस्ताव मंजूर झाला.

**सदस्य श्री. भगवान भालेराव:—** आता मतदान झाले आहे.

**सदस्य श्री. प्रदीप रामचंदानी:—** मा. महापौर जे एकदा मागे घेतले तर परत घेता येणार नाही.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—** मा. महापौर जी यानी आपल्या प्रस्ताव सदनमध्ये मागे घेतला तर आपोआप एक प्रस्ताव मंजूर झाला आहे. हा नियम आहे. नियम वाचून दाखवा.

**सदस्य श्री. भगवान भालेराव:—** मी मतदाना नंतर घेतला आहे

**सदस्य श्री. प्रदीप रामचंदानी:—** मा. महापौर जी तुम्ही आदेश दया

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—** मा. महापौर जी जेव्हा मतदान झाले नव्हते यानी की त्याच्या प्रस्तावावर मतदान झाले नव्हते आणि त्यानी आपल्या प्रस्ताव मागे घेतला

**सदस्य श्री. रमेश चव्हाण :—** मतदान प्रक्रिया सुरू झाले नंतर

**सदस्य श्री. प्रमोद टाले :—** जर विरोध करतात तर मतदान घ्यावाच लागेल विरोध नंतर मतदान झाले

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :—**सचिव मॅडम, पहिल्या प्रस्तावावर मतदान घ्या.

**महापालिका सचिव:—** ठिक आहे. कोणताही स्थगन प्रस्ताव दाखल करुन घेण्यासाठी आपण आपला प्रस्ताव मतदानानंतर पहिल्या स्थगन प्रस्तावावर मतदान घेतल्यानंतर मागे घेतला आहे. त्यामुळे पहिल्या स्थगन प्रस्तावावर आपणास विरोधात निर्णय घेणे आवश्यक आहे. मा. पीठासीन अधिकारी यांनी दिलेल्या आदेशानुसार जो पहिला स्थगन प्रस्ताव आहे तो दाखल करण्याच्या बाजुने जे नाहीत त्यांनी हात वर करावेत.

**सदस्य श्री. प्रदीप रामचंदानी:—** आता एकच मतदान विरोधात झाले आहे त्या प्रमाणे दोन तृतियांक्ष.....

**सदस्य श्री. कलवंतसिंह सोहटा:—** प्रदिप जी तुम्हाला मतदानाचा अधिकार नाही कृपया तुम्ही बसुन घ्या.

**सदस्य श्री. प्रदीप रामचंदानी:—** मॅडम हा कशासाठी हात वर करतात मला हे कळत नाही तरी समजावून सांगा.

**महापालिका सचिव:—** पहिला जो स्थगन प्रस्ताव आहे ज्यांचे सुचक श्रीम. पंचम कालानी आणि अनुमोदक श्री. राजेश वदारिया आहे त्यांचा जो प्रस्ताव आहे तो दाखल करून घ्यायचा की नाही यावर प्रस्तावाच्या बाजुने मतदान घेतले आहेत आता मा. पीठासीन अधिकारी यांच्या आदेशान्वये त्या प्रस्तावाच्या विरोधात मत घेत आहे. म्हणजे या प्रस्तावाच्या विरोधात जे आहे त्यांनी आपले हात वर करावे.

## प्रस्तावाचा विरोधात ३१ मते

१) श्री. रमेश चव्हाण
२) श्री. सुनिल सुर्वे
३) श्री. राजेंद्रसिंह भुल्लर
४) श्रीम. वसुधा बोडारे
५) श्रीम. राजश्री चौधरी
६) श्रीम. चरणजीतकौर भुल्लर
७) श्रीम. लीलाबाई आशान
८) श्रीम. पुष्पा बागुल
९) श्रीम. ज्योती गायकवाड
१०) श्रीम. ज्योती माने

११) श्रीम. शुभागी बेहनवाल
१२) श्री. स्वप्निल बागुल
१३) श्री. विकास पाटील
१४) श्री. भारत राजवानी
१५) श्री. भगवान भालेराव
१६) श्री. शेखर यादव
१७) श्रीम. संगिता सपकाळे
१८) श्रीम. शीतल कदम
१९) श्रीम. मिताली चान्पूर
२०) श्रीम. अंजना म्हस्के
२१) श्रीम. अपेक्षा भालेराव
२२) श्रीम. सुरेखा आव्हाड
२३) श्री. कलवंतसिंह सहोता
२४) श्री. सुमित सोनकांबळे
२५) श्री. सतरामदास जेसवानी
२६) श्रीम. ज्योत्स्ना जाधव
२७) श्रीम. पूजा लबाना
२८) श्रीम. सुनिता बगाडे
२९) श्री. राजेंद्र चौधरी
३०) श्रीम. कविता बागुल
३१) श्री. प्रमोद टाले

मतदान ३१ आहे म्हणून हा पण प्रस्ताव दाखल केला जाणार नाही

**सदस्य श्री. सतरामदास जेसवानी:—** मा. महापौर मॅडम पिण्याचे पाणी अशुध्द झाले नाही पाहिजे, पिण्याचे पाणी अशुध्द झाले तर लोकांचे प्राण जाऊ शकते कृपया या गोष्टीवर बारकाईने लक्ष दया, की शहराच्या लोकांचे हित कोणत्या गोष्टीत आहे. जर त्याचात लक्ष दिले तर मेहरबानी होईल.

**महापालिका सचिव:—** हा देखिल दाखल करता येणार नाही.आणि दुसरा हा देखिल बाद मग दोन्ही प्रस्ताव फेटाळले आहे, आता लक्षवेधी आहे जी स्विकारली आहे पहिली लक्षवेधी सुचना, ज्यांचे सुचक श्री. राजेंद्र चौधरी आणि अनुमोदक श्री. सुनिल सुर्वे यांची आहे ती स्विकारली आहे.

## लक्षवेधी सूचना क्र. १

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्र चौधरी
अनुमोदकाचे नाव :— श्री. सुनिल सुर्वे

विषय:—कल्याण अंबरनाथ रस्ता रुंदीकरणामध्ये बाधीत झालेल्या लोकांवर महापालिकेकडून होत असलेला अन्याय दूर करण्यात यावा याबाबतची लक्षवेधी सूचना

**सदस्य श्री. दिपक सिरवानी:—** मा. महापौर मॅडम ७ वाजले आहेत,

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—** मा. महापौर मॅडम लक्षवेधी अत्यंत महत्वाची आहे चालू दया, चालू दया लक्षवेधी

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः—** मा. महापौर जी, उप महापौर जी, आयुक्त साहेब लक्षवेधी सुचना अपण स्विकारले बददल आपला आभारी आहे उपरोक्त विषयान्वये लक्षवेधीच्या माध्यामातून महासभेचे लक्ष वेधू इच्छितो की, कल्याण अंबरनाथ रस्ता रुंदीकरणामध्ये ८००पेक्षा बांधकामे निष्कासीत करण्यात आली त्यामध्ये गेली ४० ते ५० वर्षापूर्वीची ग्राउंड +वन व ग्राउंड + टू अशी बांधकामे होती ती बांधकामे रस्त्यात बाधीत होत असल्याने महानगरपालिकेकडून निष्कासीत करण्यात आली. काही बाधकामे अर्धवट निष्कासीत केल्यामुळे धोकादायक झाली,म्हणून सदरची अर्धवट बांधकामे पूर्णपणे तोडून नव्याने बांधकाम करीत असतांना महापालिका ते बांधकाम करून देत नाही, हा त्यांच्यावर अन्याय होत आहे. हा अन्याय दूर करणेसाठी सदरचा विषय येणा—या महासभेत घेऊन त्यावर चर्चा करून योग्य तो निर्णय घेण्यात यावा. ही विनंती.

उल्हासनगर शहरामध्ये कल्याण अंबरनाथ रस्ता रूंदीकरणामध्ये महापालिकेने कार्यवाही केल्यानंतर बाधित जे लोक होते त्या लोकांची ४०, ५० वर्षा पूर्वीची मालमत्ता होती त्यांची मालमत्ता ग्रऊड प्लस वन ग्रऊन प्लस टू अशी बनवलेली होती ती मालमत्ता आपण महानगरपालिकेनी निष्कासित केली ती धोकादायक झाली, धोकादायक झालेली इमारत पडू शकते म्हणून त्या लोकांनी पूर्ण तोडून टाकले आणि तोडून टाकलेनंतर त्याचे कडे पैसे नव्हते त्यावेळेत बांधले नाही काही लोकांनी त्या रस्त्यावर जे काही बाधित झाले होते त्यांनी चार चार, पाच पाच मजले बनवून घेतले नंतर जे कोणी होते बाधित झालेले लोक त्यांनी खरोखर योगदान दिले त्यांची मालमत्ता होती त्यांचे आपल्याकडे अभिलेख आहे त्याच्यामाध्यमातून त्याच्याकडे कागदपत्र आहे अशा लोकांची मालमत्ता तोडलेनंतर त्याना बांधणे पासून थांबवतो आहे हा कुठे तरी त्यांचावर अन्याय करतो आहेत हा माझा आरोप आहे म्हणून माझी विनंती आहे लक्षवेधीच्या माध्यामातून आपल्याला की आपण अशी जी काही लोक असतील ज्यांच्या अभिलेख आपल्याकडे आहे ज्याची तीन तीन चार चार मजले पूर्वी होते जे आपला आपल्या मालमत्ता कर देत आहे अशा लोकांची बाधकाम राहिलेली असतील त्यांना बांधकाम करणेसाठी आयुक्त साहेब त्यांना बोलावून त्यांची कागदपत्र तपास करून त्यांना बांधणेसाठी परवानगी दयावी आणि जे कुणी अनाधिकृत बाधकाम करत असतील त्यांच्यावर त्यांनी कार्यवाही करावी त्यांची बाजू आम्ही घेणार नाही आता बोलायला गेलो तर उल्हासनगर शहरामध्ये ज्यांच्याकडे परवानगी नाही काही नाही अशी अनाधिकृत बांधकामे आता मोठया प्रमाणात सुरू आहे रोज आम्ही व्हॉटसॲप बघतो अशा महानगरपालिकाची बदनामी ऐकतो, प्रभाग अधिकारी यांच्या नावाची बदनामी होते तर कधी आयुक्तांची बदनामी पेपरमध्ये येते तर त्या लोकांनी जर योगदान दिले असेल आणि त्याची खरोखर मालमत्ता असेल ते आपल्याला मालमत्ता कर देत असतील आणि आपल्याकडे अभिलेख असेल तर त्यांना बांधून देणेसाठी आपण परवानगी दिली पाहिजे आयुक्त महोदय आपली जबाबदारी आहे

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः—**ही लक्षवेधी चालू आहे आणि सभ्रागृहचा सदस्याचा विरोध नाही आहे तर हा विषय होवू दया

वेळी सदस्य श्री. राजेश वानखेडे, श्री. गजानन शेळगे हे सभागृहातून पुन्हा प्रवेश गेले.

**महापालिका सचिवः—** ७ वाजले आहे नियमाप्रमाणे ७ ला सभा....

**सदस्य श्री. प्रदीप रामचंदानीः—** चौधरी साहेबांचा विषय पास पास.....

**महापालिका सचिवः—** नाही नाही ही लक्षवेधी काय आहे ते त्यानी सांगावे मा. सदस्य श्री. चौधरी साहेब सांगा, कारण आयुक्त साहेबांनी निवेदन दिले शिवाय लक्षवेधी संपणार नाही.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—** ही लक्षवेधी पूढच्या सभेसाठी ठेवण्यात यावी कारण की पूर्ण झाली नाही आहे.

**महापौर तथा पिठासन अधिकारी:—** ही सभा अनिश्चितकाळा पर्यंत स्थगित करण्यात येत आहे. मी सभा संपल्याचे जाहिर करीत आहे.

---

सुचकाचे नाव:— श्री. जमनादास पुरस्वानी
अनुमोदकाचे नाव:— श्री. राजेश वदारिया

**स्थगित प्रस्ताव**

दिनांक १५/०९/२०१७ रोजी दुपारी ३.३० वाजता सुरू केलेली सभा वेळ संपल्याने ही सभा स्थगित करण्यास प्रस्तावित.

**महासभा ठराव क्र:— २७ अ (१)** **दिनांक १५/०९/२०१७**

हि महासभा वरील प्रस्ताव विचार घेता दिनांक १५/०९/२०१७ रोजी दुपारी ३.३० वाजता आयोजित केलेल्या सभेचे कामकाज अनिश्चित कालावधी पर्यत स्थगित करण्यास मान्यता देत आहे.

सुवकाची सही:—
अनुमोदकाची सही:—

**सर्वानुमते**
महापौर/ पीठासन अधिकारी
सर्वसाधारण ।महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—**कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर ७.०५ वाजता महापौर श्रीमती मिना कुमार आयलानी यांनी सभा स्थगित केल्याचे जाहिर केले.

(प्राजक्ता मि.कुलकर्णी)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक:—०९/१०/२
०१७

उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. ०९/१०/२०१७ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

६

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा दिनांक ०९/१०/२०१७ रोजी दुपारी ३.०० वाजता घेण्यात आली. सदर सभेत महापौर, श्रीमती मिना कुमार आयलानी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१. श्रीम. मिना कुमार आयलानी —— महापौर

२. श्री. जीवन चंद्रभान इदनानी —— उप—महापौर

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीमती अर्चना गोकुळ करणकाळे | ३० | श्रीमती ज्योत्स्ना सुरेश जाधव |
| ४ | श्रीमती पुजा सचिन भोईर | ३१ | श्रीमती ज्योती शामराव माने |
| ५ | श्रीमती जयश्री ज्ञानेश्वर पाटील | ३२ | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| ६ | श्रीमती ज्योती दिलीप गायकवाड | ३३ | श्रीमती मिताली राजेश चान्पूर |
| ७ | श्रीमती पंचम उमेश कालानी | ३४ | श्रीमती लिलाबाई लक्ष्मण आशान |
| ८ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | ३५ | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे |
| ९ | श्री. स्वप्नील मिलींद बागुल | ३६ | श्रीमती संगिता नितीन सपकाळे |
| १० | श्रीमती सुरेखा हनुमंत आव्हाड | ३७ | श्रीमती शितल चंद्रकांत कदम |
| ११ | श्री. कलवंतसिंग गुरूदेव सोहटा | ३८ | श्रीमती वसुधा धनंजय बोडारे |
| १२ | श्री. अशोक बच्चुमल छाप्रु | ३९ | श्री. धनंजय बाबुराव बोडारे |
| १३ | श्रीमती गीता लालचंद साधनानी | ४० | श्रीमती दिप्ती नविन दुधानी |
| १४ | श्रीमती रेखा अशोक ठाकुर | ४१ | श्रीमती ज्योती रमेश चैनानी |
| १५ | श्रीमती शुभांगीनी निकम | ४२ | श्री. शंकर गोविंदराम लुंड |

| | | | |
|---|---|---|---|
| १६ | श्री. भगवान शंकर भालेराव | ४३ | श्री. भारत रामचंद्र राजवानी (गंगोत्री) |
| १७ | श्रीमती छाया सुजित चक्रवर्ती उर्फ अडसुळ | ४४ | श्री. सतरामदास पुतनदास जेसवानी |
| १८ | श्रीमती ज्योती प्रशांत पाटील | ४५ | श्रीमती अंजली चंद्रकांत साळवे |
| १९ | श्री. राजेश नानिकराम वदारिया | ४६ | श्री. प्रमोद नामदेव टाले |
| २० | श्रीमती दिपा नारायण पंजाबी | ४७ | श्रीमती कविता सुधिर बागुल |
| २१ | श्री. अजित प्रभुनाथ गुप्ता | ४८ | श्री. किशोर नारायणदास वनवारी |
| २२ | श्रीमती पुष्पा नाना बागुल | ४९ | श्रीमती कविता सुरेश गायकवाड |
| २३ | श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी | ५० | श्री. विकास परशुराम पाटील |
| २४ | श्री. राजेंद्र शांताराम चौधरी | ५१ | श्री. मनोज दिलीपकुमार सयानी |
| २५ | श्री. रवी किशनचंद जग्यासी | ५२ | श्री. प्रदिप अर्जुनदास रामचंदानी |
| २६ | श्रीमती इंदिरा जमनादास उदासी | ५३ | श्री. सुरेंद्र बाळकृष्ण सावंत |
| २७ | श्रीमती कविता लाल पंजाबी | ५४ | श्री. अरूण लक्ष्मण आशान |
| २८ | श्रीमती सविता प्रविण तोरणे (रगडे) | ५५ | श्रीमती आशा जीवन इदनानी |
| २९ | श्री. दिपक लक्ष्मणदास सिरवानी (साई) | | |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१.श्री.हरेश परमानंद जग्यासी, २. श्रीमती मिनाकौर अजितसिंग लबाना, ३. श्रीमती आशा नाना बिराडे, ४. श्री.रविंद्र दशरथ बागुल, ५. श्रीमती चरणजितकौर राजेंद्रसिंह भुल्लर, ६.श्री. राजेंद्रसिंह विरसिंग भुल्लर, ७. श्रीमती अंजना अंकुश म्हस्के, ८. श्रीमती सरोजिनी टेकचंदानी, ९. श्रीमती जया प्रकाश माखिजा, १०.श्री. महेश पहिलराज सुखरामनी, ११. श्रीमती अपेक्षा भगवान भालेराव, १२. श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग, १३.श्रीमती चंद्रावती आयोध्याप्रसाद सिंग, १४.श्रीमती डिम्पल नरेंद्र ठाकुर (कुमारी) १५. श्रीमती शुभांगी मनोहर बेहनवाल, १६. श्री. गजानन प्रल्हाद शेळगे, १७. श्रीमती ज्योती प्रकाश बठिजा, १८. श्री. सुमित सागर सोनकांबळे, १९. श्री. चंद्रशेखर केशव यादव, २०. श्रीमती कांचन अमर लुंड, २१. श्रीमती सुनिता बाबुराव बगाडे, २२. श्रीमती पुजाकौर श्यामसिंग लबाना, २३. श्री. राजेश देवेंद्र वानखेडे, २४. श्रीमती मिना चंद्रगुप्त सोनेजी, २५. श्रीमती मिनाक्षी रवी पाटील, २६. श्री. विजय चाहु पाटील, २७. श्री. आकाश परशुराम पाटील, २८. डॉ. प्रकाश घनश्यामदास नाथानी.

खालील अधिकारी सभेत उपस्थित होते.

१. श्री. राजेंद्र निंबाळकर, आयुक्त
२. डॉ. विजया कंठे, अतिरिक्त आयुक्त
४. श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी, प्र. महापालिका सचिव
५. श्री. राम जैसवार, शहर अभियंता
६. श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी
१०.श्री. महेश शितलानी, कनिष्ठ अभियंता
११. श्री. गणेश शिंपी, प्र. सहाय्यक आयुक्त
१२. श्री. विनायक फासे, सहाय्यक मुख्य लेखापरिक्षक
१२. श्रीम. अलका पवार, प्र.सहाय्यक आयुक्त
१३. श्री. संतोष जाधव, सहाय्यक आयुक्त
१४. श्रीमती श्रध्दा सपकाळे, प्रोग्रामर
१५. श्री. भास्कर मिरपगार, प्र. अग्निशमन अधिकारी
१६. श्री. हनुमंत खरात, कनिष्ठ अभियंता
१७. श्री. दत्तात्रय जाधव, प्र. सहाय्यक आयुक्त
१८. श्री. बी.एस. पाटील, शाखा अभियंता
१९. श्री. रहेजा, शाखा अभियंता
२०. श्री. ठाकरे, शाखा अभियंता
२१. श्री. बाळू नेटक, प्र. सुरक्षा अधिकारी
२२. श्रीमती. विशाखा सावंत, प्र. मालमत्ता व्यवस्थापक
२३. श्रीमती छाया डांगे, प्र.सहाय्यक आयुक्त
२४. श्री. अच्युत सासे, मुख्य लिपीक
२५. श्रीम. शितल बोराडे, अकॉटंट
२६. श्री. एकनाथ पवार, प्र. स्वच्छता निरीक्षक
२७. श्री. विनोद केणे, प्र. स्वच्छता निरीक्षक
२७. श्री. यशवंत सगळे, प्र. वाहन व्यवस्थापक

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.

१. श्रीमती मनिषा महाजन
२. श्रीमती नर्गिस खान
३. श्री. अशोक रामरख्यानी
४. श्री. बाळु भांगरे

महापालिका सचिव:— दुसरी महासभा सायंकाळी ५.३५ वाजता सुरू करण्यात आली.

विषय क्र.१.वाचुन दाखवितात. प्रश्नोत्तरे .....

उप महापौर, श्री. जीवन इदनानी:— प्रश्नोत्तरे नंतर घेण्यात येतील, आता कर्मचा—यांच्या बाबतीत जो एजेंडा आहे, तो घेण्यात यावा. प्रश्नोत्तरे नंतर घ्या आणि लक्षवेधी पण नंतर घ्या. प्रश्नोत्तर वगळण्यात यावा.

**महापालिका सचिव:—** प्रश्नोत्तरे चा तास डिफर करण्यात येत आहे.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** दुस—या मिटींगमध्ये घ्या.

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :—**प्रश्नोत्तराचा तास वगळण्यात येत आहे.

---

**विषय** :— प्रश्नोत्तराचा तास वगळण्याबाबत

सूचकाचे नांव :—श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नांव :— श्री. राजेंद्र चौधरी

महासभा ठराव क्र. २७ अ दिनांक :—९/१०/२०१७

ही महासभा आज दिनांक ९/१०/२०१७ रोजीच्या महासभेतील प्रश्नोत्तराचा काळ वगळण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर/पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव:—** दोन लक्षवेधी आलेल्या आहेत.

**महापालिका सचिव:—**लक्षवेधी सुचना क्र. १८ जीचे सुचक आहेत, श्रीमती अर्चना करणकाळे व अनुमोदक आहेत श्री. प्रदिप रामचंदानी, लक्षवेधी सुचना याप्रकारची आहे......................

**लक्षवेधी सूचना क्रमांक १**

विषय:— महापालिकेचे बंद पडलेले जकात नाके महिला बचत गटांना स्वयंरोजगारार्थ उपलब्ध करून मिळणेबाबत.

लक्षवेधी सुचना क्र. ०२ जीचे सुचक आहेत, श्रीमती ज्योती चैनानी व अनुमोदक आहेत श्रीम. कांचन लुंड, लक्षवेधी सुचना याप्रकारची आहे.....................

**लक्षवेधी सूचना क्रमांक ०२**

विषयः— अनधिकृत बांधकामावर कार्यवाही होत नसलेबाबत.

दोन्ही लक्षवेधी मा. महापौरांनी स्विकारल्या आहेत. लक्षवेधी नंतर घ्यायची का काय?

**सदस्य, श्री.किशोर वनवारीः—** दोन्ही लक्षवेधी नंतर घेऊ.

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :—**लक्षवेधी अमान्य करा.

**महापालिका सचिवः—** मा. महापौरांच्या आदेशान्वये दोन्ही लक्षवेधी मा. पीठासीन अधिकारी यांनी अमान्य केल्या आहेत.

**महापालिका सचिव :—** विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. २ :—** मयत झालेल्या कर्मचा—यांना वारसास तात्पुरत्या स्वरूपात करार पध्दतीने ठोक

वेतनावर नियुक्ती देणे.

---

**सदस्य, श्रीराजेंद्र चौधरीः—** एकुण किती कर्मचारी आहेत, पास करा.

**सदस्य, श्री.सुनिल सुर्वेः—** किती दिवस झाले, किती दिवसात होईल. ते पहीले महत्वाचे सांगा. किती लोक आहेत आणि किती दिवसात होणार आहे. पास...पास... करून पुढे काही होत नाही. नाही म्हणजे फक्त शिक्षण समितीचे का महापालिकेतील पण सर्वच ना? कर्मचारी कुठले कुठले त्याचा खुलासा तर करा. फक्त शिक्षण मंडाळाचेच का महापालिकेचे पण कर्मचारी....

**श्रीम.निलीमा कदम, अकाउंटंट, शिक्षण मंडळः—** ठराव आल्या नंतर लगेच दोन दिवसात आम्ही करू.

**सदस्य, श्री.सुनिल सुर्वेः—** नाही नाही, एक मिनीट फक्त, शिक्षण मंडाळाचे फक्त किंवा महापालिकेचे पण जे अनुकंपाचे आहेत, त्यांना घ्यायचे. तुम्ही लक्षात घ्या.

**सदस्य, श्री राजेंद्र चौधरीः—** शिक्षण मंडळाचे घ्या, आम्हांला काहीही हरकत नाही, महापालिकेचे पण घेतले पाहीजेत.

**सदस्य, श्री.सुनिल सुर्वेः—** तुम्ही लक्षात घ्या, मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, हा जो विषय आला आहे. शिक्षण मंडळा बरोबर महापालिकेचे पण घ्या. त्याच्या सोबत, शिक्षण मंडाळाचा विषय आला पण विषय तोच आहे. शिक्षण मंडळ महापालिकेचे आहे, आपणच निर्णय देतो.

**सदस्य, श्री.धनंजय बोडारेः—** आयुक्त साहेब, हा प्रस्ताव जो आहे, याच्यामध्येच नमुद केले आहे की, उल्हासनगर महानगरपालिकेच्या सेवेत असलेल्या वर्ग—३ व वर्ग—४ हा प्रस्ताव प्रशासन अधिका—यांनी आणला आहे.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानीः—** आता शिक्षण मंडाळाच्या अधिका—यांनी सांगितले आहे, त्यांचा ठराव आल्या नंतर दोन दिवसात त्यांना असे महानगरपालिकेच्या वतीने कोण बोलणार आहे की, किती दिवसात करणार आहेत. महानगरपालिकेच्या वतीने कोण इथे येवून बोलणार आहे की, प्रस्ताव तुमच्याकडे आल्यास आपण किती दिवसात ठोक वेतनाच्या कर्मचा—यांना कायमस्वरूपी घेणार. इतिवृत्ताची वाट न पाहता पारीत करा.

**सदस्य, श्री.सुनिल सुर्वेः—** मा. महापौरजी, याच्यामध्ये विषय असा आहे, शिक्षण मंडाळाये अधिकारी प्लस उल्हासनगर महानगरपालिकेच्या सेवेत असतांना वर्ग—३ च्या एखादया कर्मचा—याचे निधन झाल्यास त्याचे वारसास महापालिकेच्या सेवेत सामावून घेण्यात येते. परंतु अशी कारवाई करण्यास बराच अवधी लागतो, एखादया कुटूंबातील कर्त्या व्यक्तिीचे निधन झाल्यास संपुर्ण कुटूंब त्याच्यावर अवलंबून असल्याने त्या कुटूंबावर उपासमारीची वेळ येते. त्यामुळे फक्त शिक्षण मंडळ नाही तर महानगरपालिकेचे पण जे कर्मचारी मयत झालेले आहेत. त्यांच्या वारसांना पण लवकरात लवकर आणि इतिवृत्ताची वाट न पहाता म्हणतात ते बरोबर आहे. पण ते लवकरात लवकर आठवडयात किंवा दहा दिवसात झाले पाहीजे. दिवाळी त्यांची चांगली गेली पाहीजे की, आम्हांला कायमस्वरूपी सामावून घेतले म्हणून.

**महापालिका सचिव :—** मी ठराव वाचुन दाखविते, ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार शिक्षण विभागात व महापालिकेत कार्यरत मयत झालेल्या कर्मचा—याच्या वारसास तात्पुरत्या स्वरुपात करार पध्दतीने ठोक वेतनावर नियुक्ती करणेस मान्यता देत आहे. ठिक आहे? इतिवृत्ताची वाट न पहाता पास?

**सदस्य, श्री.सतरामदास जेसवानीः—** मा. महापौरजी, जे लोक दोन—तीन महीन्यापासून सेवानिवृत्त झाले आहेत, त्या लोकांना पेन्शन पण मिळत नाही, आता दिवाळी येत आहे.

**सदस्य, श्री.धनंजय बोडारेः—** या बाबत साहेब, महापौर महोदया, आपण शासनाकडे पाठपुरावा करावा. महापालिकेच्या इतिहासात असे पहील्यांदा होते. पुन्हा आम्ही आता तेच बोलायचे की, अच्छे दिन म्हणजे शिक्षकांना पेन्शन पण मिळत नाही. महापालिकेचे अनुदान राखून ठेवले आहे. शासनाकडून येणारा ५० टक्के निधी तो शासन पाठवत नाही. चांगल्या दर्जाचे शिक्षण मंत्री आहेत, श्री. प्रमोद तावडे, आमचे मित्र आहेत, पण दुदैवाने गेल्या चार महीन्यापासून मला वाटते की, शासनाने इथे निधी पाठवला नाही. त्यामुळे त्यांना पेन्शन मिळत नाहीआणि शिक्षक अक्षरक्षः रडत आहेत. प्रदिपजी खरोखर चांगले दिवस दाखवायचे असतील तर नुसते बोलू नका, “बोलाची कढी आणि बोलाचे भात” तर शिक्षकांना त्यांना पेन्शन तरी मिळावी एवढी तरी अपेक्षा ठेवा. मी मघाशी पण म्हणटलो होतो. महापौर महोदया, आपण या बाबतीत शिक्षण विभागाकडे,महाराष्ट्र शासनाकडे पाठपुरावा करावा, आयुक्त साहेबांनी सांगितले, त्यांचे त्यांनी क्लियर केले आहे. महापालिकेचा निधी त्यांनी शिक्षण मंडळाकडे दिला आहे. पण शासनाचा न आल्यामुळे शिक्षकांना पेन्शन देण्यासाठी प्राधान्य देवून लक्ष दया आणि शासनाचा निधी लवकरात लवकर मिळण्यासाठी पाठपुरावा करावा, धन्यवाद.

**<u>सदस्य, श्री.प्रदिप रामचंदानी:–</u>** धनंजय बोडारे साहेबांनी खुप चांगला मुद्दा मांडला आहे.

**<u>सदस्य, श्री.सुनिल सुर्वे:–</u>** विकास पण थांबला आणि प्रकाश पण गेला.

**<u>सदस्य, श्री.प्रदिप रामचंदानी:–</u>** यासाठी आम्ही नक्की प्रयत्न करू आणि शिक्षण मंडळासाठी पैसे घेऊन येवू, परंतु बोडारे साहेबांच्या हेही लक्षात आले पाहीजे की, शिवसेना पण सोबत शासनात आहे. तुम्ही पण शासनात आहेत, शासनाचा भाग म्हणून तुम्ही पण प्रयंत्न करा.

**<u>काही सदस्य:–</u>** पास..पास...

**<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी:–</u>** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. २** :–मयत झालेल्या कर्मचा–याच्या वारसास तात्पुरत्या स्वरुपात करार पध्दतीने ठोक वेतनावर नियुक्ती देणे.

**<u>प्रस्तावना</u>**

उल्हासनगर महानगरपालिका शिक्षण विभागाच्या कार्यक्षेत्रामध्ये मनपाच्या एकूण २८ शाळामध्ये मराठी, हिंदी, सिंधी व गुजराती माध्यमाच्या शाळा चालविण्यात येतात. त्यामध्ये मनपा शाळा क्र. १८ हिंदी माध्यमाच्या शाळेमध्ये श्री. दयाल कुकरेजा हे सह शिक्षक पदावर कार्यरत असतांना दि. ०४/०६/२००७ रोजी त्यांचे अकस्मित निधन झाले. त्यांच्या वारसाने म.न.पा.शि.मं. उल्हासनगर कार्यालयात तत्वावर नोकरी मिळणेकरिता विनंती अर्ज केला आहे.

उल्हासनगर महानगरपालिका सेवेत असतांना वर्ग ३ व ४ मधील एखादया कर्मचा–याचे निधन झाल्यास त्याचे वारसास महापालिकेच्या सेवेत सामावून घेण्यात येते. परंतु अशा कार्यवाही करण्यास बराच अवधी लागतो. एखादया कुटूंबातील कर्ता पुरुषांचे निधन झाल्यास व संपूर्ण कुटूंब त्यांच्यावर अवलंबून असल्यास त्या कुटूंबावर उपासमारीची वेळ येते.

याबाबत ठाणे महानगरपालिकेने मयत कर्मचा–याच्या वारसांना अनुकंपा तत्वाने वर्ग ३ व ४ मध्ये संबंधीत कर्मचा–याची तात्पुरत्या स्वरुपात करार पध्दतीने ठोकवेतनावर घेण्याचा ठराव करुन घेतले आहे. त्याच धर्तीवर उल्हासनगर महानगरपालिकेने अशा पात्र कर्मचा–यांच्या वारसांना वर्ग -३ व वर्ग -४ मध्ये त्यांच्या शैक्षणिक अहर्तानुसार ठोकवेतनावर तात्पुरत्या स्वरुपात करार पध्दतीने नियुक्ती महासभा ठराव क्र. दि. २०/०६/२०११ अन्वये केली असून, त्यांना घेण्यात आले आहे.

त्यानुसार मयत कर्मचा–यांच्या वारसानी अनुकंपा तत्वाने नोकरी मिळणेसाठी सादर केलेल्या अर्जानुसार त्यांच्या शैक्षणिक अर्हतेनुसार व सर्व कागदपत्राची पडताळणी अंती उपलब्ध उमेदवारास वर्ग –३ मध्ये संबंधीत उमेदवाराची तात्पुतत्या स्वरुपात करार पध्दतीने ठोक वेतनावर नेमणूक करणेसाठी सदर प्रस्ताव मा. महासभेच्या मंजूरीसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

**महासभा ठराव क्र. २८** **दिनांक :९/१०/२०१७**

सूचकाचे नाव : श्री.जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव : श्री.राजेश वदारिया

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार शिक्षण विभागात व महापालिकेत कार्यरत मयत झालेल्या कर्मचा–याच्या वारसास तात्पुरत्या स्वरुपात करार पध्दतीने ठोक वेतनावर नियुक्ती करणेस मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

महापौर/ पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :–** विषय क्र. ३ वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. ३ :–** भांडवली मुल्यावर आधारीत महाराष्ट्र शिक्षण आणि रोजगार हमी (उपकर) दर राजपत्रात अधिसूचित करणेसाठी मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडे प्रस्ताव सादर करणेसाठी स्थायी समिती ठराव क्रमांक ३७ दिनांक २१/९/२०१७ बाबत निर्णय घेणे.

---

**सदस्य, श्री.प्रदिप रामचंदानी:–** आता काय होणार आहे, त्याच्यात बदल काय झाला आहे. आता सद्याची परिस्थिती आणि या ठरावाची परिस्थिती याच्यात तफावत काय आहे?

**<u>सहाय्यक आयुक्त, श्री.संतोष जाधवः—</u>** सन्माननिय महापौर मॅडम, सन्माननिय उप महापौर, सन्माननिय आयुक्त साहेब, भांडवली मुल्याच्या आधारीत प्रॉपर्टी टॅक्सच्या संदर्भात महासभेमध्ये निर्णय झाला आहे. त्या अनुषंगाने राज्य शिक्षण उप कर आणि रोजगारहमी उप कर याच्यामध्ये आता निवासी इमारती करीता राज्य उप शिक्षण कर ०.० १ टक्के आणि वाणिज्यसाठी सुध्दा ०.० १ टक्के, औद्योगिक इमारतीसाठी ०.० १ टक्के आणि जमीनीसाठी ०.० १ टक्के जो सध्या कर आपण ५ टक्के घेत अहोत. सध्याच्या रेटमध्ये आपले ५ टक्के आहे, तो ०.० १ टक्के होणार आहे. भांडवली मुल्यावर कमी होणार आहे. शिक्षण उप कराच्या संदर्भातला रेट कमी होणार आहे.

**<u>सदस्य, श्री.प्रदिप रामचंदानीः—</u>** मागे आपण जास्त भरत होतो, आता कमी होणार आहे.पास...पास...

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेरावः—</u>** जमनुजी राजीनामा दया आणि यांना सभागृह नेता करा. श्री. प्रदिपजींना सभागृह नेता करा आणि आपण राजीनामा दया.

**<u>काही सदस्यः—</u>** पास....पास... इतिवृत्ताची वाट न पाहता पारीत करा.

**<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u>** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ विषय क्र. ३ :—भांडवली मुल्यावर आधारीत महाराष्ट्र शिक्षण आणि रोजगार हमी (उपकर) दर

राजपत्रात अधिसूचित करणेसाठी मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडे प्रस्ताव सादर करणेसाठी स्थायी समिती ठराव क्रमांक ३७ दिनांक २१/९/२०१७ बाबत निर्णय घेणे.

**<u>प्रस्तावना</u>**

राज्य शासनाने सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १० अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम यामध्ये सुधारणा करून इमारती व जमिनीचे भांडवली मुल्य यांवर मालमत्ता कर बसविण्याचे प्रयोजन केले आहे. तसेच महालेखाकार कार्यालय, मुंबई यांचेकडीलसुचना व महानगरपालिकेनेअमृत योजनेत भाग घेतला असुन केंद्र व राज्य शासनाकडुन अनुदान प्राप्त करण्यासाठी कर आकारणी व्यवस्थापनेत सुधारणा करणेची अट आहे. केंद्रीय वित आयोगाच्या शिफारशी नुसार ज्या ''ड'' वर्ग महानगरपालिका आपल्या क्षेत्रात भांडवलीमुल्य आधारीत कर आकारणी सुरू करतीलत्यामहानगरपालिकांमध्ये उत्तेजनार्थ निधी वितरीत करण्याचे धोरण आहे. राज्यातील इतर महानगरपालिकांना हे धोरण राबविणे आहे.

वर्ष २०१६—१७ पासुन (अ)उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात करयोग्य मूल्य ऐवजी भांडवली मूल्यावर आधारीत मालमत्ताकर आकारणी करणे (ब) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे अनुसूची 'ड' चे प्रकरण ८ ''कराधाननियम'' यातील नियम ७—अ याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, आयुक्त, उक्त पोट—कलम (७अ) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे, याद्वारे उल्हासनगर शहरातील इमारती व जमिनी यांच्या वापरकर्त्याच्या घटकांसाठी आणि प्रवर्गासाठी आणि इमारती व जमिनी यांचे भांडवलीमूल्य निश्चित करण्याच्या प्रयोजनासाठी, अशा विविध घटकांना आणि प्रवर्गांना द्यावयाच्या बहुविध भारांकाच्या बाबतीत तरतूद

करण्याकरीता, विनियम(क) करांचे दर यांस स्थायी समिती ठराव क्र. १०६, दिनांक १४/०३/२०१६ व महासभा ठराव क्र. ८९, दिनांक २९/०३/२०१६ अन्वये मंजुरी देण्यात आली आहे.

परंतु महाराष्ट्र शिक्षण आणि रोजगार हमी (उपकर) (सुधारणा) अध्यादेश, २०१२ याद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या महाराष्ट्र शिक्षण आणि रोजगार हमी (उपकर) अधिनियम, १९६२ (१९६२ चामहा. २७) च्या कलम ४ च्या खंड (अ) मधील उप–खंड (दोन) व कलम ६ब च्या खंड (अ) मधील उप–खंड (दोन) नुसार मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम (१९४९ चा ३) या अन्वये घटितकेलेल्या उल्हासनगर महानगरपालिकेच्या, नगरपालिका क्षेत्राच्या बाबतीत दिनांक १ एप्रिल २०१० पासून जमिनींचे किंवा इमारतींचे भांडवलीमुल्य मालमत्ता कराच्या आकारणीचा मूलाधार म्हणून स्वीकारलेल्या, निवासी व निवासेतर प्रयोजनांसाठी वापरण्यात येणाऱ्या किंवा वापरण्याच्या हेतू असलेल्या जमिनींवर व इमारतींवर आकारण्यात येणाऱ्या दरांचा प्रस्ताव, महानगरपालिकेकडून प्राप्त झाल्यावर, दरराजपत्रातील अधिसूचनेद्वारे, अधिसूचित करण्याचे अधिकार, जिल्हाधिकाऱ्यांना प्रदान करण्यात आले आहेत.

त्याअनुषंगाने उल्हासनगर महानगरपालिकेच्या क्षेत्रासाठी, निवासी व निवासेतर प्रयोजनासाठी वापरण्यात येणाऱ्या किंवा वापरण्याच्या हेतू असलेल्या जमिनींवर व इमारतींवर आकारण्यात येणाऱ्या भांडवलीकृत मूल्यावर आधारित राज्य शिक्षण उपकर व रोजगार हमी उपकर ज्यादराने उल्हासनगर महानगरपालिकेने आकारावयाचे व गोळा करावयाचे आहेत ते दर, खालील प्रमाणे नमूद केल्याप्रमाणे, दि. १ एप्रिल २०१६ पासून अधिसूचित करणेसाठी स्थायी समिती, महासभेच्या मंजुरीने मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडे प्रस्ताव सादर करावयाचा आहे.

# अनुसूची

| अनु क्रमांक | वापरकर्ताप्रवर्ग | राज्य शिक्षणउपकर | रोजगारहमीउपकर |
|---|---|---|---|
| १. | निवासीइमारती<br>खोली, किंवा सदनिका किंवा वेश्म (अपार्टमेंट) किंवा गाळा व तत्सम<br>जल तरण तलाव<br>स्टील्ट किंवा तळघर किंवा पोडियम मधील कार पार्कींग<br>जोडलेले गॅरेज<br>सोसायटीकार्यालय | ०.०१ : | लागूनाही |
| २.. | दुकाने/वाणिज्यिक/अनिवासीइमारती<br>दुकान, रेस्टॉरंट, विविध वस्तू भांडार आणि शॉपिग सेंटर, दवाखाना, | ०.०१ : | ०.००५: |

| | | | |
|---|---|---|---|
| | हॉस्पिटल, क्लिनिक आणि पॅथोलॉजी प्रयोगशाळा, खाजगी हेल्थ क्लब, जिम्नॅशियम, जलतरणतलाव, कार्यालय, गोदाम/साठवण/कोठार, वनज काटा व इतर कोणत्याही गटात समाविष्ट नसलेले घटक<br>रेस्टॉरंट व बार, मंगल कार्यालय/हॉल/कन्वेन्शनल हॉल/कम्युनिटी हॉल/पार्टी हॉलइत्यादी, मॉल, सिनेमा हॉल/सिनेमागृह/नाटयगृह, खुले सिनेमागृह–रंगमंच व इतर बांधकाम, मल्टिप्लेक्स, बॅंक, बॅंकेतर वित्तीय संस्था, जीवन व जीवनेत्तर विमा निगम कंपनी, शिकवणी वर्ग, टॉवर, जाहिरातफलक, ऑटोमॅटिक टेलर मशीन आणि मनीचेंजिंग सेंटर, पेट्रोलपंप/सर्व्हीस स्टेशन/एलपीजी, सीएनजीस्टेशन/केरोसिनस्टेशन यांचेबांधकाम<br>शैक्षणिक संस्था, नर्सरी किट्स कॉर्नर, प्ले ग्रुप<br>तबेला<br>स्टील्ट/तळघर/पोडियम मधील कार पार्कींग<br>जोडलेले गॅरेज<br>सोसायटी कार्यायल | | |
| ३. | औद्योगिकइमारती<br>औद्योगिक वसाहत<br>सेवा औद्योगिक वसाहत<br>स्टील्ट/तळघर/पोडियम मधील कार पार्कींग | ०.०१ : | ०.००५: |

| | | | |
|---|---|---|---|
| | जोडलेले गॅरेज<br>सोसायटी कार्यालय | | |
| ४. | <u>जमीन</u><br>खुली जमीन–निवासी<br>खुली जमीन–अनिवासी<br>(क) वाणिज्यिक<br>(ख) औद्योगिक<br>राखीव असलेली खुली जमीन<br>(क) अंशत: अननुज्ञेयता<br>(ख) एकूण अननुज्ञेयता | ०.०१ : | लागूनाही |

तरी वरील प्रमाणे प्रस्ताव स्थायी समितीपुढे मंजुरी करीता सादर करण्यात येत आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र. ३६</u> <u>दिनांक :–२१/९/२०१७</u>

सुचकाचे नाव :– श्री. सुनिल सुर्वे

अनुमोदकाचे नाव :– श्री. दिपक सिरवानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार भांडवली मुल्यावर आधारीत महाराष्ट्र शिक्षण आणि रोजगार हमी (उपकर) दर राजपत्रात अधिसूचित करणेसाठी मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडे प्रस्ताव सादर करणेसाठी मा. महासभेच्या मंजुरीच्या अधिन राहून मान्यता देत आहे.
या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

<u>सर्वानुमते</u>

सभापती / पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––

महासभा ठराव क्र:२९ 	दिनांक:— ९/१०/२०१७

सुचकाचे नाव :— श्री.जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री.राजेश वदारिया

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे भांडवली मुल्यावर आधारीत महाराष्ट्र शिक्षण आणि रोजगार हमी (उपकर) दर राजपत्रात अधिसूचित करणेसाठी मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडे मंजुरीसाठी प्रस्ताव सादर करणेसाठी स्थायी समिती ठराव क्रमांक ३७ दिनांक २१/९/२०१७ कायम करीत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

हापालिका सचिव :— विषय क्र. ४ वाचुन दाखवितात

————————————————————————————————————————————————

⇨ **विषय क्र.** ४ :— उल्हासनगर महानगरपालिका अधिकारी/ कर्मचा—यांना वर्ष २०१६—२०१७ साठी

सानुग्रह अनुदान देणेस मंजूरी देणे.

————————————————————————————————————————————————

सदस्य, श्री. भगवान भालेराव:— इतिवृत्ताची वाट न पहाता पास…पास…

सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:— मा. महापौर साहेबा, अग्निशमन विभागासाठी पण काही विचार करा. अग्निशमन विभागाच्या कर्मचा—यांना पण दिवाळीमध्ये काही मिळाले पाहीजेत.

**<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:–</u>** हे जे सानुग्रह अनुदान आहे, ते सर्व कर्मचारी जे आहेत, त्याच्यात डॉक्टर असोत, नर्स असोत, त्या नंतर जे आपले ठोक वेतनावर असलेले सर्व कर्मचारी या सर्वांना अनुदान देत आहे.

**<u>सदस्य, श्री. शंकर लुंड:–</u>** सचिव मॅडम, मागच्या पंधरा दिवसापासून शहरामध्ये जो पाऊस पडत आहे, वादळ झाले होते. त्यावेळी श्री. बाळू नेटके, या अधिका–याने उत्कृष्ट काम केले आहे. त्यांनी त्या वेळी दिवस बघितला नाही आणि रात्रही बघितली नाही, असे काम केले आहे. तरी आपण त्यांचे आपल्या सभागृहातर्फे सन्मान करू या आणि त्यांच्या सर्व टीमचे येथे सत्कार करायला पाहीजे. त्यांनी पंधरा दिवस जी मेहनत केली आहे, पहाटे ५.०० वाजता, ४.०० वाजता श्री. नेटकेजी आणि त्यांची सर्व टीम....

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:–</u>** सध्या बोनसचा विषय चालू आहे. त्याच्यामध्ये एक आहे, आयुक्त साहेब, दरवर्षी आपण बोनस देतांना जे आरोग्य विभागामध्ये कर्मचारी आहेत. नर्स आणि इतर त्यांना सुध्दा आपण दर वर्षी बोनस देत असतो. जे.एन.यु.एल.एम. मध्ये केंद्र शासनाच्या ज्या योजना आहेत, त्या अंतर्गत काम करणा–या महीला आणि मुली आहेत किंवा सुवर्ण जयंतीमध्ये असतील त्यांनाही आपण देतो, त्यांनाही याच्यामध्ये समावेश करा.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:–</u>** आपल्याकडे जे नियमित कर्मचारी आहेत, त्या सर्वांचा समावेश झालेला आहे. फक्त जे ठोक वेतन, कॉन्ट्रॅक पध्दतीने आहेत, त्यांना आपल्याला देता येणार नाही. मगाशी कोणी तरी तो मुद्दा पण घेतला होता.

**<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:–</u>** नाही नाही साहेब, ठोक वेतनवाल्यांना आपण मागच्या वर्षी दिलेला आहे.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:–</u>** कॉन्ट्रॅक बेसिकवाल्यांना आपण दिलेले नाही.

**<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:–</u>** कॉन्ट्रॅक बेसिकवाल्यांना मी म्हणत नाही साहेब.

**<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:–</u>** ठोक वेतनावारती आपल्याकडे जे केंद्र शासनाच्या वतीने कर्मचारी आपल्याकडे काम करीत आहेत, त्यांना.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:–</u>** त्यांना पण देतो, पण कॉन्ट्रॅक बेसिकमध्ये जे काम करतात, ती आपली जबाबदारी आहे.

**<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:–</u>** कॉन्ट्रॅक बेसिकचे कर्मचारी सोडून.

**<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:–</u>** मा. महापौर मॅडम, उप महापौरजी, आपले सदस्य, श्री. शंकर लुंड आणि टोनी सिरवानी यांनी सांगितले आहे की, श्री. बाळू नेटके यांनी या पंधरा दिवसात जो मुसळदार पाऊस पडला आहे, त्यांवेळी त्यानी खरोखर चांगली कामगिरी केली आहे. माझा पण एक अनुभव आहे, रात्रीच्या वेळी लाईट गेली होती आणि अमन टॉकिजच्या इथे एक झाड पडले होते. मी दोन तास तिथे उभा होतो. ते फक्त दोन कर्मचा–यां सोबत काम करीत होते आणि त्यांनी ते काम पुर्ण केले आणि काही असे उदाहरणे

आहेत की, त्यांनी अशा वेळी इमानदारीने कामे केली आहेत आणि आता या वेळी सदस्य, श्री. शंकर लुंड, इथे जाहीर करतील आणि त्यांचे सत्कार करतील.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरीः—** मा. महापौरजी, उप महापौर, आयुक्त साहेब, ज्या दिवशी शहरामध्ये ...

**सदस्य, श्री. शंकर लुंडः—** माझी बहीण, श्रीमती, राजश्री चौधरी यांना सुध्दा त्यांचे स्वागत करायचे आहे.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरीः—** मा. महापौर, उप महापौर, आयुक्त साहेब, काही दिवसापुर्वी उल्हासनगरमध्ये जो पाऊस झाला होता आणि त्या वेळी पावसामध्ये काही झाडे पडली होती. ती झाडे पडल्यामुळे संपुर्ण शहराची लाईट गेली होती. मी स्वतः माझा अनुभव सांगतो की, मी अग्निशमन विभागाला फोन केला होता आणि अग्निशमन विभागाच्या लोकांना घेऊन रात्री ३.०० वाजता पडलेले झाड काढले होते आणि झाड काढल्या नंतर संपुर्ण शहराची लाईट परत आली. अशा वेळी आमच्या बरोबर जे काम करीत होते, त्यांचे नाव आहे, श्री. बाळू नेटके, अग्निशमन विभागाचे अधिकारी आहेत, त्यांचे खरोखर महापालिकेच्या वतीने सत्कार व्हायला पाहीजे. त्याच बरोबर आपला उल्हासनगर महानगरपालिकेचा जो आपत्तकालीन विभाग आहे, तो आपत्तकालीन विभाग आपण फक्त काही दिवसांसाठीच ठेवत असतो. चार महीने पाऊस येतो, ते चारच महीने आपत्तकालीन विभाग कार्यरत असते. परंतु माझी अशी सुचना आहे की, हा जो आपत्तकालीन विभाग आहे, तो कायमस्वरूपी आपल्या महानगरपालिकेत राहीला पाहीजे. कारण कधी पण जर काही संकट आले, तर आपत्तकालीन विभाग आपल्याला उपयोगी पडेल. तिथे फक्त चार ते आठ कर्मचारी आहेत. ते बरोबर काम करतात आणि त्यांना चार महिने ठेवतात, नंतर चार महीन्या नंतर तेथून काढून टाकतात. तर त्यांना आपण कायमस्वरूपी आपत्तकालीन विभाग तयार करून ठेवले पाहीजे. जर शहरावर कुठली आपती आली तर ती लोक काम करू शकतात आणि त्यांना चांगले प्रशिक्षण दिलेले आहे. चांगले काम ते करतात, आमच्या समोर त्यांनी केलेले आहे, म्हणून मी हा मुद्दा मांडलेला आहे.

या सदस्या, श्रीमती पंचम कालानी यांनी सभागृहामध्ये प्रवेश केला.

**सदस्य, श्री. भगवान भालेरावः—** श्री. बाळू नेटकेच्या बदल जसे केले आहे, तसेच मला वाटते की, सचिव कार्यालयामध्ये श्री. दिनकर पवार, हे ३१ तारखेला सेवानिवृत्त होणार आहेत. त्यांनी एका ठिकाणी ३० वर्षे सेवा दिलेली आहे, प्रत्येक नगरसेवकाच्या घरी, प्रत्येक नगरसेवक, इतके होऊन गेले आहेत, ३० वर्षा पासून एकाच ठिकाणी काम केले आहे आणि एकाच ठिकाणी ते सेवानिवृत्त होणार आहेत. तर मला वाटते की, त्यांचा पण सभागृहाने सत्कार करावा आणि ते ३० तारखेला सेवानिवृत्त होणार आहेत, ३० तारखे नंतर आपली महासभा होणार नाही. म्हणून त्यांचाही सत्कार करावा. कारण ते एकाच ठिकाणी नौकरीला लागले आणि तिथेच ते सेवानिवृत्त झाले.

**सदस्य, श्री. शंकर लुंडः—** आमच्या सभागृहाने आज दाखवून दिले आहे की, आयुक्त साहेब, आज आमच्या सभागृहाने दाखवून दिले की, जो इमानदारीने काम करीत आहे, त्याच्यासाठी संपुर्ण सभागृह एकत्र आहे आणि आम्ही आज श्री. बाळू नेटकेसाठी टाळी वाजवत आहेत आणि सर्वाता संथगतीने काम करणारा

जो पाणी पुरवठा विभाग आहे, त्यांच्यासाठी आपण वर्ष ना वर्ष बोलत आलो आहे की, त्यांनी सुध्दा एवढे चांगले बनायला पाहीजे की, आम्ही त्यांचाही सत्कार करू.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकरः—** ते जोडण्याचे काम करतात आणि हे तोडण्याचे काम करतात. फक्त थोडा जो कठिण काम आहे, ते करतात.

**सदस्य, श्री. शंकर लुंडः—** सर यांना पण तसेच काम करायला सांगा.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकरः—** या गोष्टीशी मी पण सहमत आहे, मिस्टर, बाळून नेटके हे खरोखर इमानदारीने काम करतात. जेव्हा मी कधी फोन करतो, काही विचारतो तर ते एका फोनवरच काम निपटून टाकतात. नंतर परत फोन करायची मला कधी गरज पडली नाही. ते स्वतः होऊन मला सांगत असतात. धिस इज रियली अशा प्रकारे सगळया लोकांनी करायला पाहीजे. त्यांचे प्रशासन खुप चांगले आहे. आपण लोकांनी आठवण करून दिली आहे. त्यामुळे मी प्रशासनाकडून तुम्हां सगळयांना धन्यवाद देतो.

**सदस्य, श्री. शंकर लुंडः—** नंतरच्या महासभेमध्ये त्यांचा सत्कार ठेवण्यात यावा.

**सदस्य, श्री.धनंजय बोडारेः—** साहेब खरोखर...

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरीः—** लाईट डिपार्टमेंटमध्ये श्री. गोविंद पिंपळकर,.....

**सदस्य, श्री.धनंजय बोडारेः—** पहील्या दिवशी पाऊस झाल्या नंतर, वादळ वारा आला होता, तेव्हा उल्हासनगरमध्ये जवळ पास ५० च्या वर झाडे पडलेली होती आणि मी तुमच्या कानावर टाकले की, काही लोक तक्रारही करीत असतील. परंतु अग्निशमन विभागाची एवढी ओढाताण झाली होती की, प्रत्येक जण सांगत होते, माझे पहीले काढ, तुम्हांला आठवत असेल. खरोखर श्री. बाळू नेटके त्या दिवशी जिवापाड मेहनत घेतली होती. अगदी रात्रभर काम करून दुस—या दिवशी दिवस भर, मला वाटते तो माणूस ३६ तास ४८ तास झोपलेला नसेल. तर काही लोक अशी आहेत, एखादी संस्था असते त्या पैकी श्री. बाळू नेटके आहेत. ही लायब्रटी नाही. तर अशा प्रकारचे प्रोत्साहन आपण इतर लोकांना दया. ज्या पध्दतीने बाळू नेटके सेवा म्हणून काम करतात. तशा पध्दतीचे काम बाकीच्यांनी सुध्दा केले पाहीजे. एक चांगले, उत्तम उदाहरण आहे, आमच्या उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये अभिजीत महामुलकर म्हणून होते, नागरीक सुविधा केंद्रामध्ये अगदी सतत ते काम करीत होते, स्वतः सकाळी ९.०० वाजल्यापासून रात्री १२.०० ते १.०० वाजेपर्यंत काम करणारा माणूस, अशा प्रकारची माणसे आपण निर्माण करा. जेणेकरून या शहराचा चांगल्याप्रकारे कायापालट करण्यासाठी तुम्हांला मदत होईल. श्री. बाळू नेटकेंचे संपुर्ण सभागृहाच्या वतीने अभिनंदन करतो आणि इतर अधिका—यांना त्यांचे अनुकरण करण्यासाठी एक प्रोत्साहन दया. कारण तुमचा...

**सदस्य, श्री. शेकर लुंडः—** आबा आताच मी विचारपुस केली....

**सदस्य, श्री. भगवान भालेरावः—** सकाळ पासून संध्याकाळ पर्यंत ऑफिसमध्ये थांबणारे आमचे नगरसेवक श्री. प्रदिप रामचंदानी यांचे पण सत्कार व्हायला पाहीजे.

सदस्य, श्री.अरूण आशानः— मा. आयुक्त साहेब, मा. महापौर,....

सदस्य, श्री.किशोर वनवारीः— दोन शासकीय प्रस्ताव आहेत, ते चालवा.

महापालिका सचिवः— हा ठराव एकदा वाचून दाखते.

सदस्य, श्री.अरूण आशानः— सचिव मॅडम, एक मिनीट आता जो मा. विरोधी पक्ष नेता साहेबांनी ठराव मांडला, ज्यांचे अभिनंदन केले, विरोधी पक्ष नेत्यांना सांगतो की, श्री. बाळू नेटके यांचे शाल व श्रीफळ देवून सत्कार करण्यात यावा.

महापालिका सचिवः— आज श्री. नेटके साहेब आले नाहीत. पुढच्या महासभेमध्ये सत्कार करण्यात येईल.

सदस्य, श्री.अरूण आशानः— ते आज योग्य त्या लायक आहेत. स्वतः आयुक्त साहेबांनी मान्य केले आहे की, असा पण एक विभाग आहे, ते अधिकारी पुन्हा पुन्हा रिप्लाय करतो, परंतु काही काही अधिकरी, आयुक्त साहेब या सभागृहामध्ये मान्य करतात, याचा आम्हांला खुप अभिमान वाटतो की, जे अधिकारी उत्तमरित्या काम करतात. त्यांचा सत्कार पण व्हायला पाहीजे. परंतु साहेब पुढच्या महासभेमध्ये आम्ही तुमचे ते रूप पण बघू की, तुम्ही एखादया अधिका—याला त्यांचा रस्ता दाखवून दयाल, धन्यवाद.

सदस्या, श्रीम..अर्चना करणकाळेः— मा. महापौर मॅडम, मा. आयुक्त साहेब, सर्व सन्माननिय सदस्य, श्री. बाळू नेटके साहेबांचे अभिनंदन होत आहे, खरोखरच खुप चांगले अधिकारी आहेत. आम्ही केव्हाही फोन केला तर ते धावून येतात, जिथे अडचण असेल, झाडे पडलेली असतील तिथे ते येतात. परंतु एक विशेष बाब म्हणून सांगते की, एक क्रिडा अधिकारी म्हणून उत्तम आहेत. एवढया अडचणीमधून ते जिथे स्पर्धा चालू आहेत, तिथे मी स्वतः बघितले आहे. दिवसभर झोडे तोडत होते आणि एकीकडे स्पर्धा लावून येत होते. त्या बदल मी त्यांचे कौतुक करते.

महापालिका सचिवः— ठराव वाचून दाखवत आहे.

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या अटी व शर्तींवर गट "अ", "ब", "क", व "ड" मधील सर्व महापालिका अधिकारी/कर्मचारी तसेच शिक्षण विभागातील अधिकारी/शिक्षकेत्तर कर्मचारी ठोकवेतन, सर्व शिक्षा अभियानाचे कर्मचारी, वैद्यकीय आरोग्य विभागातील विविध योजनेमध्ये मानधनावरील कर्मचारी व प्रतिनियुक्तीवरील सर्व अधिकारी/कर्मचारी यांना वर्ष २०१६—२०१७ चे दिपावली सणानिमित्त सानुग्रह अनुदान नियमानुसार अदा करणेस आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे.

सदस्य, श्री..राजेश वदरियाः— मॅडम, पहीली गोष्ट म्हणजे शिक्षण मंडळ आता आहेच नाही, तो शिक्षण विभाग आहे. जो पर्यंत आपण शिक्षण मंडळ, शिक्षण मंडळ बोलत नाहीत, तो पर्यंत कोणाचीही मानसिकता बदलणार नाही. हे आता शिक्षण विभाग आहे, शिक्षण मंडळ नाही.

काही सदस्यः— पास....पास....

महापौर तथा पीठासीन अधिकारीः— सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

☑

**विषय क्र. ४:–** उल्हासनगर महानगरपालिका अधिकारी/ कर्मचा–यांना वर्ष २०१६–२०१७ साठी सानुग्रह अनुदान देणेस मंजूरी देणे.

<u>प्रस्तावना</u>

सालाबादाप्रमाणे उल्हासनगर महापालिका कर्मचारी व अधिकारी यांना सन २०१६–१७ या वर्षा करिता सानुग्रह अनुदान वाटप करणे बाबत दिनांक २७/०९/२०१७, रोजी मा. महापौर, सो यांच्या अध्यक्षते खाली महापालिकेचे पदाधिकारी व कामगार संघटेनेचे पदाधिकारी यांच्याबरोबर झालेल्या चर्चेनुसार दिपावळी सणानिमित्त (बोनस)/सानुग्रह अनुदान रू. १३,०००/– दिवाळीपूर्वी देण्याचे सर्वानुमते मान्य करण्यात आलेले आहे.

सन २०१५–१६ मध्ये रू. १२,०००/– इतके सानुग्रह अनुदान वाटप करण्यात आले होते. यावर्षी मा. महापौर, उल्हासनगर महानगरपालिका यांचे दालनात झालेल्या चर्चेनुसार रू. १३,०००/– वाटप करावयाचे असल्यास, कर्मचा–यांची संख्या अंदाजे २६५० आहे. त्यानुसार वित्तीय वर्षे २०१६–२०१७ च्या अंदाजपत्रकात सानुग्रह अनुदान या लेखशिर्षामध्ये अंदाजपत्रकात रू. ३३००००००/– इतकी तरतुद आहे. सानुग्रह अनुदानासाठी अंदाजित रक्कम रूप्ये ३४,४५०,०००/– कोटी इतकी रक्कम लागणार आहे.

उपरोक्त नमुद केलेप्रमाणे सादर करणेत येते की, वित्तीय वर्ष २०१६–२०१७ साठी सर्व महापालिका कर्मचा–यांना खालील अटी व शर्तीस अधिन राहुन सानुग्रह अनुदान अदा करणेस प्रस्तावित करण्यात येत आहे.

१) सदरचे सानुग्रह अनुदान गट ''अ'', ''ब'', ''क'' व ''ड'' मधील सर्व महापालिका अधिकारी/कर्मचारी तसेच शिक्षण मंडळातील अधिकारी/शिक्षक कर्मचारी ठोकवेतन, वैद्यकिय आरोग्य विभागातील विविध योजनेमध्ये कंत्राटी कर्मचारी, मानधनावरील कर्मचारी व प्रतिनियुक्तीवरील सर्व अधिकारी/कर्मचारी यांना अनुज्ञेय राहील.

२) जे कर्मचारी ३१ मार्च २०१६ रोजी सेवेत होते आणि ज्यांनी वर्ष २०१६–२०१७ मध्ये किमान ३० दिवस सेवा केलेली असेल असे कर्मचारी सानुग्रह अनुदान मिळण्यास पात्र राहतील.

३) दिनांक १/४/२०१६ ते ३१/३/२०१७ या कालावधीत संपूर्ण वर्ष निलंबीत असलेले कर्मचारी यांना सानुग्रह अनुदान मिळण्यास अपात्र असतील.

४) सदर सानुग्रह अनुदान ही प्रत्यक्ष हजर असलेल्या दिवसाच्या प्रमाणात खालील सुत्रानुसार देण्याचे प्रस्तावित आहे.

रूपय १३,०००/–

........................ग हजर दिवस

३६५ दिवस

५) कर्मचा–यांच्या सेवा कालावधीचा विचार करता, सर्व प्रकारच्या मंजुर रजा गृहीत धरण्यात याव्यात परंतु विना वेतन रजेचा विचार करण्यात येवू नये.

६) सानुग्रह अनुदान संदर्भामध्ये शासनाने वसुली संदर्भामध्ये निकाल दिल्यास सदर रक्कम एक रक्कमी वसुल करण्यात येईल.

७) जे कर्मचारी/अधिकारी ३१ मार्च २०१६ नंतर सेवेत होते गट ''अ'', ''ब'', ''क'' व ''ड'' मधील सर्व महापालिका अधिकारी/कर्मचारी तसेच शिक्षण मंडळातील अधिकारी/शिक्षक कर्मचारी ठोकवेतनावरील कर्माचारी वैद्यकिय आरोग्य विभागातील योजनेमध्ये (हिवताप/आरोग्य सेवक) (प्रकल्पामध्ये) कंत्राटी कर्मचारी, मानधनावरील कर्मचारी, प्रतिनियुक्तीवरील सर्व अधिकारी/कर्मचारी व प्रजनन व बाल आरोग्य केंद्र (त्ब्भ . ∏), राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान (छन्भ्ड), सुधरीत श्रयरोग्य नियंत्रण कार्यक्रम (त्छज्ब्), हिवताप आरोग्य कर्मचारी (डच्), नागरी आरोग्य क्रंद्रावरील शासकीय अधिकारी व कर्मचारी, दिनदयाल अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान, व सर्व शिक्षा अभियान या सर्व योजनेतील अधिकारी कर्मचारी यांना अनुज्ञेय राहील.

उपरोक्त सर्व २०१६–१७ साठी सानुग्रह अनुदान वाटप करणेबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी प्रस्ताव मा. महासभेकडे मान्यतेसाठी सादर.

महासभा ठराव क्र: ३० दिनांकः–९/१०/२०१७

सुचकाचे नाव :–श्री.जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :– श्री.राजेश वदारिया

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या अटी व शर्तीवर गट “अ”, “ब”, “क”, व “ड” मधील सर्व महापालिका अधिकारी/कर्मचारी तसेच शिक्षण विभागातील अधिकारी/शिक्षकेत्तर कर्मचारी ठोकवेतन, सर्व शिक्षा अभियानाचे कर्मचारी, वैद्यकीय आरोग्य विभागातील विविध योजनेमध्ये मानधनावरील कर्मचारी व प्रतिनियुक्तीवरील सर्व अधिकारी/कर्मचारी यांना वर्ष २०१६–२०१७ चे दिपावली सणानिमित्त सानुग्रह अनुदान नियमानुसार अदा करणेस आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असुन तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी

महापालिका सचिव :— विषय क्र. ५ वाचुन दाखवितात

———————————————————————————————————————————————————————
—

⇨ अशासकिय प्रस्ताव:—

विषय क्र. ५ :— उल्हासनगर कर्करोग जनजागृती मॅरेथॉन २०१७ करीता ३ लाख निधी मिळणेबाबत.

पालिका सदस्य श्री.राजेंद्र चौधरी यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

———————————————————————————————————————————————————————
——

सदस्य, श्री.किशोर वनवारी:— पास...पास...

महापालिका सचिव:— ठराव वाचून दाखवते,

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे उल्हासनगर कर्करोग जनजागृती मॅरेथॉन २०१७ करीता ३ लाख निधी उपलब्ध करुन देणेस मान्यता देत आहे.

काही सदस्य :—पास—पास......

महापौर तथा पीठासीन अधिकारी :— सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

☑ विषय क्र. ५:— **अशासकीय प्रस्ताव**

उल्हासनगर कर्करोग जनजागृती मॅरेथॉन २०१७ करीता ३ लाख निधी मिळणेबाबत. पालिका सदस्य श्री.राजेंद्र चौधरी यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

प्रस्तावना

'मातोश्री सावित्रीबाई फुले सामाजिक संस्था' ही संस्था मागील १३ वर्षापासून (सन २००३) पासून शैक्षणिक, सामाजिक व आरोग्य या विषयावर विविध उपक्रम राबवित आहेत. तसेच सदर संस्था प्रामुख्याने कर्करोग आणि व्यसन मुक्तिवर काम करत आहे. याचाच एक भाग म्हणून कर्करोग बाधित रुग्णांच्या मदतीसाठी उल्हासनगर मॅरेथॉन २०१७ चे नियोजन करण्यात आले असून या कार्यक्रमात साधारणत: ५००० लोक सहभागी करुन घेण्याचा प्रयत्न सदर संस्थेचा राहणार आहे. सदर मॅरेथॉनचे अंतर १० कि.मी. इतके असणार आहे.

समाजिक बांधिलकिंच्या दृष्टीने कर्करोग रुग्णांच्या अर्थसहाय्य करणे व कर्करोग जनजागृतीमध्ये सहभागी होणे हे महापालिका प्रशासनाचे कर्तव्य असून सदर कार्यक्रमासाठी अर्थसहाय्याची आवश्यकता असल्याने त्यासाठी महापालिकेमार्फत ३ लाख रुपये निधी या कार्यक्रमासाठी उपलब्ध करुन देणेस्तव सदरचा अशासकिय प्रस्ताव महासभेमध्ये मांडण्यात येत आहे.

महासभा ठराव क्र: ३१ दिनांकः—९/१०/२०१७

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्र चौधरी

अनुमोदकाचे नाव :— श्रीम. राजश्री चौधरी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे उल्हासनगर कर्करोग जनजागृती मॅरेथॉन २०१७ करीता ३ लाख निधी उपलब्ध करुन देणेस मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असुन तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. ६ वाचुन दाखवितात

————————————————————————————————————————————
—

## ⇨ अशासकीय प्रस्ताव

**विषय क्र. ६ :—** मालमत्ता कराची वसुली करणे करिता “अभय योजना” राबविणेकरिता येत्या महासभेमध्ये चर्चा होवून निर्णय होणेबाबत. पालिका सदस्य, श्री. दिपक सिरवानी, श्रीम. कविता पंजाबी, श्रीम. कंचन लुंड यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

————————————————————————————————————————————————————————

——

**सदस्य, श्री..राजेंद्र चौधरी:—** पास...पास...

**सदस्य, श्री..सुनिल सुर्वे:—** यासाठी एक महीन्याचा कालावधी देण्यात यावा आणि त्याचे ॲडजॅस्टमेंट व्यवस्थित पुर्ण झाले पाहीजे.

**सदस्य, श्री..किशोर वनवारी:—** एक महीन्याचा वेळ आणि पब्लिसिटी पाहीजे.

**सदस्य, श्री..राजेंद्र चौधरी:—** नाही नाही, काय आहे, हा प्रस्ताव मंजूर करीत असतांना येणा—या १५ तारखेपासून पुढील दोन महीन्यासाठी हा प्रस्ताव मंजूर करण्यात यावा आणि या शहरातील नागरीक टॅक्स जे भरतात, ती अभय योजना त्यांना जर दिली तर आपलेही महसूल वाढेल. जे काही ३० ते ३५, ४० कोटी आपल्याला मिळू शकतील आणि अभय योजना दिल्या नंतर जी लोक, ज्यांना टॅक्समध्ये त्यांचा व्याज दर जास्त आलेला आहे. त्यांनाही दिलासा मिळेल. म्हणून ही योजना येणा—या १५ तारखेपासून पुढील दोन महीन्यासाठी आपण चालू करावी.

**सदस्य, श्री..सुनिल सुर्वे:—** ही शेवटची असेल, त्या बदल मा. महापौरजी, आपण स्वत: याची घोषणा करून ही योजना जी आहे, दोन महीन्यासाठी, येत्या १५ तारखे पासून अडोस्टाईज करून प्रत्येक घरोघरी पोहचली पाहीजे. जेणेकरून ते मालमत्ताधारक येऊन त्यांनी कुठल्याही परिस्थितीमध्ये ते पैसे भरले पाहीजेत आणि ही योजना सर्व संमतीने पास करण्यात यावी, अशी माझी सर्वांना विनंती आहे.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—** अभय योजना जाहीर होण्याच्या आधी ती चार ते पाच वेळा दिली आहे, त्याच्या पेक्षा जास्त केलेली आहे. अभय योजनेचा अनुभव असा आहे की, फारसा त्याच्यामधून फायदा मिळत नाही. ऑन द कॉन्ट्ररी आपण दर वर्षी जवळ पास अभय योजना जाहीर केली आहे. फक्त आपण मागच्या वर्षी आपण मे, जूनच्या पुढे, जुलैच्या पुढे आपण १६ पासून आपण अभय योजना केली नाही. त्याच्या आधी आपण मे, २०१६ मध्ये केली होती. त्याच्या पुर्वीच्या आपण सन २०१५—१६ मध्ये आपण अभय योजना केली होती. त्याच्या आधी पण केली होती. जो ओरल अनुभव अभय योजनेचा आहे, तो एवढा आकर्षक नाही, तो एवढा प्रभावी राहीलेला नाही. आता आपण वसुलीची मोहीम गतीमान केलेली आहे, आपण बचत गटाच्या महीलांना घेतले आहे. आपण सर्व सक्तीची कारवाई सुरू केलेली आहे. अशा याच्यामध्ये आपण अभय योजना करून थोडसं म्हणजे एकीकडे आपण वसुलीची कारवाई गतीमान करायची आणि दुसरीकडे आपण अभय योजना दयायची, म्हणजे टोटली ते विरोधाभास होईल. मला वाटते की, मला वाटते की, किमान या वर्षी आपण अभय योजना लागू करू नये. या वर्षीचा अनुभव बघून पुढच्या वर्षीसाठी आपण एप्रिलमध्ये आपल्याला करता येईल. अभय योजना करायची असेल तर सलग करणे आणि मला वाटते प्रशासनाला पण विश्वासात घेणे गरजेचे आहे आणि याच्यामध्ये माझी भुमिका अभय योजनेच्या बाबतीत खरोखर प्रामाणिकपणे त्याच्या बाजूने नाही.

**सदस्य, श्री..सुनिल सुर्वे:—** मा. आयुक्त साहेब, परंतु आपण ज्या पध्दतीने सर्वांना घेतलेले आहे, वसुलीसाठी आणि अभय योजना जर लागू असेल, तर जास्तीत जास्त वसुली होईल.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—** मी जास्तीत जास्त सांगतो, एवढी अभय योजनेत माफी कुठल्याही महानगरपालिकेने किंवा कुठल्याही शासनाच्या देय रक्कमे बदल आता पर्यंत मी पाहीली नाही की, १०० टक्के व्याज माफ हा मुद्दा १० वर्षा पुर्वी, १० हजार रूपये टॅक्स भरायचा होता, तो आज १० हजार रूपये देणे, त्याच्यावर १० हजारवर आज ३० ते ४० हजार रूपये लेट फी झाली आहे. पुर्णपणे आपण माफीची पण योजना या पुर्वी आणलेली आहे. तरी देखील आपण जर पुर्ण १० वर्षाचा इतिहास काढला तर...

**सदस्य, श्री..सुनिल सुर्वे:—** साहेब, या शहराच्या दृष्टीकोणाने आवश्यक आहे, शहराच्या दृष्टीने फार आवश्यक आहे. आपण जी वसुलीची टीम लावली आहे, ती टीम कार्यरत राहीलच फक्त त्या अनुषंगाने आपल्या ज्या महीला घरोघरी पोहचतील आणि जे आपले कर्मचारी पोहचतील घरोघरी तर लोकांना पण बरे पडेल की, ३० हजार पैकी २२ हजार भरावे लागतील, ८ हजार माफ होतील. तर तो ८ हजाराच्या फायदया करीता भरेल. आपण दोन्ही बाजूने सक्ती केलेली आहे. माझी आयुक्त साहेबांना विनंती आहे, पुर्ण सभेचा या बाजूने कल आहे. तर कृपया प्रत्येक गोष्ट आयुक्त साहेबांनी आपल्या स्वत:वर न घेता, काही अधिकार आम्हांला पण आहेत. तरी कृपा करून हे दयावे.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—** आपण यावर मध्यम मार्ग असा काढू या, पुढच्या महासभेमध्ये आपण ती माफी कशा पध्दतीने दयायची, किती टक्केवारीने दयायची, किती कालावधीसाठी ती दयायची, ती चढत्या क्रमाने दयायची समजा पहील्या पंधरा दिवसामध्ये भरल्यास किती टक्के माफी, त्याच्या नंतर महीन्या भरामध्ये भरल्यास अजून कमी माफी, अशा पध्दतीने करायला पाहीजे. जेणेकरून लवकरात लवकर भरणे....

**सदस्य, श्री..सुनिल सुर्वे:—** साहेब, आता पण करू शकतो. एक महीन्याची मुदत १०० टक्केसाठी दया. आता पण करू शकतो, चर्चा करण्यासाठी सगळे बसलेले आहेत.

**सदस्य, श्री..दिपक सिरवानी:—** महासभेमध्ये चर्चा करून आताच पास करून घ्या.

**सदस्य, श्री..सुनिल सुर्वे:—** आता पास करून टाका, तुम्हांला एक विनंती आहे, दिवाळीचा मुहुर्त आहे. दिवाळीत लोकांना बोनस मिळतो. तर माणूस बोनस इतरत्र खर्च न करता आपल्या वरील कर्ज काढायचा प्रयत्न करेल असे मला वाटते.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—** गेल्या दोन महीन्या पासून आपली वसुली केवळ या कारणांमुळे थंडावलेली आहे. गेल्या वर्षा पेक्षा जास्त आहे. परंतु केवळ या कारणामुळे थंडावलेली आहे. सगळयाकडे जी अफवा पसरली आहे की, लवकरच अभय योजना येत आहे. थोडासा मला वाटते की, प्रशासनाचा .....

**सदस्य, श्री..दिपक सिरवानी:—** सर आपण मॅसेज देवू की, ही त्यांच्यासाठी शेवटची अभय योजना आहे. साहेब हा शहर आमचा आहे, या शहराचे लोक आमचे आहेत.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—** ऑगस्ट आणि सप्टेंबरमध्ये आम्ही ३ टक्के आणि ५ टक्के रिबेट जाहीर केले. त्याचा काहीच परिणाम झाला नाही.

**सदस्य, श्री..दिपक सिरवानी:—** सर त्याची जाहीरात झाली नव्हती.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—** जाहीरात पुर्ण झाली होती. पेपरमध्ये आम्ही दिले होते, माझ्या जवळ पेपरचे कटींग आहेत.

**सदस्य, श्री..दिपक सिरवानी:—** जाहीरात एक दिवस आली होती, परंतु...

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—** आम्ही रिक्षाद्वारे आनाऊन्समेंट करून प्रसिध्द दिली होती, होर्डींग्स लावले होते, पेपरमध्ये प्रसिध्दी दिली होती, नगरसेवकांच्या हॉटस अप ग्रुपवर, आणि मिडियाच्या ग्रुपवर भरपूर प्रसिध्दी देण्यात आली होती.

**सदस्य, श्री..सुनिल सुर्वे:—** मा. महापौरजी, मा. उप महापौर, तुम्ही तुमचे पण मत मांडा काय आहे ते सांगा.

**उप महापौर, श्री. जीवन इदनानी:—** मा.आयुक्त साहेबांनी जे सांगितले आहे की, शेवटी आम्ही ३ टक्के, ५ टक्के घेतले होते. ते आपण नागरीकांवर काही उपकार केले नव्हते, तो नागरीकांचा हक्क आहे. त्यांना जर वेळेवर बिल मिळाले असते तर तो आपला हक्क होता. वेळेवर बिल न मिळाल्यामुळे आम्ही महासभेमध्ये ठराव आणला होता. त्यांना आपण त्यांचे हक्क परत दिले होते आणि अभय योजना लागू झाली पाहीजे. आता लोकाना पैसे पण मिळणार आहेत, बोनस पण मिळणार आहेत. त्यामुळे आपल्याला खुप मदत मिळेल आणि लोक वाट बघत आहेत की, अभय योजना येईल आणि आपण बिल भरू. त्यासाठी आपण त्यांना सवलत दिली पाहीजे.

**सदस्य, श्री..दिपक सिरवानी:—** सर नगरसेवकांकडून मॅसेज जाईल की, ही अभय योजना शेवटची असेल. याच्या नंतर कोणतीही अभय योजना येणार नाही.

**सदस्य, श्री..धनंजय बोडारे:—** सगळयांचा इंट्रैस आहे आणि आयुक्त साहेबांना पण वाटते की, महसुल वाढवायचा आहे. मा. महापौर महोदयांना माझी एक विनंती आहे की, जसे आयुक्त साहेब तुम्ही सांगितले मागच्या वर्षी अभय योजना नव्हती, सन २०१५—१६ ला लावली होती. या पाच वर्षात, नविन वर्षात शहराला ही एकच संधी असेल अशी मी विनंती करतो. परत पुढच्या पाच वर्षात कधीही अभय योजना येणार नाही. जमुनाजी पुढच्या पाच वर्षा पर्यंत संपुर्ण बॉडी असे पर्यंत परत अभय योजना सभागृहामध्ये कोणीही आणणार नाही. एक वेळा आणल्या नंतर, सर्वांचा एक विषय बनतो.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—** लोकांना हा मॅसेज गेला आहे की, दरवर्षी अभय योजना येतच आहे. म्हणून कोणी भरत नाही.

**सदस्य, श्री..धनंजय बोडारे:—** जो पर्यंत या बॉडीची मुदत आहे, पुढची बॉडी काय ठरवल ती ठरवल, या बॉडीची मुदत संपेपर्यंत कोणही....

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:— असे जर ठरवत असाल तर मला मान्य आहे आणि मग मी त्याचे टक्केवारी पण सांगतो आणि हा विषय फायनल करू या.

सदस्य, श्री.मनोज सयानी:— अभय योजना लागू करू या, धन्यवाद सर.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:— मला वाटते की, आपण दोन महीन्यासाठी ही अभय योजना देऊ या.

सदस्य, श्री.मनोज सयानी:— १ नोव्हेंबर ते ३१ डिसेंबर पर्यंत.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:— १ नोव्हेंबर म्हणता येणार नाही, आजपासून म्हणवे लागेल कारण १ नोव्हेबर जर म्हणटल तर पुढच्या १५ दिवसात कोणी भरणार नाही. त्यांना माहीती आहे की, १ नोव्हेंबर नंतर येणार आहे. आज पासूनच लागू झाली असे म्हणावे लागेल. आज तारीख आहे ९ आपण १० किंवा ११ तारखेपासून म्हणू या. ११ ऑक्टोंबर ते १० डिसेंबर या दोन महीन्याच्या कालावधीसाठी राहील. एक मुदा पुढे ११ ऑक्टोंबर ते १० नोव्हेंबर पर्यंत भरले तर ५० टक्के त्यांची लेट फि माफ, ११ नोव्हेंबर ते १० डिसेंबर पर्यंत भरले तर २५ टक्के लेट फि माफ.

सदस्य, श्री.मनोज सयानी:— ७५ टक्के ते ५० टक्के करा.

सदस्य, श्री.प्रदिप रामचंदानी:— मागच्या वेळेस १०० टक्के आणि ७५ टक्के, ५० टक्के केले होते. किमान यावेळी आपण १० दिवसासाठी १०० टक्के करा, त्याच्या नंतर ७५ टक्के करा, त्याच्या नंतर २५ टक्के करा.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:— १५ दिवसासाठी आपण एक गोष्ट लक्षात घ्या...

सदस्य, श्री.प्रदिप रामचंदानी:— आयुक्तांना बोलू दया, तुम्ही ७१३ कोटीचा बजेट बनवला आहे. ते कुठून पैसे आणणार परत? ती वसुली होईल ना, तुम्ही काय सांगता?

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:— आपण पॉपर्टी टॅक्सचे जे उदिष्ट आहे, ते २६० कोटी ठेवले आहे. माफी आपण देतो १०० टक्के, २६० कोटीमध्ये १०० टक्के उद्दीष्ट

सदस्य, श्री.प्रदिप रामचंदानी:— १० दिवसांसाठी...

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:— पण १०० टक्के नको, १० दिवसांसाठी आपण ७५ टक्के करू.

सदस्य, श्री.प्रदिप रामचंदानी:— होय, चालेल.

सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:— पहीले १५ दिवसासाठी दया.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:— ठिक आहे, १५ दिवसासाठी आज पासून २५ ऑक्टोंबर पर्यंत ७५ टक्के, २५ ऑक्टोंबर ते १० नोव्हेंबर पर्यंत ५० टक्के, आणि ११ नोव्हेंबर ते १० डिसेंबर २५ टक्के. ठिक आहे, ३१ डिसेंबर पर्यंत आपण २५ टक्के देवू.

सदस्य, श्री.दिपक सिरवानीः— धन्यवाद सर. इतिवृत्ताची वाट न पहाता, पास...पास...

सदस्य, श्री.प्रदिप रामचंदानीः— ज्या प्रमाणे विरोधी पक्ष नेजा यांनी विषय मांडला आहे, या बॉडीमध्ये परत ही अभय योजना येता कामा नये. हे ठरावात टाका.

महापालिका सचिवः— ठरावात घेते, ही अभय योजना पुढील पाच वर्षा पर्यंत लागू होणार नाही.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकरः— या नंतर पुढील पाच वर्षे, म्हणजे या बॉडीचे राहीलेले कालावधी नाही, पुढील पाच वर्षे.

महापालिका सचिव :—मी आपणांस ठराव वाचुन दाखविते.

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे मालमत्ता कराची वसुली करणे करिता १ नोव्हेंबर ते ३१ डिसेंबर २०१७ पर्यंत “अभय योजना” राबविणेकामी खालीलप्रमाणे मान्यता देत आहे.

१) १ नोव्हेंबर २०१७ पासून १५ नोव्हेंबर २०१७ पर्यंत ७५ टक्के विलंब शुल्क माफ

२) १६ नोव्हेंबर २०१७ ते ३० नोव्हेंबर २०१७ पर्यंत ५० टक्के विलंब शुल्क माफ

३) १ डिसेंबर २०१७ ते ३१ डिसेंबर २०१७ पर्यंत २५ टक्के विलंब शुल्क माफ

तसेच

ही अभय योजना यानंतर कोणत्याही परिस्थितीत पुढील पाच वर्षापर्यंत पुन्हा लागु होणार नाही. तसेच ३१ डिसेंबर २०१७ पर्यंत अभय योजनेचा लाभ न घेणा—या सर्व थकबाकीधारकाविरुध्द त्यानंतर वसुलीची सक्तीची कारवाई प्रशासनामार्फत सुरु करण्यात यावी.

सदस्य, श्री.मनोज सयानीः— धन्यवाद सर. शहरासाठी एवढी मोठी योजना आपण लागू केली आहे, धन्यवाद.

काही सदस्यः— पास..पास....

महापौर तथा पीठासीन अधिकारी :— सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

विषय क्र. ६:–**<u>अशासकीय प्रस्ताव</u>**

मालमत्ता कराची वसुली करणे करिता “अभय योजना”राबविणेकरिता येत्या महासभेमध्ये चर्चा होवून निर्णय होणेबाबत. पालिका सदस्य श्री. दिपक सिरवानी, श्रीम. कविता पंजाबी, श्रीम. कंचन लुंड यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिकेची मालमत्ता कराची थकबाकी ही फार मोठया प्रमाणात असून, सदर मालमत्ता करावर व्याज जास्त असल्याने शहरातील नागरीक हे सदर मालमत्तेचा कर भरण्यास पुढे येत नाही.
सन २०१७–२०१८ या वित्तीय वर्षामध्ये मालमत्ता कराची एकूण मागणी रुपये ३४५ कोटी एवढी अपेक्षित धरलेली आहे. या रुपये ३४५ कोटीमध्ये चालु वर्षाची मागणी रुपये ९१ कोटी आहे. थकबाकी रुपये २४४ कोटी आहे. ‘अभय योजना’ लावल्यास व्याजाची रक्कम माफ केली जाईल. त्यामुळे मोठया प्रमाणात मालमत्ता कराची थकबाकी वसूल होईल व महापालिकेची आर्थिक स्थिती मजबुत होईल, त्यामुळे ‘अभय योजना’ लावणेसाठी येत्या महासभेमध्ये चर्चा होवून निर्णय होणेस विनंती आहे.

**महासभा ठराव क्र:३२** **दिनांक:–९/१०/२०१७**

सुचकाचे नाव :– श्री. दिपक सिरवानी

अनुमोदकाचे नाव :– श्रीम. कविता लाल पंजाबी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे मालमत्ता कराची वसुली करणे करिता १ नोव्हेंबर ते ३१ डिसेंबर २०१७ पर्यंत “अभय योजना” राबविणेकामी खालीलप्रमाणे मान्यता देत आहे.

१) १ नोव्हेंबर २०१७ पासून १५ नोव्हेंबर २०१७ पर्यंत ७५ टक्के विलंब शुल्क माफ

२) १६ नोव्हेंबर २०१७ ते ३० नोव्हेंबर २०१७ पर्यंत ५० टक्के विलंब शुल्क माफ

३) १ डिसेंबर २०१७ ते ३१ डिसेंबर २०१७ पर्यंत २५ टक्के विलंब शुल्क माफ

**तसेच**

ही अभय योजना यानंतर कोणत्याही परिस्थितीत पुढील पाच वर्षापर्यंत पुन्हा लागु होणार नाही. तसेच ३१ डिसेंबर २०१७ पर्यंत अभय योजनेचा लाभ न घेणा–या सर्व थकबाकीधारकाविरुध्द त्यानंतर वसुलीची सक्तीची कारवाई प्रशासनामार्फत सुरु करण्यात यावी.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. ७ वाचुन दाखवितात

——————————————————————————————————————————————————————————————

⇨ **विषय क्र.** ७ :— महापालिका क्षेत्रात सुरू असलेल्या अंगणवाडयाना महिला बाल कल्याण समितीद्वारे किंवा महापालिकेच्या निधीतून साहित्य पुरविणेबाबत.

——————————————————————————————————————————————————————————————

**<u>सदस्य, श्री.राजेंद्र चौधरी:—</u>** मा.महापौर, उप महापौर, आयुक्त साहेब, उल्हासनगर शहरामध्ये अंगणवाडया चालवल्या जातात. त्यांना शासनाकडून निधी मिळतो, परंतु उल्हासनगर शहरामध्ये २१० अंगणवाडया सध्या कार्यरत आहेत. त्याध्ये काम करणा—या अंगणवाडीसेविका या २१० आहेत आणि अंगणवाडी मदतनीस या २१० आहेत, अशा ४२० अंगणवाडीसेविका आणि मदतनीस या काम करीत आहेत. त्यांना शासनाकडून जो मानधन मिळतो, ते फार कमी आहे. मागे आपण बघितले एक दिड महीन्यापुर्वी त्यांना शासनाच्या विरोधात काम बंद आंदोलन केले होते. त्यांचा मोर्चाही महाराष्ट्र शासनाच्या मंत्रालयावर निघाला होता आणि अशा वेळेला आपल्या शहरामध्ये अंगणवाडीसेविका काम करीत आहेत, मदतनीस काम करीत आहेत. त्यांचे मानधन फार कमी आहे आणि त्या ० ते ५ वर्षा पर्यंतच्या बालकाचे पोषण करण, त्यांना सांभाळणे आणि इतर काही आरोग्य विभागाच्या योजना आहेत, लसीकरण असेल किंवा अजूनही काही आरोग्य विभागाच्या योजना असतील, त्यामध्ये ते काम करीत आहेत. त्याचे त्यांना मानधन मिळते ते फक्त १००/— रूपये आणि अशा वेळेला या अंगणवाडीमध्ये शिकणारे जे बालक आहेत. त्यांची परिस्थिती, जसे पाहीले की, जर खिचडी सोडली तर दुसरा कुठला अहार त्यांना मिळत नाही. म्हणून माझी महापालिकेच्या माध्यमातून या बालकांना, या शहरातील बालकांना महापालिका माध्यमातून आपल्या शहरातील बालकांना, महिला व बाल कल्याण समितीच्या माध्यमातून किंवा अजून आपला कुठला मंडळ असेल, त्या माध्यमातून त्यांना चांगला आहार मिळायला पाहीजे. कारण आपण महापालिकेच्या शाळेमध्ये चांगला आहार देतो. त्यांना रेणकोट, गमबुट सगळे देतो. अशा वेळेला अंगणवाडीतील बालकांनाही चांगला आहार मिळाला पाहीजे. जेणेकरून या सभागृहामध्ये श्री. मनोज लासी यांनी उल्लेख केला की इथे दोन बालक कुपोषित

सापडलेली आहेत. अशा वेळेला त्यांना जर आहार चांगला मिळाला, तर कुपोषित बालकांची जी संख्या आहे, ती आपल्याकडे पहील्यांदाच बघायला मिळाली आहे, ते नंतर मिळणार नाहीत. कदाचित त्या लोकांना मानधन मिळाले पाहीजे, अंगणवाडी सेविकांना ते मानधन मिळाले पाहीजे. वाढीव मानधन कसे देता येईल ते बघितले पाहीजे. त्याच बरोबर या मुलांना खेळण्याचे जे साहित्य आहेत, तेही आपण जर दिले, आपल्या महानगरपालिकेच्या महीला व बाल कल्याण समितीच्या माध्यमातून तर तेही एक व्यवस्थित होईल आणि त्या लोकांना बालवाडीमध्ये येण्याची आवड वाढेल. एकुण २४० महीला अंगणवाडीसेविका आणि मदतनीस आहेत. त्यांना आपल्या महापालिकेतर्फे अजूनही आर्थिक अनुदान देवू शकतो की काय? यासाठी पण विचार या स्थगन प्रस्तावाच्या माध्यमातून व्हावा अशी माझी विनंती आहे. त्याच बरोबर मला सांगायला आनंद होईल की, जेवढया या शहरामध्ये २१० अंगणवाडया चालतात, त्या जवळ जवळ ७० टक्के आमच्या शिवसेना शाखेमध्येच चालतात आणि त्यांना शाखेच्या माध्यमातून जी काही मदत करायची ती आम्ही करतो. हे सांगायला मला आनंद वाटतो. दुसरी गोष्ट म्हणजे ज्या ठिकाणी हे चालते किंवा त्या शिवसेनेच्या शाखा जर तोडल्या तर बाकी समाज मंदिर किंवा कोणाच्या घरामध्ये चालतो. परंतु तिथे त्या अंगणवाडी सेविकांना बसणेसाठी खुर्च्या देखील नाहीत किंवा कुठे तरी जागा नाहीत तर बाहेर अंगणवाडया चालवितात. अशा वेळेला त्यांना महापालिकेच्या माध्यमातून अंगणवाडया चालविण्यासाठी कुठेतरी सुविधा उपलब्ध करून दिली पाहीजे किंवा शासनाचा निधी येतो, त्या निधीच्या माध्यमातून त्यांना अंगणवाडया बनवून दिल्या पाहीजेत. त्यांना बसण्यासाठी खुर्च्या दिल्या पाहीजेत. त्यांना लागणारे साहित्य, पंखा वैगेरे नॉर्मल ते दिले पाहीजे, अशी माझी या प्रशासकीय प्रस्तावाच्या माध्यमातून सुचना आहे, धन्यवाद.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकरः—</u>** राज्यातील बालविकास डिपार्टमेंट स्वातंत्र आहे. त्यांच्या मार्फत या सगळया अंगणवाडया चालविल्या जातात. कुपोषणाची एवढी तीव्र जर घटना घडली तर त्यांच्या विभागाने त्याची दखल घ्यायला पाहीजे आणि ही वस्तुस्थिती नाकारता येत नाही की, या शहरामधले ते बालक आहेत. परंतु त्यासाठी वेगळे डिपार्टमेंट आहे आणि आपण असे इन जनरल जर त्यांना काही साहित्य आणि पोषक आहार वैगेरे देण्याचा याचा विचार केला तर मला वाटते ते आपल्यावर ओढून घेतल्यासारखा प्रकार होईल, एक वेगळी प्रथा पडेल. तर याला एक वेगळया पध्दतीने देखील मान्य करता येईल. जर अशा प्रकारे कुपोषाणाचे खरोखर तीव्र केसेस आढळल्या, ते तेवढया फॅमिली पुरते ती गरज कुटंबातील आहे. तर त्यांना काही दिवस ते कुपोषणाच्या लेवलमधून वर येणे पर्यंत आपण काही पोषक अहार देण्याचे ते आपण आयुक्तांना किंवा अतिरिक्त आयुक्तांना अधिकार देवू शकाल. मला वाटते की केस टू केस करण्याचे जास्त बरे राहील. इन जनरल आपण जर शासनाची योजना असतांना त्याच्यामध्ये सगळी ती खिचडी होऊन जाईल. ती त्यांची जबाबदारी आहे का? आपली जबाबदारी आहे का? आणि मग कोण काय करते?

<u>सदस्य, श्री.भगवान भालेरावः—</u> चौधरी साहेबांच्या विषयाला अनुसरून सांगतो, त्यांनी सांगितले की, केंदशासन आणि महाराष्ट्र शासन असा तो सयुक्तरित्या तो कार्यक्रम असतो आणि मानधनाचा प्रश्न त्यांना दरवर्षी...

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकरः—</u>** त्यांना मानधन नुकताच शासनाने वाढविलेला आहे. मदतनिस यांना पण मला वाटते की, ३०००/— किंवा ५०००/: रूपये त्यांना...

**सदस्य, श्री.भगवान भालेराव:—** साहेब फक्त तुम्हांला त्याच्या अनुषंगाने एक चांगला विषय उपस्थित केला आहे. ब—याच अंगणवाडया आहेत, शिवसेना शाखा असतील किंवा आर.पी.आय.च्या शाखा असतील किंवा इतर शाखा असतील, त्याच्यामध्ये भरतात किंवा समाज मंदिरामध्ये भरतात. ५५० रूपये ते भाडे देतात काही ठिकाणी ते देत नसतील. पण माझी एक विनंती आहे की, मागच्या सन २०१२ च्या काळामध्ये २१ अंगणवाडयासाठी मंजूरी आली होती, नविन बांधकामांसाठी बनविण्यासाठी पण आपण त्यांना जागाच दिल्या नसल्यामुळे त्या २१ अंगणवाडयांचे पैसे परत गेले. मला वाटते त्या अधिका—यांना बोलवून आपल्याकडे जागा, जिथे शौचालय लोक हडप करतात. जुनी शौचालय बरेच लोक हडप करतात, समाज मंदिर हडप करतात. अशा ठिकाणी जर अंगणवाडयांना जागा दिली. ते नविन निधी देतात फक्त महानगरपालिकेने बांधायची आहे. जर त्या अधिका—यांना बोलावून जर आपण केले तर अंगणवाडया परत, माझ्याकडे अशाच शौचालयाच्या तीन चार जागा पडलेल्या आहेत. त्या तुम्ही जर अंगणवाडीसाठी प्रस्तावीत केल्या तर मला आनंद होईल.

**सदस्य, श्री.धनंजय बोडारे:—** केंद्र शासनाची योजना आहे, ते बरोबर आहे. एकात्मिक महीला व बाल विकास प्रकल्प पण महापालिकेच्या माध्यमातून सुध्दा प्रत्येक वार्डामध्ये जर महीला बाल विकास प्रकल्प किंवा महीला बाल विकाससाठी जे आपल्याकडे आहे, तर प्रत्येक वार्डमध्ये असे काही कुपोषीत किंवा अशा काही लोकांना काही गरज असल्यास अशा प्रकारचा प्रकल्प राबविण्यासाठी आपल्या प्रकल्प अधिका—यांना लक्षवेधी मागचे किंवा अशासकीय प्रस्तावामागची सुचना इथे कुपोषीत नको आहे. तो एक ठपका आहे की, उल्हासनगरमध्ये आता पर्यंत कुपोषीत नव्हते आणि आता दोन बालके कुपोषीत झाली. ते काय चांगले नाही, भुषण नाही. या पुढे होऊ नये. म्हणून आता पासून अशा प्रकारचा प्रकल्प राबवा अशी या मागची एक सुचना आहे. लवकरात लवकर शोधावी प्रत्येक विभागामध्ये, प्रत्येक वार्डमध्ये चार पाच कुटूंबे असतील. त्यांच्यासाठी काय करता येईल, महिला बाल विकास प्रकल्पातून ते करा.

**सदस्य, श्री.प्रदिप रामचंदानी:—** एक शेवटची सुचना आहे, सर्व शिक्षा अभियानाचे जे शिक्षक आहेत, त्यांच्यासाठी आपण मागच्या वर्षी सानुग्रह अनुदान दिलेले आहे. त्यासाठी आपण त्यांनाही समावेश करू घ्यावे. सर्व शिक्षा अभियानाचे कर्मचारी.

**महापालिका सचिव:—** यामध्ये ठराव काय ?

**सदस्य, श्री.प्रदिप रामचंदानी:—** हा ठराव नाही आहे. याच्यात ठराव नाही, फक्त आयुक्त साहेबांनी जे मांडले आहे. जी बालेके कुपोषीत आहेत, ते उप आयुक्तांच्या माध्यमातून किंवा महिला व बाल विकास प्रकल्प अधिकारी आहेत. त्या प्रमाणे जे करीता येईल. कुपोषण सुटला पाहीजेत.

**सदस्य, श्री.सुनिल सुर्वे:—** एक मिनिट मला एक विषय आठवला आहे. याच अनुषंगाने मा. महापौर, मा. आयुक्त साहेब, आपल्या महानगरपालिकेच्या ब—याचशा शाळा रिकाम्या आहेत. त्या ठिकाणी जर अंगणवाडयाचा २१ जे म्हणत आहेत, तिथे भरण्यास त्यांना जर अनुमती दिली तरी चालेल. यांनी जे सांगितले समाज मंदिर वैगैरे तसेच आपल्या ज्या शाळा खाली आहेत. ब—याच ठिकाणी वर्ग खाली आहेत. त्या ठिकाणी जर त्यांचा समावेश करण्यात आला तर बरे होईल. संपुर्ण शहराचा विषय आहे,

**काही सदस्य:—** पास..पास...

**<u>महापालिका सचिवः—</u>** ठराव वाचून दाखवत आहेत. ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे कोणताही बालक कुपोषित होवू नये याकरीता महापालिका क्षेत्रात सुरू असलेल्या अंगणवाडयाना महिला बाल कल्याण समितीद्वारे शैक्षणिक साहित्य, पोषक आहार व इतर साहित्य पुरविणेस बाल विकास प्रकल्प अधिका—यास राज्य शासनाच्या निधीमधुन पुरविणेबाबत योग्य ती कार्यवाही करणेचे निर्देश देत आहे. तसेच कुपोषित असलेल्या बालकांना त्यांच्यात सुधारणा होण्यासाठी योग्य व पोषक आहार देण्यात येतो की नाही याची पाहणी करणेकामी उप—आयुक्त यांना निर्देश देण्यात येत आहे.

**<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u>** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

---

☑ विषय क्र. ७:— <u>अशासकीय प्रस्तावः—</u>

महापालिका क्षेत्रात सुरू असलेल्या अंगणवाडयाना महिला बाल कल्याण समितीद्वारे किंवा

महापालिकेच्या निधीतून साहित्य पुरविणेबाबत श्री. राजेंद्र चौधरी यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील झोपडपट्टयामध्ये एकात्मिक बाल विकास प्रकल्पाअंतर्गत व काही महानगरपालिकेच्या शाळमध्ये अंगणवाडया चालविले जात आहे. या अंगणवाडीमध्ये मोठया प्रमाणात झोपडपट्टीतील गरीब, मजुर कुटुंबाची मुले जात आहे. शासनाकडील अंगणवाडयांना वेळेत व मुदतील शैक्षणिक सहित्य, अल्पोपहार/खाऊ, खेळणी व इतर साहित्य मिळत नाही. महापालिकेच्या अंगणवाडयांना महापालिकेमार्फत वरील साहित्य आपण देतो. विशेषत: शासनाकडील या अंगणवाडयांमध्ये येणारे विदयार्थी हे गरीब कुटुंबाची मुले असल्याने त्यांना एका वेळेस जेवण देखील मिळत नाही. त्यामुळे त्या कुटुंबाची मुलांना पोषक आहार न मिळाल्याने कुपोषित सारख्या आजाराने पिडीत होतात. याबाबत काही दिवसांपुर्वी उल्हासनगर शहरातील मुलगा कुपाषित या आजाराने पिडीत असल्याचे निदर्शनास येवून अशा टिकात्मक बातम्या प्रसिध्द झाली होती.

तरी यापुढे कोणताही बालक कुपोषित होवू नये याकरीता उल्हासनगर क्षेत्रातील अशा सर्व अंगणवाडयांना महिला बाल कल्याण समितीद्वारे किंवा महापालिकेच्या निधीतून वरीलप्रमाणे शैक्षणिक साहित्य, पोषक आहार व इतर साहित्य देण्याबाबतचा विषय महासभेमध्ये घेण्यात येवुन याबाबत चर्चा होवुन निर्णय घेण्यात यावा.

<u>महासभा ठराव क: ३३</u> <u>दिनांक:—९/१०/२०१७</u>

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्र चौधरी

अनुमोदकाचे नाव :— श्रीम. राजश्री चौधरी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे कोणताही बालक कुपोषित होवू नये याकरीता महापालिका क्षेत्रात सुरू असलेल्या अंगणवाडयाना महिला बाल कल्याण समितीद्वारे शैक्षणिक साहित्य, पोषक आहार व इतर साहित्य पुरविणेस बाल विकास प्रकल्प अधिका—यास राज्य शासनाच्या निधीमधुन पुरविणेबाबत योग्य ती कार्यवाही करणेचे निर्देश देत आहे. तसेच कुपोषित असलेल्या बालकांना त्यांच्यात सुधारणा होण्यासाठी योग्य व पोषक आहार देण्यात येतो की नाही याची पाहणी करणेकामी उप—आयुक्त यांना निर्देश देण्यात येत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. ८ वाचुन दाखवितात

————————————————————————————————————————————————————————

⇨ <u>प्रस्तावाची सुचना:—</u>

**विषय क्र. ८ :—** महापालिकेने ठेवलेल्या किटक नाशकाच्या औषधाचा स्फोटामध्ये मुंत्यू पावलेल्या मुलाच्या कुंटूबियास आर्थिक मदत करून संबंधित अधिका—यावर कारवाई करणे बाबत

पालिका सदस्या, श्रीमती पंचम कालानी यांची प्रस्तावाची सुचना विचारत घेणे.

————————————————————————————————————————————————————————

<u>सदस्या, श्रीम.पंचम कालानी:—</u> मी जेव्हा महापालिकेत येत होते, त्या वेळी बाहेर खुप लोक उभे होते. कारण की, तिथे एका छोटया मुलाचा मुंत्यू झाला होता. तर जसे श्री. राजेंद्र चौधरी साहेबांनी सांगितले की, आपण श्रध्दांजली पण दिली आहे. तर मला फक्त चार प्रश्न विचारायचे आहेत. आपण त्यांना आर्थिक मदत देण्याचा विचार केला आहे का? हा जो अपघात झाला आहे, त्याला जबाबदार कोण आहे. जर आपल्या आफिसचा अधिकारी असेल तर कोणत्या ऑफिसचा आहे? आणि पोलिस स्टेशनकडून आपल्या जे पत्र पाठविले आहे. त्यांनी विचारले आहे की, आपण त्यांचे नाव सांगाल. हे कम्युनिकेशन कुठ पर्यंत पोहचले आहे आणि चौकशी पण कुठ पर्यंत पोहचली आहे, एका छोटया मुलाचा मुंत्यू झाला आहे.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—</u> दिनांक १७ सप्टेंबरला जी दुर्घटना ती खुप दुर्भाग्याची गोष्ट आहे. त्याची संपुर्ण माहीती मी घेतली आहे. ज्या दिवशी ही घटना झाली त्यावेळी मी शहरामध्ये नव्हतो. जशी मला

माहीती दिली गेली, त्या वेळी मला समजले की, संपुर्ण महापालिकेचे अधिकारी आणि कर्मचारी त्याला जबाबदार आहेत. महापालिकेच्या आरोग्य विभागाची ही जबाबदारी होती, त्याच्याकडून बेजबाबदारपणा झाला आहे. मी स्वत: जिथे ही दुर्घटना घढली त्या ठिकाणी भेट दिली. ज्या परिवाराच्या मुलाचे मुंत्यू झाला, त्याच्या आई आणि वडीलांशी मी चर्चा केली आणि बाकीचे पोलिस स्टेशनकडून मी सी.सी.टी.व्ही. फुटेजचा रेकॉर्ड वैगेरे मी सर्व मागवून घेतले आहे आणि पोलिसांकडून पण सर्व माहिती घेतली आहे. त्या वरून असे समजते की, ही दुर्घटना आहे, अपघात आहे. आमच्या लोकांची किती जबाबदारी होती, तिथे केमिकल होते, ते अस्ताव्यस्त होते का? त्याच्यामुळे आपल्याला सावधानी बाळगायला पाहीजे होते. या सगळया गोष्टी चौकशीमध्ये समोर येतील.

<u>सदस्या, श्रीम.पंचम कालानी:—</u> त्या दुर्घटनेचे सी.सी.टी.व्ही. फुटेज सर मी पण बघितले आहेत. त्यामध्ये असे दाखवले आहे की, जे केमिकल आहे. जे ड्रम होते ते गोडाऊनच्या बाहेर उघडयावर ठेवण्यात आले होते. इट इज नॉट अलाऊड.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—</u> या सगळया गोष्टी चौकशीमध्ये येतील. हे बघा आपल्या बघण्यानुसार आपण पाहीजे तसे इंटरफेअर करू शकतो. ते ड्रम आपण बंद खोलीमध्ये ठेवत होतो जिथे रोज लोकांचे येणे जाणे असते. तर जर तिथे अशी घटना झाली असती तर आपण बोलेल असते की, एवढी स्फोटक वस्तू आहेत, घातक वस्तू आहे तर मग आतमध्ये बंद खोलीमध्ये का ठेवले. बाहेर का ठेवले नाही, जिथे लोकांचे जाण येण आहे. मी कोणाला सपोर्ट किंवा कोणाला जस्टीफाय करत नाही. त्याचे चौकशी रिपोर्ट वेगळे येतील आणि पोलिसामध्ये पण गुन्हा दाखल केला आहे. परंतु जे केमिकल होते, त्याच्या बरोबर जर कोणी छेडछाड करीत असेल, भले तो नासमज बालक आहे, त्याच्या बरोबर छेडछाड केली आहे, ही गोष्ट समोर आली आहे. जर त्याच्या बरोबर छेडखानी केली नसती तर ही दुर्घटना झाली नसती. जसे आपल्या घरामध्ये पण भरपूर वस्तू आहेत. जसे गॅस सिंलिडर आहेत, वैगेरे जर आपण गॅसचे बटन उघडे ठेवले तर स्फोट होईल. तर या सर्व गोष्टी चौकशीमध्ये येऊन जातील.

<u>सदस्या, श्रीम.पंचम कालानी:—</u> सर आपण अशा स्फोटक वस्तू बाहेर ठेवत नाहीत.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—</u> त्याच्या विषयी मी काहीही ठोस सांगत नाही. ते सर्व चौकशीमध्ये येतील की, अशा वस्तू कशा ठेवायला पाहीजे होत, ही जबाबदारी कोणाची होती. तो आपला महापलिकेचा आहे किंवा असेच लोकांना दिले होते. कोणी मला सांगितले की गार्डनमध्ये होते. गार्डन कोणत्या जागेवर होते, या सगळया गोष्टी आपण....

<u>सदस्या, श्रीम.पंचम कालानी:—</u> सर गार्डच्या बाजूला रोड आहे, आपणाला त्या जागेवर हिजीट करायला पाहीजे.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—</u> रोडवरती लोक रोज आण जाण करत असतात, परंतु गार्डन आहे, हे पण मला माहीत झाले, ते पण मी नंतर बघेल. परंतु याच्यामध्ये जो कोणी खरोख दोषी आहे, त्याच्यावर कारवाई केली जाईल. परंतु आपण थोडा भावनेच्या भरता न येता, थोडा....

**<u>सदस्या, श्रीम.अर्चना करणकाळे:—</u>** मा. महापौर मॅडम, आयुक्त साहेब, ही जी दुर्घटना झाली आहे, त्यांना आर्थिक साय्य देण्यासाठी त्या कुटंबाचा पण विचार करण्यात यावा. एवढेच नाही तर....

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—</u>** आता आपण त्याच्यामध्ये जो त्यांचा खर्च होता, पहीले आम्ही सांगितले की, ही महापालिकेची चुकी आहे, संपुर्ण खर्च आपणच करू, त्या गोष्टीशी मी सहमत आहे. त्या लोकांनी जेव्हा पहीले लोकल हॉस्पीटलमध्ये ॲडमिट केले होते, तिथे जे डॉक्टर होते, त्याच दिवशी मी एका तासामध्ये मी त्याच्याशी बोललो पण होतो, त्यांनी पण मला सांगितले की, इज आउट ऑफ डेंजर रिकव्हरी मेडीकली काही पण ताण स्वत:चवर होऊ शकतो, नंतर त्यानी ऐरोलीमध्ये ॲडमिट केले. ते पण स्वाभाविकच होते. परंतु त्या हॉस्पीटलकडून दुस—या दिवशी त्यांना सांगितले की, त्वरीत पाच लाख रूपये जमा करा, असे तोंडी सांगितले होते. त्याच्या वरून असे समजते की, परिस्थितीचा दुरउपयोग होते, किंवा त्याचा अडव्हानटेज घेणे असे बोलेल जात होते. जर त्यांना पाच लाख रूपये अडव्हान्स पाहीजे होते तर त्यांनी प्रापर बिल अशा प्रकारे दयायला पाहीजे होते, एक फॅक्स आला होता. त्यामध्ये फक्त लिहीले होते की, इज ॲडमिटेड इज अंडर स्ट्रिटमेंट ऑल दॅट त्याच्यामध्ये पैसे लिहीले नव्हते किंवा कशासाठी एवढे पैसे होत आहे. टोटल एवढे पैसे कशासाठी पाहीजेत. त्याच्या नंतर २२ सप्टेंबरला आम्ही त्यांना एक लाख रूपये पेमेंट केले होते. त्याच्या नंतर अजून हॉस्पीटलने पैसे मागितले त्या नंतर परत आम्ही १ लाख रूपये पेमेंट केले. आम्ही असे कधीच सांगितले नाही की, याच्या नंतर पैसे देणार नाही. जसी जसी त्यांची मागणी आली आम्ही विचार करून देवू. तर कधी कधी असा मॅसेज देणे पण चुकीचे आहे की, जो जेवढी मागणी करील कधी कधी प्रशासनाने त्या भावनेनुसार चालायला नाही पाहीजे. प्रशासनाने आपले विचार, समजुतदारपणा हे सगळे साभाळून चालायला पाहीजे. तुमची मी मजबुरी समजतो, .....

**<u>सदस्या, श्रीम.पंचम कालानी:—</u>** ठिक आहे, पण चौकशी कुठ पर्यंत झाली आहे.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—</u>** चौकशी मी त्यांना उद्या पर्यत बोललो आहे, मला त्याचे रिपोर्ट पाहीजेत.

**<u>सदस्या, श्रीम.अर्चना करणकाळे:—</u>** साहेब, ते कुटूंब त्या परिस्थितीत नव्हते की, ते तुम्हांला डिटेलमध्ये माहीती देतील. तुम्ही त्या कुटूंबाची परिस्थिती त्या वेळेला बघायला हवी होती. त्यांची मानसिकता काय होती? त्यांचे लहान बालक आज त्यांच्या पासून हसता खेळता निघून गेलेले आहे. त्या संदर्भात आपण विचार करा. अजुनही एक मुलगा त्याच्यामध्ये....

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—</u>** त्याला पण आपण दिला आहे, त्याचाही वैद्यकिय खर्च केला आहे.

**<u>सदस्या, श्रीम.जयश्री पाटील—</u>** हे सर्व अधिका—यांच्या चुकीमुळे झाले आहे.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—</u>** मला अजून एक गोष्ट सांगायची आहे, जी आता तुम्ही उपस्थित केला म्हणून मी सांगतो. दुस—या पाच मुलांना म्हणजे लोक कसे गैर फायदा घेतात. त्याचे एक उदाहरण देतो, दुस—या पाच मुलांवर फक्त किरकोळ सिंथोडे उडाले होते, पण माझ्याकडे काही लोक येऊन, ऐकुण घ्या...
..

**<u>सदस्या, श्रीम.जयश्री पाटील—</u>** साहेब दोन ड्रम अजूनही तिथेच भरलेले आहेत.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:— माझा मुद्दा संपू दया मॅडम, त्याच्यासाठी माझ्याकडे लोकांनी पत्येकी पन्नास हजाराची मागणी केली होती. मी त्या लोकांना माझ्या चेंबरमधून हाकलून दिले होते, कोण होते मला माहीत नाही. यु कॅन नॉट हॅपंड कोणीही त्या परिस्थितीचा फायदा घेऊन महापालिकेची खुशमस्करी करण्याचे दिसून येते. टॅक्सचा पैसा आहे, आपण एकीकडे म्हणतो नागरीकांचा टॅक्सचा पैसा योग्य उपयोगी पडला पाहीजे. हे काय आहे? एका परिस्थितीमध्ये मला संपुर्ण सहानुभूती आहे, त्या कुटूंबाची परंतु असा खेळ करून पब्लिकला इमोशन हाईड करून प्रशासनाला कुठे तरी कोंडीत पकडायचे हे योग्य नाही. आम्ही त्यांना दोन लाख रूपये दिले आहेत. अजूनही काही जो दवाखान्याचा खर्च असेल त्या कुटूंबाची परिस्थिती विचारात घेऊन नक्की त्याच्यावर विचार करू. राहीला प्रश्न कॉम्पोजेशनचा, कंम्पेनसेशन हे आहे, कुठल्याही कोर्ट केसेसमध्ये बघा, अपघात क्लेम याच्यामध्ये सुध्दा ज्या व्यक्तिची कमवण्याची स्टेट्स होते, त्याचे राहीलेले आयुर्मान, कुटूंबाची त्याच्यावर किती जबाबदारी होती. या सगळयावर आपण कॉम्पोजेशन ठरवत असतो. तो पण इमोशनवर येवून कॉम्पोजेशनची मागणी करा ते पण ठिक आहे. परंतु त्याची अमाऊंट जी आहे, अशी काही तरी असू नये की, वेगळा प्रगात पडेल आणि आपण वेगळया ....

सदस्या, श्रीम.अर्चना करणकाळे:— आमचा हेच हेतू आहे की, त्या कुटूंबांच्या दु:खात आज पर्यंत आम्ही सामिल आहोत.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:— पुर्ण प्रशासनाला त्यांच्या बदल सहानुभूती आहे.

सदस्या, श्रीम.अर्चना करणकाळे:— प्रत्येक हजेरी सेडवर तुमच्या अधिका—यांनी जाऊन परिस्थितीची पहाणी करावी हीच नम्र विनंती आहे.

सदस्या, श्रीम.जयश्री पाटील— हे सर्व अधिका—यांच्या चुकीमुळे झाले आहे.

सदस्य, श्री.राजेंद्र चौधरी:— आयुक्त साहेब, त्या वेळेला जी घटना घडली....

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:— हे अधिका—यांच्या चुकीमुळे झाले आहे, असे आपण तरी म्हणू नका प्लीज, त्याची डायरेक्ट जबाबदारी तरी दिसून येत नाही. इन डायरेक्ट जबाबदारी जे काही आहे, ती त्याचे संरक्षण करण्याची जे काही आहे, आपण बघू शकतो. व्हिडीओमध्ये क्लियर दिसत आहे की, एक मुलगा दोन वेळा तिथे माचिसची काडी पेटवत आहे आणि त्या ड्रमच्या खाली तो काडी लावत आहे.

सदस्य, श्री.शंकर लुंड:— साहेब बालक तर समजदार नाही ना?

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:— मी मुलाची चुकी आहे, असे बोलत नाही. प्रशानाच्या पण चुकीला त्याच नजरेने बघा.

सदस्य, श्री.शंकर लुंड:— साहेब, या प्रकरणाची सर्व चौकशी झाली पाहीजे आणि मुलाच्या नातेवाईकांन भरपाई मिळाली पाहीजे, त्याची संपुर्ण देखभाल व्हायला पाहीजे. माझी बहीण श्रीम. पंचम कालानी यांचे पण तेच म्हणणे आहे.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:— मी मान्य केले आहे.

**सदस्य, श्री.शंकर लुंडः—** संपुर्ण सभागृहाने हेच बोलायला पाहीजे की, महानगरपालिकेतर्फे त्याचा जो दवाखान्याचा खर्च आहे, तो संपुर्ण केला जावा, धन्यवाद.

**सदस्य, श्री.राजेंद्र चौधरीः—** मा. महापौर, मा. आयुक्त साहेब, १७ तारखेला संध्याकाळी ६.०० वाजता ही घटना घडली, त्या घटनेची माहीती मिळताच मी त्या स्पॉटवर गेलो होतो. दुदैवी घटना घडली, कोणाच्या चुकीमुळे घडली? कशी घडली? का घडली याचा तपास पोलिस यंत्रणा करते आणि आमचीही विनंती आपल्याला आहे की, आयुक्त साहेब, आपणही आपल्या माध्यमातून त्याची चौकशी करा. परंतु ही दुदैवी घटना घडत असतांना नगरसेविका श्रीम. ज्योती गायकवाड यांनी आपल्याला पत्र देवून एक मागणी केलेली आहे की, आपण ज्या ज्या वेळेला महापालिकेच्या हद्दीमध्ये, महापालिकेच्या कुठल्याही कारणास्तव कुठलीही घटना घडली, त्यामध्ये कुठलाही व्यक्ति दगावला तर आपण त्याला आर्थिक मदत करीत असतो. त्याच्या कुटूंबाचा विचार करून, त्याच्या सहानूभुतीचा विचार करून ही मदत आता पर्यंत आपण करीत आलो आहे. म्हणून आमची सगळयांची, सभागृहाची पण विनंती आहे, मला वाटते की, अगोदर जशी ज्या व्यक्तिंना आपण मदत करीत आलो, त्यांच्या कुटुंबाचा विचार करून तशी मदत या आजच्या महासभेच्या माध्यमातून, त्यांच्या अशासकीय प्रस्तावाच्या माध्यमातून आपण करावी अशी विनंती आहे. आपण आता पर्यंत जवळ जवळ ५ लाखा पर्यंत अशा व्यक्तिला मदत केलेली आहे. ५ लाखाची मदत त्यांना दयावी, अशी आमची अशासकीय प्रस्तावाच्या माध्यमातून सुचना आहे. साहेब याच्या अगोदर आपण लोकांना दिलेले आहेत, मदत केलेली आहे.

**सदस्या, श्रीम.पंचम कालानीः—** साहेब दवाखान्याचे बिल पण पेडींग आहे, ते पण देण्यात यावे.

**सदस्य, श्री.राजेंद्र चौधरीः—** या पुर्वी आपण तीन वेळा दिलेले आहेत.

**सदस्य, श्री.प्रदिप रामचंदानीः—** महापालिकेमध्ये एकदा पाणी पुरवठा करणा—या टॅकरखाली एक व्यक्ति आली होती आणि त्याचा मुंत्यू झाला, त्या वेळेला पण आपण दिलेले आहेत. शांती नगरमध्ये एक झोपडी पडली होती, त्यांना पण दिले होते.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकरः—** माझे फक्त एकच म्हणणे होते की....

**सदस्य, श्री.प्रदिप रामचंदानीः—** आता तुम्ही म्हणता की, त्या बालकाची चुक आहे, कोणाची चुक आहे ते चौकशीमध्ये येणार आहे. जर कधी आपल्याला असे वाटले की, आपल्या एखादया अधिका—याच्या हलगर्जी पणामुळे झाले आहे, तर त्याच्यावर कठोर कारवाई करावी. कारण की, लोक जेव्हा संतापतात शेवटी इथे जेवढे सदनमध्ये आहेत, ते लोकांनी निवडून दिलेले आहे. म्हणजे लोकांचा जेवढा संताप आहे, खाली, बाहेर ५०० लोक बसलेले होते. त्यांचे असे म्हणणे होते की, ज्यांनी हलगर्जीपणा केला आहे, त्यांच्यावर कारवाई झाली पाहीजे आणि जो पर्यंत चौकशी होत नाही, जेव्हा पुर्णपणे रिपोर्ट येत नाहीत आणि त्या रिपोर्टमध्ये जे लोक आहेत तर कुठलाही मोठा अधिकारी असला तरी त्याच्यावर निलंबनाची कारवाई करावी, ही आमची विनंती आहे आणि दुसरा प्रश्न असा आहे की, या पुढे आपण कोणती सावधगिरी बाळगणार आहेत? त्याच्यासाठी आपण काय नियोजन केले आहे? अशी पुनावृत्ती होऊ नये यासाठी नियोजन करण्यासाठी आपण सर्व अधिका—यांना निर्देश दयावे, ही माझी विनंती आहे.

**सदस्या, श्रीम.पुजा भोईरः—** मा. महापौर, मा. आयुक्त साहेब, जिथे किटक नाशक रसायने होते, तिथे कर्मचारी का नव्हते? जिथे विस्फोटक होते, तिथे कर्मचारी का नव्हते?

**सदस्य, श्री.राजेश वदरियाः—** मा. महापौरजी, दिनांक १७/०९/२०१७ ला संध्याकाळी ६.०० वाजता उल्हासनगर, पाण्याच्या टाकीच्या जवळ जो केमिकलचा स्फोट झाला. त्यामध्ये कुमार राजेसिंग, जखमी झाले त्यांना ऐरोली येथे हॉस्पिटलमध्ये अॅडमिट केले होते. आयुक्त साहेबांनी त्याच्या उपचारासाठी पहीले १ लाख आणि नंतर १ लाख त्वरीत दिले होते आणि जे जखमी झाले होते, त्यांना सुध्दा ३० हजार रूपये त्यांच्या उपचारासाठी दिले होते. त्यामुळे मी त्यांचे अभारी आहे. परंतु जसे आपण पहीले पण सांगितले होते की, फक्त आयुक्तच काम करू शकत नाही. खालच्या लेवलमध्ये डिसीप्लेन आहे, ते खुप जास्त आहे. जिथे पाण्याची टाकी आहे. तिथे रिटर्न वॉल बनले आहे, कंपाऊड वॉल आहे, कंपाऊड वॉलच्या गेट जवळ सुरक्षा रक्षक असायला पाहीजे. ते तिथे नव्हते. त्या कंपाऊडच्या आतमध्ये हजेरी शेड बनले आहे आणि तिथे रोज हजेरी घेतली जाते. माझ्या प्रभागामध्ये पण हजेरी शेड आहे, मटेरीयल हजेरी शेडच्या आतमध्ये ठेवले जाते. त्याचे दोन पार्ट होतात. एका पार्टमध्ये हजेरी होते आणि दुस—या पार्टमध्ये साहित्य ठेवले जाते. आपल्याला वाटले तर आपण कोणाच्याही वार्डमध्ये जावून बघू शकतात. महत्वाचे हे आहे की, या प्रकारच्या केमिकलला हॅन्डल कसे करायचे असते, ओपन ठेवणे धोकादायक आहे. जे ज्वलनशिल पदार्थ आहे, त्यांना उघडयावर ठेवायला नाही पाहीजे. त्याला बंद खोलीत ठेवायला पाहीजे, चांगल्या जागेमध्ये लॉक करून ठेवायला पाहीजे. ही तिथल्या कर्मचा—यांची जबाबदारी होती. ती जबाबदारी त्यांनी व्यवस्थित पार पाडली नाही. जर आपण चौकशी कराल तर मला आशा आहे की, सर्वच गोष्टींची चौकशी होईल आणि आपण या नंतरच्या महासभेमध्ये त्याचे रिपोर्ट दयाल. आता त्या परिवाराला महापालिका कोणत्या प्रकारे मदत देईल. त्यांचे दिड लाखाचे बिल मुंबई हॉस्पिटलमध्ये बॅलन्स आहे आणि १ लाख ८० हजाराची औषधे, एवढा खर्च झालेला आहे. कमीत कमी ३ लाख, ३० हजार रूपये एवढा त्यांचा खर्च झाला आहे. तो जो परिवार आहे, तो खुप गरीब परिवार आहे. एवढा मोठा खर्च करण्याची त्यांची परिस्थिती नाही. आपण त्यांना मुल परत देवू शकत नाही, आपण फक्त त्यांच्या दुःखामध्ये सामिल होऊ शकतो. याच्या पेक्षा आपल्या हातामध्ये काहीच नाही. आपण जेवढी मदत करायची होती, ती आपण केली आणि त्याला वाचवण्यासाठी जेवढे प्रयत्न करायचे होते, ते आपण केले आहे. परंतु इश्वरापुढे सगळे लोक शुन्य आहेत. त्या मुलाचे जेवढे आयुष्य होते, ते त्यांना जगले. माझे निवेदन हे आहे की, त्यांना २० लाख रूपये मदत देण्यात यावी. कारण त्यांचा मेडीकलचा खर्च, आणि हॉस्पिटलचे बिल देता येईल.

**सदस्य, श्री.धनंजय बोडारेः—** आयुक्त साहेब, त्या मुलाचा मुंत्यू झाला आहे, संपुर्ण सभागृहाला त्या बदल सहानूभुती आहे आणि अति दुःख पण आहे. प्रशासनाने ज्या ज्या वेळेस मदत करायची होती, तेव्हा तेव्हा मदत केलली आहे, त्यामुळे मी धन्यवाद देतो. पण श्री. राजेश वदरयिा आणि श्रीमती कालानी मॅडम यांनी सांगितले आहे की, चौकशी करा, तर खरोखर चौकशी कराच. परंतु जेव्हा एलफिस्टन रोडला चेंगराचेंगरी झाली, एक हादसा झाला, त्या नंतर रेल्वे प्रशासन जागे झाले आणि मग पुल वाढवा, हे करा. त्या पध्दतीने असे प्रकार किंवा घटना घडू नये म्हणून वेळीच उपाय करा की, अशा प्रकारच्या ज्या ज्वलशिल वस्तू आहेत, कुठलीही घटना घडल्या नंतरच त्याच्यातून माणूस शिकतो. तशी प्रशासनाला एक समस्यासच आहे. त्या ठिकाणी मला वाटते सुवर्ण जयंती योजनेमधून गार्डन तयार कलेले आहे, गेट पण बांधलेले आहे.

टिळकनगरच्या लोकांना धोबीघाटला जाण्यासाठी एकच मार्ग आहे. म्हणजे प्रशासनाने बंद केले तरी अडचण आहे. लोकांना मग फिरून जावे लागते धोबीघाटला त्यामुळे प्रशासनाने स्ट्रीक वागले तरीही आम्हांला त्रास होणार. रस्ता बंद केला, सुरक्षा रक्षकाने गेट बंद केला, पण गार्डन आहे. तिथे एम.आय.डी.सी.ची पाण्याची मोठी टाकी आहे. प्रेक्षिकटेड झोन केला तरी ते लोकांना पचनी पडणार नाही. टिळकनगरच्या लोकांना धोबीघाटला यायचे तर तोच एक मधला रस्ता आहे, नाही तर लांबून यावे लागते, ठिक आहे तो रस्ता आहे. जर गेट बंद केले, प्रशासनाने स्ट्रीक भुमिका घेतली प्रशाासन चुकते असेही म्हणता येणार नाही. परंतु अशा प्रकारच्या घटना घडणार नाही, अशा प्रकारची उपाय योजना तरी आपल्याला करता येईल. तिथे सुरक्षा रक्षक ठेवता येईल, तुम्ही सांगितले की, त्या मुलाने दोन वेळा माचीचची काडी पेटवली होती, तुम्ही दाखवले आहे. म्हणजे ती मुलं त्या ड्रम जवळ गेली ते ठिक आहे, पण त्या मुलाने दोन वेळा काडी पेटवली. त्यामुळे निश्चितच दोष कुणाचा आहे, तो संशोधनाचा विषय आहे, तो शोधा. जर दोषी असतील तर त्याच्यावर कारवाई करा आणि अनावश्यक असतील तर दोषी नसतील तर उगीचच म्हणजे दोष कुणाचा आणि फासी कुणाला असेही हाता कामा नये. दोषी असतील तर जरूर कारवाई करा. म्हणून त्यासाठी चौकशी करा आणि अशा प्रकारच्या घटना उल्हासनगरमध्ये कुठेही होणार नाहीत, अशा प्रकारची काळजी प्रशासनाच्या प्रत्येक प्रभाग अधिकारी, संबंधित अधिकारी म्हणजे कुठलेही विभाग असोत, त्यांना घेण्यासाठी सुचना करा. तुम्ही सांगितले कॉम्पोझेशन, कॉम्पोझेशन आता काय दयायचे, जसे श्री. प्रदिप रामचंदानी यांनी सांगितले या पुर्वी आम्ही दोन–तीन लोकांना दिलेले आहे. श्रीमती ज्योती गायकवाड यांनी आणि श्रीमती करणकाळे मॅडम यांनी प्रस्ताव इथे ठेवलेला आहे. परंतु तो काय झाला असता ते सांगता येत नाही? त्याची कमाई काय? तो नगरसेवक होऊ शकला असता? आयुक्त होऊ शकला असता? मुख्यमंत्री होऊ शकला असता? तो पंतप्रधान पण होऊ शकला असता? त्याचे प्रेडीशन काय ते सांगता येत नाही? आता पर्यंत महापालिकेने प्रत्येकी ५ लाख रूपये दिलेले आहेत, त्या प्रमाणे ५ लाख रूपये आम्ही करतो, तुम्ही सांगितले की, प्रथा सुध्दा पडायला नको? तुमच्या खिशातले जाणार नाहीत, माझ्या खिशातले जाणार नाहीत, ते टॅक्स पेच्या लोकांच्या खिशातून जाणार आहेत. एकदा दिल्या नंतर तो विषय संपणार नाही, घटना अजीबातच घटणार नाहीत, कितीही काळजी घेतली तरी घटना घडणारच नाहीत असे शक्य होणार नाही. त्यामुळे एकदा दिले तर ती प्रथा पडते आणि ती पोषक होणार नाही. त्यामुळे सखोल चौकशी करा, पुन्हा होणार नाहीत अशी उपाययोजना करा आणि आम्ही सांगितल्या प्रमाणे, प्रस्तावीत केल्या प्रमाणे त्या कुटूंबाला त्यांचे नुकसान झालेले आहे, त्यांना ५ लाख, १० लाखानी, २० लाखानी सुध्दा होणार नाही, भरपाई होणार नाही. भावनांची किंमत नसते, परंतु काही तरी मदत झाली पाहीजे, ही महासभा त्या कुटूंबाला मदत देण्यासाठी प्रस्तावीत करीत आहे.

<u>सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानी:–</u> मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, हा जो विषय आज इथे उपस्थित केला आहे, श्रीमती पंचम कालानी आणि श्री. राजेश वदरिया यांनी, जसे की सभागृहाच्या काही सदस्यांनी सांगितले की आणि आपण सांगितले की, याची चौकशी चालू आहे. चौकशीचे रिपोर्ट तर येतीलच परंतु जी घटना घडली आहे, जी व्यक्ति निघून गेली आहे, ती परत येणार नाही. या घटनेला किती पण चौकशी जरी केली, परंतु कुठे ना कुठे आपल्या प्रशासनाचा हलगर्जीपणा आहे. त्या मुलाने चुकी केली, ते खेळतांना झाले, केमिकल खाली सांडावले, परंतु तिथे जर केमिकलचा ड्रम जर नसते तर ही घटना घडली नसती किंवा तिथून रस्ता जर नसता. आपल्या जवळ असे एक कार्याल्य आहे की, जो आपला हजेरी शेड आहे,

त्याच्या आतमध्ये अशी व्यवस्था व्हायला पाहीजे की, जो केमिकल आहे, तो आपण एका आठवडयाला वापरतो तो तेवढाच असायला पाहीजे आणि तो सुरक्षित ठिकाणी असायला पाहीजे. यामध्ये काही ना काही हलगर्जीपणा दिसून येत आहे. जर आपण सांगत आहेत की, आपण सि.सि.टी.व्ही. मध्ये बघितले आहे आणि त्याचे रिपोर्ट आहेत, तर पोलिस स्टेशनकडून त्याचे रिपोर्ट यायला पाहीजेत आणि या महासभेमध्ये सर्व सदस्य त्या रिपोर्टला बघतील. भविष्यामध्ये अशा प्रकारची घटना अशा साध्या चुकीमुळे केमिकल ड्रम बाहेर पडले होते आणि ती घटना घडली. असे व्हायला नको, आपले सर्व स्वच्छता निरीक्षक आहे, मुकादम आहेत, त्याची देखभाल करीत असतात आणि त्यांना सुचना दयायला पाहीजेत की, त्यांनी ते सुरक्षित ठिकाणी ठेवायला पाहीजेत आणि हा विषय आज इथे उपस्थित केला आहे. मी सांगतो की, अशा प्रकारे काही वर्षा पुर्वी आम्ही याच महासभेमध्ये जर अशा प्रकारच्या घटना घडत असतात, यामध्ये प्रशासनाची काहीना काही चुकी आहे. परंतु अशी पण एक चुकी आहे की, प्रशासनाला दोष न देता, मानवतेच्या आधारावर आपण काहीना काही भरपाई देत असतो. तर मी सभागृहाच्या सर्व सदस्यांचे विचार ऐकल्या नंतर, मा. महापौरजी मी आपल्याला निवेदन करतो की, हा जो मुलागा ९ वर्षाचा आहे, मी त्याला हॉस्पिटलमध्ये बघितले होते, मी त्याच्या हिम्मतीची तारीफ करतो की, जेव्हा ही घटना घटली, तेव्हा माझ्या घराच्या एकदम समोर हॉस्पिटल आहे, तिथे मी त्याला भेटायला गेलो होतो. त्या वेळेस मी विचार सुध्दा केला नाही की, तो मुलगा आता आपल्या बरोबर राहीला नाही. त्याची हिम्मत एवढी होती की, तो माझ्या बरोबर बोलत होता. जो डॉक्टर त्या हॉस्पिटलमध्ये होते, ते त्याचे काका होते. त्यांनी मला सांगितले की, जेव्हा त्याचे वडील आग लागल्या नंतर त्याला घेण्यासाठी गेले, तेव्हा त्याने स्वतःच्या वडिलाना स्वतःपासून दूर केले आणि सांगितले की आपण दुर व्हा मला काहीच झाले नाही. अशा प्रकारे ही जी दुर्घटना घडली आहे, त्यासाठी मि विनंती करातो की, असा ठराव केला जावा की, त्याच्यासाठी जो वैद्यकिय खर्च झाला आहे. काही महापालिकेतर्फे देण्यात आला आहे आणि बाकिचा वैद्यकिय खर्च राहीला आहे, तो आणि आणखीन ५ लाख रूपये, असे प्रकारे आपण किती तरी वेळा या सभागृहाने ५ लाख रूपये दिले आहेत. ते त्वरीत जास्त उशिर न लावता आणि इतिवृत्ताची वाट न बघता दोन दिवसामध्येच मा. महापौरजी आपण त्याच्या कुटंबियांना इथे बोलावून  मा. आयुक्त साहेब आणि आपण त्यांचा जो वैद्यकिय खर्च झाला आहे आणि ५ लाख रूपये त्वरीत देण्यात यावा. श्री. राजेश वदरिया यांनी सांगितले आहे, ती माहीती घेऊन ३ लाख ३० हजार त्यांचा अजून खर्च झाला आहे. ते ३ लाख ३० हजार आणि ५ लाख असा माझा प्रस्ताव आहे, ते त्यांना देण्यात यावेत आणि आपण दोन दिवसात स्वतः त्यांच्याकडे जाऊन किंवा त्यांना इथे बोलावून देण्यात यावे आणि भविष्यामध्ये अशा घटना घडणार नाहीत, त्यावर लक्ष देण्यात यावे.

<u>आयुक्त, श्री.राजेंद्र निंबाळकरः—</u> मला सगळ मान्य आहे, फक्त एकच गोष्ट आहे, हॉस्पिटलचा जो पण खर्च झाला आहे, हे हॉस्पिटलला माहीत झाले नाही पाहीजे की, महपालिका सगळा खर्च देत आहे. जो आपण खर्च देणार आहे, तो सिव्हिल सर्जनने सर्टीफाय करणे गरजेचे आहे, असे आपण लिहू, फक्त आपण एवढे करू.

<u>महापालिका सचिवः—</u> ठराव वाचून दाखवते.

हो महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे महापालिकेने ठेवलेल्या किटकनाशक औषधाच्या स्फोटामध्ये मृत्यु पावलेल्या मुलाच्या कुटुंबियास झालेला वैद्यकीय खर्चाची उर्वरीत रक्कम रुपये ३ लाख ३० हजार व ५ लाख आर्थिक मदत देण्यास मान्यता देत आहे.

तसेच याकामी लवकरात लवकर चौकशी करुन संबंधीत अधिका–यावर कारवाई करणेस प्रशासनास निर्देश देत आहे.

<u>काही सदस्य :–</u>पास–पास......

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :–</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. ८:– <u>प्रस्तावाची सूचना</u>**

महापालिकेने ठेवलेल्या किटकनाशक औषधाच्या स्फोटामध्ये मृत्यु पावलेल्या मुलाच्या कुटुंबियास आर्थिक मदत करुन संबंधित अधिका–यांवर कार्यवाही करणेबाबत पालिका सदस्या श्रीमती पंचम कालानी यांची प्रस्तावाची सूचना विचारात घेणे.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागामार्फत किटकनाशक औषधे मागविण्यात येत असून प्रभागत त्याची फवारणी केली जाते. परंतु दिनांक १७/९/२०१७ रोजी सायंकाळी ६.०० वाजता उल्हासनगर–१ येथिल टिळक नगर पाण्याच्या टाकीजवळ असलेल्या हजेरी शेडमधील ड्रममध्ये ठेवलेल्या किटकनाशक फवारणी रसाायनाचा स्फोट होवून त्यामध्ये कुमार अरिहंत राजेश सिंह वर्ष ९ हा जखमी होवून त्याचा दुदैवी मुत्यु झाला आहे. त्यास सर्वस्वी महापालिका जबाबदारी आहे या मुत्युमुळे त्याच्या कुटुंबावर मोठा आघात झाला आहे. तरी त्याच्या कुटुंबियास महापालिकेची आर्थिक मदत मिळावी तसेच संबंधित अधिकारी व कर्मचारीवर कार्यवाही होणे याबाबतचा विषय येत्या महासभेमध्ये घेण्यात येवून चर्चा होवून निर्णय घेण्यात यावा याकरीता प्रस्तावची सूचना मांडत आहे.

<u>महासभा ठराव क्र: ३४</u> <u>दिनांक:–९/१०/२०१७</u>

सुचकाचे नाव :– श्रीम.पंचम कालानी

अनुमोदकाचे नाव :– श्री. राजेश वदारिया

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे महापालिकेने ठेवलेल्या किटकनाशक औषधाच्या स्फोटामध्ये मृत्यु पावलेल्या मुलाच्या कुटुंबियास झालेला वैद्यकीय खर्चाची उर्वरीत रक्कम रुपये ३ लाख ३० हजार व ५ लाख आर्थिक मदत देण्यास मान्यता देत आहे.

तसेच याकामी लवकरात लवकर चौकशी करुन संबंधीत अधिका—यावर कारवाई करणेस प्रशासनास निर्देश देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिवः—** आता या मिटींगचे विषय संपलेले आहेत.

**सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानीः—** मा. महापौरजी, एक विषय आहे, श्री. बोडारे साहेब वाचून दाखवतील. तीन महीने झाले आहेत, आपली मिटींग व्यवस्थित चालत नाही. एक महिना आपण मिटींग ठेवली नाही आणि दुस—या महिन्यामध्ये जेव्हा मिटींग झाली ती आपण स्थगित केली आणि आज मिटींग व्यवस्थित चालत होती परंतु वेळेच्या अभावी आपण ती पण स्थगित केली आहे. त्या विषयां पैकी एक विषय हा अतिआवश्यक आहे. जेव्हा आपण चर्चा करू, त्यावेळेस ठराव करावा. त्या विषयाची मान्यता आपण करून घेऊ, सर्व सभागृह उपस्थित आहेत. आपण या विषयावर चर्चा करू.

**महापालिका सचिवः—** चर्चा करा, पण या विषयाचा ठराव आता करता येणार नाही, सर्व संमतीने चर्चा होत आहे. कारण हा आधीच्या सभेचा विषय आहे, ठराव होणार नाही.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारेः—** आयुक्त साहेब, उल्हासनगरच्या दोन मुली, ज्या शास्त्रिय संगितासाठी स्पेन, युरोपला जात आहेत, त्यांना मदत म्हणून त्या मराठा सेक्शनला रहात आहेत आणि या दोन्ही मुली एक तबला वादक आहे, शास्त्रिय संगिताच्या आहेत, त्यांनी मागणी केली होती. तेव्हा त्यांना मदत करा कारण त्या जाऊ शकत नाहीत. त्यांना मदत करण्यासाठीचा प्रस्ताव आहे. परंतु आता मिटींग स्थगित झाली आहे, मला वाटते की, आम्ही कार्योत्तर मंजुरी नंतर देऊ, जर आता त्यांना दिले नाही तर त्या नोव्हेंबरमध्ये जाऊ शकत नाहीत. म्हणून हा विषय इथे आणला आहे.

**आयुक्त, श्री.राजेंद्र निंबाळकरः—** आपणाला ठरवावे लागेल की, किती खर्च येतो, आणि किती प्रमाणात मदत अपेक्षित आहे.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारेः—** २ लाख, ६६ हजार, २०० रूपये त्यांचा खर्च आहे.

**आयुक्त, श्री.राजेंद्र निंबाळकर:—** मग आपण किती प्रमाणात त्यांना मदत करायची.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—** २ लाख, ६६ हजार रूपये. हा त्यांचा तेवढा खर्च आहे.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** मा. आयुक्त साहेब, मा. महपौरजी, माझी एक सुचना तुमच्या पाठीमागे महापुरूष आणि जे देवांचे फोटो आहेत, त्यांच्यावर धुळ खुप साठलेली आहे. तर साफसफाई व्यवस्थीत झाली पाहिजे.

**आयुक्त, श्री.राजेंद्र निंबाळकर:—** मी सचिवांना सांगतो करून घ्यावे.

**महापालिका सचिव :—**कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर ६.५१ वाजता महापौर, श्रीमती मिना कुमार आयलानी यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक:— २०/११/२०१७

**उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि.२०/११/१७ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.**

७

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा दिनांक२०/११/२०१७ रोजी ३.००वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत महापौर, श्रीमती मिना कुमार आयलानी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१. श्रीम. मिना कुमार आयलानी —— महापौर

२. श्री. जीवन चंद्रभान इदनानी —— उप—महापौर

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीमती अर्चना गोकुळ करणकाळे | २५ | श्रीमती ज्योत्स्ना सुरेश जाधव |
| ४ | श्रीमती ज्योती दिलीप गायकवाड | २६ | श्रीमती सविता प्रविण तोरणे (रगडे) |
| ५ | श्री. हरेश परमानंद जग्यासी | २७ | श्री. गजानन प्रल्हाद शेळगे |
| ६ | श्रीमती मिना कौर अजितसिंग लबाना | २८ | श्री. दीपक लक्ष्मणदास सिरवानी |
| ७ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | २९ | श्री. चंद्रशेखर केशव यादव |
| ८ | श्री. रविंद्र दशरथ बागुल | ३० | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे |
| ९ | श्री. स्वप्नील मिलींद बागुल | ३१ | श्री. धनंजय बाबूराव बोडारे |
| १० | श्री. अशोक बच्चुमल छाप्रु | ३२ | श्रीमती कांचन अमर लुंड |
| ११ | श्रीमती गीता लालचंद साधनानी | ३३ | श्री. शंकर गोविंदराम लुंड |
| १२ | डॉ. प्रकाश घनश्यामदास नाथानी | ३४ | श्रीमती सुनिता बाबुराव बगाडे |
| १३ | श्रीमती रेखा अशोक ठाकुर | ३५ | श्री. सतरामदास पुतनदास जेसवानी |
| १४ | श्री. महेश पहिलराज सुखरामनी | ३६ | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| १५ | श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग | ३७ | श्री. किशोर नारायणदास वनवारी |
| १६ | श्री. भगवान शंकर भालेराव | ३८ | श्रीमती मिना चंद्रगुप्त सोनेजी |
| १७ | श्रीमती ज्योती प्रशांत पाटील | ३९ | कु. कविता सुरेश गायकवाड |
| १८ | श्रीमती चंद्रावती आयोध्याप्रसाद सिंग | ४० | श्री. आकाश परशुराम पाटील |
| १९ | श्री. राजेश नानिकराम वधरिया | ४१ | श्री. प्रदिप अर्जुनदास रामचंदानी |
| २० | श्रीमती दिपा नारायण पंजाबी | ४२ | श्री. सुरेंद्र बाळकृष्ण सावंत |
| २१ | श्री. अजित प्रभुनाथ गुप्ता | ४३ | श्री. अरुण लक्ष्मण आशान |
| २२ | श्री. राजेंद्र शांताराम चौधरी | | |
| २३ | श्री. रवी किशनचंद जग्यासी | | |
| २४ | श्री. सुमित सागर सोनकांबळे | | |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१) श्रीम. पुजा भोईर २) श्रीम. जयश्री पाटील ३)श्रीम. पंचम कालानी ४) श्रीम. आशा बिराडे ५) श्रीम चरणजितकौर भुल्लर ६) श्री. राजेंद्रसिंह भुल्लर ७) श्रीम. सुरेखा आव्हाड ८) श्रीम. अंजना म्हस्के ९) श्री. कलवंतसिंग सोहता १०) श्रीम. सरोजिनी टेकचंदानी ११) श्रीम. जया माखिजा १२) श्रीम. अपेक्षा भालेराव १३) श्रीम. शुभांगिनी निकम १४) श्रीम. छाया चक्रवर्ती उर्फ अडसुळ १५) श्रीम. डिम्पल ठाकुर(कुमारी) १६)श्रीम. पुष्पा बागुल १७)श्रीम. राजश्री चौधरी १८)श्रीम. शुभांगी बेहनवाल १९)श्रीम. इदिरा उदासी २०) श्रीम. कविता लाल पंजाबी २१) श्रीम. ज्योती बठिजा २२) श्रीम. ज्योती माने २३) श्री. रमेश चव्हाण २४) श्रीम. मिताली चान्पूरे २५) श्रीम. लीलाबाई आशान २६) श्रीम. संगिता सपकाळे २७) श्रीम. शीतल कदम २८) श्रीम. वसुधा बोडारे २९) श्रीम. दिप्ती दुधानी ३०) श्रीम. ज्योती चैनानी ३१) श्रीम. पुजा लबाना ३२) श्री. भारत राजवानी ३३) श्रीम. अंजली साळवे ३४) श्री. प्रमोद टाले ३५) श्रीम. कविता बागुल ३६) श्रीम. मिनाक्षी पाटील ३७) श्री. विजय पाटील ३८) श्री. विकास पाटील ३९) श्री. मनोज सयानी ४०) श्रीम. आशा इदनानी.

खालील अधिकारी सभेत उपस्थित होते./होत्या

श्री. संतोष देहरकर मा. आयुक्त यांच्या स्थानी आसनस्थ होते.

१. श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी, प्र. महापालिका सचिव

२. श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी

३. श्री. एस.के. सेलवन, कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा)

४. श्री. विनायक फासे, प्र मुख्य लेखा परिक्षक

५. श्री. संतोष जाधव, उप लेखा परिक्षक

६. श्री. गणेश शिंपी, प्र. सहाय्यक आयुक्त

७. श्रीम. अलका पवार, प्र.सहाय्यक आयुक्त

८. श्री. नंदलाल समतानी, प्र. सहाय्यक आयुक्त

९. श्री. भास्कर मिरपगार, प्र. अग्निशमन अधिकारी

१०. श्री. हनुमंत खरात, कनिष्ठ अभियंता

११. श्री. बाळू नेटक, प्र. सुरक्षा अधिकारी

१२. श्री. एकनाथ पवार, प्र. स्वच्छता निरीक्षक

१३. श्री. विनोद केणे, प्र. स्वच्छता निरीक्षक

१४. श्री. यशवंत सगळे, प्र. वाहन व्यवस्थापक

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.

१. श्रीमती मनिषा महाजन

२. श्रीमती नर्गिस खान

३. श्री. अशोक रामरख्यानी

४. श्री. बाळु भांगरे

दुपारी ३.२४ वाजता वंदेमातृरम म्हणुन सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>महापालिका सचिव :—</u> दिनांक २०/११/२०१७ रोजीची सर्वसधारण सभा सुरू होत आहे. विषय क्रमांक १ प्रश्नोत्तरे.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u> मा. महापौर जी आज इथे आयुक्त साहेब उपस्थित नसल्यामुळे माझी विनंती आहे की ही सभा स्थगित करण्यात यावी.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u> हा सभा अनिश्चितकालावधी साठी स्थगित करण्यात यावी.

<u>महापौर तथा पिठासन अधिकारी:—</u> हा सभा अनिश्चितकाळा पर्यत स्थगित करण्यात येत आहे.मी सभा संपल्याचे जाहिर करीत आहे.

---

सुचकाचे नावः— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नावः— श्री. राजेश वदारिया

<u>स्थगित प्रस्ताव</u>

दिनांक २०/११/२०१७ रोजी दुपारी ३.०० वाजत सुरू केलेली सभा मा. आयुक्त साहेब उपस्थित नसल्यामुळे ही सभा स्थगित करण्यास प्रस्तावित.

<u>महासभा ठराव क्रः— ४०ब</u> <u>दिनांक २०/११/२०१७</u>

हि महासभा वरील प्रस्ताव विचार घेता दिनांक २०/११/२०१७ रोजी दुपारी ३.०० वाजता आयोजित केलेल्या सभेचे कामकाज अनिश्चित कालावधी पर्यत स्थगित करण्यास मान्यता देत आहे.

सुवकाची सहीः—

अनुमोदकाची सहीः—

<u>सर्वानुमते</u>

महापौर/ पीठासन अधिकारी

सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u>कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर दुपारी ३.२७ वाजता महापौर श्रीमती मिना कुमार आयलानी यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

## <u>उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर</u>

दिनांकः—१८/१२/२०१७

<u>उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. १८/१२/२०१७ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त</u>.

**७—अ**

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा दिनांक २०/११/२०१७ रोजी दुपारी ३.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभा स्थगित केल्याने दिनांक १८/१२/२०१७ रोजी सायंकाळी ४.००वाजता आयोजित करण्यात आली. सदर सभेत महापौर, श्रीमती मिना कुमार आयलानी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१. श्रीम. मिना कुमार आयलानी –– महापौर

२. श्री. जीवन चंद्रभान इदनानी –– उप–महापौर

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीमती अर्चना गोकुळ करणकाळे | २७ | श्रीमती इंदिरा जमनादास उदासी |
| ४ | श्रीमती पुजा सचिन भोईर | २८ | श्रीमती कविता लाल पंजाबी |
| ५ | श्रीमती जयश्री ज्ञानेश्वर पाटील | २९ | श्रीमती सविता प्रविण तोरणे (रगडे) |
| ६ | श्रीमती ज्योती दिलीप गायकवाड | ३० | श्री. गजानन प्रल्हाद शेळके |
| ७ | श्री. हरेश परमानंद जग्यासी | ३१ | श्रीमती ज्योती प्रकाश बठिजा |
| ८ | श्रीमती मिनाकौर अजितसिंग लबाना | ३२ | श्री. दिपक लक्ष्मणदास सिरवानी (साई) |
| ९ | श्रीमती आशा नाना बिराडे | ३३ | श्रीमती ज्योत्स्ना सुरेश जाधव |
| १० | श्री. राजेंद्रसिंह विरसिंग भुल्लर | ३४ | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| ११ | श्री. स्वप्नील मिलिंद बागूल | ३५ | श्री. चंद्रशेखर केशव यादव |
| १२ | श्रीमती सुरेखा हनुमंत आव्हाड | ३६ | श्रीमती मिताली राजेश चान्पूर |
| १३ | श्री. अशोक बच्चुमल छाप्रु | ३७ | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे |
| १४ | डॉ. प्रकाश घनश्यामदास नाथानी | ३८ | श्रीमती दिप्ती नविन दुधानी |
| १५ | श्रीमती रेखा अशोक ठाकुर | ३९ | श्रीमती ज्योती रमेश चैनानी |
| १६ | श्रीमती जया प्रकाश माखिजा | ४० | श्रीमती कांचन अमर लुंड |
| १७ | श्रीमती शुभांगीनी निकम | ४१ | श्री. शंकर गोविंदराम लुंड |
| १८ | श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग | ४२ | श्री. भारत रामचंद्र राजवानी (गंगोत्री) |
| १९ | श्रीमती छाया सुजित चक्रवर्ती उर्फ अडसुळ | ४३ | श्री. सतरामदास पुतनदास जेसवानी |
| २० | श्रीमती ज्योती प्रशांत पाटील | ४४ | श्रीमती कविता सुधिर बागुल |
| २१ | श्रीमती चंद्रावती आयोध्याप्रसाद सिंग | ४५ | श्री. किशोर नारायणदास वनवारी |
| २२ | श्री. राजेश नानिकराम वदारिया | ४६ | श्रीमती मिना चंद्रगुप्त सोनेजी |
| २३ | श्रीमती डिम्पल नरेंद्र ठाकुर (कुमारी) | ४७ | श्रीमती कविता सुरेश गायकवाड |
| २४ | श्रीमती दिपा नारायण पंजाबी | ४८ | श्री. मनोज दिलीपकुमार सयानी |

| | | | |
|---|---|---|---|
| २५ | श्री. अजित प्रभुनाथ गुप्ता | ४९ | श्री. प्रदिप अर्जुनदास रामचंदानी |
याकरीता शासनाकडुन आलेल्या दलित वस्ती निधींचे सबंधीत प्रभागात समान वाटप करण्यात यावे, जेणेकरुन दलित वस्तीतील कोणताही प्रभाग निधीवाचून वंचीत राहणार नाही व त्या प्रभागातील विकासकामे वेळेवर करता येतील. यास्तव सदरचा अशासकिय प्रस्ताव येणा—या महासभेत ठेवून त्वरीत निर्णय घेण्यात यावा, ही विनंती.

महासभा ठराव क्र: ५४ दिनांक:—१८/१२/२०१७

सुचकाचे नाव :— श्री. शेखर यादव

अनुमोदकाचे नाव :— सुनिल सुर्वे

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे शासनाकडून आलेल्या दलित वस्ती निधीचे संबंधीत प्रभागात समान वाटप करुन त्या प्रभागातील विकासकामे शासन नियमानुसार करण्याकामी प्रशासनास निर्देश देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी

सर्वसाधारण महासभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. ८ वाचुन दाखवितात

————————————————————————————————————————————————————

⇨ विषय क्र. ८ :— प्रस्तावाची सूचना

मा. ज्योतिबा फुले, अण्णाभाऊ साठे व पुज्य झुलेलाल यांचे पुतळे बनविण्यासाठी शिल्पकार विजय क्षिरगांवकर यांना कार्यालयीन आदेश देणे याबाबतची सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

————————————————————————————————————————————————————————
——

**<u>सदस्य, श्री. किशोर वनवारीः—</u>** इतिवृत्ताची वाट न पहाता पास..पास...

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—</u>** मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, हा विषय जो मी आणला आहे, हा विषय मा. आयुक्त साहेब...

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकरः—</u>** विषय क्र. ७ पास झाला आहे, परंतु यामध्ये थोडे टेक्नीकली यामध्ये डिपार्टमेटचे, शासनाच्या ज्या गाईड लाईन आहेत, त्या लक्षात घेणे गरजेचे आहे. हा विषय सदस्य, महोदयानी ठेवला आहे. परंतु यामध्ये आमचे मत घेतले नाही. यामध्ये शासनाचे काही निकष आहेत, त्या वेळी जी बॉडी होती, त्या वेळी काही ठराव पास झाला आहे. २०० कामे मंजूर केले आहेत. त्यामधले काही कामे आम्ही केले आहेत आणि बाकीचे जे राहीले आहेत, ते ठरावनुसार करावे किंवा शासनाचा जो निर्णय त्या प्रमाणे....

**<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानीः—</u>** साहेब, कसे आहे, लोकांची भावना कशी आहे की, दलित वस्तीचे जे फंड येतात, निधी येतात ते ...

**<u>सदस्या, मिना सोनेजीः—</u>** शासनाच्या निर्णयानुसार करा.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—</u>** शासन निर्णयानुसार परंतु समान, सगळया ठिकाणी दिले गेले पाहीजेत.

**<u>सदस्य, श्री. किशोर वनवारीः—</u>** समान वितरीत झाले पाहीजेत.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकरः—</u>** शासनाने हे निर्देश दिलेले आहेत की, हा निधी वाटप करण्याच्या वेळी जो दलित प्रभाग रिर्झव्हमध्ये आहेत, त्यांना प्राधान्याने दयायचे आहेत आणि शिल्लक राहीलेला ५० टक्के जिथे जास्त लोकसंख्या आहे, ते तिथे तो खर्च करा. असे निष्कर्ष आहेत.

**<u>सदस्य, श्री. किशोर वनवारीः—</u>** दलित वार्डमध्ये समान वितरीत झाले पाहीजे.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकरः—</u>** माझ्या माहीती प्रमाणे तो विषयपत्र ठेवला आहे, तो पर्यंत आपण हा विषय स्थगित ठेवू आणि नंतर संपुर्ण विषय समजून घेऊन नंतर निर्णय घेतला तर खुप चांगले राहील.

**<u>सदस्य, श्री. किशोर वनवारीः—</u>** परंतु सर झोपडपट्टीमध्ये समान वितरीत व्हायला पाहीजे.

**<u>सदस्य, श्री. रमेश चव्हाणः—</u>** शासनाच्या नियमानुसार करा तुम्ही.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकरः—</u>** माझे तेच म्हणणे आहे. शासनाच्या नियमात पण आपण त्याच्यावर चर्चा झाली पाहीजे आणि आम्ही तो विषय पण सभागृहापुढे ठेवलेला आहे.

**<u>सदस्य, श्री. रमेश चव्हाणः—</u>** बरोबर आहे, शासनाच्या नियमा प्रमाणे झाले पाहीजे.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकरः—</u>** आता आपण विषय केला तर तो त्याच्याशी विसंगत होईल. आता आपण सभागृहापुढे ठेवत आहे.

**<u>महापालिका सचिव :—</u>** शासन नियमानुसार करण्यात येईल.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—</u>** मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, हा जो माझा विषय आहे, महात्मा ज्योतिबा फुले, अण्णाभाऊ साठे, आणि पुज्य झुलेलाल यांचे महानगरपालिकेच्या आवारामध्ये पुतळे बसवण्यासाठी दिनांक २९/९/२०१६ ला मा. स्थायी समितीने ठराव क्र. ७५, ७६ व ७७ महात्मा ज्योतिबा फुले, अण्णाभाऊ साठे, पुज्य झुलेलाल यांचे पुतळे बसवण्यासाठी श्री. विजय क्षिरगांवकर, शिल्पकार यांना आपण काम करण्यासाठी मान्यता दिली होती. परंतु अजून त्यांना वर्क ऑर्डर दिली नाही, त्यामध्ये काय काय कमी आहे? वर्क ऑर्डर का दिली जात नाही? त्यामध्ये जे काही कमी असेल ते पुर्ण करून लवकरात लवकर वर्क ऑर्डर दिली जावी.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर</u>**ः— जे पुतळे बनवण्याचा आणि बसवण्याचा जो विषय आहे, त्यामध्ये शासनाच्या गृहविभागाचे स्पष्ट सुचना आहेत की, शासनाच्या मान्यतासाठी जिल्हाधिकारी यांच्या मार्फत त्यांच्याकडे जो प्रस्ताव जातो, तो आम्ही पाठवला आहे. जर त्यांची मान्यता नसेल तर आपण शिल्पकाराला नियुक्त करतो आणि शासनाकडून मान्यता मिळत नाही किंवा तिकडून यायला उशिर होत असेल तर हा खर्च करणे किंवा नियुक्त करणे मला वाटते की, जो पर्यंत शासन यावर निर्णय घेत नाही, तो पर्यंत आपण पुढे जाणे योग्य वाटत नाही.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—</u>** माझे असे म्हणणे आहे की, शासनाच्या मान्यतासाठी काय काय करावे लागेल.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर</u>**ः— ते सर्व झाले आहे, आम्ही प्रस्ताव पण पॉझिटीव्ह पाठवला आहे. मी दोन रिमाईडर आज पर्यंत शासनाला पाठविले आहेत.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—</u>** एक रिमाईडर अजून पाठवून लवकरात लवकर करण्याचा प्रयत्न करा.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर</u>**ः— शेवटचा रिमाईडर शहर अभियंता यांच्या सहीने पाठवला आहे.

**<u>सदस्य, श्री. मनोज सयानीः—</u>** आयुक्त साहेब, हा मुद्दा लोकांच्या भावनांशी जोडलेला आहे. तो सन २००४ पासून चाललेला आहे. आपण आल्या नंतर दोन रिमाईडर पाठवले आहेत, परंतू विशेष लक्ष देवून हे जे तीन पुतळे आहेत, महात्मा ज्योतिबा फुले, अण्णाभाऊ साठे आणि भगवान झुलेलाल यांचा, या मध्ये काय आहे? की, अण्णाभाऊ साठे यांचा पुतळा उल्हासनगर —५ इथे गार्डनमध्ये बसवला आहे. याच प्रमाणे आपण महापालिकेत बसवाल आणि उद्या आम्ही कोणत्याही चौकात भगवान झुलेलाल यांचा पुतळा बसवला तर आणि तुमच्यावर कंडीशन टाकतील की, आपण महापालिकेमध्ये बसवा परत वाद होईल. त्यामुळे शांतता बिघडेल.

**<u>सदस्य, श्री.सतरामदास जेसवानीः—</u>** उल्हासनगर—५ मध्ये या विषयावर खुप नाराज आहेत की, महानगरपालिकेने उशिर केल्यामुळे आणि खेळाच्या मैदानावर मान्यता न घेता तिथे पुतळा बसवला आहे, त्यामुळे तिथे लोक नाराज आहेत. अशांतीचे वातावरण व्हायला नको म्हणून जे पुतळे आहेत, त्यासाठी लवकरात लवकर मा. जिल्हाधिकारी यांची मान्यता घेऊन करण्यात यावे.

**<u>आयुक्त, श्री.राजेंद्र निंबाळकर</u>**ः— मी या विषयी संपुर्ण सहमतआहे आणि अनुकूल आहे, त्यासाठी आम्ही शासनाला परत परत रिमाईडर देत आहेत.

**<u>सदस्य, श्री.मनोज सयानी:—</u>** साहेब, आपण स्वत: जातीने लक्ष देवून लवकरात लवकर करावे अशी संपुर्ण सभागृहाची आपल्याला विनंती आहे.

**<u>महापालिका सचिव :—</u>** प्रशासनास निर्देश देत आहे. असे ठरावात टाकते.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>** हे काम करण्यासाठी लवकरात लवकर प्रशासनाकडून मंजूरी घेण्यात यावी.

**<u>सदस्य, श्री.सतरामदास जेसवानी:—</u>** मनोज जी धन्यवाद.

**<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u>** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

---

विषय क्र. ८:— <u>प्रस्तावाची सूचना</u>

मा. ज्योतिबा फुले, अण्णाभाऊ साठे व पुज्य झुलेलाल यांचे पुतळे बनविण्यासाठी शिल्पकार विजय क्षिरगांवकर यांना कार्यालयीन आदेश देणे याबाबतची सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

<u>प्रस्तावना</u>

दिनांक २९/९/२०१६ रोजीच्या स्थाय समिती ठराव क्रमांक ७५,७६ व ७७ अंतर्गत मा. ज्योतिबा फुले, अण्णाभाऊ साठे व पुज्य झुलेलाल यांचे पुतळे बनविणेसाठी मंजुरी देण्यात आलेली आहे. सदरचे काम शिल्पकार श्री. विजय क्षिरगांवकर यांना पुतळे बनविणेसाठी मंजुरी मिळालेली आहे. तथापी स्थायी समितीमध्ये ठराव पारीत होवून देखील आजतागायत पुतळे बनविणेकामी आदेश देण्यात आलेले नाहीत. तरी कृपया मा. ज्योतिबा फुले, अण्णाभाऊ साठी व पुज्य झुलेलाल यांचे पुतळे बनविणेसाठी शिल्पकार श्री. विजय क्षिरगांवकर यांना आदेश पारीत करण्यात येणे आावश्यक आहे.

तरी वर नमुद केलेल्या बाबी लक्षात घेवून श्री. विजय क्षिरगांवकर यांना कार्यालयीन आदेश देण्यासाठी येत्या महासभेमध्ये विषय घेवून याबाबत चर्चा होवून निर्णय घेण्यात यावा.

<u>महासभा ठराव क्र:</u> ५५ दिनांक १८/१२/२०१७

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :—श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे मा. ज्योतिबा फुले, अण्णाभाऊ साठे व पुज्य झुलेलाल यांचे पुतळे बनविण्यासाठी शिल्पकार विजय क्षिरगांवकर यांना कार्यालयीन आदेश लवकरात लवकर देण्याकामी शासनाकडून मंजुरी घेणेसाठी प्रशासनास निर्देश देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी

सर्वसाधारण महासभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. ९ वाचुन दाखवितात

———————————————————————————————————————————

⇨ विषय क्र. ९ :— <u>प्रस्तावाची सूचना</u>

उल्हासनगर महानगरपालिकेतील कामगार संघटनांना महापालिकेच्या बाहेर जागा उपलब्ध

करुन देणेबाबत पालिका सदस्य श्री. सुनिल सुर्वे यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

———————————————————————————————————————————

——

<u>सदस्य, श्री.प्रदिप रामचंदानी:—</u> पास...पास...

<u>सदस्य, श्री.सुनिल सुर्वे:—</u> आणि लवकरात लवकर करून दयावे, इतिवृत्ताची वाट न पहाता, पास...पास... लवकरात लवकर साहेब, हे ऑफिस रिकामे किती दिवसात होतील. पुढच्या महासभेच्या आधी म्हणजे एक महीन्यात होईल.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—</u> परंतु यांची जागा आपण आयडेंटीफाय केली आहे का?

<u>सदस्य, श्री.सुनिल सुर्वे:—</u> आयडेंटीफाय, महापालिकेच्या आवारात नको आहे, बाहेर त्यांना कुठेही दया. आमचे म्हणणे एवढेच आहे की, इथे जागा पहीलेच कमी पडत आहे.

<u>सदस्य, श्री.प्रदिप रामचंदानी:—</u> पास...पास...

<u>सदस्य, श्री.सुनिल सुर्वे:—</u> इतिवृत्ताची वाट न पहाता.

<u>कही सदस्य :—</u>पास—पास......

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

विषय क्र. ९ :— <u>प्रस्तावाची सूचना</u>

उल्हासनगर महानगरपालिकेतील कामगार संघटनांना महापालिकेच्या बाहेर जागा उपलब्ध करुन देणेबाबत पालिका सदस्य श्री. सुनिल सुर्वे यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

---

**<u>प्रस्तावना</u>**

उल्हासनगर महानगरपालिका मुख्यालयाच्या आवारात निवडून आलेले पदाधिकारी, अधिकारी यांना बसण्यास तसेच नागरीकांना सोयी सुविधा देतांना दालने कमी पडत असून महापालिका मुख्यालयाच्या आवारात कामगार संघटनांना देखील दालने उपलब्ध करुन देण्यात आलेली आहेत. श्री. भाई जगताप यांच्या अध्यक्षतेखाली अखिल भारतीय कर्मचारी महासंघ या संघटनेस ज्याप्रमाणे महापालिकेच्या आवाराबाहेर महापालिकेच्या वास्तुत संघटनेसाठी दालन/कार्यालय उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत, त्याच धर्तीवर महानगरपालिकेच्या कामगारांच्या अन्य संघटनांना देखील नियम व तरतुदीनुसार मुख्यालयाच्या आवाराबाहेर सर्व सोयींनी युक्त असे प्रशस्त दालने/ कार्यालये उपलब्ध करुन दयावीत, ही विनंती.

**<u>महासभा ठराव क्र:</u>** ५६            <u>दिनांक:–१८/१२/२०१७</u>

सुचकाचे नाव :– श्री.सुनिल सुर्वे

अनुमोदकाचे नाव :– श्री. शंकर लुंड

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे उल्हासनगर महानगरपालिकेतील कामगार संघटनांना महापालिकेच्या बाहेर नियम व तरतुदीनुसार सर्व सोयींनी युक्त असे प्रशस्त दालने/ कार्यालये लवकरात लवकर जागा उपलब्ध करुन देणेस मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

<u>सर्वानुमते</u>
महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**<u>महापौर तथा पिठासन अधिकारी:–</u>** मी सभा संपल्याचे जाहिर करीत आहे.

**<u>महापालिका सचिव :–</u>**कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर ७.०० वाजता महापौर श्रीमती मिना कुमार आयलानी यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

( प्राजक्ता मि. कुलकर्णी )

प्र. महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक:—
१६/१२/२०१७

उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. १६/१२/२०१७ रोजीच्या विशेष महासभेचे इतिवृत्त.

२

उल्हासनगर महानगरपालिकेची विशेष महासभा शनिवार, दिनांक १६/१२/२०१७ रोजी ३.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत महापौर, श्रीमती मिना कुमार आयलानी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१. श्रीम. मिना कुमार आयलानी —— महापौर

२. श्री. जीवन चंद्रभान इदनानी —— उप—महापौर

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीमती अर्चना गोकुळ करणकाळे | ४१ | श्री. दिपक लक्ष्मणदास सिरवानी (साई) |
| ४ | श्रीमती पुजा सचिन भोईर | ४२ | श्री. सुमित सागर सोनकांबळे |
| ५ | श्रीमती जयश्री ज्ञानेश्वर पाटील | ४३ | श्रीमती ज्योत्स्ना सुरेश जाधव |
| ६ | श्रीमती ज्योती दिलीप गायकवाड | ४४ | श्रीमती ज्योती शामराव माने |
| ७ | श्री. हरेश परमानंद जग्यासी | ४५ | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| ८ | श्रीमती मिनाकौर अजितसिंग लबाना | ४६ | श्री. चंद्रशेखर केशव यादव |
| ९ | श्रीमती पंचम उमेश कालानी | ४७ | श्रीमती मिताली राजेश चान्पूर |
| १० | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | ४८ | श्रीमती लिलाबाई लक्ष्मण आशान |
| ११ | श्रीमती आशा नाना बिराडे | ४९ | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे |
| १२ | श्री. रविंद्र दशरथ बागुल | ५० | श्रीमती संगिता नितीन सपकाळे |
| १३ | श्रीमती चरणजितकौर राजेंद्रसिंह भुल्लर | ५१ | श्रीमती शितल चंद्रकांत कदम |
| १४ | श्री. राजेंद्रसिंह विरसिंग भुल्लर | ५२ | श्रीमती वसुधा धनंजय बोडारे |
| १५ | श्री. स्वप्नील मिलींद बागुल | ५३ | श्री. धनंजय बाबुराव बोडारे |

| | | | |
|---|---|---|---|
| १६ | श्रीमती सुरेखा अहनुमंत आव्हाड | ५४ | श्रीमती दिप्ती नविन दुधानी |
| १७ | श्रीमती अंजना अंकुश म्हस्के | ५५ | श्रीमती ज्योती रमेश चैनानी |
| १८ | श्री. कलवंतसिंग गुरूदेव सोहता | ५६ | श्रीमती कांचन अमर लुंड |
| १९ | श्री. अशोक बच्चुमल छाप्रु | ५७ | श्री. शंकर गोविंदराम लुंड |
| २० | डॉ. प्रकाश घनश्यामदास नाथानी | ५८ | श्रीमती सुनिता बाबुराव बगाडे |
| २१ | श्रीमती रेखा अशोक ठाकुर | ५९ | श्रीमती पुजाकौर श्यामसिंग लबाना |
| २२ | श्रीमती सरोजिनी टेकचंदानी | ६० | श्री. भारत रामचंद्र राजवानी (गंगोत्री) |
| २३ | श्रीमती जया प्रकाश माखिजा | ६१ | श्री. सतरामदास पुतनदास जेसवानी |
| २४ | श्री. महेश पहिलराज सुखरामनी | ६२ | श्रीमती अंजली चंद्रकांत साळवे |
| २५ | श्रीमती शुभांगीनी निकम | ६३ | श्री. प्रमोद नामदेव टाले |
| २६ | श्री. भगवान शंकर भालेराव | ६४ | श्रीमती कविता सुधिर बागुल |
| २७ | श्रीमती छाया सुजित चक्रवर्ती उर्फ अडसुळ | ६५ | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| २८ | श्रीमती चंद्रावती आयोध्याप्रसाद सिंग | ६६ | श्री. किशोर नारायणदास वनवारी |
| २९ | श्री. राजेश नानिकराम वदारिया | ६७ | श्रीमती मिना चंद्रगुप्त सोनेजी |
| ३० | श्रीमती दिपा नारायण पंजाबी | ६८ | श्रीमती मिनाक्षी रवी पाटील |
| ३१ | श्री. अजित प्रभुनाथ गुप्ता | ६९ | श्री. विजय चाहु पाटील |
| ३२ | श्रीमती पुष्पा नाना बागुल | ७० | श्रीमती कविता सुरेश गायकवाड |
| ३३ | श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी | ७१ | श्री. आकाश परशुराम पाटील |
| ३४ | श्रीमती शुभांगी मनोहर बेहनवाल | ७२ | श्री. विकास परशुराम पाटील |
| ३५ | श्री. राजेंद्र शांताराम चौधरी | ७३ | श्री. मनोज दिलीकुमार सयानी |
| ३६ | श्रीमती इंदिरा जमनादास उदासी | ७४ | श्री. प्रदिप अर्जुनदास रामचंदानी |
| ३७ | श्रीमती कविता लाल पंजाबी | ७५ | श्री. सुरेश बाळकृष्ण सावंत |

| | | | |
|---|---|---|---|
| ३८ | श्रीमती सविता प्रविण तोरणे (रगडे) | | श्री. अरूण लक्ष्मण आशान |
| ३९ | श्री. गजानन प्रल्हाद शेळगे | ७६ | श्रीमती आशा जीवन इदनानी |
| ४० | श्रीमती ज्योती प्रकाश बठिजा | | |

तर

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१. श्रीमती गीता लालचंद साधनानी, २. श्रीमती अपेक्षा भगवान भालेराव, ३. श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग, ४. श्रीमती ज्योती प्रशांत पाटील, ५. श्रीमती डिम्पल नरेंद्र ठाकुर (कुमारी), ६. श्री. रवि किशनचंद जग्यासी, ७. श्रीमती आशा जीवन इदनानी .

खालील अधिकारी सभेत उपस्थित होते.

१. श्री. राजेंद्र निंबाळकर, आयुक्त
२. श्रीमती विजया कंठे, अतिरिक्त आयुक्त
३. श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी, प्र. महापालिका सचिव
४. श्री. राम जैसवार, शहर अभियंता
५. श्री. संतोष देहेरकर, उप आयुक्त (मुख्यालय)
६. श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी
७. डॉ. राजा रिझवानी, प्र. वैद्यकिय आरोग्य अधिकारी
८. श्री. कुमार जग्यासी, कनिष्ठ अभियंता
९. श्री. हनुमंत खरात, उप अभियंता
१०. श्रीमती छाया डांगळे, सहाय्यक आयुक्त
११. श्री. श्री. गणेश शिंपी, सहाय्यक आयुक्त
१२. श्रीमती श्रध्दा सपकाळे, प्रोग्रामर
१३. श्री. भास्कर मिरमगार, प्र. अग्निशमन अधिकारी
१४. श्री. बाळू नेटके, प्र. सुरक्षा अधिकारी
१५. श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक
१६. श्री. यशवंत सगळे, प्र. वाहन व्यवस्थाक

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.

१. श्रीमती मनिषा महाजन

२. श्रीमती नर्गिस खान

३. श्री. अशोक रामरख्यानी

४. बाळू भांगरे

दुपारी ३.३२ वाजता वंदे मातरम म्हणुन सभेची सुरूवात करण्यात आली.

या वेळी मा. महापौरांच्या स्थानी, उप महापौर, आसनस्थ होते आणि मा. आयुक्तांच्या स्थानी उप आयुक्त (मुख्यालय), श्री. संतोष देहेरकर आसनस्थ होते.

महापालिका सचिवः— विषय क्र. ....

सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानीः— एक मिनीट, श्रध्दांजली आहे, मा. महापौर साहेब, आयुक्त साहेब, सचिव मॅडम, उल्हासनगर महानगरपालिकेच्या माजी नगरसेविका, श्रीमती भारती नरेंद्र राजानी, यांचा मृत्यूं झाला आहे. भारतीय जनता पार्टीचे अध्यक्ष श्री. नरेंद्र राजानी, माजी अध्यक्ष, यांची धर्म पत्नी होत्या. मी संपुर्ण सभागृहाला सांगतो की, २ मिनीट उभे राहून त्यांच्या आत्म्याला शांती लाभण्यासाठी श्रध्दांजली वाहण्यात यावी.

सदस्य, श्रीम. मिना सोनेजीः— त्याच बरोबर, आपल्या सिनेमा कलाकार, शशीकपुर यांचा पण मुत्यूं झाला आहे, त्यांना सुध्दा श्रध्दांजली वाहण्यात यावी.

सदस्य, श्री. किशोर वनवारीः— काल पण दोन अपघात झाले आहेत, त्या मुलासाठी आणि त्याच्या वडीलांसाठी पण श्रध्दांजली वाहण्यात यावी.

महापालिका सचिवः— कृपया सगळयानी दोन मिनीटे उभे रहावे.

---

सुचकाचे नाव :— श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :— श्री. प्रदिप रामचंदानी

**शोक प्रस्ताव**

उल्हासनगर महानगरपालिकेच्या माजी नगरसेविका व भारतीय जनता पार्टीचे अध्यक्ष श्री. नरेंद्र राजानी यांच्या पत्नी श्रीमती भारती नरेंद्र राजानी यांचा काही दिवसांपुर्वी मृत्यु झाला.

आणि सिनेमा कलाकार शशी कपुर यांचा सुध्दा मृत्यु झालेला आहे.

तसेच उल्हासनगर शहरात अपघातात एक मुलगा व त्याच्या वडिलांचा मृत्यु झाला आहे.

वर उल्लेख केलेल्यांच्या कुटूंबियांचे दु:खात हे सभागृह सहभागी असुन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

<u>महासभा ठराव क्र. ४० क</u> <u>दिनांक:– १६/१२/२०१७</u>

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्रीमती भारती नरेंद्र राजानी, श्री. शशी कपुर व उल्हासनगर शहरातील अपघातात एक मुलगा आणि त्याचे वडील यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दु:खात सहभागी होऊन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी

विशेष महासभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव:–</u> विषय क्रमांक १ वाचून दाखवितात.

---

⇨ <u>विषय क्र. १ :–</u> उल्हासनगर शहराच्या मंजूर आराखडयामध्ये वगळण्यात आलेल्या क्षेत्रामध्ये आरक्षण बदलून पब्लिक युटीलीटीचे आरक्षण टाकण्यासाठी हरकती व सूचना घेणे तसेच महासभा, तज्ञसमितीच्या सूचयना व नागरीकांनी दिलेल्या हरकती विचारात न घेतल्याने या संदर्भात चर्चा, विचार, विनिमय करणे.

---

<u>सदस्या, श्रीम. ज्योत्सना जाधव:–</u> मा. महापौर, मा. आयुक्त साहेब, आजची महासभा ही विकास आराखडयावर चर्चा करण्यासाठी ठेवण्यात आलेली आहे. मला विकास आराखडया विषयी काही तरी बोलायचे आहे. या शहराचा विकास आराखडा शासनाकडून मंजूर करण्यात आलेला आहे, तो मंजूर करून आलेला आहे. पण तो

विकास आराखडा तयार करण्यासाठी ४ तज्ञ अधिकारी व तीन विद्यमान नगरसेवक यांची कमिटी नेमण्यात आली होती. त्या कमिटीने मोठया विश्वासाने शहराच्या विकासाच्या दृष्टीने काही घडामोडी करून नागरीकांचे सजेशन व ऑब्जेक्शन यांचा विचार करून महासभेमध्ये विकास आराखडयाचा पुर्नरविचार करून ठराव पारीत केला गेला होता. तो पारीत केलेला ठराव शासनाकडे पाठविण्यात आला. परंतु शासनाच्या अधिका—यांनी शासनाने नियुक्त केलेली कमिटी व महासभा यांचा विचार न करता, आपल्या मर्जीप्रमाणे शहराचा विकास आराखडा महापालिकेवर सोपवलेला आहे. जर असाच आपल्या मर्जीप्रमाणे शहराचा विकास आराखडा तयार करायचा होता, तर तो आराखडा तयार करतांना कमिटी नेमण्याचे नाटक कशाला करायचे होते. तसेच काही झोपडपट्टयांवर आरक्षण ठेवण्यात आलेले आहे. त्या प्रमाणे शासनाच्या ब्लॉक व बॅरेकवर नविन डी.पी. रोड टाकण्यात आलेला आहे. उल्हासनगर शहरामध्ये शासनाचे पुर्नवसन कायदयाने नागरीकांना ब्लॉक व बॅरेक सनद देवून देण्यात आलेले आहे. सनद दिलेल्या नागरीकांना आशा प्रकारे आरक्षण ठेवून पुन्हा बेघर करण्यात येत आहे, ही बाब विसंगत आहे. हा शहराचा मंजूर विकास आराखडयाचा नियोजन विकास समिती, सभापतीच्या या अधिका—यांचा मी निषेध करत आहे. मा. महापौर, आमच्या प्रभागामध्ये विनस टॉकीज ते छत्रपती शाहू महाराज उडाणपुल या ठिकाणचा रस्ता जुन्या डी.पी. प्लॉन प्रमाणे बारा वर्षापुर्वी ८० फुटाचे मार्कीग देवून, एक वेळ तोडण्यात आलेले आहेत. त्यामध्ये कित्येक नागरीक बेघर झालेले आहेत. आता पर्यंत त्यांना कुठल्याही प्रकारची पर्यायी जागा दिलेली नाही. आता एम.एम.ए.आर.डी.ए. तर्फे जुन्या डी.पी. प्लॉन प्रमाणे, ८० फुटाचा सिमेंट क्रॉर्केटचा रस्ता मंजुरी असतांना आता नविन विकास आराखडया प्रमाणे १०० फुटाची मार्किंग त्या ठिकाणी देण्यात येत आहे. त्या रस्त्या लगत राहणा—या नागरीकांना काहीही पर्यायी जागेची नियोजन न करता १०० फुटाची मार्किंग करून रस्ता रूंदीकरणाच्या नावा खाली त्यांना पुन्हा बेघर करण्यात येत आहे. मा. महापौर साहेब, आता पर्यंत डी.सी. रूलवर कलस्टर बाबत काहीही शासन निर्णय नसतांना अशा प्रकारे तडकाफडकी निर्णय घेऊन, त्या रस्त्यावर १०० फुटाची मार्किंग कशा आधारे देण्यात येत आहे. याबाबत या सभेमध्ये जो पर्यंत निर्णय होत नाही, तो पर्यंत मी जमीनीवर बसण्याचा निर्णय घेत आहे.

**या वेळी सदस्या, श्रीमती जोत्सना जाधव, या स्टेज जवळ जमीनीवर खाली बसल्या.**

<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारेः—</u> या ठिकाणी विकास आराखडयावर चर्चा चालू आहे, टाऊन प्लॅनिंगचे कोणी आहेत का?

**<u>सदस्य, श्री. सतरामदास जेसवानीः—</u>** मा. महापौर साहेब, आज शहराची सुधारणा आणि शहराच्या नशीबाचा फैसला होणार आहे. आयुक्त साहेब, इथे उपस्थित नाहीत. अशी काय महत्वाची मिटींग होती की, आज इथे आयुक्त साहेब, उपस्थित नाहीत, कृपया याची माहीती दया, तर खुप उपकार होतील.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेरावः—</u>** सन्माननिय महापौर...

**<u>सदस्य, श्री. सतरामदास जेसवानीः—</u>** साहेब, मी विनंती केलेली आहे, तरी कृपया आयुक्त साहेब सांगतील तर खुप उपकार होतील, हे नगरसेवकांनी विचारले आहे आणि माझी सर्व नगरसेवकांना विनंती आहे की, जर आपणाला काही विचारायचे आहे तर त्याचे उत्तर मला मिळायला पाहीजे, धन्यवाद.

**<u>उप आयुक्त मुख्यालय, श्री. संतोष देहेरकरः—</u>** मा. महापौर, सर्व सन्माननिय सदस्य, मा. आयुक्त साहेब, जो मोर्चा आलेला आहे, ते तिथे सामोरे गेलेले आहेत, ते येत आहेत. त्यांची सर्व कागपत्र इथे आहेत, थोडया वेळेत ते येतील.

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:—** आयुक्त साहेब, येणार आहेत ना? धन्यवाद.

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:—** मा. महापौरजी, आमच्या सदस्या, श्रीमती जाधव मॅडमनी जो मुद्दा उचलला आहे, तो एक विचार करण्यासारख मुद्दा आहे, त्या खाली जमीनीवर बसल्या आहेत, हे फक्त एकाच रोडबाबत झालेले नाही, तर दुस—या रोडच्या बाबतीत सुध्दा असे झाले आहे. आज ५४ करोड रूपये एम.एम.आर.डी.ए. कडून पास होऊन आले आहेत. तेव्हा दोन—तीन वर्षे पहीले जे एस्टिमेट बनवले होते, त्या वेळी डेव्हलेपमेंट प्लॉनमध्ये तो रोड ८० फुटाचा होता. आता दुर्गा पाडयामध्ये पण १३ करोडचे एस्टीमेट आहे. जे आमचे सदस्य, श्री. विकास पाटील आणि श्री. आकाश पाटील आणि श्रीम. कविता गायकवाड काही माझ्या पॅनल बरोबर कनेक्टेड आहेत. त्यामध्ये पण ४० फुटाचे मार्किंग पंधरा दिवसामध्ये दिले आहेत आणि आता सांगत आहेत की, ८० फुटाचे दयायचे आहे. तर याच्या नंतरही पहीले पंधरा—विस दिवसापुवी चाल चक्की, उल्हासनगर स्टेशन पर्यंत ८० फुटाचे मार्किंग दिले आहे, जुन्या डेव्हलपमेंट प्लॉनच्या हिशोबाने दिले आहे आणि आता परत जाऊन १०० फुटाची मार्किंग दिली आहे. जर एम.एम.आर.डी.ए. ची एस्टिमेट ८० फुटाचे पास आहे, आमच्या कॅम्प नं. ५ मध्ये जे १३ करोड रूपयाचे काम आहते, ते एस्टिमेट ४० फुटाचे पास आहेत आणि आता आपण ८० फुट करू दोन्ही ठिकाणी ८० फुटावरून १०० फुट करणार आहेत. तर त्या एस्टीमेटचे कास्ट कमी पडतील, ते महापालिका भरणार आहे का? त्या एस्टिमेंटची जी किंमत वाढले ते कोण भरेल? चोविस तास महापालिका म्हणते की, आपल्या जवळ पैसे नाहीत, नगरसेवक निधी पण देणार नाही, प्रभाग समिती निधी पण देणार नाही, शहराचा विकास करणार नाही, शहराचे विनाश करू, तर रोडची जी भरपाई आहे, ती कोण करणार आहे? तर मी मा. महापौर, मा. आयुक्त साहेब, यांच्या माध्यमातून एक सुचना देतो की, अजून डेव्हलपमेंट प्लॉन लागू झाला नाही. डी. पी. प्लॉनचे ऑब्जेक्शन ४ जानेवारी पर्यंत चालू आहेत आणि जो जूना डी. पी. प्लॉन होता एस.एम., त्याचे २१ एप्रिलचा जी.आर. काढून नोव्हेबरमध्ये शेवटी पाठविला आहे. तो पण आठ—दहा महीने उशिरा पाठविला आहे. तो सुध्दा लोकांना समजले नाही आणि बाहेर हजारो लोकांचा मोर्चा आला आहे. तर कृपया करून जो पहीले एस्टिमेट जसे पास आहे, त्या प्रमाणे रोड बनला पाहीजे ८० चा, दुर्गापाडा, जुना पोस्ट ऑफिस आणि टॅकर पॉईट पाईप लाईन पर्यंत आहे. तर तो ४० किंवा ८० फुटाचा पास झाला आहे, तरी कृपया करून तो रोड ज्या प्रमाणे पास झाला आहे, ते एम.एम.आर.डी.ए. चे पैसे आहेत आणि जे एम.एम.आर.डी.ए. चे रोड आहेत, ते ५६ करोड रूपयांचे आहेत आणि ते ४० फुट आणि ८० फुटाचे आहेत.

**या** वेळी सदस्य, श्री. अजित गुप्ता यांनी सभागृहामध्ये प्रवेश केला.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** मा. सदस्यांना मी निवेदन करतो की, आजचा जो विषय आहे, त्यावर चर्चा करण्यासाठी आपण इथे बसलो आहे.

**सदस्य, श्री. अरूण आशान:—** मा. महापौर, मा. आयुक्त साहेब, मा. सचिव मॅडम,....

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** आपण जो विरोध केला आहे,....

**सदस्य, श्री. प्रमोद टाले:—** मा. महापौरजी वनवारी साहेबांनी, आता जो मुद्दा मांडला आहे....

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:—** मी सभागृहाचे लक्ष वेधण्यासाठी बोलेलो आह की, दुर्गापाडा इथे ४०फुटाचे मार्किंग दिली आहे आणि इकडे ८० फुटाचे दिले आहे, ते तेवढेच जूनेच राहीले पाहीजे. एस्टीमेट पण त्या प्रमाणे पास आहे आणि एम.एम.आर.डी.ए. चे पैसे सुध्दा त्या प्रमाणे पास आहेत.

या वेळी मा. महापौर  व मा. आयुक्त यांनी सभागृहामध्ये प्रवेश केला व आसनस्थ झाले.

<u>दस्य, श्री. प्रमोद टाले:–</u> वनवारी साहेब, मी आपल्या विषयावर पुढे बोलत आहे, एम.एम.आर.डी.ए. ने आपले जे रोड पास केले आहेत, त्यामध्ये माझ्या इथला पण एक रोड आहे. जो सुभाष टेकडी पासून भरतनगर पर्यंत जात आहे. तेथे सर्व वस्ती आहे, जिथे अर्धा रोड ६३ फुटाचे आहे आणि अर्धा ओपन आहे, तिथे बिल्डर काम करायला जाणार आहेत, तिथे ४० फुटाचे केले आहे, म्हणजे एका रोडचे दोन तुकडे केले आहेत. असे का व्हायला पाहीजे? आणि एम.एम.आर.डी.ए. ने त्याचे फंड पास केले आहेत, एस्टिमेट पास केले आहेत, त्या वेळी जेव्हा महानगरपालिकेले एस्टिमेट बनवले, तेव्हा महानगरपालिकेला समजायला पाहीजे होते. तो ६० फुटाचा रोड जिथे वस्ती आहे, तिथे टाकला गेला आहे आणि ४० फुटाचा रोड जिथे वस्ती नाही, तिकडे टाकला आहे आणि तो एकच रोड आहे, सुभाष टेकडी पासून ते भरतनगर पर्यंत तो एकच रोड आहे. एका रोडचे दोन तुकडे आणि वेगवेगळे भाग केले आहेत, याचा पण खुलासा व्हायला पाहीजे.

या वेळी सदस्या, श्रीम. कांचन लुंड यांनी सभागृहामध्ये प्रवेश केला.

<u>सदस्या, श्रीम. कविता बागुल:–</u> मा. महापौर, मॅडम, मा. आयुक्त साहेब, आंबेडकर चौक ते भरतनगरला जो रस्ता जाणारा आहे, तिथे वस्ती आहे, तिथे ६० फुटाचा रस्ता केला आहे आणि तिथे बिल्डरची जागा आहे, तिथे ४०फुटाचा रस्ता केला आहे. एका रस्त्याचे दोन तुकडे कसे केले आहेत, एक ६०फुटाचा आणि एक ४० फुटाचा?

<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:–</u> सन्माननिय महापौर आणि उप महापौर, शहराचा विकास आराखडा आपण संदर्भात जी बैठक आयोजित केली आहे. शासनाने जवळ जवळ ७५ टक्के डी.पी. हा मंजूर करून पाठविला आहे. या बैठकीमध्ये ज्या गोष्टी घडतील किंवा मागणी होईल, त्या शासनाकडून आपण मान्यता करून घेणार आहोत का? पहीले हे सांगा. इथे आम्ही ओरडतो आणि तुमचे आदेश पाळले जात नाहीत. एवढा मोठा निर्णय शहर विकास आराखडयाचा तो शासन दरबारी मान्य होणार आहे का?

<u>महापौर तथा पिठासिन अधिकारी:–</u> आपण थोडा फार मराठी, हिंदीमध्ये मिक्स करून बोलाल तर जास्त समजेल.

<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:–</u> मॅडम आपण स्टेजवर बसून जे जे आदेश दिलेले आहेत, त्यांचे आज पर्यंत पालन झाले नाही, त्याची अंमलबजावणी झाली नाही. आज एवढी मोठी मिटींग शहराच्या विकासाठी आम्ही  डी.पी. प्लॅनच्या विरोधात, त्या बाबतीत जे जे बोलत आहेत, ते आपण शासनाकडून पास करून आणाल का? लास्ट सभेमध्ये आपण स्टेजवर बसून एक आदेश पारीत केला होता. प्रभाग समितीच्या अधिका–याला आपण त्वरीत हटवावे, तो आदेश विधान परिषदेकडून पारीत झाला. आपल्या आदेशाचे पालन होत नाही. एवढी महासभा चालल्या नंतर, महासभेचा वेळ जातो, महासभेचा एवढे नुकासान झाले

आहे की, एवढे आपण सगळे परत करीत आहेत, ते शासना पर्यंत पोहचेल का? आणि त्याच्यावर निर्णय होईल का? हे विचारायचे आहे.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:–</u> कुठला निर्णय झाला हे आम्हांला सांगा की, कुठला निर्णय झाला आहे.

<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:–</u> महापौर मॅडम, जो शहराच्या हिताचा निर्णय आहे, तो आम्ही करण्याचा प्रयत्न करू. असे अश्वासन आपण सदस्यांना देवू शकतो.

<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:–</u> आपण महापौर नाहीत. आपण स्विकृत सदस्य आहेत. महापौरांनी बोलायला पाहीजे, आपण बोलू नका? आपण बोलू शकत नाही.

<u>सदस्य, श्री. प्रमोद टाले:–</u> प्रदिपजी शांततेचा मार्ग घ्या.

<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:–</u> मा. महापौरांचा रिपोर्ट आपल्या जवळ आहे का? महापौर मॅडम डी.पी. प्लॉन बदल आज शहरामध्ये एवढा हंगामा चालू आहे, कोणाचे घर तुटणार आहे, कोणाचे दुकान तुटणार आहे, शहरामध्ये याच गोष्टी बदल चर्चा चालू आहे. लोक कामावरून येतात, चांगल्या प्रकारे जेवण करीत नाहीत, सगळयांच्या लक्षात हेच येते की, माझा घर तुटणार आहे का? सगळे नगरसेवक विचारत आहेत. आता महासभेमध्ये जो निर्णय होईल. तो आपण मंजूर करून आणणार का? एवढेच विचारायचे आहे.

<u>महापौर तथा पिठासिन अधिकारी:–</u> शहराच्या हितासाठी जे पण बनेल त्यासाठी मी महाराष्ट्र शासनाकडे जाऊ आणि कोणाचेही नुकसान होणार नाही, त्यासाठी आम्ही जरूर प्रयत्न करू.

<u>सदस्य, श्री. अरूण आशान:–</u> सन्माननिय महापौर मॅडम, उप महापौर साहेब, आयुक्त साहेब, सचिव मॅडम, महापौर मॅडम लक्ष दया, आज शहरामध्ये एवढी आग लागली आहे की, जो डी.पी. प्लॉन लागू केला आहे, आज या डी.पी. प्लॉनवर सन्माननिय सभापती खाली बसल्या आहेत. सभागृहातील सर्व सदस्य, या मधील किती डी.पी. प्लॉन माहीत आहे, मला सुध्दा माहीत नाही. परंतु जी माहीती माझ्या जवळ आहे, आयुक्त महोदय, मला आपल्याला सांगायचे आहे की, दिनांक ७/१२/२०१७ रोजी आपण डी.पी. प्लॉन समजवण्यासाठी एक मिटींग बोलावली होती. आपल्याना मध्येच बोलण्याचा अधिकार नाही, मला बोलू दया. आमच्या सदस्या खाली बसल्या आहेत, आपण पण खाली बसा, आम्हांला बोलण्याची संधी दया. मा. महापौरजी आपण त्यांना बसण्यासाठी सांगा. आपण आदेश दया.

काही सदस्य, एकत्रित बोलत असल्यामुळे कोण काय बोलत होते, ते समजून आले नाही.

<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:–</u> सन्माननिय, प्रदिप रामचंदानी आपल्या शहराचा रिंगरूट कुठून जात आहे, ते सांगा.

<u>महापौर तथा पिठासिन अधिकारी:–</u> कृपया करून नियमांचे पालन करा.

<u>सदस्य, श्री. अरूण आशान:–</u> मा. महापौर मॅडम, मला परत बोलायचे आहे,

**<u>महापौर तथा पिठासिन अधिकारी:—</u>** प्रदिपजी आपण खाली बसून घ्या, कृपया करून एक एक करून बोलाल तर सगळयांना समजेल.

**<u>सदस्य, श्री. अरूण आशान:—</u>** आयुक्त साहेब, आपण पण लक्ष दया, आता संपुर्ण सभागृहाला समजेल असे स्पष्ट हिंदीमध्ये बोलतो. दिनाक ७/१२/२०१७ ला मा. आयुक्त साहेबांनी याच सभागृहामध्ये जो शासन निर्णय घेऊन डी.पी. प्लॉन आणला होता. तो समजवण्यासाठी सर्व लोकांना, सर्व नगरसेवकाना मिटींग घेतली होती, परंतु त्या सभेमध्ये खुप नगरसेवक अनुपस्थित हाते. तर किती लोकांना हा डी.पी. प्लॉन समजला आहे किंवा नाही? मला माहीत नाही. मला माहीत नाही, परंतु माझ्या जवळ जी माहीती आहे, त्या माहीतीच्या आधारे मी सभागृहाला सांगणार आहे. तर माझे प्रिय सदस्य, श्री. रामचंदानी साहेब, आपण कृपया ऐकुन घ्या. हा संपुर्ण शहराचा प्रश्न आहे. इथे आपण मजा करीत आहेत आणि खाली लोक मोर्चा घेऊन आले आहेत, त्यामुळे आयुक्त साहेब आणि महापौर मॅडम उशिरा आले आहेत. कारण की, संपुर्ण शहर घाबरले आहे. माझ्या जवळ काही मुद्दे आहेत, जर आयुक्त साहेब आणि महापौर मॅडम क्लियर करतील तर आम्हांला पण माहीती होईल की, या शहराचा विकास कोणत्या डी.पी. प्लॉननुसार आणि कोणत्या आधारे होणार आहे. मा. महापौरजी हा जो डी.पी. प्लॉन आलेला आहे. तो ४३ वर्षाच्या नंतर मा. महापौरजी आपल्याला हिंदी समजत नसेल तर मी मराठीमध्ये बोलतो. जर आपण लक्ष देणार नाही, तर मला सभागृहाला सांगायचे आहे की, आपले लक्ष आणि उप महापौर, आयुक्त साहेब, यांचे लक्ष या विषयावर असायला पाहीजे. कारण की हा शहराचा सर्वात ज्वलंत विषय आहे. जे येणा—या ३० वर्षामध्ये आपण काय डेव्हलपमेंट करणार आहेत. जो प्लॉन या सभागृहामध्ये ...

**<u>महापौर तथा पिठासिन अधिकारी:—</u>** कृपया करून मी आपल्याला एक विनंती आहे की, आपण शांतता ठेवाल तर चर्चा करण्यासाठी सगळयानां समजेल. आपण नियमांचे पालन करा, एक एक करून बोलाला तर सगळयांना समजेल.

**<u>सदस्य, श्री. अरूण आशान:—</u>** मा. महापौरजी मॅडम, मी जे बोललो आहे, त्याची आपल्याकडे रेकार्ड झाले आहे. माझे मित्र परत एकदा ऐकावे, ही सभा झाल्या नंतर आणि त्यांना माहीती झाले पाहीजे की, मी काय बोललो आहे. तर हा जो डी.पी. प्लॉन आहे, आयुक्त साहेब, महापौर मॅडम, तो ४३ वर्षा नंतर या उल्हासनगर शहरामध्ये आला आहे. ४३ वर्षा नंतर जेव्हा हा डी.पी. प्लॉन आला, तेव्हा आयुक्त साहेबांनी हा डी.पी. प्लॉन समजवण्यासाठी १२० च्या स्पिडने हा डी. पी. प्लॉन समजावला आहे. कारण की जेव्हा मी ऐकला तेव्हा १२० चा स्पिड होता. जो पहीला प्लॉन उल्हासनगरमरध्ये लागू झाला होता, तो प्लॉन दिनांक १/७/१९७४ ला लागू झाला. त्याच्या नंतर सन २०१७ मध्ये हा प्लॉन आला आहे. सन २०१० ते सन २०१३ पर्यंत या प्लॉनचा सर्वे चालू होता आणि सन २०१३ नंतर ऑब्जेक्शन, सजेशनच्या नंतर हा प्लॉन गव्हर्नमेंटला पाठवला गेला. तेव्हा १९७४ साली तेव्हा उल्हासनगरची लोकसंख्या २ लाखाच्या आसपास होती आणि सन २०१० मध्ये ५ ते ७ लाखा पर्यंत होती. महापौर महोदया, आपले शहर वाढले पण शहराची सिमा कधीच वाढली नाही आणि या शहराचा इतिहास आहे की, १३ चौ. किलो मिटरमध्ये आज पण लोक एक दुस—याला मिळून मिसळून राहतात. जेव्हा हा प्लॉन सादर केला गेला, त्यामध्ये काही

कमी होते. या प्लॉनची प्रक्रिया एम.आर. टी.पी. अॅक्ट प्रमाणे कलम २३ पासून कलम ३१ पर्यंत संपली. त्या २३ मध्ये आपण पहीले इंन्टेशन दाखल केले, २४ मध्ये आपण नगररचनाकार अॅपॉईमेंट केले, २५ मध्ये जो लॅन्ड आहे, त्याच्यावर काय स्ट्रक्चर आहे? तो नकाशा तयार करण्यात आला, त्या नंतर २६ मध्ये ऑब्जेक्शन, सजेशन घेतले, एम. आर.

टी.पी. अॅक्ट २८ प्रमाणे आपण जे चार सदस्य, अॅपॉईमेंट केले होते, त्यामध्ये जी.एस. भिडे, जे एम.एम. आर.डी.ए.चे नियोजन समितीचे एक सदस्य होते, प्रदुषण मंडळातर्फे कुलकर्णी साहेब होते आणि माझ्या माहीतीनुसार नगररचना विभागाकडून पाटणकर साहेब होते आणि तीन सदस्य यांना पण नियुक्त केले होते, ही ऐकण्याची गोष्ट आहे. एवढे लोक असतांना सुध्दा या शहराच्या विकासाठी ऑब्जेक्शन,सजेशन मागविण्यात आले. महापौर मॅडम मला खुप दु:खाने सांगावेसे वाटते की, एक पण ऑब्जेक्शन, सजेशनचा शासनाने कोणताही निर्णय घेतला नाही. तो जसा आहे, त्यांना जसा पाहीजे होता, तसा करून त्यांनी पाठविला आहे. महापौर मॅडम या शहराचा खरोखर जर विकास व्हायला पाहीजे तर या शहराचे जे रहिवाशी आहेत, या शहरामध्ये राहणारी जी गरीब जनता आहे, झोपडपट्टीमध्ये राहणारी जनता आहे, जे निर्वासित होऊन आलेली जनता आहे, बिल्डींगमध्ये राहणारी जनता आहे, त्यांची काळजी घेणे हे आपले अनिवार्य कार्य आहे. आज शहराचा जो रिंगरूट बनणार आहे, त्या रिंगरूटला जर आज आपण बघितले तर तिथे झोपडपट्टी आहे आणि तिथे ९० टक्के मराठी लोक राहतात. आता या मुद्दयावर जर कोणी बोलेल तर कोण कुठे आणि किती टक्के राहतात, ते पण मी सांगेल. तर आज या रिंगरूटच्या बाजूला जे निर्वासित लोक काल येऊन इथे बसले आहेत, त्यांच्या बरोबर मराठी जनता होती, आज मराठी लोक, मराठी जनता आज निर्वासित होत आहे. हा कुठला न्याय आहे, हा कुठला डी.पी. प्लॅान आहे. सन १९७४ साली जेव्हा तिकडे पाकिस्तानमध्ये युध्द झाले तेव्हा सिंधी लोकांना या महाराष्ट्रामध्ये, या उल्हासनगरमध्ये निर्वासित म्हणून स्थान दिले आणि आज हा डि.पी. प्लॉन येऊ या महाराष्ट्रातल्या लोकांना उल्हासनगरमधून निर्वासित करीत आहे, त्यांना बाहेर पाठवत आहेत, हा कुठला न्याय आहे. हा कुठला डि.पी. प्लॉन विकासाचा तुम्ही आणला आहे. या डी.पी. प्लॉनमध्ये ज्या गोष्टी तुम्ही बघायला पाहीजे होत्या त्या गोष्टी बघितल्या नाहीत, असा माझा सरळ सरळ आरोप आहे. तज्ञ कमिटीने नेमलेल्या काही शिफारसी किंवा हरकती घेतलेल्या काही नोंदी शासनाने त्याचा एकही विचार न करता इकडून तिकडून फिरवून आणला आहे आणि या प्लॉनला मंजूरी दिली आहे. जर का डी.पी. प्लॅान तुम्हांला मंजूर करायचाच होता, तर इपी ठेवले तरी का? कारण त्या इपीमध्ये अजून तुम्हांला काही फेर बदल करून काही लोकांची कामे झाली नाहीत, काही लोकांची कामे करायची होती, म्हणून तो इपी तुम्ही ठेवला आणि हा अंशत: मंजूर केलेला प्लॅान आणि डी.पी. चा प्लॅान असे दोन्ही प्लॅान उल्हासनगरमध्ये सादर केले. मा. महापौर मॅडम, या शहरामध्ये ज्या दिवसापासून प्लॅान आला आहे, त्या दिवसापासून एक पण नगरसेवकांना फोन आला नाही असे झालेच नाही की आमचे काय होणार आहे? ते सत्तापक्षाचे असतील किंवा विरोधी पक्षाचे असतील. सगळया लोकांच्या फोनवर फक्त एकच चर्चा होत असते की, माझे घर जाईल, माझे दुकान जाईल, आमचे काही होईल? शाळेचे काय होईल? शाळेमध्ये मुले शिकतील किंवा नाही अशी सगळी चिंता लोकांना लागली आहे. कोणतेही नगरसेवक शांतपणे झोपत नसतील, मॅडम आपण सुध्दा शांतपणे झोपत नसाल. आज दहशतीचे वातावरण उल्हासनगरमध्ये आहे. आयुक्त साहेबांनी सांगितले की, जेव्हा हा डी.पी. प्लॅान लागू

होईल, तेव्हा क्लस्ट्रर योजना येईल. जेव्हा हा डी.पी. प्लॅान येईल तेव्हा १० मिटर पर्यंत आपण क्लस्ट्र योजना लागू करू. परंतु नगररचना विभागाचे लोक पण इथे आहेत, आयुक्त साहेब, स्वत: इथे हजर आहेत. तर आयुक्त साहेब, मला सांगा की, आपल्या जवळ जो प्लॅान आला आहे, त्यामध्ये डि.सी. रूल आला आहे का? जर डि.सी. रूल नाही आहे, तर प्लॅान लागू कसे झाला. नियमावली नाही, आई–बाप नाही, परंतु मुल आले आहे, कसे माहीती पडेल की, आपण डी.सी. रूलचे प्रावधान केले नाही. क्लस्ट्रर योजना लागू करू आणि ४ एफ.एस. आय देवू, ४ एफ.एस. आय देण्यासाठी नियमावली कुठे आहे.

या वेळी सदस्य, श्री. किशोर वनवारी हे सभागृहातून बाहेर गेले.

<u>सदस्य, श्री. प्रमोद टाले:–</u> अरूण प्लॅानवर आयुक्तांची सही नाही.

<u>सदस्य, श्री. अरूण आशान:–</u> बघा, प्लॅानवर आयुक्तांची सही नाही, सत्ताधारी पक्ष....

<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:–</u> माझा म्हणण्याचा अर्थ असा आहे की.....

<u>सदस्य, श्री. अरूण आशान:–</u> श्री. प्रदिप रामचंदानी मी मध्येच बोललो नाही, आपण कसे मध्येच बोलले.

<u>सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:–</u> शहराच्या हितासाठी बोला.

<u>सदस्य, श्री. अरूण आशान:–</u> आणि डी.पी. याची नियमावली आपल्या जवळ आले नाही, साहेब, मला तुम्हांला विचारायचे या शहरामध्ये डेव्हलपमेंट प्लॅान लागू झाला त्याचे डि.सी. रूल अजून आले नाही. तुम्ही मला सगळया प्रश्नांची उत्तरे दया. डी.सी. रूल अजून लागू झाला नाही. या डी.सी. रूलमध्ये अशंत: मंजूर केलेल्या डि.सी. रूलमध्ये मला वाटते सेक्टर १, २, ३ प्रमाणे आपण ४ सेक्टर कलेले आहेत. त्या सेक्टरमध्ये आपण दिनांक ७/१२/२०१७ मध्ये आपण समजवल्या प्रमाणे १३०० हेक्टर जमीनीवर आपण रेसीडेन्शीयल, कमर्शिअल, इंडस्ट्रीयल, युटीलिटी, गार्डन आणि अजून ज्या काही योजना आहेत, त्या प्रमाणे आपण प्रत्येकी टक्केवारी आम्हांला दिलेले आहेत. रेसीडेन्सी एरिया ४० टक्के, कमर्शियल एरिया ७० टक्के, इंडस्ट्रियल एरिया ६ टक्के, युटीलिटी २ टक्के, गार्डन ०.९१ टक्के हा जो सगळा मिळून एरिया आहे, तो आपण १३०० हेक्टमध्ये वायफर कसे केले आहे मॅडम. परंतु या शहरामध्ये आज पर्यंत १ एफ.एस. आय. कसा लागू आहे आणि आयुक्त साहेबांनी आम्हांला सांगितले होते की, अडीच एफ.एस.आय. अजून येईल आणि ४ एफ.एस.आय. होईल. त्याची कोणतीच नियमावली नाही, आपल्या जवळ असेल तर आपण सादर करा. या सभागृहाला दाखवा की, ही नियमावली आहे. मला सांगायचे आहे की, जर कोणतीच नियमावली नाही, कोणतेच नियोजन नाही, आमच्या सभापती खाली बसल्या आहेत. कारण त्याच्या इथे रोडचे मार्किग देण्याचे काम चालू झाले आहे. डी.पी. प्लॅान कधी लागू झाला? तो डि.सी. रूल कोणता वापरणार आहेत. जे लोक इफेक्टेड आहेत, त्यांचा काय होईल. आज पर्यंत कोणतीच गोष्ट आपण सांगितलेली नाही, आपण सांगितले होते की, डी.पी. प्लॅान लागू होईल आणि त्या प्रमाणे प्रभागवारी मिटींग घेऊ आणि प्रभाग समितीनुसार आपल्याला समजावून सांगितले जाईल. त्याच्या नंतर शासनातर्फे हा डी. पी. प्लॅान जाईल, त्याच्या नंतर डा.सी. रूल येईल, त्याच्या नंतर आपण निर्णय

घेऊ. आयुक्त साहेब, ज्या वेळेस हा डी.पी. प्लॉन तयार होत हाता, त्या वेळेस मला तर वाटते की, एक पिक्चर आला होता, तुम्ही नेहमी पिक्चरमधले गाणे सांगतात, आज मी तुम्हांला एक गाणे सांगणार आहे. "दुश्मान, पिक्चर आला होता, देखो देखो देखो, दिल्लीचा कुतुबमिनार देखो, मुंबई शहर की बहार देखो, आग्रे का ताज महल घर बैठे सारा संसार देखो" हा प्लॉन सगळा ऑफिसमध्ये बसून झालेला आहे. घरी बसून काम झालेले आहे आणि त्याच्या नंतर म्हणतात की, "पैसा फेको तमाशा देखो" हे मोठमोठया लोकांसाठी केलेले काम आहे. हे पैसे फेकून तमाशा दाखवणार आणि आमच्या शहराला वेठीस आणणार म्हणून हा प्लॉन केलेला आहे. आयुक्त साहेब, १३०० हेक्टरमधल्या जमिनीचा किती अभ्यास आहे, मला माहीत नाही. परंतु या १३०० हेक्टर किलो मिटरमध्ये कंजेष्टर या शहरामध्ये संपुण लोक गुन्यागोविंदाने, दाटीवाटीने रहात आहेत. ज्या सुविधा मिळतात त्या घेत आहेत. आपण लादलेला टॅक्स भरायचा प्रयत्न करतात, पाणी मिळाले टॅंकर बंद केले तरी गुपचुप राहतात. पण आज त्या बिचा–यांचा देवारा तसाच जायची वेळ आली आहे. तर आयुक्त साहेब, अशा हया प्लॉनला आम्ही मान्य कसे करायचे? मा. महापौर मॅडम, मी आपली प्रशंशा केली होती पहील्या महासभेमध्ये, असे झाले नाही पाहीजे की लोक बोलतील आपण महापौर असतांना आमचे घर उध्दवस्त झाले. खुप महत्वाची गोष्ट आहे. आयुक्त साहेबांनी शासनाकडून आलेले काम केले आहे, आयुक्त साहेब, आपला काम करतील आणि उद्या निघून जातील. आपण सगळे इथे राहणारे आहेत. आपण लोकांना काय उत्तर देणार, आज संपुण जनता, व्यापा–यांपासून ते रोडवर सामान विकणारे लोक सर्वच त्रस्त आहेत. त्यांचे कोण ऐकणार? आपण अर्धा प्लॉन मंजूर तर करून दिला आहे. जर त्यामध्ये काही करायचे आहे, तर त्यामध्ये अंडर सेक्शन ३७ एम.आर.टी.पी. ॲक्टनुसार करा असे आपण सांगितले आहे आणि आज जी चर्चा बोलावली आहे, ती याच विषयावर आहे. परंतु जे लोक बाधित झालेले आहेत, ते लोक कुठे जाणार. त्यांना कुतूबमिनार दाखवून दिले, दिल्ली, मुंबई सगळे दाखवून दिले आहे, परंतु आता पैसे कुठून आणार आणि काम कुठून करणार. आज हे सिंगापूर, स्वप्न दाखवले, खोटे–खोटे बोलले गेले आणि खोटे बोलण्याची लांबी २५ मिटर करून टाकली. बिचारे ९ फुट, १० फुटावर राहणारे लोक, त्यांना २५ मिटर पर्यंत आपण पोहचवून दिले, ते कधी होणार. ३० वर्षामध्ये ३ रोड बनवू शकले नाहीत, आता पण आपला केबी रोड अपुर्ण राहीला आहे. तिथे पण लोकांनी जे बांधले आहे, ते तोडावे लागले आहे, आज हे व्यापारी लोक रस्त्यावर आलेले आहेत, हे संपुर्ण शहर आपण रस्त्यावर आणणार आहेत का? आपल्याला काय करायचे आहे. कोण गॅरंटी देईल की, रोडच्या कटींगमध्ये जी घरे गेली आहेत, ते कॅन्सल करू? ज्या लोकांची घरे आहेत, तिथे गार्डन बनणार आहे, याची गॅरंटी कोण देणार आहे? शाळेच्या बाजुला स्मशान भुमीचे प्लॉन आहे, त्याची गॅरंटी कोण देणार? की, या शाळेच्या बाजुला स्मशानभूमी होणार नाही. मला स्वत:ला हजारो लोकांनी प्रश्न केले आहेत, आज मी आपल्याला प्रश्न करतो? आपण स्टेजवर बसून ऐकत आहात, डी.पी. येईल, त्याचे ऑब्जेक्शन येतील नंतर त्याची पुडी बांधून बाजूला फेकून देणार, त्याला पुढे कोण घेऊन जाणार आहे. लोकांना कोण साहय करणार आहे, असे डि.पी.प्लॉन आणि असे कारस्थान हे पण कोणत्याच महानगरपालिकेमध्ये बघितले नाही, हे चांगल्या दिवसाचे स्वप्ने आहेत. चांगल्या दिवसाच्या स्वप्नामुळे बिचारे लोक रात्री सुध्दा झोपत नाहीत, त्यांची झोप उडाली आहे. आज या स्थितीमध्ये आयुक्त साहेब, आपण डी. पी. बघितला आहे, तज्ञ लोकांनी बघितला आहे. आपण मानतात की, एस.एम. जो आहे, तो सॅगशन मॉडीफिकेशन फायनल आहे आणि जो एक्सल्कुडेड पोर्शन आहे, ईपी त्यामध्ये आपल्या ऑब्जेक्शन,

सजेशन घ्यायचे आहेत. आयुक्त साहेब, आपण संपुर्ण एस.एम. वाचला नाही, किंवा आपण संपुण ई.पी. वाचला नाही असे मला वाटते. कारण की, एकाच जागेवर, मी नगररचना विभागाच्या एका व्यक्तिला बोलवण्याची परवानगी मागतो की, त्यांनी माझ्या प्रश्नाचे उत्तर देण्यात यावे. जग्यासी साहेब, ३१ एप्रिल २०१७ ला एस.एम.च्या बाबतीत आपण नोटीफिकेशन आम्हांला सर्वांना देण्यात आले. त्यामध्ये सी नंबरच कॉलम वाचतो दि प्राव्हेट ऑर रेंन्टल प्रिमायसेस डी. साईन इन पब्लिक सेमी पब्लिक स्कुल शल कंन्टीन्यु टू बी इन फ्रेक्चर झोन एज अ लॉग पब्लिक सेमी पब्लिक युझर एक्सझिट आदर वाईस दि कमिशनर उल्हासनगर म्युनिसिपल कॉप्रोरेशन शॅल  अलाउ डेव्हलपमेंट प्रिमायसेस ऑन सक्सेस लॅन्ड कन्सर्डीग ॲट जॉनिंग मेजर लॅन्ड यु झोन अफटर टू व्हेरीफिकेशन ॲन्ड विथ दि प्रायर एप्रुवल ऑफ दि डायरेक्टर ऑफ टाऊन प्लॅनिंग महाराष्ट्र ऑफ पुणे त्याचा अर्थ असा आहे साहेब, जर एखादी प्राव्हेट ट्रस्टची शाळा आहे आणि उद्या त्यांना शाळा बंद करायची आहे आणि तर त्याच्या अपटॅग जो पण झेनिंग आहे, त्या झोनिंगचा वापर करून ते तिथे शाळा बनवतील तर त्या शाळेचे महत्व राहणार नाही. बरोबर आहे.

**<u>कनिष्ठ अभियंता, श्री. कुमार जग्यासी:—</u>** बरोबर आहे सर.

या वेळी सदस्य, श्री. किशोर वनवारी यांनी पुन्हा सभागृहामध्ये प्रवेश केला.

**<u>सदस्य, श्री. अरूण आशान:—</u>** तर आयुक्त साहेब, ज्या ठिकाणी शाळा असून त्या ठिकाणी आपण शाळेचे आरक्षण टाकले नाही किंवा ती बाब गंभीर घेतली नाही. जर का अशा ट्रस्टच्या शाळा बंद झाल्या तर त्या शाळेमधल्या मुलांनी जायचे कुठे? आणि हा अधिकार आयुक्त साहेब, आपल्याला दिला आहे. माझे तर म्हणणे आहे की, हा अधिकार महासभेला असला पाहीजे आणि हया शाळा ज्या अस्तित्वात आहेत. त्या शाळेमध्ये आयुक्त साहेब, मुलांच्या भविष्याचा, देश घडविण्याचा हा जो प्रश्न आहे. पुढच्या पिढी मधला कुठलाही मुलगा या उल्हासनगर महानगरपालिकेत आयुक्त साहेब, तुमच्या खुर्चीवर येऊन बसू शकतो. पण ती शाळाच बंद झाली तर तो मुलगा कुठून आयुक्त बनेल. तर अशा शाळा तुम्ही रिर्झव्ह का ठेवल्या नाहीत. त्या शाळेंवर तुम्ही फक्त पब्लिक युटीलिटी किंवा आरक्षित झोन जे तुम्ही लॅन्ड अपीडेटेड जो तुम्ही नकाशा बनवला होता, त्याच्यामध्ये तुम्हांला शाळा कशी दिसली नाही, हा माझा तुम्हांला प्रश्न आहे. तुम्ही सर्व्हे केला सन २०१० ते सन २०१३ चे मग शाळेच्या जागेवर शाळेचे आरक्षण का नाही.

**<u>कनिष्ठ अभियंता, श्री. कुमार जग्यासी:—</u>** साहेब, तिथे आरक्षण का टाकण्यात आले नाही, हे जे पब्लिक सेमी युटीलिटी दाखवले आहे, त्याच्यावर नंबर देण्यात आलेले नाही. नंबर न देण्याचे कारण आहे की, तिथे अस्तित्वात असलेले ते युझर एक्झीस्टींगमध्ये आहे, याचा अर्थ असा आहे.

**<u>सदस्य, श्री. अरूण आशान:—</u>** बरोबर आहे, म्हणजे एक्झीस्टींगमध्ये ती लोक कधी पण जाऊ शकतात.

**<u>कनिष्ठ अभियंता, श्री. कुमार जग्यासी:—</u>** आता हे शासनाने टाकले आहे.

**<u>सदस्य, श्री. अरूण आशान:—</u>** साहेब, मला काय म्हणायचे आहे? की, आपण त्याच्यावरती जर स्कुल आरक्षण जर टाकले असते, पर्टीकुलरी शाळेच्याकरीता आरक्षित तर शासनाने विचार केला असता.

या वेळी सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी, हे स्टेज जवळ जमीनीवर खाली बसले.

<u>कनिष्ठ अभियंता, श्री. कुमार जग्यासीः—</u>परंतु साहेब मंजूर आराखडा किंवा प्रारूप आराखडयामध्ये जे एक्झीस्टींग अस्तित्वात स्ट्रक्चरल असतात ते दर्शविण्याची प्रोसेसर अशा पध्दतीने आहे. साहेब, हे ग्रीन आहे, दोन मिनिटे ऐका साहेब, सपना गार्डन आहे, त्याच्यामध्ये तुम्ही बघणार तर एका ग्रीन लाईनने ४५ ॲगलवर त्यांनी हॅचिंग करून दाखवलेले आहे. सेंच्युरी ग्राउंड तुम्ही बघणार तर सेंच्युरी ग्राउंडवर पण त्यांनी ग्रीन कलरने ४५ ॲगलवर त्यांनी हॅचिंग करून दाखवले आहे. आता दोन मिनीटे ऐैका साहेब, सिंध नॅशनल हिंदी स्कुल आहे, तिथे हॅचिंग करून दाखविले आहे, पब्लिक आणि सेमी पब्लिक युटीलिटी.

<u>सदस्य, श्री. अरूण आशानः—</u> पण मी जे म्हणजतो, उद्या जर ट्रस्टवाल्यांनी सांगितले की, मला नुकसान होते, मला शाळा चालवायची नाही. तर त्याला तुम्ही कुठला झोन वापराल.

<u>कनिष्ठ अभियंता, श्री. कुमार जग्यासीः—</u> साहेब, हे शासनाने ठरवून दिलेले आहे.

<u>सदस्य, श्री. अरूण आशानः—</u> शासनाचीच गोष्ट सांगत आहे, तुम्हांला फक्त उत्तर दयायचे आहे, सभागृहाराला. ही शासनाचीच गोष्ट समजून सांगायची आहे, म्हणून तुम्हांला उभे केले आहे. काही ज्या सुचना आयुक्त साहेब, महापौर मॅडम, काही गोष्टी अशा आहेत की, त्या शासनाने जबरदस्त बरोबर बघितल्या आहेत, काही गोष्टी अशा आहेत की, त्या शासनाने बघितल्या सुध्दा नाहीत. एस.एम. नंबर १ जाऊ दया, नंबर २ ते पण जाऊ दया, महापौर मॅडम, आयुक्त साहेब, एस.एम. बघा तुम्ही, एस.एम. नंबर ४ साईट नंबर ४ रिक्रेयशन ओपन टाका नंबर ९७ डिलेटेड इन इंक्ल्युडेड आय झोन ही बाब फक्त शासनाने बरोबर बघितली कि, तिथे रिक्रेयशन ग्राउंड ओपन आहे तो मंजुर करू नका, कारण ती जागा सेंच्युरी कंपनीची आहे आणि ती आय झोन केलेली आहे, शासनाचे किती लक्ष आहे. गरीब जनतेच्या झोपडपट्टीवरून रोड जातो, तिथे शासनाचे लक्ष नाही. पण ही जागा बरोबर, जी आम्ही पाठवली ती गेली, किती काटेकोरपणे लक्ष आहे. नंबर पाच सोडून दया, नंबर ६ एस.एम. ६, एम.ए. साईट नंबर ५, रिक्रेयशन ओपन टीका नंबर, सीट नंबर, ९९ आणि ५, १०० आणि ५ डिलिटेड ॲन्ड इंक्ल्युडेड आय झोन शासन परत जागे झाले की, रिक्रेयशन झोन कॅन्सल करायला पाहीजे कारण ती जागा सेंच्युरी कंपनीची आहे, तिथे पण त्यांनी आर. झोन केला आहे. जर ही बाब शासनाने लक्षात ठेवली असती तर शासनाच्या हे लक्षात आले नाही की, जेव्हा १२० फुटाचे रिंगरूट जाईल, तर तिथे जे बाधित लोक आहेत, जो आपल्या जवळ प्लॅान आहे, त्या प्लॅानचा नकाशा आलेला आहे. त्यामध्ये स्पष्ट दिसते की, ती संपुर्ण झोपडपट्टी आहे. ते लोक बिचारे कुठे जाणार, जर आपण कंपनीचा फायदा करायचा असेल तर लोकांचे नुकसान कोण सहन करणार? यांना न्याय कोण देणार? आज जर आपल्याला थोडी फार जमीन जर मिळाली असती तर, जो पर्सेंट ऑफ दि लॅन्ड आहे, रिक्रेयशन ग्राउंडचा त्याच्यामध्ये आपले पर्सेंटेस आले असते. आज ते पर्सेंटेस डिलीट झालेले आहेत आणि ते पर्सेंटेस दुसरीकडे लागू केले आहेत, तर हे काय आहे? साहेब मला हेच सांगायचे आहे, शासनाने काही गोष्टी चांगल्या बरोबर बघितल्या आहेत. हेच मी म्हणतो, पण आता लक्षात येत नाही की, शासनाने काही गोष्टी आमच्या बरोबर ऐैकल्या, पण काही गोष्टी आमच्या बिलकुल ऐकल्या नाहीत. त्यातल्या दोन—तीन तुम्हांला सांगायच्या होत्या, की शासन औद्योगिक

कारणासाठी, बिल्डरांसाठी, ओपन स्पेससाठी, ज्या खुल्या जागा आहेत, त्याच्यासाठी एवढे तात्पर्याने आणि एवढे दुर्बिन लावून बघितले आहे की, त्या लोकांना बिलकुल त्रास होऊन दिला नाही. पण ज्या बॅरेक आहेत, ज्या बिल्डींग आहेत त्यांच्यावरून सरसकट १२० फुटाचे रोड, २५ फुटाचे रोड, ४० फुटाचे रोड या सगळया वरतून नेलेले आहेत. आयुक्त साहेब, काही गोष्टी अशा आहेत की, ज्या तुम्हांला आता माहीती पडतील, त्याच्यामध्ये चुक शासनाची की तुमची का नगररचना विभागाची? हे आता तुम्हीच मला सांगा. एस.एम. मध्ये नंबर आहे, ९० अे ४३, शॉप नंबर ६१ रिक्रेयशन ओपन, टीका सीट नंबर ६३५, साईट नंबर ६१ एम ४३ डिलेटेड ॲन्ड इन्क्ल्युडेड इन मल्टी स्टोरेज पार्किंग टू बि मोडिफाय ॲन्ड इंन्क्ल्युडेड इन आर झोन फॉर रिक्रेयशन अमेटीस स्पेस इन यु.आर.एस. त्याचा शासनाकडे ३१ खाली साईट नंबर ६१ रिक्रेयशन ओपन इज प्रपोझ टू बि डिलीटेड ॲज सो ॲज दि प्लॉन साहेब याच्यावरच शासन थांबले नाही. एस.एम. मध्ये झालेला हा जो भाग आहे, हा शासनाने केल्या नंतर याला ईपीमध्ये ठेवण्यात आला, का? तर त्याला ती पार्किंगची जागा परत सरळ करता यावी. जर का एस.एम.मध्ये फायनल आहे तर ती जागा डी.पी.मध्ये कशी? ईपी नंबर २३, सेम तसेच बघा साहेब, साईट नंबर ६१ रिक्रेयशन ओपन टीका शॉप नंबर ६३५, साईट नंबर ६१ एम, ४३ डिलेटेड ॲन्ड इंन्क्ल्युडेड इन मल्टी स्टोरेज पार्किंग टू बि मोडिफाय ॲन्ड इंन्क्ल्युडेड इन आर झोन फॉर रिलोकेशन ऍन अमेटीस स्पेस इन यु.आर.एस. आणि त्याच्यामध्ये लिहीले आहे सेम, साईट नंबर ६१ रिक्रेयशन ओपन इज प्रपोझ टू बि डिलीटेड ॲज सो ॲज दि प्लॉन एस.एम. मध्ये फायनल झालेले आहे, ईपीमध्ये आलेले आहे. आयुक्त साहेब, मग नक्की काय आहे? एस. एम. फायनल की ईपिमध्ये दुरूस्ती, हे तुम्ही दिलेले पेपर आहेत. अजून एक चुक...

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकरः—</u> मा. महापौर मॅडम, मा. सन्माननिय सदस्य, ॲज सो इन प्लॉन जे एस. एम. मध्ये म्हणटले आहे, त्याचाच अथे ते ईपीमध्ये घेतले आहे. दोन्हीकडे आला आहे, असा त्याचा अर्थ होत नाही. आपण त्याच्यामध्ये ईपीमध्ये ते आले आहे, म्हणून ॲज सो इन प्लॉन म्हणजे, ॲज सो इन ईपी प्लॉन.

<u>सदस्य, श्री. अरूण आशानः—</u> साहेब, थोडे फार नकाशा समजतो म्हणूनच मगाशी माझ्यावर हे लोक ओरडले, थोडेच सांगतो अजून पुढे आहे. काही काही चुका जग्यासी साहेब, २०५ एस.एम. साईट नंबर १२१, युटीलिटी सर्व्हिस पार्किंग टर्मिनलस, टीका नंबर ३२५, साईट नंबर..जग्यासी साहेब, फक्त एवढेच सांगायचे आहे की, एस.एम. आणि ईपीमध्ये फक्त निवडक दोनच माझ्या जवळ आहेत की, ते आले आहेत. जर शासनाने संपुर्ण प्लॉन बघितला आहे, असे आयुक्त साहेब म्हणतात, तर बाकी लोकांचे असे का झाले नाही? जे आपण एवढे ऑब्जेक्शन पाठवले होते, जो प्लॉन शासनाकडे गेला होता ३१वन मोडिफायसाठी हीच गोष्ट त्यांच्या लक्षात कशी आली नाही आणि बाकिच्या गोष्टी त्यांच्या लक्षात का आल्या नाहीत? यामध्ये नगररचना विभागाचे लोक आणि आयुक्त साहेब, जे पण कोणी असतील त्यांनी ही गोष्ट लक्षात का आणून दिली नाही? आणि १२० फुटाच्या रिंगरूटवर एवढा मोठा हंगामा होईल, लोक कुठे

जातील, अजून सांगतो, हा शहराचा मुद्दा आहे, जर कोणाला असे वाटत असेल, तुम्हीच हे केलेले आहे, तुम्हीच पाठविला आहे.

<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:–</u> तुम्हीच हे केलेले आहे, तुम्हीच पाठविला आहे.

<u>सदस्य, श्री. अरूण आशान:–</u>आम्ही करून पाठविले होते. जग्यासी साहेब, पुढे बघा काय होते ते?

<u>सदस्य, श्री. रमेश चव्हाण:–</u> मा. महापौर, उप महापौर, आयुक्त साहेब, लाल चक्की ते शाहू महाराज....

<u>सदस्य, श्री. किशोर वनवारी:–</u> सतरामदास जेसवानी बसलेले आहेत, त्यांना पण उठवा.

<u>सदस्य, श्री. रमेश चव्हाण:–</u> आता मागेच त्या रस्त्याचे रूंदीकरण झालेले आहे आणि ८० फुट रस्ता केलेला आहे आणि आता तीन वर्षे अगोदर तिथेच प्लॉन पास करून ८० फुटाच्या वर प्लॉन पास केलेले आहेत, बिल्डींगस बनवल्या आहेत. तिथे आता एम.एम.आर.डी.ए. कडून ८० फुटाचा रस्ता पास झालेला आहे आणि आता कालच १०० फुटाची मार्किंग दिलेली आहे. त्या १०० फुटाच्या मार्किंगने लोक एवढे अस्वस्थ झाले आहेत की, मी नगरसेवक आहे, माझे सहकारी नगरसेवक समोर बसले आहेत. सगळे आमचे बिल्डींगचे लोक रात्री १.०० वाजे पर्यंत आम्हांला, परंतु असे करायचे नव्हते ना? तुम्ही मार्किंग देतात, लोक किती घाबरले आहेत? याचे उत्तर दया आम्हाला.

<u>सदस्य, श्री. किशोर वनवारी:–</u> दुर्गापाडयामध्ये सुध्दा असेच केलेले आहे, तिथे पहीले ४० फुटाची मार्किंग देवून गेले आहेत, आता ८० फुटाची मार्किंग देवून गेले आहेत.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:–</u> मा. आयुक्त साहेब, माझी बहीण श्रीम. ज्योत्सना जाधव ज्या खाली बसल्या आहेत आणि त्यांचा विषय पण गंभीर आहे. तिथे आपण रोड पास केला आहे, त्याची वर्क ऑर्डर मिळाली आहे आणि त्याची कटींग पण झालेली आहे आणि आज नविन डेव्हलपमेंट प्लॉन आला आहे आणि आपण त्वरीत ८० फुटावरून १०० फुट करू असे पण नाही. येणा–या भविष्यकाळामध्ये आपण कधी पण करू शकतो. तर त्यांचे असे म्हणणे आहे की, पहीलेच ८० फुटाची कटींग झाली आहे, ८० फुटाचा रोड पास झाला आणि त्याची वर्क ऑर्डर मिळाली आहे आणि आता आपण त्वरीत १०० फुटाचे करू तर ते पण ठिक नाही. या विषयाला आपण गंभीरतेने घ्या आणि त्यांचा खुलासा पण करा आणि मी

श्रीम. ज्योत्सना जाधव यांना निवेदन करतो आणि श्री. दादा सतरामदास यांना की, आपण आपल्या जागेवर बसून घ्या. आयुक्त साहेब, आपल्या विषयाला गंभीरतेने घेतील.

<u>**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—**</u> मा. महापौर महोदया, श्रीम. ज्योत्सना जाधव आणि श्री सतरामदास जेसवानी समोर बसलेल्या आहेत. कोणत्याही सदस्यांना समोर बसण्याची वेळ येता कामा नये. समोर बसतात तर त्यांच्या काही भावना आहेत. सिवसेना गटनेता श्री. रमेश चव्हाण यांनी सांगितल्या प्रमाणे एम.एम.आर.डी.ए. ने रस्ता मंजूर केला आहे, ब—याच दिवसापासून, ब—याच वर्षा पासून त्याचा पाठपुरावा करीत होतो आणि शेवटी परिस्थिती अशी झाली की, आता जो अस्तित्वात रस्ता आहे, जो एम.एम.आर.डी.ए. ने विकसित केलेला आहे, सन २००० मध्ये, एम.एम.आर.डी.ए. च्या माध्यमातून तो विकसित केला आहे. पुन्हा एम. एम.आर.डी.ए. ने नविन त्यासाठी निधी दिलेला आहे आणि लोकांना सगळयांना सांगितले की, आता नविन डी.पी. नुसार उद्घाटन होणार आहे. आता त्या ठिकाणी शंभर फुटाची मार्किंग दिली आहे. सन १९७४ चा डि.पी. अजूनही अंमलबजावणी झालेली नाही आणि जो आर.पी.गट शासनाने डी.पी. मंजूर केलेला आहे, लोकांच्या पॅनेलमधला तो आम्ही मंजूर करतो नाही करत ती वेगळी गोष्ट आहे. परंतु शासनाने अर्धवट केलेला आहे, सॅगशन मॉडिफिकेशन ईपी एक्सर्ली पोर्शन म्हणजे मला वाटते महाराष्ट्रात काय देशात पण पहीलाच असेल असेत मी त्या दिवशी सुध्दा सांगितले होते. आता तो अर्धवट मंजूर केलेला, मंजूर केलेला बोलायच किंवा नाही केलेला बोलायचे, माणूस जिवंत आहे कि मेलला आहे, हे सॅगशन देता येत नाही, मग मुंत्यु प्रमाणपत्र कसे दयायचे एक तर एम.एम.आर.डी.ए. कडून त्या डी.पी.साठी रोड मंजूर झालेला आहे आणि रोड सुध्दा मोठा जो बजेट तुमचा पाच कोटीचा असणार आहे. तो १०० फुटावर गेल्या नंतर बजेटमध्ये बदल होणार आहे. तर आपणास विनंती आहे की, या पुर्वी डी.पी. रोड असतांना सुध्दा महापालिकेची आर्थिक परिस्थिती लक्षात घेता, या महासभेने प्रस्ताव पारित केलेला आहे, त्यामुळे ते कमी केलेले आहे. तर सर्व सदस्यांचे एकच म्हणणे आहे की, जो एम.एम.आर.डी.ए. ने मंजूर केलेला रस्ता आहे आणि पुर्वीच्या डी.पी. नुसार समजा आपण डी.पी.चा रस्ता आहे उशिरा सुरू केलेला आहे, त्याची अंमलबजावणी उशिरा सुरू झालेली आहे. त्यात प्रशासनाचा सुध्दा कुठे दोष नाही. परंतु तो मंजूर झालेला आहे, त्यानुसार प्रशासनाने करावे अशी सर्व सदस्यांची विंनती आहे आणि तशी भावना आहे.

**या** वेळी सदस्य, श्री. रवि जग्यासी हे सभागृहातून बाहेर गेले.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—** मा. महापौर, मा. उप महापौर, मा. सर्व सन्माननिय सदस्य, आपल्या शहराचा डेव्हलपमेंट प्लॅान जवळपास ४३ वर्षानी शासनाने औचारीरित्या २१ एप्रिल, २०१७ रोजी शासनाच्या गॅझेटमध्ये प्रसिध्द केला आणि आपण या शहराच्या नागरीकांसाठी त्याच्या सर्व नकाशा सहित हा डेव्हलपमेंट प्लॅान २९ नोव्हेंबर रोजी आपण शहरवासियांसाठी खुला केला आहे आणि यासाठी ज्या काही एक्स्टेंशन मॉडिफिकेशन चेंजेस पोर्शन आहे, त्याच्यासाठी आपण ऑब्जेक्शन आणि सजेशन मागविण्यासाठी आपण, आधी १२ डिसेंबर पर्यंत मुदत होती. ती आपण लोकांच्या आग्रहास्तव आणि वेळ कमी आहे, तेव्हा त्याच्यामध्ये शासनाच्या मंजूरीने आपण ४ जानेवारी पर्यंत मुदत वाढवलेली आहे. मला वाटते जे एक्सक्लुडेड पोर्शनसाठी लोकांना हरकती सुचना दाखल करण्या बाबतची जी काही मोठी त्यामध्ये शंका होती, ती आपण लगोलग दुर केलेली आहे. जेनेकरून लोकांना एक्सक्लुडेड पोर्शन बदल देखील वेळेस त्याच्यामध्ये अभ्यास करून त्याच्यामध्ये माहीती घेऊन त्यामध्ये आपत्ती आणि सुझाव जे आहेत, ते सहसंचालक कोकण विभाग यांच्याकडे ४ जानेवारी पर्यंत दाखल करता येतील. याच्यामध्ये ब—याचशा आरक्षणाच्या बाबतीत, या प्रामुख्याने रस्त्यांच्या रूंदीच्या बाबतीत, जे काही शासनाने बदल केले आहेत, त्या बदल बरेचशे आक्षेप आणि लोकांच्या भावना काही प्रमाणात त्या ठिकाणी दिसून येतात. परंतु हा एक डेव्हलपमेंट प्लॅान आपल्या शहरासाठी शासनाने दिलेला जो प्लॅान आहे, त्याची अंमलबजावणी जसे आपण जूना डेव्हलपमेंट प्लॅान १५७ आरक्षणे आपण ठेवलेली होती. त्यामध्ये पण काही रस्त्यांची रूंदी याच्या पेक्षा किंवा या पध्दतीने आपण ठेवली होती. परंतु त्याचा अंमल मात्र आपण स्थानिक परिस्थितीत आणि आपल्या गरजेनुसार आणि आवश्यतेनुसार आपण त्याला अंमल दिलेले आहे. मला वाटते हे शासनाने त्यांच्या पध्दतीने जे काही नियोजनाचे मुद्दे असतात, ज्या काही तरतुदी असतात त्यानुसार हा प्लॅान जाहीर केलेला आहे. आता त्याच्यामध्ये एक्सक्लुडेड पोर्शन लागू झालेला आहे. परंतु विशेषत: ही आपत्ती आहे, सॅगशन मॉडीफिकेशन बदल ज्याच्यामध्ये ते सर्व बदल होऊन फायनल झालेले आहे. परंतु त्याच्यामध्ये आपण आपल्या शहराची परिस्थिती आपण आपल्या नागरीकांचे त्याच्यामध्ये ज्या येणा—या आडचणी आहेत, ते विचारात घेऊन त्यामध्ये आपण अंमलबजावणी करतांना त्या पध्दतीने करू शकतो. १०० फुटाचा आपण ८०फुटाचा करू शकतो आणि ८० फुट असतांना १०० फुट करता येणार नाही. तर हा मुख्य फरक आपण लक्षात घ्यावा. जर डी.पी.मध्ये ६० फुट दिला असता, तर मग ८०फुट करणे अवघड झाले असते. परंतु डी.पी. च्या फुटमध्ये ज्या मा. सदस्यांच्या ज्या तिव्र भावना आहेत की, त्या ठिकाणी १०० फुटी रस्ता दाखवला आहे. आपण आपल्या पध्दतीने आणि शेवटी महासभेच्या निर्णयानुसार आणि सर्व मा. सदस्यांच्या निर्णयानुसार पुढे जाणार आहोत. त्यामुळे मला वाटते हा मुद्दा इथेच सर्वांच्या बाबतीत या ठिकाणी स्पष्ट

होऊ शकेल आणि शेवटी डेव्हलपमेंट प्लॅन जसे मी सांगितले आहे, आपण शहराचे सुनियोजन करण्यासाठी आहे. केवळ रस्तारूंदीकरणामध्ये कोणाच्या काही प्रॉपर्टीज अफेक्ट होतात, म्हणून त्या सगळयालाच वाव दयायचा नाही, हे सुध्दा कुठेतरी चुकीचे आहे. डेव्हलपमेंट प्लॅन शिवाय शहराचा विस्तार होणर नाही. अर्थात मघाशी जसा मुद्‌दा निघाला, क्लस्टर डेव्हलपमेंट ही मोठी कळीची बाब त्या ठिकाणी राहणार आहे. क्लस्टर डेव्हलपमेंटमुळे ब—याचशा डेव्हलपमेंटला वाव मिळणार आहे. त्याचे रूलस का आले नाहीत, अजून कसे पेंडीग आहेत, हा मुद्‌दा वेगळा वादग्रस्त आहे आणि त्याच्याबदल पण प्रशासन आणि महानगरपालिकेतर्फे आपण प्रयत्न करणार आहेत. कारण डेव्हलपमेंट प्लॅन विधाउट डिसी रूलस आपण त्याला अंमल देऊ शकत नाहीत. केवळ रस्ता रूंदीकरणा शिवाय आणि रस्ता रूंदीकरण जरी झाले तरी त्याला कॉम्पोजेशन देणेसाठी आपल्याकडे तरतुदी पाहीजेत. मेन म्हणजे आपला जुना डी.पी. अंमलात न येण्याची तीच कारणे आहेत. त्या वेळेस आपली फायनान्स परिस्थिी निट नव्हती. परंतु आताच्या डी.पी. प्लॅनमध्ये जर क्लस्टर डेव्हलेपमेंट आणि टी.डी.आर. ज्या सारख्या तरतुदी आहेत. त्यानुसार आपण रस्तारूंदीकरणामध्ये देखील आपण निर्णय घेऊ शकतो. मला वाटते ही वृत्ती जी आहे, ती मला वाटते जास्त काल्पनिक स्वरूपाची आहे आणि विनाकारण लोकांमध्येही त्या लोकांनी त्याच्यामध्ये भय बाळगू नये आणि शेवटी ते निर्णय आपण घेणार आहोत. आता आरक्षणाचा जो मुद्‌दा आहे, त्या बदल आपणाला खरोखर आपत्ती आहे, सॅगसन मॉडीफिकेशन आहे, त्या बदल आपणाला पुढचा जो पर्याय असतो, तो सेक्शन ३७ चे मॉडीफिकेशन आहे. ते आपण बदल आणि खरोखर आपत्तीजनक आहे ते आपल्या करायला तो देखील वाव आहे. तर मला वाटते वरल डेव्हलपमेंट प्लॅन बाबत कोणीही भयग्रस्त होण्याची गरज नाही आणि जसे “भागो भागो भुत आया” अशा पध्दतीने जनसमज पसरू नये अशी मला सगळयांना या ठिकाणी विनंती करायची आहे.

या वेळी सदस्य, श्री. रवि जग्यासी यांनी पुन्हा सभागृहामध्ये प्रवेश केला.

**सदस्य, श्री. रमेश चव्हाणः—** मा. महापौर मॅडम, मा. आयुक्त साहेब, आपण मार्किंग दिली आहे, ती १०० फुटाची का दिली.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकरः—** आपण मार्किंग याच्यासाठी दिली आहे की, आपण पहीले त्या लोकांना एक जाणीव तरी व्हायला पाहीजे की, डी.पी. प्लॅन प्रमाणे ही अशा पध्दतीने त्याची मार्किंग आहे. त्याचे अंमल करायचे आहे किंवा कसे करायचे आहे, अर्थात मी पण समजू शकतो की, मार्किंग दिल्यामुळे

लोकांमध्ये जास्त जास्त कनफ्युज होऊ शकते, त्याच्यामुळे मी विचार करतो आणि खरोखर आपल्याला ज्या वेळेला अंमल करायचा असेल, त्याच वेळेला मार्किंग करून हा पण मी विचार करायला तयार आहे, काही हरकत नाही.

<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—</u> आयुक्त साहेब, ८० फुटाचा जो मंजूर केलेला रोड आहे, तो विकसित करायला आता काहीही हरकत नाही आणि त्यानुसारच मार्किंग करायला सुचना करा. एम.एम.आर.डी.ए. ने ब—याच वर्षापासून पास केला आहे, तो मंजूर झाला आहे.

<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—</u> एम.एम.आर.डी.ए. ने पाच रस्ते मंजूर केलेले आहेत, त्या बाबत पण हा निर्णय झाला पाहीजे.

<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—</u> दुसरा कल्याण अंबरनाथ रोड होता कामा नये? नाहीतर आपण मार्किंग देणार आणि लोकांना भयभित करणार तो रस्ता आता मंजूर झालेला तो आता चालू करा.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—</u> तुम्हांला कळले नाही, कल्याण अंबरनाथचे कळाले नाही.

<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—</u> कल्याण अंबरनाथचा रस्ता जसे अडीच—तीन वर्षापासून पेडींग आहे, पडलेला आहे, तसे होता कामा नये, आता अस्तित्वात आहे, तो मंजूर पण झालेला आहे. तो वाढवत बसलो तसेच भिजत राहणाणर. त्यामुळे ८० फुटा प्रमाणे मंजूर करा.

<u>सदस्य, श्री. विजय पाटील:—</u> आयुक्त साहेब, साईट नंबर ३६० ग्रीन झोन दाखवला आहे. संपुर्ण गाव, १ किलो मिटरचा पट्टा ग्रीन झोन दाखवला आहे आणि पुर्ण गांव आमचे ग्रीन झोनमध्ये येते. ग्रीन झोन म्हणजे काय? घरे बनणार आहेत का त्याच्यावर? काय काम करू शकतात? १ किलो मिटरचा पुर्ण पट्टा दाखवला आहे, दुर्गापाडयाचा आणि हा गांव आहे तो पुर्ण ५ नंबरमध्ये वसलेला आणि मुळ, या उल्हासनगरचा मुळ गांव, मुळ पाया हा दुर्गापाडा आहे. आता दुर्गापाडयात पुर्ण पट्टा १ किलो मिटर पर्यंत ग्रीन झोन दाखवलेला आहे. याच्या पुर्वी अंबरनाथ गांव हा उल्हासनगरमध्ये नव्हता आणि उल्हासनगरमध्ये घेतल्या नंतर आताच्या डी.पी. मध्ये पुर्ण १ किलो मिटरचा ग्रीन झोन दाखवलेला आहे.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—</u> ते सॅगेशन मॉडीफिकेशनमध्ये आहे का ईपीमध्ये आहे?

<u>सदस्य, श्री. विजय पाटील:—</u> आहे, दोन्ही याच्यात आहे आणि पुर्ण पट्टा १ किलो मिटर.

या वेळी सदस्या, श्रीम. ज्योत्सना जाधव व सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी हे खाली बसले होते, ते आपल्या जागेवर आसनस्थ झाले.

<u>**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—**</u> ते १३७ यादीमध्ये आहे का ५४० च्या यादीमध्ये आहे. मघाशी मी सांगितले की, सॅगशनमध्ये असेल तर आपण रस्त्याच्या बाबतीत निर्णय घेऊ शकतो, परंतु आरक्षण जे आहेत, त्या ठिकाणी डेव्हलपमेंट युज अलाऊ होणार नाही. जो पर्यंत ३७ चे मॉडिफिकेशन आपण शासनाकडून मंजूर करून घेणार नाही.

या वेळी सदस्या, श्रीमती लिलाबाई आशान व सदस्या, श्रीमती ज्योती माने यांनी सभागृहामध्ये प्रवेश केला.

<u>**सदस्य, श्री. विजय पाटील:—**</u> आयुक्त साहेब, कारण की हा गांव संपुर्ण उल्हासनगरमध्ये होता, त्यांला पुन्हा अंबरनाथमध्ये घेतले आणि पुन्हा आता उल्हासनगरमध्ये घेतले आणि आता जायचे कुठे? आणि हे आमचे मुळ गांव होते. जेव्हा सन १९४८ मध्ये उल्हासनगर वसले त्याच्या आधी आमचे हे गांव होते आणि आता पुर्ण ग्रीन झोनमध्ये टाकले आहे, तर आम्ही जायचे कुठे? म्हणजे जी परिस्थिती ४ नंबरमध्ये झाली आहे, ती ५ नंबरमध्ये आणू नका? मा. महापौर मॅडम, याचे गंभीर परिणाम होतील, जर संपुर्ण गांव ग्रीन झोनमध्ये आला, हे गांव आमचे मुळ उल्हासनगरचे आहे. त्याच्या नंतर अंबरनाथमध्ये गेले आणि अंबरनाथमधून परत उल्हासनगरमध्ये घेतले आणि पुन्हा जर आपल्याला तिथे काही जर करता येत नसेल, तर आम्ही जायचे कुठे?

<u>**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—**</u> पहीले या प्रश्नांचे उत्तर मी देतो, आणि सर्व अशा प्रकारच्या आरक्षणा बदल माझे हे सामुहिक माझे उत्तर असेल की, ज्याच्यामध्ये आपल्याला सॅगशन प्लॅनमध्ये जर कुठलेही आरक्षण असेल, आरक्षण दोन प्रकारचे असतात. एक डेव्हलपमेंट आरक्षण आणि एक नॉन डेव्हलपमेंट आरक्षण.

<u>**सदस्य, श्री. विजय पाटील:—**</u> डी.पी. ज्यांनी आणला त्यांना बोलू दया.

<u>**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—**</u> अरूणजी पाटीलला बोलू दया.

__सदस्य, श्री. भारत राजवानी:—__ साहेब विरोधी पक्षाच माईक बंद आहे, अरूण आशान, बोडारे साहेबांचे माईक बंद आहेत.

__सदस्य, श्री. विजय पाटील:—__ सहा नंबरला जी परिस्थिती झाली, ती परिस्थिती लक्षात घ्या. तीच परिस्थिती ५ नंबरला झाली तर याचे परिणामच वाईट होतील. याचे परिणाम प्रत्येकाला भोगावे लागतील. आम्ही मुळ इथले असून आम्हांला ग्रीन झोनमध्ये, जी परिस्थिती सहा नंबरची झाली तीच परिस्थिती पुन्हा एक नंबर ते पाच नंबर पर्यंत होईल.

__आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—__ सगळया शंका दुर होतील.

__महापौर तथा पिठासिन अधिकारी:—__ सन्माननिय सदस्य....

__सदस्य, श्री. विजय पाटील:—__ तिथे पुन्हा प्रत्यक्ष बघा, ज्यांनी हे .....

__सदस्य, श्री. प्रमोद टाले:—__ आयुक्त साहेब:— माझा एक प्रश्न होता,

__सदस्य, श्री. विजय पाटील:—__ जेव्हा उल्हासनगर इथे वसले तेव्हापासून आम्ही इथे रहात आहे.

काही सदस्य, एकत्रित बोलत असल्यामुळे कोण काय बोलत होते, ते समजून आले नाही.

__सदस्य, श्री. प्रमोद टाले:—__ मा. आयुक्त साहेब, मघाशी ज्योत्सना मॅडम आणि....

__सदस्य, श्री. विजय पाटील:—__ आयुक्त साहेब, बघा काही तरी याच्यावर करा. सांगा.

__सदस्य, श्री. प्रमोद टाले:—__ मा. आयुक्त साहेब, मघाशी तुम्ही बोललात की, १०० फुटाचा रस्ता ८० फुटावर करू शकतो. या संदर्भात निवेदन दिले होते, एम.एम.आर.डी.ए.चे जे चार ते पाच रोड आहेत, ते जुन्या डी.पी.प्रमाणे झाले आहेत. आमच्या शुभाष टेकडी ते भरतनगर हा एक एम.एम.आर.डी.ए. कडून पास झालेला आहे, वर्क ऑर्डर दिलेली आहे.

__सदस्य, श्री. अरूण आशान:—__ हे प्रशासन जनताची आवाज दाबत आहे.....

__महापौर तथा पिठासिन अधिकारी:—__ आवाज दाबत नाही...

__सदस्य, श्री. अरूण आशान:—__ आमचा माईक बंद केला म्हणून आम्हांला इकडे येऊन बोलायला लागले.

__सदस्य, श्री. किशोर वनवारी:—__ आपला आवाज माईकला पसंद नाही.

**<u>सदस्य, श्री. विजय पाटील:–</u>** काही तरी लोकांना माहीती दया. त्या बदल्यात आम्हांला भेटणार काय आहे? ज्याचे घर जाणर आहे, त्याला काय मिळणार आहे, हे पहीले सांगा.

**<u>सदस्य, श्री. प्रमोद टाले:–</u>** आयुक्त साहेब, मघाशी आपण निवेदन दिले आहे की, एम.एम.आर.डी.ए. चे जेवढे रस्ते आहेत, ते ज्या एस्टीमेटमध्ये, ज्या प्लॅनमध्ये पास झालेले आहेत, त्या पध्दतीने करायला काही हरकत नाही. जे १०० फुट मार्किंग दिलेले आहे, ते ऑल रेडी ८० फुटाचा होता. तो तुम्ही करायला काही हरकत नाही, असे निवेदन दिले आहे. शुभाषटेकडी ते भरतनगर हा जो पहीला ६० फुट आणि नंतर ४० फुट तो एस्टिमेट दिलेला आहे. खरे तर ६० फुटाचा रस्ता नविन डी.पी. मध्ये आहे. परंतु जुन्या डी.पी.मध्ये तो रस्ता खरे तर ४० फुटाचा आहे. त्याचे एस्टिमेट सुध्दा ४० फुटाचे झालेले आहे. असे असतांना संपुर्ण परिसर शुभाष टेकडी ते भरतनगर पर्यंत हा ४० फुटाचा व्हावा, खास करून जुन्या डी.पी. प्रमाणे व्हावा, आज पर्यंत जे प्लॅन एम.एम.आर.डी.ए. ने पास केले आहेत, त्या पध्दतीने व्हावा, अशी आमची विनंती आहे.

**<u>सदस्य, श्री. गजानन शेळके:–</u>** म्हारळ गांव इथे महानगरपालिकेने जुना सर्व्हे ५८व नविन सर्व्हे १६ मानेरेगांव उल्हासनगर इथे ८०० चौर मिटरचा भुखंड विकास योजनेसाठी आरक्षित ठेवला होता आणि दफन भूमिसाठी आरक्षित ठेवलेला आहे. तसेच त्या ठिकाणी मुस्लिम समाजाचे दोन मुतदेह दफन करण्यात आले आहेत. ही जागा महानगरपालिकेच्या ताब्यात असतांनाही तिथले आरक्षण उठवून ते १२ नंबर वार्डामध्ये टाकण्यात आलेले आहे आणि तिथे असा कोण हाता की, आपल्या मालकीच्या, महानगरपालिकेच्या मालकीचा भुखंड असतांनाही ते सोडून पॅनल नंबर १२ , सम्राट अशोकनगरमध्ये कब्रस्थानसाठी आरक्षण टाकलेले आहे, केलेले आहे. तिथे असा कोण होता की, तो गांधीजी होता, त्याच्या डोक्यावर टोपी होती आणि तो त्यांनी बदली करून घेतला, तरी हा कब्रस्थान जिथे होते, तिथेच मुस्लिम समाजाला देण्यात यावे. हा विषय अनेक वेळा महासभेमध्ये आला आहे आणि ते बहूसंख्येने इथे राहतात तरी त्यांना कब्रस्थान मिळत नाही. नेमके ते सम्राटनगरमध्ये दिलेले आहे किंवा कुठे ते समजायला पाहीजे.

**<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:–</u>** मा. महापौरजी, उप महापौर, आयुक्त साहेब, आजची महासभा शिवसेनेच्या आणि विरोधी पक्षाच्या सदस्यांनी खास मंजूर झालेल्या विकास आराखडयावर चर्चा करण्यासाठी बोलवलेली आहे. या बैठकीमध्ये बरीचशी चर्चा झाली, अधिका–यांनी उत्तरेही दिलेले आहेत. एस.एम. मध्ये चर्चा

करत असतांना एस.एम.मध्ये बदल करायचे असतील, तर ते शासनाकडे ३७ अन्वये मॉडिफिकेशन करून आपल्याला शासनाकडे जावे लागेल. माझा प्रश्न आयुक्तांना आहे की, जेवढे एस.एम. झालेले आहेत, त्या एस.एम. मध्ये आम्हांला सर्वच जागी जवळजवळ ४० टक्के बदल करायचा जर असेल, तर या महासभेने एकच ठराव केला तर ते बदल होऊ शकतील का? त्याच बरोबर हा विकास आराखडा मंजूर करतांना या शहरामध्ये विकास आराखडयाची गरज होती, ती सन २०१० पासून याची प्रोसेस सुरू झाली. सन २०१३ ला हा प्रस्ताव महासभेपुढे आला. महासभेने १७/१/२०१७ रोजी निर्णय घेतला आणि तो निर्णय घेत असतांना सर्वच पक्षाच्या सदस्यांनी तो निर्णय घेतला, सर्व पक्षाच्या सदस्यांनी तो निर्णय घेतला आणि त्यामध्ये जे काही बदल ठरवलेले आहेत, तो प्रस्ताव पारीत केला आणि शासनाला पाठविला. माझा प्रश्न एकच आहे की, तो प्रस्ताव पाठवल्या नंतर शासनाने त्या प्रस्तावाकडे कुठल्याही प्रकारे लक्ष न देता, या डी.पी.ला मंजुरी दिली आणि त्याच्यापुढे जाऊन सांगायचे झाले तर मला श्री. बोडारे साहेबांनी अगोदरच सांगितले आहे की, महाराष्ट्रामधल्या कुठल्याही महानगरपालिकेमध्ये अशा पध्दतीने डी.पी. मंजूर झाला नसेल, भाग भाग वारीस, असे मंजूर झाला नसेल तो आपल्या शहरासाठी मंजूर झालेला आहे. शासनाने मंजूर केलेला डी.पी. जो आहे, तो डी.पी. आपण जेव्हा प्रस्ताव पाठवला त्याच्यावर लक्ष न देता, त्या प्रस्तावावर कुठलेही लक्ष न देता, हा डी.पी. मंजूर केला. जर महानगरपालिकेच्या पैशातून हा डी.पी. बनत असेल, महापालिकेची लोकल बॉडी असेल आणि त्यांनी दिलेला जो प्रश्न आहे, त्यांनी दिलेला जो प्रस्ताव आहे, त्याचा जर विचार शासन करणार नसेल, तर ही दुदैवी बाब आहे. शासनाने विचार करायला पाहीजे होता. परंतु शासनाने तो विचार न करता, श्री. अरूण आशान यांनी सांगितल्या प्रमाणे जाणूनबुजून जिथे खाली भुखंड आहते, त्या भुखंडावर कमर्शियल, रेसीडेन्शीयल असे आरक्षण टाकलेले आहेत. कब्रस्थानची जागा खाली असतांना, जुना ५८ नंबर सर्व्हे खाली असतांना, ती जागा त्यांना दिली असतांना, तिथे जाऊन त्यांनी दोन मृतदेह दफन केले असतांना, ती जागा काढून त्या बाजूला सम्राट अशोकनगरमध्ये शाळा आहे आणि तिथे लोक राहत आहेत. त्या जागेवर त्यांनी जाणूनबुजून आरक्षण दिलेले आहे, असे आमचे आरोप आहेत आणि हे बिल्डर लोकांच्या सांगण्यावरून केले आहे, असे आरोप आहेत, त्याचे उदाहरण मी कब्रस्थानच्या माध्यमातून दिले आहे. दुसरा विषय असा आहे की, कब्रस्थानची जागा देत असतांना, हिंदु स्मशानभूमी एक नंबरला आहे, त्या ठिकानी एक जागा एस.एम. मध्ये त्यांना दिली. तर तिथे ती जागा खाली आहे का? त्या जागेवर अनधिकृत बांधकामे झालीत, लहानमुले तिथे दफन केले जातात. जिथे जागाच नाही, अशा जागेवर जाणूनबुजून जागा दिली गेलेली आहे. एस.एम. मध्ये दाखवले आहे की, ही जागा तुम्हांला दिलेली आहे. तर हे एक मुस्लिम समाजाची थट्टा करण्याचे काम प्रशासनाच्या माध्यमातून

जे काही नगररचना विभागाचे जे काही अधिकारी आहेत, त्यांनी केलेले आहे, असे माझे आरोप आहेत. अशा या सगळया बाबी आपल्या लक्षात आणून दिलेल्या आहेत. रिंगरूटच्या बाबतीमध्ये आयुक्त साहेबांनी सांगितले आहे की, डी.पी. मंजूर झाल्या नंतर आपण १०० फुट केल्या नंतर त्याला आपण ८० फुट करू शकतो. रिंगरूट १२० फुटाचा मंजूर झाला, तर त्याला ८० फुट करू शकतो का? याचे उत्तर मला आयुक्तांनी दयावे. जर असे करत असाल आणि त्याला ८० फुट करू शकतो, तर तिथे लोक बेघर होणार नाहीत, लोक बेघर होण्याची वेळ येणार नाही. असा जर आपण निर्णय घेणार असाल, तर ठिक आहे. परंतु तसे न करता, लाखो लोक जर बेघर होणार असतील आणि या शहरामध्ये लाखो लोकांची आपण पर्यायी व्यवस्था करू शकणार नाही किंवा करू शकणार नसेल, तर हा डी.पी. काय कामाचा आहे, हा डी.पी. बोगस डी.पी. आहे, असे माझे मत आहे. हा डी.पी. जर लोकांना बेघर करणार असेल, जर शहरातून लोकांना हाकलून देणार असेल, शहरातून पळवून लावणारा असेल, तर त्या डी.पी. चा आम्ही निषेध करतो. शहरामध्ये जेव्हा रिंगरूट होतो, त्या वेळेला त्या रिंगरूटची शहराची महानगरपालिका १३ कि. मिटर आहे. मला माहीती मिळाली की, शहरामध्ये जर रिंगरूट बनवायचे असेल तर कमीत कमी ५० कि. मिटर शहराची हद्द असली पाहीजे, महापालिकेची हद्द असली पाहीजे. असा काही नियम आहे का त्याचाही खुलासा आयुक्तांनी करावा? दुसरी गोष्ट अशी आहे की, जर शहराच्या विकासाठी हा आराखडा जर नसेल आणि या अगोदरच्या महासभेने देलेला जो प्रस्ताव होता, तो प्रस्ताव जर शासन मंजूर करणार नसेल, तर या डी.पी. मी निषेद करतो, त्या डी.पी. चा आम्ही होळी करतो, असे मी या ठिकाणी जाहिर करतो.

<u>सदस्या, श्रीमती अंजली साळवेः—</u> मा. महापौर, मा. आयुक्त साहेब, खरे म्हणजे जी चर्चा आज आपण इथे करीत आहोत. त्याचा काही उपयोग होणार आहे का? त्याची दखल शासन प्रशासन घेणार आहे का? कारण आपण मागे जी डी.पी. संदर्भातील जी मिटींग घेतली, त्यात महासभा ठराव क्रमांक ४१ दिनाकं १७/१/२०१४ याचे सुचक होते, मा. बोडारे साहेब आणि अनुमोदक होते, श्री. राजेश वदारिया या ठरावाप्रमाणे या महासभेने १०७ बदल या डी.पी. मध्य सुचवले होते. तसेच डी.सी. रूलमध्ये सुध्दा काही बदल सुचवले होते व या महासभेने त्या अटींवर या डी.पी.ला मान्यता दिलेली होती. परंतु माझ्या माहीतीनुसार आता प्रकाशित झालेला अंतिम डी.पी. मधील सॅगेशन मॉडिफिकेशनमध्ये बहुतांश महासभेचे सजेशन मान्य केले नाहीत. तसेच डी.पी.संदर्भात ४ एप्रिल, २०१३ पासून ते ४ मे २०१३ पर्यंत ज्या सुचना व हरकती जनतेकडून मागविण्यात आल्या त्यामध्ये १६ हजार ५६६ एवढया सुचना व हरकती आल्या होत्या व जी कमिटी गठीत करण्यात आली होती, त्यात चार सदस्य व शासनाचे तंज्ञ लोक व महासभेने सुचवलेले तीन सदस्य, अशी जी कमिटी होती, यांनी १ जून २०१३ ते ७ ऑगस्ट २०१३ दरम्यान २६१० एवढया लोकांची सुनावणी करून तब्बल ५४४ फेर बदल डी.पी. मध्ये सुचवले होते. परंतु त्यातून शासनाने आता प्रकाशित केलेल्या सॅगशन मॉडिफिकेशनमध्ये ४०५ सजेशन अमान्य केले आहेत. टक्केवारी जर बघितली गेली तर फक्त २५ सजेशनला मान्यता दिली आहे. मा. महापौर मॅडम, मा.आयुक्त

साहेब, माझ्या म्हणनेचा उद्देश असा आहे की, प्रशानाला व राज्य सरकारला स्वत:ची मनमानी कारभार करायचा होता तर तेवढे सजेशन, ऑब्जेक्शन, स्थायी समिती, महासभेचे ठराव या सर्वांचा खटाटोप करण्याची काय गरज होती. हा डी.पी. म्हणजे प्रशासनाचे व राज्य सरकारची हुकुमशाही आहे असे मला वाटते. अशा हुकुमशाहीचे जनतेवर काय परिणाम होतो? याचे उदाहरण माझ्या प्रभागातील, सिध्दार्थनगर येथील देवू इच्छिते की, आयुक्त साहेब, २५ वर्षा पासून जी लोक रहात होते, त्यांना अचानक चार दिवसात दुकाने व घरे खाली करण्याची नोटीस दिली होती. त्या वेळी तिथे एकाचे हृदयविकाराने बळी गेला आणि आता सध्याच्या स्थितीमध्ये हा विभाग आरक्षणातून वगळलेला गेला आहे. आमच्या कॉंग्रेस पक्षाचे माजी मुख्यमंत्री स्वर्गीय विलासराव देशमुख यांनी अशा गोरगरीब जनतेवर अन्याय होऊ नये म्हणून या उल्हासनगर शहरातील नागरीकांच्या मालमत्तेच्या संरक्षणांच्या संदर्भात ऐतिहासिक असा सन २००६ मध्ये अॅक्ट लागू केला होता. तरी देखील प्रशासन हुकूमशाही करते तर नागरीकांना कसे दारोदारी भटकावे लागते. याचे उदाहरण सिध्दार्थनगर येथील रहीवासी आहेत. वरील उदाहरण मी एवढया करीता देत आहे की, जेणेकरून भविष्यात असा अन्यायकारक डी.पी. लागू केला, तर शहरातील नागरीकांचे प्रशासनाच्या हुकूमशाहीने काय हाल होऊ शकतात. म्हणून महापौर मॅडम, आयुक्त साहेब, मी संपुर्ण डी.पी. चे कॉंग्रेसच्या पक्षातर्फे जाहिर निषेध करते व कॉंग्रेस पक्ष सदर विषयाचा विधानपरिषदेच्या रस्त्यावर उतरून सुध्दा निषेध करेल. माझ्या विरोधाची प्रमुख कारणे मी सांगू इच्छिते की १) स्थायी समितीचा अहवाल याची पुर्णत: दखल घेण्यात आलेली नाही व त्यांनी सुचविलेले बदल सुध्दा करण्यात आलेले नाहीत. महासभा ठराव क्रमांक ४१ मधील सुचविलेल्या बहुतांच्या सुचनांची दखल घेण्यात आलेली नाही. तसेच डी.सी. रूल व क्लस्टर योजना या बदल काही पारदर्शकता नाही, ४) शहर विकास आराखडा बनवतांना शहराचे क्षेत्रफळ विस्तार करण्याची कोणतीही प्रक्रिया का केलेली नाही. १२० फुटाचा रिंगरूट रोड हा पुर्णपणे शहरासाठी विशेत: दलितवस्त्या व झोपडीधारकांसाठी अन्यायकारक आहे. ५) तसेच रस्त्यात बाधित होणा—या नागरीकांच्या पुर्नवसनाच्या संदर्भात अध्याप कोणतीही ठोस अशी पॉलिसी पारदर्शक दिसून येत नाही. ६) डी.पी.मध्ये ज्या भरपुर जागा खुल्या होत्या, तिथे रहिवासी झोन टाकण्यात आलेले आहेत. ज्या परिसरात बांधकाम आहे, त्यावर आरक्षण टाकण्यात आलेले आहेत. त्यामुळे डी.पी. बनवतांना काही ठराविक लोकांना हाताशी धरून त्यांचा फायदा करण्यात येत आहे, असा संशय शहरवासियात निर्माण होत आहे. डी.पी. संदर्भात किती निर्णय होतील हे संशयास्पद वाटत आहे. सदर डी.पी. मध्ये सर्वात मोठा अन्याय क्रिडाप्रेमी जनतेवर होत आहे. जसे की, १९७४ च्या डी.पी. मध्ये १९ भुखंडाच्या मैदानावर खेळाचे आरक्षण होते. त्याचे एकुण क्षेत्रफळ ८८.४९ एकर एवढे होते. परंतु सध्याच्या डी.पी. मध्ये एकुण क्षेत्रफळ खुपच कमी केल्याचे दिसून येते. तसेच बहतांश खेळाचे आरक्षण ४ व ५ नंबरवर लावल्याचे दिसून येते. त्यामुळे भविष्यात मैदान नसलेले शहर म्हणून उल्हासनगरची ओळख होणार आहे. मैदानाच्या संदर्भातील माझे आक्षेप खालील प्रमाणे आहेत. १९७४ च्या विकास आराखडयातील मैदानाच्या आरक्षण क्रमांक एक, १२ एकर पुर्णपणे वगळून टाकण्यात आलेले आहे. आरक्षण क्रमांक २ नविन विकास आराखडयात चेंजेस आहेत. मात्र झोपडपट्टीने व्यापलेले असल्यामुळे विकास होणे कठिण आहे. आरक्षण क्रमांक ३ हे काही प्रमाणात कायम असून अतिक्रमण व पेपार्क चालवण्याच्या ताब्यात आहे. आरक्षण क्रमांक ४ अतिक्रमण झालेल्या भुखंडावर टाकण्यात आलेले आहे. आरक्षण क्रमांक ५ ते खुल्ले असले तरी नविन आराखडयात कमी केले आहे व आरक्षण हटवलेली जागा, एका मोठया बांधकामधारकाच्या ताब्यात आहे. आरक्ष क्रमांक

६ ची आवश्यकता देखील आरक्षण क्रमांक ५ सारखीच आहे. आरक्षण क्रमांक ७, ८, व १६, १७ हे आरक्षणक्षेत्र कमी करण्यात आलेले आहे. मैदानाचे आरक्षण क्रमांक ९ हे अतिक्रमण झालेले असले, तरी नविन विकास आराखडयात हे आरक्षण कायम आहे. मैदानाचे आरक्षण क्रमांक ११, १३ हे नविन विकास आराखडयात झोपडपट्टीवर लादले आहे. मैदानाचे आरक्षण क्रमांक १८, १९ हे चिज कारखानदाराने पुर्णपणे अतिक्रमण असल्याने हटविले गेले आहे. मंजूर विकास आराखडयात आरक्षण क्रमांक १७१, १७२ हे स्टेडियमसाठी राखीव ठेवण्यात आलेले आहे. सदर जागा ही पुर्णपणे खुल्ले असूनही, ही जागा ईपी ६३ मध्ये का टाकण्यात आलेली आहे? हे समजून येत नाही. तसेच माझ्या प्रभागातील प्रभाग क्रमांक १८ मध्ये महाराणा प्रताप चौक ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक हा ६० फुटी रोड केल्यामुळे त्याला विरोध आहे. प्रभाग क्रमांक १८ मध्ये सेक्टर ३ मधील रस्ता एम–१, ६७ बी याबदल सुचना हरकती मध्ये अर्धा रस्ता कट करण्यासाठी प्रस्ताव मांडला होता. कारण पुढील रस्त्यामध्ये सगळे सनदधारक ब्लॉकस आहेत. परंतु मंजूर विकास आराखडा हा पुर्ण रस्ता कट करण्यात आलेला आहे, याला माझा आक्षेप आहे. तरी माझ्या सर्व हरकतीचे प्रशासन काही दखल घेईल, शाशंकता तरी मी माझ्या प्रभागातील व पक्षाची प्रतिनिधी म्हणून आपल्या समोर मांडत आहे. मा. महापौर, उप महापौर, आयुक्त साहेब, डी.पी. प्लॉन सर्व शहरासाठी अत्यंत आवश्यक आहे व तो चांगल्या प्रकारे झाला पाहीजे, अशी आमची इच्छा आहे. पण यासाठी शहरातील नागरीक बाधित होणार नाही व आम्ही सुचविलेल्या सर्व हरकती व सुचना लक्षात घेऊन....

या वेळी सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी हे सभागृहा बाहेर गेले.

<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारेः–</u> एक मिनीट, मा. आयुक्त साहेब....

<u>सदस्या, श्रीम. कांचन लुंडः–</u> मा. महापौरजी, सन १९७४ मध्ये डी.पी. प्लॉनमध्ये ५३६ हेक्टर आर. झोन रेसिडेन्सी एरिया पण या नविन डी.पी. प्लॉनमध्ये ५३ हेक्टर आर. झोन केले आहे. याचे कारण हे आहे की, डी.पी. प्लॉनमध्ये २३ हेक्टर आर.झोन कमी दाखवले आहे. जेव्हा सन १९७४ मध्ये लोकसंख्या १,६८,०४८ हजार दाखवली आहे. हे आकडे त्या वेळच्या गॅझेटनुसार आहेत, नविन डी.पी. च्या गॅझेटमध्ये २०३१ पर्यंत प्रोजेक्टेडमध्ये लोकसंख्या सातशे, सात हजार दाखवली आहे. परंतु आजच्या तारखेत अभिलेखानुसार १२ ते १५ लाख लोक उल्हासनगरमध्ये राहतात. या हिशोबानुसार आर. झोन जास्त व्हायला पाहीजे, तो कमी व्हायला नको पाहीजे. मा. पंतप्रधानमंत्री, श्री. नरेंद्र मोदीजी, आवास योजनेनुसार सगळयांना घरे मिळायला पाहीजेत. आर. झोन वाढवून सगळया लोकांना घर दिले पाहीजे. या डी.पी. प्लॉनला लागू करण्यासाठी लोकांना किती तरी किमंत दयावी लागत आहे? शहराचा विकास करतांना,

रिंगरूट बनवतांना किती घरे, किती दुकाने व इमारती इफेक्टेड होणार आहेत, त्याचा सर्व्हे होणे गरजेचे आहे, असे माझे निवेदन आहे. सन २००५ मध्ये रेर्ग्युलायजेशन ऑफ ऑथोरिटी डेव्हलममेंट ऑफ सिटी उल्हासनगर ऑडिनेश सन २००६ च्या महाराष्ट्र शासनाच्या १० नंबर पानावर लिहीले आहे की, ऑन ऑथोरिटी डेव्हलपमेंट कॅरीड आउट इन दि सिटी ऑफ उल्हासनगर, बिफोर ऑफ दि फस्ट जानेवारी, २००५ शॅल बी रेर्ग्युलाईस्ड इन ऑडिनेश विथ दि प्रोव्हीजन ऑफ याचे कारण आहे की, शहरीच्या कोणत्याही मालमत्तेला अनधिकृत म्हणून शकत नाही. नविन डी. पी. प्लॅनच्या गॅझेटमध्ये इ पॅराग्राफमध्ये लिहीले आहे. की, गव्हर्नरमेंट बिल्ट ऑफ प्रॉपर्टीमध्ये ......

<u>महापौर तथा पिठासिन अधिकारी:—</u> सन्माननिय सदस्य, कृपया करून जे सदस्य बोलत आहेत, त्या वेळी आपण शांतता राखा. ते सदस्य बोलत आहेत, ते मला सुध्दा समजत नाही तर त्याच्यावर उपाय कसा निघेल? आपण डी. पी. प्लॅनसाठी चर्चा करण्यासाठी आलेलो आहेत, तरी या चर्चेला थोडे गंभीरतेने घ्या.

<u>सदस्या, श्रीम. कांचन लुंड:—</u> आभारी आहे, मॅडम, नविन डी.पी. प्लॅनच्या गॅझेटमध्ये ई पॅराग्राफमध्ये लिहीले आहे की, गव्हर्नरमेंट बिल्ट ऑफ प्रॉपर्टी ब्लॉक, बॅरेक... कृपया हा मुद्दा खुप महत्वाचा आहे, आपण शांतता राखावी. गव्हर्नरमेंट बिल्ट ऑफ प्रॉपर्टी ब्लॉक, बॅरेक, गव्हर्नरमेंट बिल्ट ऑफ शॉप यांना आरक्षणापासून दुर ठेवले आहे आणि या प्रॉपर्टीचा कुठेच उल्लेख केला नाही. ज्या रेग्युलाईजेशन ॲक्टमध्ये लिगल होते. रेग्युलाईजेशन ॲक्ट आज पर्यंत अंमलबजावणी झाली नाही. त्यामुळे ही गरीब जनता आता बेघर होणार आहेत. या सभागृहाने त्या लोकांसाठी गंभीरतेने विचार करायला पाहीजे. गव्हर्नरमेंट बिल्ट ऑफ प्रॉपर्टीवर नविन रोड टाकले आहेत. काही ठिकाणी नगरपालिका, महानगरपालिकामध्ये प्लॅन मंजूर केले आहेत. यामध्ये असे दाखवले आहे की, सी.ई.पी.टी. जसे ऐजैन्सीने शहराचा डी.पी. प्लॅन बनवला आहे. यामध्ये शहराचे फिल्ड सर्व्हे गुगलमॅपमध्ये १९७४ सेक्शन डी.पी./यु. एम. सी. /बेसमध्ये रियल इमेजला नंजर अंदाज करून फक्त ऑफिसमध्ये बसून काम केले आहे. त्यामुळे शहरातील लोकांना परिस्थिचा

सामना करायला लागत आहे. त्यामुळे हा डी.पी. रद्द करण्यात यावे आणि फिल्ड सर्व्हे करून नविन डी. पी. प्लॉन केले जावे. अशा प्रकारे मा. मुंख्यमंत्री, श्री. देवेंद्र फडणवीस साहेबांनी मुंबईच्या डी.पी. प्लॉनमध्ये बदल करण्याचे आदेश दिले होते, तर उल्हासनगरचे का नाही? धन्यवाद.

या वेळी सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी यांनी पुन्हा सभागृहामध्ये प्रवेश केला.

<u>**सदस्या, श्रीम. सविता तोरणेः—**</u> मा. महापौर, उप महापौर, आयुक्त साहेब, व सर्व सन्माननिय सदस्य, मोठया अपेक्षानंतर प्रकाशित झालेले शहराचा विकास आराखडा हा कोणत्याही आर्थिक शहराचा विकास करणारा आराखडा भासत नसून हा शहरातील गोरगरीब, कष्टकरी जनतेला भकास करणारा आराखडा असून केवळ काही धनदांडक्या बिल्डरांचा विकास करणारा आराखडा आहे, याला माझा तिव्र विरोध आहे. महोदय, आम्ही शहर विकासाच्या विरोधात नाही तर शहर विकासाच्या नावावर केवळ काही लोकांनाच फायदा पोहचवण्यासाठी माझ्या गोरगरीब जनतेवर एका बाजुला अन्याय होत असेल तर मला कदापी मान्य नाही. महोदय, १२० फुटाचा रिंगरूट रोड रद्द करावा. कारण यामुळे उल्हासनगर शहरातील लाखो बांधव बेघर होणार आहेत, त्याच बरोबर मी माझ्या १२ नंबर पॅनलच्या जर विचार केला तर आनंदनगर, संतोषनगर, लाशन सोसायटी, सम्राट अशोकनगर, आर्शिवाद सोसायटी, रेणूका सोसायटी येथील हजारो घरे उध्दवस्त होणार आहेत आणि जी ४० ते ५० वर्षापासून वसलेली आहेत, या बेघर होणा—या नागरीकांची पर्यायी व्यवस्था होईल, यासाठी शहरात कुठेही जमीन उपलब्ध नाही. यांचे पर्यावसन करण्याचे जे गाजर दाखवले जात आहे, यावर विश्वास ठेवायचा कसा. कारण के.बी. रोडवरील दुकाने तोडतांना देखील, सर्व तोडली गेली. परंतु ती पुर्ण होतांना दिसत नाही. महोदय, माझ्या प्रभागामध्ये सम्राट अशोकनगरमध्ये ५४ आरक्षण शैक्षिक उपयोगासाठी ठेवले आहेत, तेथे हजारो नागरीक राहत आहेत. एवढेच नाहीत तर १५५, १५६ व १५७ हे आरक्षण दफनभूमी व इतर उपयोगासाठी ठेवण्यात आलेले आहेत. महोदय, तेथे गोरगरीब, कष्टकरी, दलित, मुस्लिम व भारतीय मराठी समाज असलेली हजारो घरे आहेत व हजारो विद्यार्थी शिकत असलेली मराठी माध्यमांची शाळा आहेत. तिथे दफनभूमीचे आरक्षण दिले आहे. त्या शाळेमध्ये मी सुध्दा बालवाडी पासून शिकत आलेले आहे आणि मला आज २१ वर्ष झालेले आहेत. तरी पण आज तिकडचे गोरगरीब आम्हांला प्रश्न करतात की, आज आम्ही तुम्हांला निवडून दिलेले आहे, तुम्ही आमच्यासाठी काय करणार आहात. आज ते धुणीभांडी करून त्यांच्या मुलांना शिकवतात, आज ती शाळा जर तोडली तर ती

मुले जाणार कुठे? त्यांचे शिक्षण होणार कुठे? या गरीबांच्या मनामध्ये अशी भिती निर्माण झाली आहे. ते तुम्ही जरा लक्षात घ्यावे, त्यासाठी म्हारळगांव इथे असेलेली दफनभूमी हस्तांतरीत करावी व उल्हासनगर–४ व ५ येथे राहणा–या मुस्लिम बांधवांसाठी आरक्षित केलेले कैलास कॉलनी येथील दफनभूमी आरक्षित करावी. महोदय, सम्राट अशोकनगरमध्ये दफनभूमीचे व इतर सर्व आरक्षण रद्द करून हा भाग रहीवासी म्हणून घोषित करावे, हा भाग रहिवासी झोन म्हणून घोषित करावा. सभागृहाने यावर फेर विचार करावा व या मध्ये तुम्ही चांगला निर्णय घ्यावा, अशी माझी विनंती आहे, धन्यवाद.

<u>सदस्या, श्रीम. अर्चना करणकाळे:–</u> मा. महापौर, पुर्वी आम्हांला ऑब्जेक्शन, सजेशन घ्यायला लावले होते, तर त्या ऑब्जेक्शन, सजेशनचे काय झाले? हे आम्हांला कळाले नाही. जे ऑब्जेक्शन घेतले होते, ते आरक्षण तसेच्या तसेच आहेत आणि ज्या रिकाम्या जागा आहेत, तिथे आर झोन दाखवण्यात आलेले आहेत. मा. साहेबांना माझी एक विनंती आहे की, जिथे झोपडपट्टीत लोक राहत आहेत, तिथे ग्रीन झोन दाखविण्यात आलेले आहे, सर्व नगरसेवकांची मागणी होती की, ते हटवण्यात यावे. सध्यास्थितीत लोक तिथे राहत आहेत, म्हणून सर्व नगरसेवकांची मागणी होती की, लोकांचा विचार करून हे आरक्षण हटविण्यात यावे. माझा एक प्रश्न आहे की, खेमानी पासून अॅन्टीना रिजेन्सी इथे एक नविन रोड, नविन डी. पी. प्लॉनमध्ये दाखविण्यात आलेला आहे. तो खरा आहे की, काय याचा मला उलगडा करण्यात यावा. आपला एक रिंगरोड होता, तो १०० फुटाचा मुरबाड– कल्याणचा तो आता सध्या १२० फुटाचा असा काही सांगण्यात येत आहे. तरी ते पण काय आहे? ते समजून सांगण्यात यावा व आपला शिवरोड ते बसस्टॉप हा ६० फुटाचा होता आणि आता सध्या आराखडयामध्ये ४० फुटाचा दाखविण्यात येत आहे, तो कमी करण्यात आलेला आहे. परंतु आम्ही जिथे आम्ही कमी करण्यासाठी मागणी करीत आहोत, तिथे तुम्ही १०० फुटाच्या ठिकाणी १२० फुटाचा केलेला आहे. त्यामध्ये आमच्या गोरगरीब जनेतेचे खुप भारी नुकसान होणार आहे. याचा फटका आम्हांला बसणार आहे, तरी सर्वांची मागणी हीच आहे आणि मी सर्व सदनला विनंती करते की, विकास आराखडा, उल्हासनगरचा विकास होऊ दया, परंतु गरीबांची कुर्बानी होऊ देवू नका? गरींबाना साथ दया. ज्या पध्दतीने गरीब लोकांची घरे तुटणार आहेत, तर त्यांना काही तरी आश्वासन दया, नाहीतर काही तरी सांगा आणि मला नगररचनाकार यांना विचारायचे आहे की, खेमानी ते रिजेन्सी पर्यंतचा हा रोड कसा गेला? कारण ७ ते ८ आरक्षण ग्रीन झोनमध्ये कसा गेला? जिथे वस्ती आहे, आणि अॅन्टीना रिजेन्सी आता वसवलेले आहे आणि ते बिल्डींगचे काम चालू आहे. तो आर. झोनमध्ये दाखविण्यात आलेला आहे. मला जराशी तिथली माहीती सांगण्यात यावी व सदनला पण माहीती देण्यात यावी, ही नम्र विनंती.

**सदस्या, श्रीम. कविता बागुलः—** मा. महापौर मॅडम, आयुक्त साहेब, आपल्या शहराचा विकास आराखडा प्रसिध्द झाल्या पासून नागरीकांमध्ये उलटसुलट चर्चा चालू आहे, भितीचे वातावरण पसरलेले आहे. नागरीकांच्या या भितीला आपण एक पत्र देवून ते थांबवावे. नागरीकांचा काही प्रश्न मी आपल्या समोर लेखी पत्रावर देवून मी आपल्या सोबत मांडत आहे. कृपया आपल्याकडून उत्तर अपेक्षित आहे. पहीला मुद्दा विकास आराखडयाची अंमलबजावणी आपण कधी पासून करणार याचा खुलासा करावा. दुसरा मुद्दा विकास आराखडयामध्ये बाधित झोपडपट्टी, चाळ, पक्की घरे, इमारती या बाबत महानगरपालिकेने पुनर्वसनाची लेखी स्वरूपात भुमिका जाहिर करावे. तिसरा मुद्दा क्लस्टर डेव्हलपमेंट आपल्या महापलिका क्षेत्रात लागू होणार का? आणि कसे का? याचा खुलासा करावा. चौथा मुद्दा, एस.आर.ए., एम.आर.डी.ए. बाधित होणा—या नागरीकांच्या पुनर्वसन करण्याची जबाबदारी घेणार का? आणि पाचवा मुद्दा, हा विकास आराखडा नागरीकांसाठी आहे. परंतु दोन लाखाच्या आत नागरीक बेघर होत असतील तर हा विकास आराखडा काय कामाचा? या विकास आराखडयाला मी जाहिर विरोध करते. सातवा मुद्दा आपल्या शहराला तीन स्टेशन लागू आहेत, शहरातून दोन राज्य महामार्ग जातात, उल्हसनगर —४ आणि ५ हा ८० फुटाचा रस्ता सध्या अस्तित्वात झालेला आहे आणि काही रोडचे काम चालू आहेत. मग आपल्या शहराला रिंगरोडची आवश्यकता आहे का? महाराणा प्रताप ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक हा रोड ६० फुटाचा करण्यात यावा. या शहराचा विकास व्हावा परंतु गोरगरीबांचे नुकसान होणार नाही, याची खबरदारी व काळजी घ्यावी. माझ्या माहीती प्रमाणे या ठिकाणी बिल्डरच्या जागा आहे, या ठिकाणी रिंगरूट रोड या जागा ईपीमध्ये घेतलेल्या आहेत. म्हणजे हा प्लॅन बिल्डरच्या माहीतीसाठी बनवलेला आहे, असे आमच्या लक्षात आलेले आहे आणि या भुमिकेसाठी भारीप बहूजन महासंघाच्या नगरसेविका म्हणून पक्षातर्फे तिव्र विरोध करते आणि वेळ पडल्यास आम्ही रस्त्यावर उतरून तिव्र आंदोलन करू, धन्यवाद.

__सदस्या, श्रीम. जयश्री पाटील:—__ मा. महापौर, उप महापौर, आयुक्त साहेब, आम्हांला माहीती करून दया की, मुरबाड ते कल्याण रोड किती फुटाचा आणि खेमानी ते धोबीघाट किती फुटाचा? याची आम्हांला माहीती दया.

__सदस्य, श्री. भगवान भालेराव:—__ मुरबाड कल्याण रस्ता किती फुटाचा आहे आणि रिंगरोड किती फुटाचा आहे. त्यांची माहीती दया?

__कनिष्ठ अभियंता, श्री. कुमार जग्यासी:—__ १२० फुटाचा बनवणार आहे.

__सदस्या, श्रीम. जयश्री पाटील:—__ हा ८० फुटाचा आहे, याच्या अगोदर पण ३० ते ३५ वर्षापुर्वी लोकांचे भरपुर नुकसान झालेले आहे. रोड बनवतांना माझ्या वडीलांचे स्वत:चे दुकान रोडमध्ये गेलेले आहे. तर आता १२० फुटाचा होणार तर संपुर्ण जाणार. बरेच लोक याच्यामध्ये बेघर होणार आहेत. याच्या आधी पण गेलेले आहेत आणि जे वाचले आहेत, ते १२० फुटामध्ये संपुर्ण जाणार आहेत. तरी मी नम्र विनंती करते की, कमीत कमी ८० फुटाचा व्हायला पाहीजे.

__सदस्या, श्रीम. पुजा भोईर:—__ मा. महापौर, मॅडम, जो रिंगरोड १२० फुटाचा केला जाणार आहे, त्यामुळे लोक बेघर होणार आहेत, तर लोक जाणार कुठे? हा प्रश्न सर्वांना पडला आहे की राहणार कुठे आणि जाणार कुठे कृपया याचा खुलासा झाला पाहीजे.

__सदस्य, श्री. भगवान भालेराव:—__ मा. महापौर मॅडम, उप महापौर साहेब, आणि जग्यासी साहेबांना मी विनंती करतो की, त्यांनी स्टेजवर यावे. जग्यासी साहेब, आपला कल्याण —मुरबाड रस्ता नॅशनल हायवे आहे, आपल्या डी.पी. प्लॅनमध्ये तो २४ मिटर दाखवला आहे.

__कनिष्ठ अभियंता, श्री. कुमार जग्यासी:—__ सध्या १२० फुट ठेवण्यात आलेला आहे. त्याला एम.एच. २२२ सध्या म्हणतात.

__सदस्य, श्री. भगवान भालेराव:—__ म्हणजे २२२ बरोबर आहे, कल्याण —अंबरनाथ रस्ता किती फुटाचा आहे?

कनिष्ठ अभियंता, श्री. कुमार जग्यासी:— कल्याण—अंबरनाथ जो रस्ता ठेवला आहे, साईबाबा मंदिर ते राधास्वामी सत्संग आता मी कल्याणच्या दिशेने सांगतो, जिथे आपला साईबाबा मंदिर आहे. तिथून राधास्वामी सत्संग पर्यंत म्हणजे जो १२० फुट आहे ते पॅच आणि परत शांतीनगरच्या गेटपासून ते साईबाबा मंदिर पर्यंत १२० फुट, (३६ मिटर) म्हणजे जी मधली अट आहे, ते ३० मिटर ठेवण्यात आलेली आहे आणि जे जे शेवटचे टोक आहे, १२० फुट ठेवण्यात आले आहे.

सदस्य, श्री. भगवान भालेराव:— आणि कुर्ला कॅम्पमध्ये स्टेट हायवे आहे ना?

कनिष्ठ अभियंता, श्री. कुमार जग्यासी:— हा शासनाने निर्णय घेतलेला आहे.

सदस्य, श्री. भगवान भालेराव:— ओ जग्यासी साहेब, हा स्टेट हायवे आहे ना? हा नॅशनल हायवे आणि स्टेट हायवे, बरोबर.

कनिष्ठ अभियंता, श्री. कुमार जग्यासी:— बरोबर आहे.

सदस्य, श्री. भगवान भालेराव:— मग रिंगरूट कोणता आहे, उल्हासनगर शहरासाठी ३६ मिटर?

कनिष्ठ अभियंता, श्री. कुमार जग्यासी:— कसे आहे साहेब, हे निर्णय शासनाने घेतलेले आहे. आपण महासभेमध्ये त्याची रूंदी कमी करण्यासाठी दिनांक २८/४/ ला प्रस्ताव टाकला होता. परंतु शासनाने हे निर्णय स्वत: घेतलेले आहेत.

सदस्य, श्री. भगवान भालेराव:— मला हेच म्हणायचे आहे की,, १३ किलो मिटरच्या शहरामध्ये एवढी मोठी कोणती आवश्यकता आहे. ३६ मिटरचा रिंगरूट ठेवला पाहीजे, काय आवश्यकता वाटली पाहीजे.

कनिष्ठ अभियंता, श्री. कुमार जग्यासी:— महासभमध्ये दिनांक २८/४ मध्ये असा प्रस्तावीत आला होता की, त्याची रूंदी कमीत कमी १८ ते २४ मिटर करा. जो पर्यंत क्लस्टर येत नाही. परंतु शासनाने याच्यावर फायनल निर्णय ३६ मिटर दिला आहे.

सदस्य, श्री. भगवान भालेराव:— आता तुम्ही शांतीनगर सांगितले आहे, त्याच्यावर मी बोलतो, शांतीनगर ते साईबाबा मंदिर याच्या मधला अंतर किती दोन किलो मिटरच्या कमी आहे ना?

कनिष्ठ अभियंता, श्री. कुमार जग्यासी:— होय सर,

सदस्य, श्री. भगवान भालेराव:— मधले अंतर किती आहे?

कनिष्ठ अभियंता, श्री. कुमार जग्यासी:— मधले कमीत कमी ३ किलो मिटरचा आहे.

 या वेळी सदस्य, श्री. अजित गुप्ता हे सभागृहाच्या बाहेर गेले.

सदस्य, श्री. भगवान भालेराव:— २ किलो मिटरच्या आसपास असेल, तुम्ही मला सांगा की, इकडे रिंगरूट करणार मग शहराची परिस्थिती काय आहे? म्हणजे कुठे उतरणार लोक रिंगरूटवरून हे पुर्णपणे चुकीचे आहे, झोपडपट्टीतील्या उत्तर भारतीय व मराठी लोकांना संपवण्याचा हा कटकारस्थान आहे. त्यामुळे या रिंगरूटला आमचा पुर्णपणे विरोध आहे आणि तुम्हांला जर वाटत असेल, माझ्या माहीती प्रमाणे हा एक्सप्रेस हायवे हा बिर्ला कॉलेज पासून ते कांबा पर्यंत ओव्हर ब्रिज होणार आहे. तर तुम्ही रिंगरोड कशा पध्दतीने घेणार आहेत. ओव्हर ब्रिजला कनेक्ट करणार आहेत का? तुमच्या या डी.पी. प्लॉनमध्ये हा रस्ता बिर्ला कॉलेज पासून ते कांबा पर्यंत ओव्हर ब्रिज होणार आहे. मग कांबा वरून तुम्ही कनेक्ट करणार आहात का धोबी घाटवरून कनेक्ट करणार आहात? त्या रस्त्याला तुम्ही कुठे कनेक्ट करणार आहात? एक रस्ता शहाड ब्रिज वरून जातो, दुसरा रस्ता धोबीघाट वरून होतो, रिंगरोडचे दोन टोक, मग तुम्ही कुठे कनेक्ट करणार आहेत, तेवढे आम्हांला कळू दया. म्हणजे एकतर तुम्ही गरीब लोकांच्या मनामध्ये शंका निर्माण करतात, एक तर तुम्हाचाच प्लॉन तुम्हालाच माहीत नाही. काय चालले आहे, आता शासनाचे मुरबाडच्या रस्त्यासाठी, नॅशनल हावेसाठी साडे आठशे कोटी रूपये मंजूर झाले आहेत आणि आता ओव्हर ब्रिज होणार आहे. मग तुम्ही ३६ मिटरचा रिंगरोड कुठून काढणार आहेत. ब्रिजच्या खालून काढणार आहेत का? विशेष म्हणजे आम्हांला एक गोष्ट कळते, हा जो डी.पी. प्लॉन आहे, हा पुर्णपणे चुकीचा आहे. जसा आता त्यांनी शाळेचा मुद्दा उपस्थित केला, अशोकनगर शाळेच्या संदर्भातला त्या कब्रस्तानाचा मुद्दा असेल, जिथे लोकसंख्या आहे, तिथे तुम्ही डी.पी. प्लॉन व्यस्थितीत बसवतात. सगळया वेगवेगळया गोष्टी हया तुम्हांला प्रत्यक्षात माहीत आहेत आणि आम्हांला एकच गोष्ट कळायची आहे की, इथे प्रत्येक सगळया सदस्यांच्या भावना आहेत. आम्ही जो डी.पी. सर्वानुमते पारीत केला होता, सन २०१४ ला, तो डी.पी. जर लागू होत असेल, तर ही महासभा त्याला परवानगी देत आहे. जर सन २०१४ चा डी.पी. लागू होणार असेल तर. आपण त्याला सर्वानुमते पास केला होता आणि तो होत असेल तर, या डी.पी.ला आमचा तिव्र विरोध होत

आहे. पक्षाच्या वतीने पण आहे आणि नगरसेवक या नात्याने आम्ही सर्व सदस्यांच्या वतीने सांगतो की, या डी.पी. ला आमचा तिव्र विरोध आहे.

या वेळी सदस्य, श्री. अजित गुप्ता, यांनी सभागृहामध्ये पुन्हा प्रवेश केला.

<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारेः—</u> सन्माननिय महापौर, आयुक्त साहेब, संपुर्ण शहराचे या आजच्या बैठकीकडे, महासभेकडे लक्ष आहे. संपुर्ण शहराचे आज नागपूरवरून पालकमंत्र्याचे लक्ष आहे की, आज काय ठरते? त्यांनी शहरवासियांना शब्द दिले आहे की, आम्ही, शिवसेना तुमच्या बरोबर आहे, तुमच्यासाठी पालकमंत्री म्हणून यासाठी जे जे काही करावे लागेल, या शहरातील नागरीकांना उध्दवस्त होण्यापासून वाचवण्यासाठी ते ते करेल म्हणजे नागपुर पर्यंतचा, म्हणजे ते आज नागपूरवरून या ठिकाणी आले आहेत. मी संपुर्ण शहराला विनंती करतो की, एक तर लोकांच्या जीवनमरणाचा प्रश्न आहे. नोट बंदिच्या काळामध्ये जसे लोकांचे जीव गेले होते. तशाच प्रकारेचे जीव जाण्याची वेळ ही आता आलेली आहे. त्यामुळे हसून आणि मस्करी करून चालणार नाही. या शहराला वेळ देण्याची, विचार देण्याची आणि दिशा देण्याची वेळ आता आपल्या हातून निघून गेलेली आहे. ती शासनाने काढून घेतलेली आहे आणि आता शासन म्हणजे काय ते मी नक्की सांगेल तुम्हांला त्यामुळे कृपया गांर्भीय लक्षात घेऊन सर्व सदस्यांनी, पहीले शिवसेनेच्या सदस्यांनी दिले, नंतर विरोधी पक्षावाल्यांनी दिले, नंतर सत्ताधारी पक्षानी सुध्दा संमती दिली आहे. विचार झाला पाहीजे, चर्चा झाली पाहीजे. २६ चा सेक्शन, २८ चा सेक्शन, ३० चा सेक्शन, ३१ चा सेक्शन, सेक्शन ३७ चा आहे, ३८ चा आहे. सगळे सेक्शन आहेत पण या सभागृहाला माहीत नाही. मी संपूर्ण सभागृहाला सांगतो की, शासनाने आमच्या हातात काहीच ठेवले नाही. पंगू बनवून ठेवले आहे, अगोदर प्रशासनाने सर्वांना सांगितले की, आपण जे मॉडिफिकेशन करू ते पुर्ण सॅगशन करून आपण इकडे आण, मला वाटते की, सत्ताधारी पक्ष तेव्हा बरोबर होते, विरोधी पक्षाची भावना पण तीच होती. या ठिकाणावून

पाठविलेले मॉडिफिकेशन सॅगशन केलेले त्यानुसार इथे या शहराचा विकास होईल. जग्यासी मला प्रक्रिया सांगा आणि या शासन, शासन सोप आहे. शासनाकडे उल्हासनगर महानगरपालिकेच्या प्रशासनाच्या वतीने कोण होते? की, रिप्रेझेंट करणार होते. कारण सेप्ट कंपनीने अगोदरच गोडबंगाल केले होते. कोणाकडून काही तरी मलीदा घेऊन किंवा काही जास्त इंट्रेसने हा प्लॉन केला होता, हे संपुर्ण सभागृहाने तेव्हा मान्य केले. आमचे श्री. मनोज लासी असती, श्रीमती ज्योती भाभी असतील त्या सेप्ट कंपनीच्या शंकेची सुयी किंवा शंकेने पण अर्धे निश्चित झाले होते की, काही ठराविक लोकांचा त्यांनी इंट्रेस साध्य केला होता, नंतर मग जुना नकाशा घेतला होता, तिथे फक्त त्यांनी पेन्सील घेऊन रेषा मारल्या होत्या. अस्तित्वात असलेली बिल्डींग त्यांनी लक्षात घेतली नव्हती, मोकळा प्लॅट कुठला तो लक्षात घेतला नव्हता, बॅरेक, ब्लॉक्स, झोपडपट्टया कुठलाही विचार केला नव्हता. आताच भगवान भालेराव साहेबांनी सांगितले की, नॅशन हावे २२२, ३६ मिटरचा स्टेट हावे जो शहरामधून जातो, कल्याण ते कर्जत हा २४ मिटरचा आणि रिंगरोड हा ३६ मिटरचा हे त्यांनी प्रस्तावीत केले होते आणि नंतर त्या वेळेस सुध्दा संपुर्ण सभागृहाने सांगितले होते की, सेप्ट कंपनीने हा एका कॅबिनमध्ये बसून फक्त ठराविक लोक गेल्यानंतर त्यांचा इंट्रेस सर्व्ह केल्या नंतर, बाकी उल्हासनगर वासियांचा उल्हासनगर शहराला काय पाहीजे? जिथ येईल तिथे, मी तेव्हाही बोललो की, माझे मिनिट्स काढा जरा, त्या पहील्या मिटींगमध्ये माझे हेच शब्द होते की, या सेप्ट कंपनीने एका ऑफिसमध्ये बसून तयार केलेला, फक्त इंट्रेस्टेड ठराविक लोकांचा इंट्रेस सर्व्ह करण्यासाठी तयार केलेला डी.पी. प्लॉन आहे, त्या लोकांचा इंट्रेस झाला, बाकी त्यांना पाहीजे तशा रेषा मारल्या. परंतु तत्कालीन आयुक्तांनी आणि प्रशासनाने सांगितल्या नंतर त्या वेळेस सुध्दा आमच्याकडे पर्याय नव्हता. तो जर नकाशा आम्ही त्यावळेस मंजूरी देत नाही किंवा त्याला मॉडिफिकेशन करीत नाही, तर शासन आहे तसा लागू करणार होता, अशा प्रकारे बरोबर, तुम्हांला मान्य असेल तर लागू करा, आम्ही काही बोलत नाही. पण एक भूमिका स्पष्ट करा की, आज जो नकाशा मंजूर केलेला आहे, तो तुम्हांला मान्य आहे. कशा प्रकारे

अंमलबजावणी करायची शासनाचे अधीन असतील, कोणाचे असतील ते मान्य करा. पण आम्हांला आमची भुमिका घेऊ दया. त्या वेळेस एक सेप्ट कंपनीचा कोणी धवल म्हणून अधिकारी होता, तो इथे स्पष्टीकरण पण देत नव्हता. नगरसेवकांनी विचारलेल्या प्रश्नाचे तांत्रीक किवा टेक्नीकल एक्सपर्ट म्हणून ज्या कंपनीकडे आम्ही ठेका दिला होता, सन २०११ ला तो इथ स्पष्ट करू शकत नव्हता की, हा नकाशा कुठला आहे. इतर आरक्षण कोणते ठेवलेले आहते, ते सांगू शकत नव्हता. पण नंतर ३९ वर्षानंतर, ४० वर्षानंतर डेव्हलपमेंट प्लॅन येतो, सभागृहासह संपुर्ण उल्हासनगर आनंदीत होते. कुठे तरी दिशा येईल आणि त्यांनी केलेल्या चुका सुधारणा करून आम्हांला सरकारकडे प्रस्तावीत करायचे होते, कारण सरकार आमचे ऐकेल, अशी भावना होती. त्यांचा वेडेपणा होता. प्रशासनामध्ये ज्यावेळी मला वाटते की, श्री. बालाजी खतगांवकर होते आणि श्री. होगे पाटील नगररचनाकार होते, त्यांनी आम्हांला आश्वासन दिले होते की, नाही असेच होणार आहे, पण तसे झाले नाही. अशी वस्तूस्थिती आहे. जग्यासी साहेब, प्रोसेसर कशी आहे, डेव्हलपमेंट प्लॅन मंजूर करतांना एखादया कंपनीची नेमणूक केली आहे, त्याने पहीले काय केले पाहीजे रिव्हॅल्य बरोबर झाले नाही, अशी संपुर्ण सभागृहाची भावना होती, तेव्हा आरोप पण झाले होते की, एकझिसटींग लॅन्डवेज नकाशा तयारच केला नाही किंवा तयार केला त्याचा विचारच केला नाही, बरोबर आहे ना? रिव्हॅल्यु एकझिसटींग लॅन्डवेज, बरोबर, आता एकझिसटींग लॅन्डवेज तो विचार केला नाही म्हणून पाहीजे तिकडे, ओपन जागेवर त्यांनी आर. झोन टाकले होते आणि ज्या झोपडपट्टया आहेत, ब्लॉक्स आहेत, बॅरेक आहेत, इमारती आहेत, एक इमरतीचे मी तुम्हांला उदाहरण देतो की,पेन्शील फॅक्टरी ते स्टेशन असा २४ मिटरचा रोड काढला, तो रोड करतांना त्या ठिकाणी जवळपास १२ ते १३ इमारती आहेत. गर्व्हनर बिल्ट ऑफ प्रॉपर्टीस आहेत, ब्लॉक आहेत, बॅरेक आहेत, त्याच्या बाजूला असलेला एकझिसटींग रोड त्याचा विचार केला नाही, नविन रोड प्रस्तावीत केला. असे ब—याच ठिकाणी झाले एकझिसटींग रोडचा विचारच केला नाही. एकझिसटींग रोडचा विचार केला, पण त्यांना पाहीजे होता, तसा केला. त्याच्यावर तेव्हाही

आरोप झाले होते, मी आज पण बोलत आहे. एकझिसटींग लॅन्डवेज त्याचा विचार केला नाही. सन १९७४ ला जो रिंगरोड होता, त्यावेळस तेवढया झोपडपट्‌टया नव्हत्या. साहेब, त्यावेळेस ओपन लॅन्ड होते, आम्ही बोलतो, शासनाच्या हातामध्ये काय तेवढे माहीत आहे? तुम्ही सांगितले की सॅगेशन मॉडिफिकेशनवर आम्ही बोलू शकत नाही आणि ईपी, ईपीवर बोलून सुध्दा काय होणार आहे? जे या पुर्वी झाले तेच, मी तुम्हांला सांगतो, शासन, शासन म्हणजे काय? बरे महानगरपालिकेतर्फे शासनाने कोणाची मदत, किंवा टेक्नीकल असोशियशन  घेतले होते का? शासन म्हणजे कोणी तरी अधिकारी असणार.

कनिष्ठ अभियंता, श्री. कुमार जग्यासी:— ३० पर्यंत पुर्ण प्रस्ताव शासनाकडे पाठवतात. त्या नंतर त्याच्याकडे सदस्य, श्री. धनंजय बोडारे:— स्वतंत्र कमिटी असते,

कनिष्ठ अभियंता, श्री. कुमार जग्यासी:— महानगरपालिकेचे अधिकारी तिथे जावू शकत नाही, स्वतंत्र कमिटी असते.

सदस्य, श्री. धनंजय बोडारे:— उल्हासनगर महानगरपालिकेच्या कुठल्याही अधिका—यांनी टेक्नीकरल असोशियशन घेतले नाही की, हा प्लॉट कशासाठी, हा प्लॉट कसा आहे, त्या ठिकाणची वस्तुस्थिती कशी आहे, याचा विचार केला नाही. मजेशिर बात आहे. सेप्ट कंपनीने अहमादाबादला बसून जो प्लॉन तयार केला, त्याच्यामध्ये मॉडिफिकेशनसाठी उल्हासनगरमध्ये आल्या नंतर त्याच्यावर आरोप झाले. क्लस्टर डेव्हलपमेंट येणार, शहर विकास होणार, या नावाखाली जर केला नाही तर शासन असेच मंजूरी देईल. आपण त्यावेळेस मंजूरी दिलेली आहे. साहेब, शासन म्हणजे काय? शासन गॅझेट काढते, जसे बिल्डरांना सोयीस्कर असते तसे, कधी सी.आर. ५०० मिटरचा तर कधी १०० मिटरचा, जर कब्रस्थानचा विषय आहे, जे श्रीमती रगडे ताईनी स्पष्ट केले, श्री. चौधरी यांनी सांगितले की, साईट नंबर ५० या ठिकाणी एकेकाळी शासनाने पत्र दिलेले आहे की, नो मॅन लॅन्ड तिथे माणूस राहू शकत नाही, जाऊ शकत नाही, कब्रस्थानचा विषय आला होता. शमशानभुमी, मुस्लिमांना कब्रस्थान दयायचे होते तर, शासनाचे एक पत्र आले होते, नो

मॅनस लॅन्ड, पोलिसांचा रिपोर्ट आहे, सांगायचे की शासन आहे, इथे महानगरपालिकेच्या कुठल्याही अधिका—याची , अधिकारी म्हणून माहीती घेतली नाही की, उल्हासनगरची परिस्थिती कशी आहे, सेप्ट कंपनीवर विश्वास ठेवलेला आहे. माझा मुळ मुद्दा काय आहे? की, सेप्ट कंपनीने केलेला नकाशा कसा चुकीचा होता? त्यामध्ये उल्हासनगर महानगरपालिकेत ज्या सभागृहाच्या त्यांनी दिलेली सुचना, त्यांनी घेतलेल्या हरकती, लोकांचा विचार करून सेप्ट कंपनीने त्याचा विचार केला नाही. म्हणजे पुन्हा तसेच जर त्यामध्ये महानगरपालिकेच्या अधिका—यांचा सल्ला घेतला असता, सल्ला घेतला नाही अजिबात, सल्ला घेतला नाही आयुक्त, किंवा टेक्नीकल नगररचनाकार, नगररचनाकार गेल्या दोन वर्षा पासून नाहीत आणि होते ते उपयोगाचे नव्हते. कारण ते शहरासाठी काम करीत नव्हते, फक्त ठराविक लोकांसाठीच करीत होते. म्हणजे नगररनाकार नव्हते, कुठल्या तरी चेंबमध्ये बसून म्हणजे अहमादाबादमध्ये तयार केलेला नकाशा, जसेच्या तसाच त्यांनी मंजूर केलेला आहे. त्यांनी केलेल्या नकाशा आणि त्याच्यामध्ये सुधारणा केली तर शहर विकासाच्या दृष्टीने, ओपन प्लॉट होते, तिथे आरक्षण टाकले होते, तिथे झोपडपट्टया होत्या कमीत कमी उध्दवस्त कशा होतील. त्यांच्या पुर्नवसनाचा विचार केला होता. व्यापारी उध्वस्त होणार नाहीत, सिंधी भाषी निर्वाशित होणार नाहीत, परत असे सर्वांचा विचार करून जो नकाशा मंजूर केला होता, तो पुन्हा शासनामध्ये बसलेल्या अधिकारी, ज्यांनी पत्र दिले होते की, नो मॅनस लॅन्ड पुन्हा त्या पत्राचे काय झाले ते माहीत नाहीत. ते मंजूर होतात आणि तिथे मोठमोठे टावर होत आहेत. प्रशासन, त्या शासनाचा असा प्रकारचा आदेश जो उल्हासनगर वासियांना उध्दवस्त करणार आहे, तो आम्ही स्विकारायचा? कोण सुखी आहे, यामध्ये? नंतर विचारले होते, अधिकारी सुध्दा संभ्रमात होते की, अशा प्रकारचा प्लॉन आलाच कसा?

<u>सदस्य, श्री. राजेश वानखेडे:—</u> आबा आपण विरोध करायचा आहे.

सदस्य, श्री. धनंजय बोडारे:– विरोध आहे ना? नुसता विरोध करून चालणार नाही, जर यात शासनाने मस्ती केली, शासन म्हणजे शासकिय अधिकारी असणार, अशाच प्रकारचे लागू जर केला तर त्यासाठी वाटेल ते करावे लागेल. उल्हासनगर वासियांनी तयारी ठेवा.

सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:– तयारी आहे, तयारी आहे.

सदस्य, श्री. धनंजय बोडारे:– संपुर्ण सभागृहाची भावना लक्षात घेऊन, महापौर मॅडम, तुम्ही बोललात मी करील, १२० फुटाचा रिंगरोड तुम्ही रद्द करणार आहेत का? इथे प्रदिप रामचंदानी किंवा जमनादास पुरस्वानी आता या ठिकानी त्यांनी आश्वासन दयावे की, ते आम्ही रद्द करतो, आम्ही तुम्हांला पाठिंबा देतो. १२० फुटाचा रिंगरोड रद्द करणार का? जे रस्ते, बिल्डींगवरून, ब्लॉकस वरून, बॅरेकस वरून, झोपडपट्टी वरून रस्ते गेले आहेत, ते रद्द करू शकतात का? माईनरमध्ये ३७ मध्ये माझा अनुभव आहे, माईनर मॉडिफिकेशनमध्ये आता पर्यंत पाठवलेले प्रस्ताव, मग तो व्हि.टी.सी. ग्राउंडचा असुदे किंवा इतर कोणताही मिनाताई ठाकरे नगरचा असूदे, अगदी हॉस्पिटलसाठी आम्ही पाठविलेला प्रस्ताव दहा–दहा वर्षा पासून परत आला आहे. तर सॅगशन मॉडिफिकेशनचे माईनर मॉडिफिकेशनमध्ये रूपांतर होऊच शकत नाही, तुम्हांला खात्री आहे आणि ईपीमध्ये तुम्ही सांगितले की, ईपीमध्ये काही चर्चा करा आणि ईपी सरळच्या सरळ काढले, तरी तिथे बसलेले अधिकारी त्यांच्याकडे जातील आणि त्यांचेच ईपी रद्द होतील, बाकीच्यांचे रद्द होणार नाहीत. ते जसेच्या तसेच राहतील. मला सांगा महासभेने जो सेप्ट कंपनीकडून नकाशा प्रस्तावीत झाल्या नंतर लोकांच्या तक्रारी प्राप्त झाल्या नंतर १७ हजार तक्रारी प्राप्त झाल्या होत्या, त्याच्या पैकी किती सुधारणा केल्या आपण ६९५, त्या पैकी किती विचारात घेतल्या,९५ टक्के नाकारल्या म्हणजे जे महासभेचे पदाधिकारी, तज्ञ समिती जी सहा लोकांची होती, तीन एक्सपर्ट आणि तीन सदस्य, सदस्य यासाठी असतात की, उल्हासनगरची भोगोलिक परिस्थिती त्यांना माहीत असते आणि टेक्नीकल असिस्टंट एक्सपर्ट असतात. त्यांच्याकडून आलेले प्रस्ताव, त्यात महानगरपालिकेने एकत्रित केले, त्यात असा एकही ५ टक्के केले.

त्यात सांगतो कुठले ५ टक्के केले, जसे की, तिकडचे कब्रस्थान इकडे आणायचे बरोबर ना, एखादे मैदान अर्जंट करायचे अशा प्रकारचे म्हणजे बिल्डरांना हितकारक असलेले ५ टक्के बाकीचे एकही प्रस्ताव मंजूर केलेले नाही. एकही हरकती, सुचना विचारात घेतल्या नाहीत. म्हणजेच पुन्हा सेप्ट कंपनीने अहमदाबादला बसून काही बिल्डरांच्या हितासाठी केलेला प्रस्ताव, या शासनाच्या एका अधिका—यांने तो मंजूर केलेला आहे. असा प्रस्ताव तुम्ही या ठिकाणाी मंजूर करणार आहेत का? मान्य करणार आहेत का? असा शहराला उध्दवस्त करणारा नकाशा आम्ही त्याचा तीव्र शब्दात निषेध करतो, पालकमंत्र्यानी आश्वासन दिलेले आहे की, आम्ही शहरवासियांच्या बरोबर आहे, मा. श्री. एकनाथ शिंदे साहेबांनी, खासदारांनी, सर्व सत्ताधारी, विरोधी पक्षांनी एकत्र येवून अशा विनाशक डी.पी. चा आपण विरोध करू या, ईपी आपल्या हातात, शासनाने काही ठेवले नाही. हा रद्द करण्यासाठी सर्वांनी दुसरा काही पर्याय नाही. हा पुर्णपणे रद्द झाला पाहीजे किंवा....

या वेळी सदस्य, श्री. गजानन शेळके सभागृहातून बाहेर गेले.

<u>सदस्य, श्री. शंकर लुंडः—</u> सत्ताधारी असो किंवा विरोधी पक्ष पण हा शहराचा विषय आहे.

<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारेः—</u> शहराचा विषय आहे, शहराचा विषय आहे, म्हणून सर्वांनी मिळून करायला पाहीजे, कारण की, हे सेप्ट कंपनीने तयार केलेला आहे. ईपी म्हणजे एक्सक्लुडेड पोर्शन, त्यांनी पोर्शन पार्ट केले आहेत. त्याचे पार्शन करा किंवा पार्ट करा, मी तर पोर्शनच बोलतो, याच्या विरोध आहे, यासाठी जो पर्यंत हा डेव्हलपमेंट प्लॅन शिफारसीसह नाही तर सेक्शन २८ मध्ये आम्ही ठराव क्रमांक ४१ दिनांक १७/१/१४ हा आहे तसा मंजूर करीत नाहीत किंवा मंजूर केल्या नंतर जाहिर करीत नाहीत, तो पर्यंत उल्हासनगरवासी गप्प बसणार नाहीत, तो पर्यंत आंदोलने आणि बाकीचे प्रकार चालत राहतील अशी मी सुचना देतो. हा वेगळा पार्ट झाला कारण पब्लिकच्या भावना आहेत. याच्या विरोधासाठी जो आम्ही मंजूर

केला आहे, दिनांक १७/१/२०१४ त्या वेळी उप महापौर, मला वाटते की, जमनादास होते. त्यांनी सुरूवातीलाच विरोध केला होता, श्री. मनोज लासी यांनी सुध्दा विरोध केला होता, सर्वांनी विरोध केला होता आणि सर्वांच्या सहमतीने दिनांक १४/१/२१४ ला विरोध केला होता. क्लस्टर व्हिथ ४ एफ.एस. आय. व्हिथ रिडेव्हलपमेंट, झोपडपट्टी पुर्नविकास जे रस्त्यामध्ये बाधित होतील, जे रस्ते आम्ही प्रस्तावीत केले होते, त्यांच्या पुर्नवसनाचे पुर्ण नियोजन त्याच्या बरोबरच प्रस्ताव मंजूर करून पाठवला होता, त्याच बरोबर जो रिंगरोड होता, अॅज इट इज जो अलायमेंट आहे, एकझीसटींग अलाईनमेंट लक्षात घेऊन १८ मिटर किंवा २४ मिटर जिथे १८ मिटर आहे, तिथे कमीत कमी लोकांसाठी, परंतु आपल्याकडे जागा आहे का? १३ किलो मिटरमध्ये ३६ मिटरचा रिंगरोड, नॅशनल हावे ३६ मिटर, रिंगरोड ३६ मिटर पटेलच कसे? म्हणजे कॅबिनमध्ये बसून प्लॅन तयार केलेला आहे. त्याचा विचारच केला नाही, जर नॅशन हावे, ३६ मिटरचा असेल तर रिंगरोड कुठल्या हिशोबाने ३६ मिटरचा धरला आहे. १३ किलो मिटरवर लोक राहतात किती? नागपूर सारख्या शहराला १०० फुटाचा रिंगरोड आहे. नागपुरचा एरिया किती मोठा त्याची लोकसंख्या किती व उल्हासनगरची लोकसंख्या किती? दुस–या बाजूला आपण हायटेक सिटीचे शहर आम्ही बोलतो, फक्त १३ स्केआर किलो मिटरचे, या १३ स्केअर मिटरच्या शहरामध्ये ४० टक्के आरक्षण आणि रस्ते, १३ स्केअर मिटरच्या शहरामध्ये ४० टक्याच्या वर दिलेले आहे, ५५ टक्के मध्ये, म्हणजे १३ मधले ४५ टक्के गेले, ८ किलो मिटरमध्ये जवळपास १० लाख लोक राहणार आहेत आणि हा डेव्हलपमेंट प्लॅन पुढच्या ३५ वर्षे साठी आहे, म्हणजे तेव्हा आमची जनता किती होणार आहे. हे सगळे शक्य होणार आहे का? सुरूवातीलाच म्हणटले होते की, स्वप्नवादी आहे. स्वप्न साकार झाले पाहीजे. हा डेव्हलपमेंट पहीलाच होता आणि त्याची पुनरावृत्ती आता झाली आहे. म्हणून शासनाला तीव्र शब्दामध्ये कळवले पाहीजे की, अशा प्रकारची थट्टा, अशा प्रकारची मस्करी कुठल्याही शहराच्या नागरीकां बरोबर होता कामा नये? मुख्यमंत्री महोदयांना सांगितले पाहीजे की, अशा प्रकारेचे वेस्टेज इंट्रेससचे अधिकारी ते फक्त कंपनी

किंवा भुमाफिया किंवा विकासक शहराच्या सर्वसामान्य नागरीकांचा विचार करणारे जर अधिकारी नसतील तर असे अधिकारी हे कुचकामी आहेत. सरकारच्या विरोधातले आहेत आणि नागरीकांच्या विरोधातले आहेत. त्यांच्यावर कारवाई झाली पाहीजे सेप्ट सारखी कंपनी पुन्हा अशा प्रकारचा डेव्हलपमेंट प्लॅन न करण्यासाठी त्यांना ब्लॅक लिस्ट करावे, जेणेकरून अशा प्रकारचे लोकांचे आता नुकसान झालेले आहे, पाच वर्षे आम्ही या शहराच्या डेव्हलपमेंट प्लॅनच्या प्रतिक्षेत होतो. सन २००९ पासून सन २०१७ पर्यंत आठ वर्षे त्या प्रोसेसमध्ये गेले. एका सेप्ट कंपनीच्या, मी सुरूवातीलाच सांगितले आहे की, त्यांना टेक्नीकल नॉलेज काहीच नव्हते. हा रद्द करण्यासाठी शिफारस करावी आणि सेक्शन २८ मध्ये दिनांक १७/१/१४ ला ठराव क्रमांक ४१ नुसार शिफारसीसह नागरीकांच्या, सभागृहाच्या शिफारसीसह जो प्रस्ताव पाठवला आहे, डी.सी. रूलसह एफ.एस. आय. चार झाले, याच्यामध्ये काहीच नाही. एका बाजूला ना क्लस्टर डेव्हलपमेंट आहे ना पुर्नविकास आहे, इमारतींचा विकास किती तरी इमारती आमच्या तशाच पडून आहेत. ४ नंबरचा रस्ता ६० फुट झालेला आहे. रस्त्यावर गार्डन, जो आता वाणिज्य वापर तिथे गार्डन, नेहरू चौक ते शिरू चौक बसस्टॉप, ८० फुट पुढे काय करणार त्यांचे, बर त्यांचे पुनर्वसन करणार तही अंतर्भुत नाही कसे करणार आहेत, काही नाही एक आयुक्त सोडून गेले, दुसरे आयुक्त आले तुम्ही काय करणार, काही नाही. अशा प्रकारची टांगती तलवार शहराच्या नागरीकांवर आम्ही ठेवू इच्छित नाही. त्यामुळे याचा तिव्र शब्दात विरोध करतो आणि जो ठराव देत आहे, तर महापौर महोदया, आपण स्वत: जातीने मा. मुख्यमंत्री महोदयांना भेटून उप महापौर आपण सुध्दा, आपण सुध्दा मा. मुख्यमंत्री महोदयांना भेटून शहरातील नागरीकांच्या भावना त्या ठिकाणी व्यक्त कराव्यात आणि हा रद्द होऊन, जे आम्ही मंजूर केलेले आहे, तो मंजूर केलेला डेव्हलपमेंट प्लॅन शहराच्या हितासाठी आणि शहराला वेगळा आकार देता येईल, अशी माझी विनंती आहे, धन्यवाद.

**या** सदस्य, श्री. गजानन शेळके यांनी सभागृहामध्ये पुन्हा प्रवेश केला.

सदस्य, श्री. डॉ. प्रकाश नाथानी:— मा. महापौर, मा. उप महापौरजी, आयुक्त साहेब, मी डी.पी. प्लॅनच्या विषयी बोलायचे आहे की.......

काही सदस्य, एकत्रित बोलत असल्यामुळे कोण काय बोलत होते ते समजून आले नाही.

सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:— तुम्ही काय करणार आहेत? ३७ नुसार मंजूर करणार आहेत का?

सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:— हे बघा जर आपण इथे ईपी ३७ च्या हिशोबान पास केले नाही तर ते लोक त्यांच्या हिशोबाने करीत आहेत. परंतु एक प्रत महासभेकडून जाते, ३७ च्या ईपी मध्ये बदल झाला पाहीजे.

सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:— काहीच होणार नाही.

सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:— १०० टक्के होणार. ३७ मध्ये होणार नाही, परंतु ईपीमध्ये होईल.

सदस्य, श्री. डॉ. प्रकाश नाथानी:— मला शहरा विषयी विचार करायचा आहे, राजकारण करायचे नाही, कारण असे होईल माझे काहीच नाही, मी दवाखाना चालवेल परंतु शहर उद्धवस्त होईल. माझे वडील सन १९७४ मध्ये जसे रोडवर झोपले होते, त्यांचा मुंत्यू झाला. शहर परत उध्दवस्त होईल, मी तुम्हांला हात जोडून पाया पडून विनंती करतो की, कृपया करून माझे म्हणणे ऐका तत्कालीन आयुक्तांनी सांगितले होते की, शहराचे काहीच होणार नाही. खुप आश्वासने दिली होती, आपल्या महासभेमध्ये खुप मिटींग झाल्या होत्या. रोड शो झाले होते, टाऊन हॉलमध्ये मिटींगी झाल्या होत्या. इतिहासमध्ये पहीलाच असा डी.पी. प्लॅन होता, त्यावेळी माझी धर्मपत्नी नगरसेविका होत्या, त्यांनी त्या वेळी आयुक्तांना डी.पी.प्लॅन पास करून दिला नाही, सांगितले होते हा विनाशकारी डी. पी. प्लॅन आहे. त्यासाठी त्यांनी सांगितले होते की, यामध्ये ४ नंबरमध्ये, लुंड मॅडमच्या वार्डामध्ये रोड बनवतांना जिथे बंगले होते, बिल्डींग होत्या तिथून आरक्षण दाखवले होते. सेप्ट कंपनीने हा प्लॅन घरामध्ये बसून बनवला होता. जर कोणी बनवत असेल तर

टेलिफोनच्या वायर तुटतात. आपण डी.पी. प्लॅनला मान्यता दिली, आम्ही खुप आनंदीत होती की, १७ हजार ऑब्जेक्शन आले आहेत. मिटींगमध्ये मा. सदस्य, वगळेच होते, सदस्यांमध्ये कोणी सत्तापक्षामध्ये असतील तर कोणी विरोधी पक्षामध्ये असतील. श्री. बोडारे साहेब पण आपल्या बरोबर आहेत आणि दुसरे लोक पण आमच्या बरोबर होते. साई पार्टी पण आपल्या बरोबर होती, आम्ही कधीच एक दुस—याच्या विरोधात राहीलो नाही. शहरासाठी विचार केला की, शहराचा चांगला विकास होईल. आयुक्त, श्री. बालाजी खतगांवकर यांनी टाऊन हॉलमध्ये खुप मोठे भाषण दिले होते. आमचे आमदार श्री. पप्पू कालानी यांनी भाषण दिले, आणि अजून दोन आमदार, श्री. बालाजी किणीकर व श्री. कुमार आयलानी यांनी सुध्दा भाषण केले आणि सांगितले की, चिंता करण्याची काहीच गरज नाही, १०० फुटाचा रोड, ८० फुटाचा करू आणि ते झाले नाही. आज कल्याण —अंबरनाथ रोडच्या बाजूची दुकाने तोडली गेली पण त्यांना बनवायची परवानगी मिळाली नाही. आता रिंगरोड बनवणार आणि शहराचे इंटरनल रोड बदल करणार, जेव्हा २० फुटाचे रोड होते, तेव्हा लोकांना हात—पाय जोडून, विनंती करून तेव्हा एकझीसटींग नव्हते, त्या वेळी रोड बनवले होते आणि जेव्हा आम्ही पाकिस्तानमधून आलो होतो, तेव्हा आम्ही रोड बनवले होते. रोड चालण्यासाठी बनवले, गाडी चालवण्यासाठी बनवले नव्हते, तर चालण्यासाठी बनवले होते. हात—पाय जोडून २० फुटाचा बनवला आणि आता २४ मिटरचा दिला आहे. परंतु आता काय तिथे मेट्रो रेल्वे चालणार आहे का? काय चालणार आहे, मला तर काहीच समजत नाही, आज सर्व दुकाने, घरे तुटणार आहेत आणि लोक बेघर होणार आहेत. ते कुठे जातील. आपण पहीले कल्याण—अंबरनाथ रोडच्या बाबतीत लोकांना काहीच दिले नाही. आता १२० फुटाच्या रोडमुळे किती दुकाने, घरे, झोपडया तुटतील, किती तरी पान टप—या तुटतील आणि बाधीत होणारे लोक कुठे जातील. परंतु या सेफ कंपनीचा जो डी.पी. आहे, तो दोन दिवसापुर्वी माझ्या हातामध्ये होता. मी त्याचा अभ्यास केला होता, आयुक्त साहेब, आपण जर त्या वेळेचे इतिवृत्त बघितले तर सर्वात जास्त माझ्या धर्मपत्नी या डी.पी. प्लॅनवर बोलल्या होत्या. जे शहराच्या

विकासाठी विचार करतात, ते जास्त राजकारण करीत नाहीत. कारण की, आम्ही गरीब लोक आहेत, आम्ही फुटपाथवर झोपलो आहेत. रिफ्युज कॅम्पमध्ये आम्ही रोडवर झोपून हे शहर बनवला आहे. आमचे गरीब लोक झोपडपट्टीमध्ये राहत आहेत. जर या डी.पी. प्लॅनमुळे ते उध्दवस्त होतील, मला तर परत पाकिस्तानाला जावे लागेल, परंतु हे गरीब लोक कुठे जातील. मला माहीत नाही. मला वाटते की, हा डी. पी. प्लॅन कोणी बनवला, कोणाला पावर होती. आपल्याला तर माहीत आहे की, ज्यांनी बनवला होता, त्यामध्ये सात लोकांची टीम होती. सेक्शन २८ मध्ये एक्सपर्ट कमिटी बसते, त्यामध्ये नगररचनाकार असतात, डायरेक्टर ऑफ नगररचनाकार असतात आणि तीन लोकल सदस्य असतात. मला वाटते की, त्यांचे पद काय होते? एक्स डायरेक्टर ऑफ टाऊन प्लॅनर, दुसरे होते, चिफ प्लानर ऑफ एम.एम.आर.डी. ए. आणि तिसरे होते प्रदुषण विभागाचे इंजिनियर, एक्सफर्ट फॉर क्लस्टर हे चार होते आणि बाकीचे तीन सदस्यांचे त्यांनी ऐकले नाही. या एक्सफर्ट कमिटीने चांगले रिपोर्ट दिले आहेत. १७ हजार ऑब्जेक्शन आले आहेत, आणि काय झाले फक्त ५ टक्के पास झाले. मी सांगतो की ते ५ टक्के पास झालेच नाहीत तर ते डीफॉल्ट झाले आहेत. फक्त नाईलाजाने ते ५ टक्के पास केले आहेत. आयुक्त साहेब, मी हात जोडून विनंती करतो की, आपण दोन वर्षानंतर इथून बदली होऊन निघून जाल आणि दुसरे आयुक्त, येतील परंतु आम्हाला इथेच जगायचे आहे आणि इथेच मरायचे आहे. सभागृहामध्ये बसलेले नगरसेवक आहेत, ते निवडून आलेले आहेत, ते उद्या निवडून येतील किंवा नाही, मला माहीत नाही. मी सुध्दा नंतर निवडून येईलच मला माहीत नाही. मला जगायचे इथेच आहे, मला भरपूर रूग्न येऊन विचारत असतात, साहेब, काय होईल, माझे ब्लडपेशन चेक करा, साहेब, या शहराचे काय होईल. माझे वडील, रडून रडून मरून गेले, काय होईल या शहराचे, आपण १२० फुटाचे मोठमोठे रोड दिले आहेत, आपण थोडे अनुमान लावा, माणुसकीच्या नात्याने थोडा विचार करा. मी असे सांगत नाही की, शहराचा विकास झाला नाही पाहीजे, परंतु मला वाटते की, कुणाचे नुकासान करून शहराचा विकास झाला पाहीजे असे नको आहे. लोकांना

वाटले की, क्लस्टर येईल, क्लस्टर येईल, परंतु क्लस्टरचा अर्थच कोणाला माहीत नाही. मी सांगतो, मला जेवढे माहीत आहे, तेवढे मी तुम्हांला सांगतो. क्लस्टर इथे असा आहे,की, जेवढया बिल्डींग पडल्या आहेत, क्लस्टरच्या योजनेमध्ये राणी मॉ, गुडमॅन कॉटेज, सन्मुख सदन, शीश महल, जेव्हा शीशमहलच्या मागच्या आणि पुढच्या चार बिल्डींग पडतील तेव्हाच क्लस्टर बनेल. तो पर्यत शहर उध्दवस्त होऊन जाईल. आपण लोक हसा..हसा..

<u>सदस्य, श्री. अरूण आशानः—</u> आयुक्त साहेब, खुप महत्वाचे आहे. डॉ. साहेब, आपण बोला कोणी हसणार नाही. जे हसतात ते उल्हासनगरचे राहणारे नाहीत.

<u>सदस्य, श्री. डॉ. प्रकाश नाथानीः—</u> मी हात जोडून विनंती करतो सर, मला वाटते की, मी हे शहर सोडून निघून जाऊ. आपण बोलाल की, हे सभागृह सोडून जा, तर मी शहर सोडून जाईल. परंतु या शहराला मी तुटून देणार नाही. या शहराला मा. आयुक्त, श्री. चंद्रशेखर साहेबांच्या वेळेस १६ रोड बनवायला दिले होते. त्यावेळेस नेहरू चौकचे तुटले होते, उल्हासनगर स्टेशनचे तुटले होते, परंतु काय झाले, उल्हासनगरचे रिक्षा नगर झाले. हे शहर संपुर्ण नियमानुसारच होईल. अमन टॉकीज जवळचा सर्वात छोटा रोड आहे. तरी सुध्दा तिथे ट्राफिक जॉम होत नाही. यासाठी मी महापौरांना धन्यवाद देतो की, हा लहान रस्ता आहे, परंतु कधी ट्रॉफिक जॉम झाली नाही. या छोटया रस्त्याला आपण प्लॉनिंगनुसार बनवले आहे. आपल्याला नमस्कार करतो, साहेब हसू नका? मी आपल्याला धन्यवाद देतो. सर हे निर्वासितांचे शहर आहे, निर्वासितासाठी अध्यादेश आले, अध्यादेश का आले? गव्हर्नर साहेबांनी अध्यादेश का दिले? त्यांनी विचार केला की, हे गरीब लोक आहे आणि गरीब लोकांसाठीच अध्यादेश येत असतो. हा डी.पी. प्लॉन कोणाच्याही कामाचा नाही, प्रसिध्द होण्याच्या पहीलेच ऑब्जेक्शन घेतले होते. साहेब, माझा इंटरनल रोड आहे, ईटरनल रोड ३० फुटाचा आहे, त्याला आपण २४ मिटरचा केला आहे. त्याचा नंबर आहे, एम.एम. २७ बी. सर आपल्याला पॉवरस आहेत, जर आपण पावरचा वापर कराल परंतु आपण किती दिवस राहणार, आपण एक वर्ष, दोन वर्ष राहाल आणि नंतर बदली होऊन इथून निघून जाल. जसे श्री. बालाजी खतगांवकर साहेबांनी छाती ठोकपणे सांगितले होते, माझ्या जवळ व्हीडीओ क्लिपस आहेत, परंतु साहेब, एक आयुक्त येतात, दुसरे निघून जातात. आता १२० रिंगरोडमध्ये दुकाने तुटतील, घरे तुटून जातील, परत कोणी तरी आयुक्त येतील, ते सांगतील की, आपण घर बनवण्यासाठी सरकारकडून परवानगी घेऊन या, माझे घर तुटून गेले फक्त पाच वॉल शिल्लक राहीले, मी ते पाच वॉलची जमीन घेऊन कुठे जाणार, मला

अंबरनाथमध्ये टी.डी.आर मिळेल की, उल्हासनगरमध्ये टी.डी.आर. मिळेल, काहीच मिळणार नाही, मी रस्त्यावर येऊन जाईल. मी आपल्यांना विनंती करतो की, जेवढे पण ईटरनल रोड आहेत, आपण जे आश्वासन दिले आहे, तत्कालीन तीन महीन्या आतमध्ये ३७ वन मध्ये आपण आम्हांला सहकार्य करा, महापौरांचे पण सहकार्य असले आणि आमदारांचे पण सहकार्य राहील आणि डी.पी.प्लॉन आपण शासनाकडून पास करून घेऊन येवू.

सदस्य, श्री. अरूण आशानः— डॉक्टर आपण बोला. महापौर मॅडम डॉक्टर साहेबांचा विषय आहे.

महापौर तथा पिठासिन अधिकारीः— अरूणजी, डॉक्टर साहेबांना, पुर्ण करू दया. डॉक्टर यु कॅन कंन्टन्यु

सदस्य, श्री. डॉ. प्रकाश नाथानीः— महापौरजी, सात तज्ञ जे टाऊन प्लॉनिंगमध्ये होते, नगररचनाकार होते, डायरेक्टर ऑफ नगररचनाकार, एक्स डायरेक्टर ऑफ टाऊन प्लॅानर, चिफ प्लॅनर ऑफ एम.एम.आर.डी.ए., प्रदुषण मंडळाचे इंजिनियर आणि लोकल बॉडीचे तीन सदस्य होते त्यांचे सुध्दा ऐकले नाही. शंभर मिट्यींग झाल्या पण काहीच झाले नाही. मिटींग घेऊन काय होईल, फक्त चर्चा होईल का अंमलबजावणी होईल? मला फक्त आपल्याकडून उत्तर पाहीजे. अंमलबजावणी होईल का? आणि मी विनंती करून माफी मागतो.

महापौर तथा पिठासिन अधिकारीः— सगळया बाबतीत अंमलबजावणी होईल.

सदस्य, श्री. अरूण आशानः— मा. महापौर, मा. आयुक्त साहेब, पाच मिनिट पहीले डॉ. साहेबांनी जे सांगितले की, हा जो प्लॉन आला त्याच्या पहीले माझ्या जवळ एक प्रत होती. मी डॉक्टर साहेबांच्या या गोष्टी बदल सहमत आहे. महापौर मॅडम, आयुक्त साहेब, हा प्लॉन जेव्हा आपल्याकडे आला, दिनांक ३०/४/२०१७ मध्ये शासनाने हा लागू केला. आपल्याकडे यायच्या अगोदर जसे डॉक्टर बोलले तसे २१/४/२०१७ ला एका ईपीमध्ये कोरझन ऑर्डर निघली. म्हणजेच हा प्लॉन शहरामध्ये यायच्या अगोदर लोकांना माहीत होता. हे या गोष्टीवरून सिध्द होते. ही एक कोरझन ऑर्डर आहे. मा. सेक्शन ऑफिसराची आहे. मी वाचून दाखवतो. डॉक्टर साहेबांच्या या गोष्टीवर मी सहमत आहे की, शहरामध्ये असा हा विनाशकारी प्लॉन यायच्या अगोदर काही लोकांना माहीत पडले, त्यामध्ये मोठमोठे बदल झाले. त्यामध्ये ईपी १२१, साईट नबंर ३११ रिक्रेशन ओपन स्पेस प्रोपोज टू बी रिसाईन अॅज अ पार्क रिंगरोड नोटीफिकेशन

नंबर २१३ दि इस्ट वेस्ट २४ मिटर व्हाईट न्यु रोड प्रपोझ दि एरिया ऑफ साईट ३११ रिक्रेशन ऑफ ओपन स्पेस नॉर्थ साईट २४ मिटर रोड, आयुक्त साहेब आरक्षण झालेले होते. ते ईपीमध्ये माहीत पडले, माहीती पडायच्या अगोदर कोरीझन ऑर्डर झाली. शासनाकडे तेव्हा माणसांनी जाऊन करून घेतली आणि संपुर्ण क्षेत्र डिलीटेड करून प्रपोज टू बी इनक्ल्युडेड आर. झोन पाच नंबरचा एवढा मोठा एरिया आहे, दुसरी सर्वात मोठी धोकादायक आणि धक्कादायक बाब अशी की, आपल्याकडे सन २०१३ ते २०१७ पर्यंत प्लॉनिंग ॲथॉरिटी झाले होते. जग्यासी साहेब, एका गोष्टीचे उत्तर दया. वनवारी साहेब, तुम्ही खाली बसा.

<u>महापौर तथा पिठासिन अधिकारीः—</u> सन्माननिय सदस्य...

<u>सदस्य, श्री. अरूण आशानः—</u> जग्यासी साहेब, सन २०१० ते सन २०१३ पर्यंत आणि २०१३ ते २०१७ पर्यंत नव्या डि.पी.चे काम चालू होते, त्यामध्ये दोन्ही डि.पी. प्लॉन बघून अधिकतम डी.पी. नुसार आपल्याला प्लॉनिंग पास करायचे होते. जर असे असेल आयुक्त साहेब, सन २०१३ तर एम—१२९ ए, २४ मिटरचा जो रोड आहे, त्या रोडच्यावर यु.एम.सी. डी.पी. १२९/१३. १२४ दिनांक ३०/७/२०१५ ला बिल्डींग परवानगी कशी काय दिली? तुमच्या प्लॉनिंग ॲथोरिटीमध्ये जर रोड बनत असेल, त्या रोडवर तुम्ही बिल्डींग परवानगी कशी दिली? म्हणूनच मा. विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितले की, हा प्लॉन हा विनाशकारी डी.पी. हा रद्द झाला पाहीजे. त्याच्यामध्ये आयुक्त साहेब, तुमच्या प्रशासनाच्या पण चुका आहेत. डी.पी. चा रोड माहीत आहे. तरी सुध्दा त्याच्यावर बिल्डींग प्लॉन पास केले. मग त्यावेळेस तुमची सेप्ट कंपनी, तुमचे अधिकारी यांनी काय बघितले? कुठला न्युनतम आणि कुठला अधिकतम प्लॉन बधितला आणि मंजूर केला. त्या जागेवर आता ४ माळयाची इमारत उभी आहे. १२० फुटाचा तुम्ही रिंगरोड म्हणता, त्या रिंगरूटवर तुम्ही दोन वर्षापुर्वी प्लॉन पास केला. माझ्याकडे अशी दहा उदाहरणे आहेत. मग त्या १२० फुटाच्या रिंगरूटला तुम्ही दहा मिटर, म्हणजे तुम्ही साडे नऊ मिटरची जागा सोडून ती बिल्डींग तोडणार का? ज्या बिल्डींगला तुम्ही दोन वर्षापुर्वी प्लॉन पास केला आहे. हा संपुर्ण प्लॉन जसे मा. बोडारे साहेबांनी सांगितले एका रूममध्ये बसून मॅन्युप्लेट करून हा प्लॉन तयार केलेला आहे आणि आयुक्त साहेब, हा रद्द झाला पाहीजे. आयुक्त साहेब, याच्यामध्ये ज्या काही गोष्टी आहेत, त्या प्रशासनाच्या पण आहेत. त्या त्यांनी बघितलेल्या नाहीत, मग याला दोषी कोण? मग त्या रोडवरची बिल्डींग पाडणार का? तुम्ही जी मंजूरी दिली होती, ती खोटी होती का? ती मंजूरी कुठल्या आधारे दिली? या सगळया गोष्टी आयुक्त साहेब, विचार करायला पाहीजे.

<u>सदस्य, श्री. किशोर वनवारीः—</u> मा. महापौर, उप महापौर, आयुक्त साहेब, सचिव मॅडम, आणि सन्माननिय सदस्य, आज इथे जो डी.पी. चा मुद्दा चालू आहे. तो विरोधी पक्षातर्फे चार स्थायी समिती सदस्यांनी त्याच्यावर स्वाक्षरी केल्या होत्या. सत्ताधारी पक्षातर्फे पण चार स्थायी समिती सदस्यांनी स्वाक्षरी केली होती,

ते आठ जण होते. स्वाक्षरी केल्या नंतर मा. महापौरांनी ही विशेष महासभा बोलावली आहे. आज ही मिटींग गरज नाही की, ती पुर्ण झाली पाहीजे. पुर्ण झाली नाही तर २७ तारखेला पण ठेवू शकतो, ३० तारखेला पण ठेवू शकतो. पहीले सभागृहाचे एक निर्णय व्हायला पाहीजे. पहीले जो एस.एम. डी.पी. आहे, तो फायनल झाला आहे. त्याचे अध्यादेश २१ एप्रिलला मा. मुख्यमंत्री यांनी सॅगेशन केल्या नंतर हा अध्यादेश आला आहे. त्याच्यासाठी कोणतेही ऑब्जेक्शन, सजेशन नाही. दुसरा आहे, एक्सल्युडेट पार्ट त्याचा निर्णय १३७ प्लॅटचे होऊ शकले नाही. त्यांचा ऑब्जेक्शन सजेशनची तारीख १२ डिसेंबर पर्यंत होती. गव्हर्नमेंटने मुदत वाढवून ४ जानेवारी पर्यंत ठेवला आहे. आज ऑब्जेक्शन व सजेशन जे पण दयायचे आहेत. ते विभागीय आयुक्त, कोकणभवन येथे दयायचे आहेत. ते ४ जानेवारी पर्यंत दयायचे आहेत. महासभेमध्ये आपण फक्त ३७ नियमानुसार ठराव पास करू शकतो आणि तो आपण कोकणभवन येथे पाठवू शकतो की, ईपीमध्ये आम्ही या सुधारणा केल्या आहेत आणि जो जुना डी.पी. आहे, एस.एम. च्यावर ३७/१मध्ये आम्ही महासभेमध्ये मायनर मॉडिफिकेशन किती पण करू शकतो. हा जो डेव्हलपमेंट प्लॅन आहे, चार वर्षापासून चालला आहे. सन २०१३ मध्ये आला होता. तेव्ही मी सदस्य, नव्हतो त्यावेळी शिवसेना आणि भाजपा यांची युती होती. सर्व नेतागण बसले होते, कमिटी पण बसली होती, १७ हजार ३३ ऑब्जेक्शन पाठवले होते, सरकारने काही टक्के मंजूर केले होते आणि बाकी रद्द केले. हे मला स्पष्ट करायचे आहे की, सेप्ट कंपनीने संपुर्ण शहराच्या लोकांबरोबर मिळून आणि काही बिल्डरांना मदत करण्यासाठी आणि काही आरक्षणाची पाहणी न करता, त्यांनी जो आपल्या बरोबर अन्याय केला आहे. त्याच्यासाठी सगळयांचे एकमत आहे. परंतु वेगवेगळे भाषण देणार आणि विरोध करणार तर ते होणार नाही. आमच्या सदस्या, श्रीमती साळवे मॅडमनी जे ऑब्जेक्शन होते, ते एक एक करून वाचले आहेत. जसे मी आयुक्त साहेबाना आणि महापौरांना पण इनवर्ड मध्ये देण्यात आले आणि महासभेमध्ये पण एक एक प्रत देतो की यामध्ये सुधारणा झाली पाहीजे. तर ही सुधारणा आयुक्त साहेब पण करू शकतात. आयुक्त साहेबांनी आज महासभेमध्ये आम्हांला आश्वासन दिले आहे, ते खरोखर खात्रीलायक आहे. आयुक्त साहेब असा विचार करीत नाहीत की, यांचे तुटायला पाहीजे, त्यांचे विचार पण आमच्या सारखेच आहेत. एक दिवस जग्यासी साहेबांनी, गंगोत्री साहेबांच्या पॅनलमध्ये आयुक्त साहेबांकडे एक तक्रार केली होती. डी.पी. मध्ये फारवरलाईनमध्ये महापालिकेतर्फे, शासनाच्या योजनेमधून हरीजन क्वार्टस बनवले आहेत, तर सर हे आरक्षण दुसरीकडे केले आहे, आयुक्त साहेबांनी महासभेमध्ये सांगितले होते की, हे ऑब्जेक्शन महापालिकेतर्फे जाईल की, हे जे क्वार्टस आहेत, ते क्वार्टससच राहीले पाहीजेत. अशाच प्रकारे, संपर्ण उल्हासनगरमध्ये एक तुकडा असा आहे की, गुरूदाससिंग कम्पाउंड वॉल आणि निजधाम आश्रम हे उल्हासनगरमध्ये गांधी रोड येथे पाहीजे होते, ते आता अंबरनाथमध्ये आहेत आणि त्यांचे रजिस्ट्रेशन होते ते अंबरनाथमध्ये होते. सात बाराचा उतारा पण आहे, परंतु त्या एरियामध्ये जो उल्हासनगरमध्ये गांधी रोड येथे आहे, त्यांच्यावर सुध्दा आरक्षण दिले आहे. तर अंबरनाथवर उल्हासनगर डेव्हलपमेंट प्लॅनचा जे आरक्षण आहे, ते अंबरनाथमध्ये कसे येवू शकते? त्याच्या सर्व प्रत मी आपल्याला देतो आणि काही कागद पण देतो. आज आपल्या मुस्लिम बांधवाना कब्रस्थानसाठी किती तरी वर्षे जागाच नाही आणि कारण काय आहे? आणि कोण जागा देत नाही. मी सभागृहाला विनंती करतो की, आज आपण सगळे मिळून निर्णय घेऊ की, मुस्लिम बांधवांना कब्रस्थान देवू. त्याच बरोबर त्यांना ही जागा कुठे पण दया. असे नाही की, त्यांना इथेच जागा दिली पाहीजे. असे माझे काहीच नाही. फक्त त्यांना जागा मिळाली पाहीजे. दुसरे म्हणजे

आयुक्त साहेबांना हे पण माहीत आहे की, जे रोड एम.एम.आर.डी.ए. ने पास केले आहेत, त्यामध्ये गायकवाडपाडा, दुर्गापाडा पर्यंत रोड आहे, त्यांना सुध्दा ४० फुटाची मार्किंग दिली आहे. नंतर सांगितले की, ८० फुट देवू. जे एस्टिमेट तीन वर्षापुर्वी केले आहेत, दोन वर्षापुर्वी काम पास झाले आहे. डेव्हलपमेंट प्लॉन होता, त्यानुसार पास झाले आहे. ते सहा रोड जुन्या डेव्हलपमेंट प्लॉननुसार बनायला पाहीजेत. आज जेवढे पण ऑब्जेक्शन आहेत, सर्वसंमतीने सर्व सदस्यांनी जे काही बदल करायचे आहेत, ते देण्यात यावे आणि कोणत्याही पक्षाचे असोत, परंतु शहर सर्वाचे आहे. जे पण सदस्य ऑब्जेक्शन देतील, महासभा पुर्ण झाली नाही तरी, महासभा स्थगित करून नंतरच्या महासभेत घेऊ. परंतु आपपाल्या पॅनलमध्ये जे काही बदल करायचे आहेत, ते आपण महासभेच्या माध्यमातून देवू आणि आपण ईपीचा एक ठराव करून ४ जानेवारीच्या अगोदर कोकणभवन इथे पाठवू आणि जो जुना डेव्हलपमेंट प्लॉनचा जी.आर. आलेला आहे. त्याच्यामध्ये आपल्याला किती पण मॉडिफिकेशन केले तरी ३७/१ मध्ये आपण मॉडिफिकेशन करून सुध्दा पाठवू शकतो. त्यामध्ये शासन आवश्यक सुधारणा करेल. चौधरी साहेबांनी सांगितले की, ५० किलो मिटरचा एरिया आहे, तर तिथे रिंगरोड होतो. जर १० किलो मिटरच्या एरियामध्ये जर रिंगरोड होत असेल तर आम्हांला तो रिंगरोड नाही पाहीजे. कारण की, पहीले जेव्हा शासनाकडे रिंगरोड ८० फुटाचा पाठवला, तो शहराच्या बाहेरून होता आणि आता शहराच्या मधून १२० फुटाचा जो रिंगरोड टाकला आहे, तो एकदम चुकीचा आहे. रिंगरोड आपल्याला नाही पाहीजे. कारण की, हा रिंगरोड शहराच्या मेन बाजारातून, इंडस्ट्रीयल एरिया असा घेतला आहे. अशा रिंगरोडची आपल्याला आवश्यकता नाही. आज झुलैलाल बाजाराला, ५ नंबरमध्ये आरक्षणामध्ये टाकले आहे. हे चुकीचे आहे. वसणशाह दरबाराच्या ग्राउंडचे आपल्याला एक उदाहरण दिले आहे. पोलिस स्टेशनसाठी आरक्षण होते, ते काढून कमर्शिअल केले आणि बाजूल तुकडा तुकडा आरक्षण दुसरे टाकले आहे. तर हा जो डेव्हलपमेंट प्लॉन आहे, जेव्हा आपले लोकप्रतिनिधी मा. मुख्यमंत्र्याना भेटले, त्यांनी सांगितले की, हा जो डेव्हलपमेंट प्लॉन पास झाला आहे, जर हे थांबवले असते, परंतु सन २००६ मध्ये डेव्हलपमेंट प्लॉन एक वेळा रद्द झाला आहे आणि सन २०१३ मध्ये सुध्दा रद्द झाला आहे. ४३ वर्षा नंतर हा डेव्हलपमेंट प्लॉन आला आहे आणि ४३ वर्षा पर्यंत जो डेव्हलपमेंट प्लॉन लागू होता, तेव्हा १० टक्के सुध्दा इमप्लीमेंट झाले नव्हते. तर ३३ ते ३५ वर्षापासून शहरामध्ये जेवढे पण लोकप्रतिनिधी बसले आहेत, आम्ही शहरातील लोकांबरोबर आहेत. तीन वर्षापासून कोणते डेव्हलपमेंट झाले आहे. नगरसेवकांना प्रभाग समिती निधी दिले जात नाही तर शहराचे डेव्हलपमेंट कसे होणार? तीन वर्षापासून कोणाचे सुध्दा १ रूपयाचे काम झाले नाही. शहरामध्ये डेव्हलमेंट ते विसरून जा, मी खात्री देतो की, ते होणारच नाही. शहरामध्ये नगरसेवकांना निधी दिले जात नाही तर रोड कसे बनणार? १० महीन्यापासून आम्ही शिव्या खात आहेत आणि इथे आल्या नतर इथे सुध्दा शिव्याच खात आहेत. ही शहराची वस्तुस्थिती आहे, तर शहराचे डेव्हलपमेंट विसरून जा. सभागृहातील सदस्यांनी खात्री करायला पाहीजे की, जो पण मुद्दा शहराच्या नुकसान होईल असा आला तर असा मुद्दा स्थायी समितीमध्ये असेल किंवा महासभेमध्ये असेल तो आपण घ्यायचा नाही आणि आयुक्त साहेबाना, पण शहराचे नुकसान झाले नाही पाहीजे असे वाटते आणि मला सुध्दा असे वाटते की, शहराचे नुकसान झाले नाही पाहीजे. आपण संपुर्ण डेव्हलपमेंट प्लॉन रद्द करून एक ठराव करू आणि प्रत्येकांचे जे जे ऑब्जेक्शन आहेत, ते पण ठरावामध्ये टाकण्यात यावेत आणि आपले जे नेते, मा. मुख्यमंत्री साहेबांकडे गेले होते, तेव्हा आश्वासन दिले की, जे पण ऑब्जेक्शन असतील त्याच्यामध्ये सुधारणा केल्या जातील. त्यावेळी मा. पालक मंत्री पण

आमच्या बरोबर होते, मा. श्री.रविंद्र चव्हाण साहेब पण आमच्या बरोबर होते. तरी कृपया करून कोणाचेही नुकसान होणार नाहीत आणि जेवढे काही ऑब्जेक्शन, सजेशन ईपीमध्ये आहेत, ते देण्यात यावे आणि २१ तारखे नंतर अजून एक महासभा ठेवण्यात यावी. एकामध्ये ईपीचे जायला पाहीजे आणि दुस—यामध्ये एस. एम. चे गेले पाहीजेत. वेगवगळे ठराव करण्यात यावेत. ईपीचे ऑब्जेक्शन वेगळे आणि एस.एम.चे ऑब्जेक्शन ३७ मध्ये वेगळे यासाठी सर्व सन्माननिय सदस्यांच्या वार्डामध्ये जे जे प्रॉब्लेम झाले आहेत, जसे १७ हजार ३३ ऑब्जेक्शन दिले होते. मी जग्यासी साहेबांना धन्यवाद देतो की, कारण की, डायरेक्टरच ते होते, जग्यासी साहेब, मा. मुख्यमंत्र्याना उल्हासनगर शहराचे स्वप्न पडले नव्हते, पाठवणारे तुम्हीच लोक होते. आपण माझ्या प्रश्नाचे उत्तर दया. आपले फक्त तीन महीने राहीले आहेत, सेवानिवृत्त होणार आहेत, तर आपण खोटे बोलणार नाहीत. हे सांगा की, डेव्हलपमेंट प्लॅन बनवतांना त्यामध्ये तुमचा सहभाग नाही का? या अधिका—यांना काय माहीत ते तर मार खात होते,बाकी लोकांना पण आपण माहीती देतात तर यासाठी आपण सुध्दा डायरेक्टर बना आणि माहीती दया आणि महासभेला आश्वासन दया की, जे सदस्य ऑब्जेक्शन, सजेशन देतील ते मा. आयुक्तांच्या स्वाक्षरीने जातील आणि आमच्याकडून पण जातील असे आपण आश्वासन दया.

या वेळी सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी, हे सभागृहातून बाहेर गेले.

<u>कनिष्ठ अभियंता, श्री. कुमार जग्यासी:—</u> मी संपुर्ण सभागृहाला सहकार्य करेल.

<u>सदस्य, श्री. अरूण आशान:—</u> मा. महापौर मॅडम, मा. उप महापौर, आयुक्त साहेब, वनवारी साहेब, हे विसरले आहेत की, या महासभेमध्ये सतत तीन तास डी.पी. प्लॅनच्या विरोधात संपुर्ण सभागृह चर्चा करीत आहे आणि ते ऑब्जेक्शन, सजेकशनच्या बाबतीत बोलतात, त्यांना गंभीरता किती आहे, हे मला माहीत नाही? हा जो प्लॅन बनवला आहे, तो संपुर्ण चुकीचा आहे. त्याला रद्द करण्यासाठी आणि पहीले जे निवेदन करेक्शन करून आणण्यासाठी संपुर्ण सभागृह एक होत आहे आणि ते अशा वेळी डी.पी. वर चर्चा करीत आहेत. जर संपुर्ण प्लॅनच परत सरकारकडे जाणार आहे, तर अशा वेळी ईपीमध्ये कोण लक्ष देणार. आपण कोणती महासभा चालवाल, महापौर मॅडम हा विषय गंभीर आहे, आज पर्यंत ३७ मध्ये किती पाठवले आहेत, किती आले आहेत? जर आपण आम्हांला आश्वासन देत आहेत, तर आमच्या वार्डामध्ये रोडचे आणि गार्डनचे एस.एम. ३७ मध्ये आपण करून आणाल का? आता ही जी चर्चा आहे, ती संपुर्ण शहराची आहे. यामध्ये एस.एम. मध्ये आणि ईपीमध्ये कोणतीही चर्चा होणार नाही. यामध्ये आज पर्यंत

जेवढे पण पस्ताव पाठवले आहेत,ते शासनाने एक पण मान्य केले नाहीत. सन १९७४ चे जे पण आहेत, ते आज पर्यंत एक पण आला नाही आणि परत आपण देत आहेत. हा जो डी.पी. आहे, तो रद्द करण्यात यावा. या डी.पी. मध्ये जे प्रस्ताव, जे ऑब्जेक्शन, सजेशन होते, ते ऐकण्यात यावे आणि नविन पध्दतीनुसार परत हा डी.पी. प्लॅान बनवण्यात यावा. जर प्रस्तावना ठेवत असतील तर आम्ही हरकती घेऊ आणि ३७ मध्ये पाठवू तर हे शक्य नाही. सन १९७४ ते सन २०१७ पर्यंत जेवढे पाठवले आहेत, ते अजून पर्यंत झाले नाही. तर ही काय चर्चा चालू आहे? मा. महापौर मॅडम आपण जरा विचार करा की, हे सभागृह काय बोलत आहे? हे सभागृह या डी.पी. प्लॅानच्या विरोधात आहे. मी पण याच बाजूने आहे. आज जो ठराव होणार आहे, आयुक्त साहेब, त्याच्यामध्ये भरपूर काही तरी कमी आहे, काही चुका आहेत, काही तक्रारी आहेत. यामध्ये विरोधी पक्षांनी दिलेला प्रस्ताव साहेब मान्य करावा, तो विचारात घ्यावा.

सदस्य, श्री. किशोर वनवारीः— मा. महापौर, उप महापौर, आयुक्त साहेब,

सदस्या, श्रीम. कविता पंजाबीः— आपण कसे बोलत आहात?

सदस्य, श्री. अरूण आशानः— मॅडम जर चुकीची गोष्ट होत असेल तर, सुधारणा करायला पाहीजे.

सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः— मा. महापौरजी, सगळयांना बोलण्याची संधी दिली जावी, सभागृहातील कोणतेही सदस्य, बोलत असतील तर त्यांना बोलू दया.

सदस्य, श्री. अरूण आशानः— परंतु मी बोलत आहे ना? माझे बोलणे तरी पुर्ण होऊ दया.

सदस्य, श्री. दिपक सिरवानीः— अरूणजी काय होते की, ७८ लोकांचे आग्रह आहे.

सदस्य, श्री. अरूण आशानः— आपण जे सांगितले, ते मी सांगितले मला पुर्ण तर बोलू दया.

सदस्या, श्रीम. कविता पंजाबीः— आम्ही आपले बोलणे ऐकत आहेत, मा. महापौरजी, आयुक्त साहेब, श्री. अरूण आशान जे बोलत आहेत, ते अगदी बरोबर आहे. त्यांची बोलण्याची जी पध्दत आहे, ती बरोबर आहे. मी ऐकत आहे, जेव्हा पासून त्यांनी बोलायला सुरूवात केली, तेव्हापासून त्यांचे बोलणे

बरोबर आहे. परंतु आम्ही सर्व विरोधात आहेत आणि सगळयांना बोलण्याची संधी मिळाली पाहीजे आणि काही वेळ निश्चित करा. सगळयांना या डी.पी. प्लॅन विषयी खेद आहे. परंतु एकाच विषयावर आपण जर परत परत बोलत असाल तर सगळयांचे ऐकले पाहीजे ना? मी त्यांच्या विरोधात नाही आणि कोणाच्याही विरोधात नाही. दुसरी गोष्ट म्हणजे मला एका गोष्टीचे वाईट वाटले की, जे त्यांनी सांगितले की, पाकिस्तानमधून सिंधी लोक आले आणि महाराष्ट्रामध्ये त्यांना आरक्षण मिळाले आणि सिंधी लोक मराठी लोकांना इथून पळवून लावत आहेत. इथे जाती, धर्म काहीच नाही, आपण सगळे एकच आहोत, इथे मराठी, हिंदू, मुस्लिम कोणीच नाही, आपण फक्त नगरसेवक आहेत आणि संपुर्ण उल्हासनगरसाठी जे चुकीचे आहे, आपण त्याच्यासाठी लढा देवू. आपण इथे सगळे भाई–भाई आहेत, इथे हिंदू किंवा मुसलमान असे झाले नाही पाहीजे, धन्यवाद.

या वेळी सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी यांनी पुन्हा सभागृहामध्ये प्रवेश केला.

<u>सदस्य, श्री. दिपक सिरवानी:–</u> मा. महापौर, उप महापौर, आयुक्त साहेब, सन १९४६ मध्ये निर्वासित होऊन जेव्हा आमचे पुर्वज इथे आले, ते सांगत होते की, जीव वाचवून इथे आले होते आणि आज अशी परिस्थिती आली आहे की, जीवाची पर्वा नाही किंवा मालाची पर्वा नाही. या शहराला आम्ही सोडून कुठे जाणार. हा माझा प्रश्न आहे. दुसरे असे की, सगळयांना माहीत आहे की, हा डी.पी. प्लॅन एका बंद दरवाजामध्ये बनवला आहे किंवा कोणाच्या म्हणण्यावरून बनवला आहे. ही गोष्ट कुठे ना कुठे सत्य आहे. उदाहरणार्थ जसे शाळेच्या जागेवर कब्रस्थान आले. दुसरे आहे की, चांदीबाई कॉलेजच्या आतमधून रोड निघत आहे, तो गणेशनगरच्या झोपडपट्टीतून के.बी. रोड पर्यंत, ती हजार झोपडया त्यामध्ये ५ मिटरचा रोड नाही का काहीच नाही? सरळ रस्ता काढला आहे, तीन हजार झोपडयांसाठी आपल्याकडे काही पर्याय आहे. एस.आर.ए. स्किम आहे का? ते तीन हजार परिवार कुठे राहणार, पहीले आपल्याला त्यांना पर्यायी जागा दयायची आहे. तीन किला मिटरचा के.बी. रोड आहे, आपण त्यांच्यासाठी आता पर्यंत काहीच केले नाही. एक रोड सोडून ५० फुट रोडच्या नंतर दुसरा रोड, १०० फुट सोडून तिसरा रोड हे फक्त रोडनगर बनले आहे. आपण जरा तीन नंबर ओटी सेक्शनचा, आनंदनगरचा रिंगरोड येत आहे. याच्या पहीले सन १९७४ चा जो प्लॅन होता, ८० फुट किंवा १०० फुटाचा होता. तो बरोबर ठेवला होता, आज पण तो ६० फुटाचा रोड आहे. अशी काय गरज होती? की, आनंदनगर, संतोषनगर, पाच ते सहा हजार घरे उध्दवस्त करून आपण १२० फुटाचा रिंगरोड काढत आहेत. १३ किलो मिटरमध्ये लोक उध्दवस्त होणार आहेत, जर

शहरवासीच राहणार नाहीत तर हे शहर कोणासाठी राहील? मा. महापौरजी, उप महापौरजी, आयुक्त साहेब, हा महत्वाचा मुद्दा आहे. तरी ३७ मध्ये हा रिंगरोड रद्द करण्यात यावे. आम्ही डेव्हलपमेंटच्या विरोधात नाही. आम्हांला पण शहरवासी विचारतात की, कल्याण शहर बनले, अंबरनाथ बनले, ठाणे बनले आहे. आपला शहर पण बनायला पाहीजे. परंतु शहरवासीयांना उध्दवस्त करून नाही. साईट नंबर १०८ मोबाईल बाजार, सन १९५० पासून तिथे कमर्शिअल एरिया आहे, परंतु तिथे पार्किंगसाठी अलाऊड केले आहे. दोन वर्षापासून त्यांना शटर लावण्याची परवानगी नाही, ते के.बी. रोडमध्ये बाधीत झाले होते. सन १९५० पासून उल्हासनगर शहर गाऊन बाजारासाठी प्रसिध्द आहे. संपुर्ण भारतात इथून गाऊन जातात. सेंच्युरी रेयॉन ४ आणि ५ बाबत श्री. अरूणजी यांनी सगळा इतिहास सांगितला आहे. त्या विभागाला संपुर्ण ग्रीन झोनमध्ये टाकले आहे. नेहरू चौक, शिरू चौक ४० फुटाचा रस्ता आहे, तिथे ६० फुटाची मार्किंग दिली आहे. दुकानदारांना पहीले ८० फुटाची कटींग दिले होते, त्यांनी पहीले नगररचना विभागाकडून प्लॅन पास करून आज बिल्डींग बनवल्या आहेत. आज परत त्यांना दुकानांची कटींग देणार, आम्ही शहरामध्ये काय सांगणार? चांदाबाई कॉलेजचा रोड आम्ही सन १९९९ मध्ये ओटी चौकचा ४० फुट दिले होते आणि परत ८० फुटाची मार्किंग दिली आहे. स्टेशन रोड ८० फुटाचा सन २००४ मध्ये आपण कटींग दिली होती, त्याच्या नंतर त्यांनी बिल्डींग बनवल्या होत्या, दोन्ही बाजून कटींग केली होती. बेहरानी प्राइट ते शिवाजी चौक पर्यंत १०–१० फुट दोन्ही बाजूनी कटींग केल्या आहेत. आज आपण परत त्यांना ८० फुटाची कटींग करायला लावणार आहेत, शेवटी हे शहर वाचेल किंवा नाही, जरा विचार तर करा. ३७ बी मध्ये काय काय करणार? आम्ही १७ हजार ऑब्जेक्शन दिले होते, त्यामध्ये फक्त ५ टक्के ६९२ पास होऊन आले आहेत. बाकीचे काय झाले ते त्यांना नकार का दिला गेला ते तर आम्हांला माहीती पडले पाहीजे. सन २०१४ पासून ते सन २०१७ पर्यंत सगळयांच्या नजरा आमच्यावर आहेत. याच्या अगोदरच्या मिटींगमध्ये मी पण होतो आणि आपण पण होते, आमचे काही सदस्य नविन आहेत, त्यांना जास्त माहीती नसेल परंतु सन २०१४ मध्ये आम्ही ऑब्जेक्शन टाकले होते, आमच्या कोणकोणत्या गोष्टी चुकीच्या होत होत्या साठी आम्ही ऑब्जेक्शन घेतले होते. आता परत तिकडून काळे पिवळे होऊन आले आहे. कृपया करून महापौर मॅडम, उप महापौरजी, आयुक्त साहेब आपण या शहराला वाचवा, धन्यवाद.

<u>सदस्या, श्रीम. मिना सोनेजीः–</u> महापौर मॅडम, उप महापौर, आयुक्त साहेब, सर एक जूनी म्हण आहे, “निम हकीम खतरे जान” सेप्ट कंपनीने जे काम केलेले आहे, त्यांच्यवर जे ऑब्जेक्शन घेतले होते, त्यांना त्या बदल काही माहीती नव्हती, त्यांनी अशीच अंमलबजाणी करून एक पोस्टर बनवून आमच्या समारे आणला आहे. माझ्या एरियामध्ये ५० मिटरमध्ये ६ शाळा येतात, परंतु आम्ही आर. झोनसाठी रेफर केले

होते, साईट नंतर २६१मध्ये त्यांनी परत शाळांना आरक्षण ठेवले आहे. तिथे ५० मिटरवर एक शाळा आहे आणि १०० मिटरवर एक इग्लिश शाळा आहे. त्यावेळेस आम्ही जास्त ऑब्जेक्शन घेतले नव्हते, आमच्या इथे जो रेसिडेन्सी झोन आहे, तो गायब झाला आहे आणि तिथे परत स्कुल आरक्षण आले आहे. त्याला आम्हांला हटवायचे आहे. दुसरी गोष्ट म्हणजे, गाऊन बाजार उल्हासनगर–५ मध्ये जेव्हा पासून आम्ही पाकिस्तानमधून इथे आलो आहे, तेव्हा पासून तिथे संपुर्ण कमर्शिअल आहे आणि कमर्शिअल टॅक्स भरले जात आहे. तिथे फक्त भारतातूनच नाही तर इतर देशातून सुध्दा लोक शॉपिंगसाठी येत आहेत. तिथे ग्रीन झोन डिक्लर केले आहे. तिथे व्यापा–यांमध्ये खुप संताप आहे, भीती आहे आणि तिथे मिसगाईड्स होत आहे. आयुक्त साहेब, आपण एक मिटींग आमच्या बरोबर लावली आहे. त्यासाठी मी आपल्याला धन्यवाद देते. अशाच प्रकारची आपण नागरीकांसाठी सुध्दा एक मिटींग लावा. नागरीकांना डी.पी. प्लॉन बाबत माहीती नाही, त्यांच्यामध्ये गैरसमज होत आहेत, कुठे व्यवस्थित सांगितले जाते, कुठे मिसगाईड्स होत आहेत. तरी त्यांना माहिती मिळण्यासाठी सामाजिक संस्था, स्थानिक नागरीक ज्यांना पण प्रॉब्लेम आहेत, त्याच्यासाठी किंवा रोज जे ऑब्जेक्शन येत आहेत, त्यांच्यासाठी एक आयडिया दया की, काय होणार आहे? आणि दुसरी गोष्ट म्हणजे प्रत्येकाला रिंगरोडच्या बाबतीत ज्या समस्या आहेत, त्याच्यासाठी कृपया करून लक्ष देण्यात यावे, धन्यवाद.

<u>सदस्या, श्रीम. सुरेखा आव्हाडः–</u> मा. महापौर, उप महापौर, मा. आयुक्त साहेब, आज आपण ही सभा बोलवली याच्यामध्ये सर्वानी आपले विचार मांडले आहेत. मी तर असे म्हणते की, आपली भारताची जी शासन पध्दत आहे, ती लोकशाही पध्दत आहे. लोकशाही पध्दतीमध्ये असे निर्णय घेतले जावेत की, ते लोकांच्या हिताचे असावेत. परंतु हा जो डी.पी. प्लॉन आलेला आहे, तो संपुर्णपणे लोकांच्या विरोधात आहे. या मुळे आज शहरामध्ये जे लोक जीवन जगतात, त्यांना रात्रीची झोप सुध्दा येत नाही. झोपेमध्ये त्यांचे तुटलेले घर आणि त्यांची मुले, बाळे रस्त्यावर आलेली ते बघतात आणि अक्षरशः ते उठून बसतात. तर ते आम्हांला बघून आमच्या समोर ते रडतात. तर अशा लोकांना आम्ही कसे आश्वस्थ करू शकतो. याचा विचार आपण केला पाहीजे. त्याच बरोबर आपण क्लस्टर डेव्हलपमेंटचा विचार करीत आहोत, पण आपल्या शहरामधल्या ८० टक्के लोकांना क्लस्टर डेव्हलपमेंटचा प्लॉन समजतच नाही. तर त्याचा विचार करून काय फायदा आहे. त्या लोकांना आपल्याला कसे आश्वस्थ करता येईल किंवा आज जो के.बी. रोड आहे, याच्यावरती ज्या लोकांची दुकाने तुटलेली आहेत, घरे तुटलेली आहेत, त्या लोकांना दोन–दोन, तीन–तीन वर्षे झाली आहेत. त्यांना आपण त्यांची पर्यायी जागा देवू शकलो नाही किंवा त्यांच्यासाठी आपण काही पर्यायी व्यवस्था उपलब्ध करू शकलो नाही. तर त्यामुळे बाकीच्या लोकांच्या मनामध्ये ही

भिती आहे. त्याच बरोबर आपण एस.एम. १७६ ते १७७ मध्ये फुलनगर, कौशलनगर हा जो एरिया आहे, जगदंबा मंदिरच्या बाजूचा, हा पुर्ण एरिया आपण आरक्षण दाखवलेले आहे. तेथील लोक भयभीत झालेले आहेत, तर आपण त्यांना अशी हमी देवू शकतो का? किंवा या डी.पी. प्लॉनमुळे आपण त्यांना काही सुविधा देवू शकतो, आश्वस्थ करू शकतो? त्यामुळे जो डी.पी. प्लॉन या जनतेच्या विरोधात आहे, या शहराच्या विरोधात आहे, येथील लोकांना आपण आश्वस्थ करू शकत नाही. त्यांचा विनाश होणार आहे, याची त्यांना भिती आहे. तर अशा डी.पी. प्लॉनला मी माझ्या वतीने, माझ्या पक्षाच्या वतीने तसेच ज्या ज्या लोकांचा याला विरोध आहे, त्या सर्वांच्या वतीने मी या डी.पी. प्लॉनचा विरोध करीत आहे, धन्यवाद.

**सदस्य, श्री. मिलिंद बागुलः—** मा. महापौर मॅडम, मा. आयुक्त साहेब, ज्या प्रकारे श्रीम. सुरेखा आव्हाड यांनी सांगितले की, १०३ ते १०४ फुलेनगर आणि कौशलनगर हा एरिया त्या ठिकाणी ५० वर्षा पासून लोक राहत आहेत. परंतु त्या ठिकाणी आरक्षण दाखवण्यात आलेले आहे. कृपया करून त्याच्यात बदल करावा, अशी आमची विनंती आहे, धन्यवाद.

**सदस्या, श्रीम. सुरेखा आव्हाडः—** मा. आयक्त साहेब, माझी अशी विनंती आहे की, आम्ही या सभागृहामध्ये नविन सदस्य म्हणून निवडून आलो आहोत, तर आम्हांला ब—याच पैकी याच्या मधले नॉलेज नाही, तर आम्हांला एरिया प्रमाणे, वार्ड प्रमाणे याची माहीती देण्यात यावी आणि हा डी.पी. प्लॉन समजावून सांगण्यात यावा. आम्हांला एरिया प्रमाणे, कुठल्या वार्ड मध्ये कशा प्रकारे आरक्षण झालेले आहे. हे आम्हांला समजून सांगण्यात यावे. कारण आम्ही तिथून जनप्रतिनिधी म्हणून निवडून आलेलो आहे, लोक आम्हांला विचारतात, तर त्यांना आम्ही काय सांगावे. तरी कृपया आमच्यासाठी एवढे प्रयत्न करण्यात यावे.

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवानीः—** उल्हासनगर —५ चे दोन नगरसेवक आहेत, कृपया करून व्यापा—यांच्या ज्या समस्या आहेत, त्या ऐकण्यात याव्यात. महापौर महोदया आणि आयुक्त साहेबांना विनती आहे की, जर कोणी लेकप्रतिनिधी लोकाच्या समस्या आपल्या समोर सांगत असेल, परंतु पहीले या शहरामध्ये एकच आमदार होते आणि आता शासनाने तीन आमदार दिले आहेत आणि शासन, महाराष्ट्र शासन, आपली महानगरपालिका या सर्वांचा एकच उद्देश आहे की, जे पण तंत्रिक आहे, जीव आहे, पशू आहेत, त्यांना राहण्यासाठी सिंधी भाषेमध्ये आखेडो (घरटे) बोलतात ते मिळते आणि माणसांना जागा मिळते. तर भारत सरकारने ज्या गरीबांकडे घर नाही, अशा गरींबांना मोफत घर देण्यासाठी योजना बनवली आहे. भारताच्या प्रधानमंत्र्यानी जर एवढा विचार केला आहे. तर आज आयुक्त साहेब पण आहेत, त्यांना महाराष्ट्र शासनाने पब्लिकच्या ज्या समस्या आहेत, ते ऐकण्यासाठी पाठवले आहे. मी महापौर मॅडमला,

आज श्री. कुमार आयलानी साहेबांचा वाढदिवस आहे, महापौरांच्यातर्फे मी त्यांना शुभेच्छा देतो आणि नागपूरमध्ये अधिवेशन चालू आहे, शहराच्या समस्याच्या बाबतीत तिथे सुध्दा लक्षवेधी टाकण्यात आली आहे. फक्त आपल्याला निर्णय करायचा नाही तर महाराष्ट्र शासनाने जो डी.पी. पाठवला आहे, त्यामध्ये ज्या चुका आहेत, आणि आमचे शहराचे जे लोकप्रतिनिधी आहेत, ते पण उठवतील. तरी कृपया करून आपण याची घाई करण्यात येवू नये, नाही तर चुकीचे होऊन जाईल. त्यासाठी नागपूर वरून आवाज उठवण्यात यावा आणि आपल्या इथे महापौरांकडून आवाज उठवण्यात यावा. जेव्हा ईपी पास झाले होते, याच महासभेमध्ये सर्व पार्टीच्या सदस्यांनी पास करून सरकारला पाठविण्यात आला. उल्हसनगरचे नगरसेवक कोणत्याही पार्टीमध्ये भांडण नाही, शहराच्या हितासाठी सर्व निवडून आले आहेत आणि परत परत निवडून येतात. महापौर मॅडम आपण सुध्दा निवडून आल्य आहेत, भाजपाचे आमदार दोन वेळा निवडून आले आहेत. इथे जेवढे नगरसेवक आहेत, ते सगळे निवडून येतात कारण की, पब्लिकसाठी काही तरी करीत असतात. त्यासाठी आम्हांला आंदोलने करायला लागले आहेत, तरी कृपया जे पण आपल्या हातामध्ये आहे, ते आपण चांगले करण्यात यावे. आमचे पुर्वज सन १९४८ मध्ये उल्हासनगरमध्ये आले होते, त्यांनी आपल्या महनतीने घरे बनवली. त्यावेळी सगळे काही पाकिस्थानमध्ये सोडून आले होते, कारण की तेथील सरकार मदत करीत नव्हती, आता आमचे परिवार इथे वसले आहेत आणि येथून जर काढून लावत असेल तर आमची मुले कुठे जाणार? आमच्या व्यापा–यांची एक संस्था आहे, त्याच्याशी आम्ही चर्चा केली आहे आणि आम्ही त्यांचे सदस्य आहेत. जो १२० फुटाचा जो रिंगरोड आहे, आयुक्त साहेबांनी सांगितले आहे की, जे पण आपल्या हातामध्ये आहे, ते आपण आवश्यक करू. मी आपल्याला धन्यवाद, देतो की, आम्हांला जीवन जगण्यासाठी जो आसरा दिला आहे, त्या बदल धन्यवाद देतो आणि दुसरे असे सांगतो की, आम्हांला किती तरी वेळा आश्वासन मिळाले आहेत. जे पहीले आयुक्त, श्री. हिरे साहेब होते, त्यांनी आश्वासन दिले होते की, जो कल्याण–अंबरनाथचा रोड आहे, तेथील लोकांचे नुकसान करणार नाही, तिथे बाधीत होणा–या लोकांना कुठे तरी पर्यायी जागा देवू आणि आता बघा की, किती वर्षे झाली त्यांच्यासाठी आपण काहीच करू शकलो नाही. आम्हांला भारत सरकारवर विश्वास आहे, महाराष्ट्र सरकारवर विश्वास आहे, आम्हांला विश्वास आहे की, कोणी तरी आयुक्त येतील आणि आम्हांला मदत करतील, परंतु कुठे ना कुठे निराशाच झाली आहे. आमची ४० फुटाची मागणी होती, तिथे ८० फुट करण्यात आले. लाल चक्की पासून कैलास कॉलनी पर्यंत पहीले ६० फुट केले होते. कॅम्प नं. ५ वाले सगळे महानगरपालिके बरोबर होते आणि महापालिके बरोबरच राहणार. परंतु आता ८० फुट का? अशी काय मागणी होती. जर आम्ही महासभेमध्ये ६० फुटाचा रस्ता ठराव पारीत करून पाठविला होता, तर त्याला ८० फुट कसे

करण्यात आले. झुलैलाल येथील रस्ता ८० फुटाचा कसा करण्यात आला. तर हे दुकानदार कुठे जाणार, त्यांना जागा कुठे देणार, जागा देण्यासाठी आपल्याकडे जमीन नाही. तरी कृपया करून कॅम्प नं. ५ मधील लोकांना वाचविण्यात यावे. त्याचे कमीत कमी नुकसान होईल असे पहावे, धन्यवाद.

<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानीः—</u> मा. महापौर मॅडम, उप महापौर, आयुक्त साहेब, आज सभागृहामध्ये असे वातावरण बघायला मिळाले की, सत्ता पक्ष आणि विरोधी पक्ष या सर्वांनाच खुप दुःख झाले आहे. जो डी. पी. प्लॉन आला आहे, त्यामध्ये भरपूर चुका/उणिवा राहील्या आहेत. परंतु सेक्शन २६ मध्ये ड्राफ्ट डेव्हलपमेंट प्लॉन प्रसिध्द केला गेला, आपली सर्वात मोठी चुक म्हणजे त्या वेळी हा ड्राफ्ट डेव्हलपमेंट प्लॉन रद्द करायला पाहीजे होता. त्यावेळी तो आपण केला नाही. या ड्राफ्ट डेव्हलपमेंट प्लॉनमध्ये सुधारणा करण्यासाठी खुप प्रयत्न केले, जेव्हा एखादा विद्यार्थी परिक्षा देतो, तेव्हा पेपरमध्ये भरपुर काटछाट होते आणि प्राफेसर असतात त्यांना वाचण्याची इच्छाच होत नाही, ते संपुर्ण पेपरला काट मारतात. अशाच प्रकारची चुकी आपली

झाली आहे, तेव्हा भारतीय जनता पार्टीचा सहभाग होता, शिवसेनेचा सहभाग होता आणि काही पक्षाचा पण सहभाग होता आणि राष्टवादी कॉग्रेस आणि सर्व सभागृहाने चुक केली आहे. जेव्हा सेप्ट कंपनीचा संपुर्ण डेव्हलपमेंट प्लॉन रद्द करून नविन प्लॉन आणायला पाहीजे होते, ते आपण केले नाही. आपण सेक्शन २८/४ मध्ये ते आपल्याला समजला नाही. आम्हांला वाटले की, सरकारकडून चार एक्सपर्ट असतील आणि आपल्या स्थायी समितीकडून चार सदस्य असतील आणि प्लॉन व्यवस्थित बनवतील आणि व्यवस्थित बनवला सुध्दा आपण सेप्ट कंपनीला सांगायला पाहीजे होते की, हा प्लॉन पुर्णपणे बदलून आणा आणि सरकारला पाठवा. परंतु आपण काय केले, एक मोठे पुस्तक बनवले. त्यामध्ये मॉडिफिकेशन ६९५ होते आणि ६९५ मॉडिफिकेशन जर सरकारकडे जातील तर काही तरी गडबड दिसेलच, याचे खलनायक सेप्ट कंपनी आहे, जर आपण व्यवस्थित लक्ष दिले असते तर आज एवढा गोंधळ झाला नसता. १७ हजार ऑब्जेक्शन दिले आणि ६९५ मॉडिफिकेशन एक मताने पाठवले. आपण जेव्हा एक मताने पाठवले तेव्हा सरकारने एक लाईन लिहीली आहे. त्यामध्ये जिथे गव्हर्नमेंट बिल्ट पॉपर्टी असेल, जिथे गव्हर्नमेंट बिल्ट शॉप असतील त्याच्यावर जे पण आरक्षण होईल, ते आरक्षण मानले जाणार नाही आणि जिथे बॅरेक असतील, ब्लॉक असतील ते जर सेप्ट कंपनीने टाकले असतील तर तिथे सुध्दा आरक्षण राहणार नाही. आता सभागृहातून कोणाला वाटते की रद्द करायला पाहीजे आणि कोणाला वाटते की, त्यामध्ये सुधारणा

करायला पाहीजे परंतु समस्या सगळयानाच आहे. जेव्हा आम्ही मा. मुख्यमंत्री साहेबांच्या भेटीसाठी गेलो होतो, त्या वेळी मा. महापौर, श्रीम. अपेक्षा पाटील सुध्दा आमच्या बरोबर होत्या. तेव्हा मा. मुख्यमंत्री साहेबांनी महापौर, श्रीम. अपेक्षा पाटील यांच्या समोर सांगितले होते की, तुम्ही डी.पी. पास करून घ्या. त्या वेळी आयुक्त म्हणून श्री. मनोहर हिरे साहेब होते. त्यावेळी श्रीम. ज्योती कालानी यांनी सांगितले की, यामध्ये खुप चुका आहेत आणि ग्रीन झोनच्या जागी आर. झोन ठेवले आहेत, ते आम्ही लोकांनी पण बघितले होते, आमच्या डोळया समोरच किती तरी ग्रीन झोन होते, इथे एक मोठे स्टेडीयम होते, ते आम्ही आर. झोन करून पाठवले होते. यामध्ये सर्व पक्ष सामिल होते, आपण सरकारला दोष देवू शकत नाही. सन १९७४ मध्ये जे ग्रीन झोन होते, ते आपण आर. झोन करून पाठवले.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारेः—** आता हे आपल्याला मान्य आहे का? बस करा जास्त बोलू नका आपण सरकार किती बरोबर आहे, हे दाखवायचे आहे का? काय खरे आहे आणि काय नाही? आमचे म्हणणे मान्य आहे तर मान्य करा. तुम्हांला मान्य आहे ना ठिक आहे, आम्ही आमचा प्रस्ताव देतो.

यावेळी श्री. धनंजय बोडारे यांनी मा. महापौर यांच्याजवळ ठराव दिला.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानीः—** नाही नाही, आम्ही तुम्हांला मान्य करीत आहेत, मी म्हणत आहे की, आपल्या ज्या चुका झाल्या आहेत, त्या सुधारायला पाहीजेत.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारेः—** आम्हांला हे मान्य नाही. मी पहीले प्रशासनाने सांगितले होते की, या चुका आपण सुधारू शकतो, आयुक्त साहेबांनी सांगितले ते मी सांगतो की, त्यावेळी आयुक्त साहेबांनी सांगितले होते की, ही सर्व जबाबदारी माझी आहे.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानीः—** सांगा आपण, चर्चा करा. मी तर सांगत आहे की, ३७ मध्ये आपल्याला सुधारणा करायची आहे.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:—** सन्माननिय बोडारेजी, आपण शांतता राखा.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—** नाही नाही ते स्पष्टीकरण देत आहेत की, सरकारने कसे केले, जर सरकारची चुक आहे, तर सरकारच्या लक्षात आणून दयायला पाहीजे. ही आपली चुक नाही, मी परत परत सांगत आलो आहे. जेव्हा श्री. बालाजी खतगांवकर, आयुक्त म्हणून होते, तेव्हा त्यांचे म्हणणे आहे, इतिवृत्तात आले आहे. आराखडा तयार करण्यापुर्वी यामध्ये माझी भुमिका शुन्य असते, विकास आराखडा तयार करण्यासाठी पार्श्वभूमी आमची असते. परंतु आपल्याला जे पाहीजे ते करणे आमचे कर्तव्य आहे. मुळ आराखडा कलम २६ खाली तो जास्तीत जास्ती नियोजनाच्या अटीनुसार तयार करण्यात आला, त्यावर लोकांनी आक्रोश केला, एवढे रस्ते नाहीत. लोकांच्या पक्या घरावरून रस्ते जातात, जिथे झोपडपट्टी आहे, तिथे हरीत पट्टा दर्शविला आहे. तो वस्तुस्थितीला धरून नव्हता. परंतु त्यांनी नियोजनाच्या अटी लक्षात घेऊन जेवढे करू शकतात, तेवढे लक्षात घेऊन त्यांनी आराखडा तयार केलेला आहे. ज्या लोकांच्या तक्रारी समोर आल्या, प्रत्येक प्रभाग समितीत सुचना आल्या ब—याच होत्या. म्हणजे जी वस्तीस्थिती आहे, असे त्यावेळच्या आयुक्तांचे म्हणणे होते. त्याच्या नंतर आपण सगळयांनी मिळून एक ठराव परीत केला होता. तेव्हा माझे स्टेटमेंट होते, जो बदल आहे, तो मी या ठिकाणी नमुद करतो आयुक्त साहेब, त्याची काटेकोरपणे काळजी घ्यावी. या संपुर्ण शहराच्या भावना आहेत. या सुधारणा त्या प्रारूपमध्ये असतील, त्या दोन प्रकारच्या असतील, पुढचा प्रस्ताव आम्ही पाठवणार आहोत. त्या झाल्या नाहीत, ही आपली चुक आहे, सरकारची चुक नाही. ही सरकारची चुक आहे, सरकारच्या लक्षात आणून दयायला पाहीजे.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—** माझे म्हणणे असे आहे की, आपल्याला आज काय पाहीजे? ज्या दोन गोष्टी आहेत, त्या मुख्यत्व करून इथे येत आहेत. एक आहे रिंग रोड, रिंगरोडचा खुप विरोध आहे. आपण ८० फुटाचा प्रस्ताव करून पाठवले होते आणि आपल्या या दोन गोष्टीवर आपण लक्ष दयावे आणि १२० फुटाच्या रिंगरूट रोडला माझा सुध्दा विरोध आहे. आमची भारतीय जनता पार्टीला सुध्दा नाही पाहीजे, एवढया वर्षा पासून वसलेल्या झोपडया आहेत, त्यांच्यासाठी पण काही ना काही मार्ग काढायला पाहीजे. आपण ८० फुटाचे करून पाठवले होते आणि सरकारने १२० फुट करून पाठवला आहे आणि आपले जे तज्ञ लोक होते, त्यांनी त्यांचे म्हणणे सुध्दा ऐकले नाही. मी हेच सांगत होतो. परंतु त्या बरोबर हे पण

सांगायला पाहीजे होते की, जेव्हा आपल्याला हे पहीलेच करायला पाहीजे होते, त्यावेळी आपण कुठे ना कुठे कमी पडलो आहे. मला एक गोष्ट सांगा की, आता बोराडे साहेबांनी सांगितले की, यामध्ये सरकारचा दोष नाही, तर अधिका–यांचा दोष आहे. परंतु जेव्हा पक्षाची एखादी गोष्ट येते तेव्हा असे वाटते की, आपण खुप मोठी चुक केली आहे. आम्ही पण तुमच्या बरोबर आहेत, आम्हांला पण वाटते की, जो डी.पी. प्लॅनला बनवला आहे, त्यामध्ये दुरूस्ती झाली पाहीजे.

<u>महापौर तथा पिठासिन अधिकारी:–</u> प्रदिपजी पत्रकार आणि मिडियावाले बसलेले आहेत, आपण कृपया करून विषयाला धरून बोला, हा माझा आदेश आहे.

<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:–</u> मॅडम माझी एक विंनती आहे की या प्लॅनमध्ये शहराच्या फायदयासाठी जे काही बदल करायला लागतील त्यामध्ये गोरगरीब कधीच उद्ध्वस्थ व्हायला नाही पाहीजे. आमची भावना आहे की, जे गोरगरीब आहेत, त्यांच्याकडे घर नाही त्यांना घर दयायचे आहे, त्यांना उद्ध्वस्थ करायचे नाही. तरी आपण या डी.पी. प्लॅनमध्ये जेवढे गोरगरीब आहेत, जेवढी लोक विस्थापित होत असतील आणि ज्यांचे घर उद्ध्वस्थ होणार आहेत, त्यांना आपण पुर्णपणे संरक्षण देवू अशी आमची भूमीका आहे.

<u>सदस्य, श्री. भारत राजवानी:–</u> मा. महापौर,आयुक्त साहेब, ज्या प्रकारे सर्व सदस्यांनी सांगितले की, शहरामध्ये डी.पी. प्लॅनमध्ये किती चुकीचे काम झाले आहे? जे आरक्षण आले आहे, त्या प्रमाणे माझ्या १७ नंबर पॅनलमध्ये अर्ध्या किलो मिटरमध्ये पाच गार्डन आहेत आणि दुसरीकडे प्राव्हेट प्रॉपर्टीमध्ये गार्डन टाकले आहेत. यामध्ये २७२ नंबर आरक्षण आहे. जी जिल्हाधिकारी कार्यालय येथून सोसायटी मंजूर केलेली आहे, त्यामध्ये १९ प्लॉट आहेत. वेलप्लॅन सोसायटी उल्हासनगरमध्ये एकच आहे. तीला सुध्दा शासनाने उध्दवस्त केले आहे. त्यांचे जे प्राव्हेट गार्डन आहेत, त्यांच्या आतमधून वेगळे रोड टाकले आहेत. तरी कृपया करून हे आरक्षण येथून काढण्यात यावे, आणि जो मेन रोड आहे ६० फुट तो ४० फुटाचा करण्यात आला आहे. असाच तहसिलदार कार्यालय येथून एक रोड आहे, तो ६० फुटाचा होता, तो एरिया अजून डेमोलेशन होत नाही. तो रोड पण चांगला आहे. त्याला ४० फुट केले आहे. मला एक माहीती पाहीजे, ज्यांचे बॅरेक आहेत, त्यांच्या समोर जे नॉन मॅन लॅड होत, त्यांचे प्लॅन पास होतील का? मला याची माहीती पाहीजे कोण आहे?

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:–</u> मा. महापौरजी, मा. उप महापौर, मा. आयुक्त साहेब,......

<u>सदस्य, श्री. शंकर लुंड:–</u> मा. महापौर, मा. आयुक्त साहेब.....

सदस्य, श्री. भारत राजवानी:– जो रोड ६० फुटाचा होता, तो ४० फुट केला आहे. ज्या बॅरेकच्या समोर नॉन मॅन लॅन्डस आले होते. आले नाही. त्यांचा प्लॉन पास होईल का? बिलकुल होणार नाही. अशा प्रकारे संपुर्ण शहर उध्दवस्त होईल आणि त्यांना पुढे प्रॉपर्टी डेव्हलपमेंट करता येणार नाही. माझी विनंती आहे की, परत सरकारला पाठवून त्यामध्ये बदल करून तिथे परत आरक्षण ठेवले जावे. मा. आयुक्त साहेब, गाऊन बाजार इथे एक रोड आहे, दुधनाका ते ४० सेक्शन पर्यंत तो ८० फुटाचा केला आहे.

सदस्या, श्रीम. पंचम कालानी:– मा. आयुक्त साहेब, हा जो डी.पी. प्लॉन आला आहे, त्याबाबतीत विचारपुस करण्यासाठी आमच्या घरी १०० ते २०० लोक आले होते, ते विचारत होते की, या डी.पी. प्लॉनमध्ये आमचा एरिया कोणता आहे. सर मला एक विनंती आहे आणि एक प्रश्न पण आहे हा जो प्लॉन आहे, रेड, ग्रीन, पिवळा हे सगळे लोकांना समजत नाही. फक्त १० टक्के लोकांना समजायला येईल आणि ९० टक्के लोंकाना काहीच समजले नाही, त्यांना आम्हांला उत्तर दयायचे आहे.

सदस्य, श्री. किशोर वनवारी:– या डी.पी. प्लॉनमध्ये कोणालाच काहीच दिसत नाही की समजत नाही.

सदस्या, श्रीम. पंचम कालानी:– सर जेव्हा डी.पी. प्लॉन बनवला जात होता, त्यावेळी शहरातील पाच मोठमोठे बिल्डर तिथे बसले होते. दोन–तीन लोक बसले होते, त्यांनी हा डी.पी. प्लॉन बनवला आहे. मला वाटते की, सर्वसाधारण लोकांसाठी हा डी.पी. नाही तर या पाच मोठमोठया बिल्डरांसाठीच हा डी.पी. प्लॉन बनवला आहे. मी आज जे बोलली आहे, तेच सगळे बोलतील.

सदस्य, श्री. भगवान भालेराव:– जे बिल्डर आहेत, त्यांची नावे पण सांगायला पाहीजे होते.

काही सदस्य, एकत्रित बोलत असल्यामुळे कोण काय बोलत होते, ते समजून आले नाही.

सदस्य, श्री. शंकर लुंड:– महापौर मॅडम, आयुक्त साहेब, मी फक्त आपले एक मिनीट घेतो, आपले जे सगळे सदस्य आहेत.....

सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:– मी श्रीम.पंचम कालानी यांना सलाम करतो की, त्यांनी खरी दिशा दाखवली आहे. त्यांनी सांगितले की, हा डी.पी. प्लॉन कसा बनला.

सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:– मा. महापौर, आजची सभाग, २२ तारखेला सायंकाळी ४.०० वाजे पर्यंत ही सभा स्थगित करण्यात यावी.

**<u>महापौर तथा पिठासिन अधिकारी:—</u>** ही सभा स्थगित करण्यात येत असून २२ तारखेला सायंकाळी ४.०० वाजता घेण्यात येईल.

**<u>महापालिका सचिव:—</u>** २२ तारखे पर्यत सायंकाळी ४.०० वाजे पर्यंत मा. महापौरांनी मिटींग स्थगित केली आहे. कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

---

सूचकाचे नांव :—श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नांव :— श्री. रमेश चव्हाण

<u>स्थगित प्रस्ताव</u>

दिनांक १६/१२/२०१७ रोजी दुपारी ३.०० वाजता सुरु केलेली सभा काही कारणास्तव स्थगित करण्यास प्रस्तावित.

<u>महासभा ठराव क्र. ४० ड</u> <u>दिनांक :</u> <u>१६/१२/२०१७</u>

ही महासभा वरील प्रस्ताव विचारात घेता दिनांक १६/१२/२०१७ रोजी दुपारी ३.०० वाजता आयोजित केलेल्या सभेचे कामकाज दिनांक २२/१२/२०१७ रोजी सांयकाळी ४.०० वाजेपर्यंत स्थगित करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर/पीठासीन अधिकारी

विशेष महासभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर ७.०० वाजता महापौर श्रीमती मिना कुमार आयलानी यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)

महापालिका

सचिव

उल्हासनगर

महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः—२२/१२/२
०१८

उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. २२/१२/२०१८ रोजीच्या विशेष महासभेचे इतिवृत्त.

२—अ

उल्हासनगर महानगरपालिकेची विशेष महासभा विशेष महासभा शनिवार दिनांक १६/१२/२०१७ रोजी ३.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेचे कामकाज स्थगित केल्याने सदर सभा शुक्रवार दिनांक २२/१२/२०१७ रोजी सांयकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली. सदर सभेत महापौर, श्रीमती मिना कुमार आयलानी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१. श्रीम. मिना कुमार आयलानी —— महापौर

२. श्री. जीवन चंद्रभान इदनानी —— उप—महापौर

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीमती अर्चना गोकुळ करणकाळे | ३३ | श्री. गजानन प्रल्हाद शेळके |
| ४ | श्रीमती पुजा सचिन भोईर | ३४ | श्रीमती ज्योती प्रकाश बठिजा |
| ५ | श्रीमती जयश्री ज्ञानेशवर पाटील | ३५ | श्री. दिपक लक्ष्मणदास सिरवानी (साई) |
| ६ | श्रीमती ज्योती दिलीप गायकवाड | ३६ | श्री. सुमित सागर सोनकांबळे |
| ७ | श्री. हरेश परमानंद जग्यासी | ३७ | श्रीमती ज्योत्स्ना सुरेश जाधव |
| ८ | श्रीमती पंचम उमेश कालानी | ३८ | श्रीमती ज्योती शामराव माने |
| ९ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | ३९ | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| १० | श्री. रविंद्र दशरथ बागुल | ४० | श्री. चंद्रशेखर केशव यादव |
| ११ | श्रीमती चरणजितकौर राजेंद्रसिंह भुल्लर | ४१ | श्रीमती लिलाबाई लक्ष्मण आशान |
| १२ | श्री. राजेंद्रसिंह विरसिंग भुल्लर | ४२ | श्रीमती शीतल चंद्रकांत कदम |
| १३ | श्री. स्वप्नील मिलिंद बागुल | ४३ | श्रीमती वसुधा धनंजय बोडारे |
| १४ | श्रीमती सुरेखा हनुमंत आव्हाड | ४४ | श्री. धनंजय बाबुराव बोडारे |
| १५ | श्रीमती अंजना अंकुश म्हस्के | ४५ | श्रीमती कांचन अमर लुंड |
| १६ | श्री. अशोक बच्चुमल छाप्रु | ४६ | श्री. शंकर गोविंदराम लुंड |
| १७ | डॉ. प्रकाश घनश्यामदास नाथानी | ४७ | श्रीमती सुनिता बाबुराव बगाडे |
| १८ | श्रीमती रेखा अशोक ठाकुर | ४८ | श्रीमती पुजाकौर श्यामसिंग लबाना |
| १९ | श्री. महेश पहिलराज सुखरामनी | ४९ | श्री. भारत रामचंद्र राजवानी (गंगोत्री) |

| | | | |
|---|---|---|---|
| २० | श्रीमती शुभांगीनी निकम | ५० | श्री. सतरामदास पुतनदास जेसवानी |
| २१ | श्री. भगवान शंकर भालेराव | ५१ | श्रीमती अंजली चंद्रकांत साळवे |
| २२ | श्रीमती ज्योती प्रशांत पाटील | ५२ | श्री. प्रमोद नामदेव टाले |
| २३ | श्री. राजेश नानिकराम वदारिया | ५३ | श्रीमती कविता सुधिर बागुल |
| २४ | श्रीमती दिपा नारायण पंजाबी | ५४ | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| २५ | श्री. अजित प्रभुनाथ गुप्ता | ५५ | श्री. किशोर नारायणदास वनवारी |
| २६ | श्रीमती पुष्पा नाना बागुल | ५६ | श्रीमती मिना चंद्रगुप्त सोनेजी |
| २७ | श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी | ५७ | श्रीमती कविता सुरेश गायकवाड |
| २८ | श्रीमती शुभांगी मनोहर बेहनवाल | ५८ | श्री. आकाश परशुराम पाटील |
| २९ | श्री. राजेंद्र शांताराम चौधरी | ५९ | श्री. विकास परशुराम पाटील |
| ३० | श्री. रवी किशनचंद जग्यासी | ६० | श्री. मनोज दिलीपकुमार सयानी |
| ३१ | श्रीमती इंदिरा जमनादास उदासी | ६१ | श्री. प्रदिप अर्जुनदास रामचंदानी |
| ३२ | श्रीमती सविता प्रविण तोरणे (रगडे) | ६२ | श्री. सुरेंद्र बाळकृष्ण सावंत |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१) श्रीमती मिनाकौर अजितसिंग लबाना २) श्रीम. आशा नाना बिराडे ३)श्री. कलवंतसिंग गुरूदेव सोहता ४) श्रीमती गीता लालचंद साधनानी ५) श्रीमती सरोजिनी टेकचंदानी ६) श्रीमती जया प्रकाश माखिजा ७) श्रीमती अपेक्षा भगवान भालेराव ८) श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग ९) श्रीमती छाया सुजित चक्रवर्ती उर्फ अडसुळ १०) श्रीमती चंद्रावती आयोध्याप्रसाद सिंग ११) श्रीमती डिम्पल नरेंद्र ठाकुर (कुमारी) १२) श्रीमती कविता लाल पंजाबी १३) श्रीमती मिताली राजेश चान्पूर १४) श्री. सुनिल मुकुंद सुर्वे १५) श्रीमती संगिता नितीन सपकाळे १६) श्रीमती दिप्ती नविन दुधानी १७)श्रीमती ज्योती रमेश चैनानी १८) श्रीमती मिनाक्षी रवी पाटील १९) श्री. विजय चाहू पाटील २०) श्री. अरूण लक्ष्मण आशान २१) श्रीमती आशा जीवन इदनानी.

खालील अधिकारी सभेत उपस्थित होते./होत्या

१. डॉ. विजया कंठे, अतिरिक्त आयुक्त

२.श्री. संतोष देहेरकर, उप आयुक्त (मुख्यालय)
३. श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी, प्र. महापालिका सचिव

४. श्री. राम जैसवार, शहर अभियंता

५. डॉ. राझा रिझवानी, प्र. वैद्यकिय आरोग्य अधिकारी

६. श्री. अशोक जाधव, सहाय्यक आयुक्त

७. श्री. महेश शितलानी, प्र. कार्यकारी अभियंता

८. श्री. कुमार जग्यासी, कनिष्ठ अभियंता

९.श्री. हनुमंत खरात, कनिष्ठ अभियंता

१०. श्री. वानखेडे, लेखा परिक्षक

११. श्री. नंदू समतानी, प्र.सहाय्यक आयुक्त

१२. श्रीम. छाया डांगळे, प्र.सहाय्यक आयुक्त

१३. श्री. मनिष हिवरे, प्र.सहाय्यक आयुक्त

१४. श्रीम. श्रध्दा सपकाळे, प्रोग्रामर

१५. श्रीम. विशाखा सावंत, प्र. मालमत्ता व्यवस्थापक

१६. श्री. विनोद केणे, प्र. स्वच्छता निरीक्षक

१७. श्री. यशवंत सगळे, प्र. वाहन व्यवस्थापक

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.

१. श्रीमती मनिषा महाजन

२. श्रीमती नर्गिस खान

३. श्री. अशोक रामरख्यानी

४. श्री. बाळु भांगरे

सायंकाळी ४.२५ वाजता वंदेमातृरम म्हणुन सभेची सुरूवात करण्यात आली.

या वेळी डॉ. विजया कंठे, अतिरिक्त आयुक्त हया आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी म्हणुन आसनस्थ होत्या.

<u>महापालिका सचिवः—</u> विषय क्रमांक १ वाचून दाखवितात.

---

⇨ <u>विषय क्र. १ :—</u> उल्हासनगर शहराच्या मंजूर आराखडयामध्ये वगळण्यात आलेल्या क्षेत्रामध्ये आरक्षण बदलून पब्लिक युटीलीटीचे आरक्षण टाकण्यासाठी हरकती व सूचना घेणे तसेच महासभा, तज्ञसमितीच्या सूचयना व नागरीकांनी दिलेल्या हरकती विचारात न घेतल्याने या संदर्भात चर्चा, विचार, विनिमय करणे.

---

**<u>सदस्या, श्रीम. मिना सोनेजीः—</u>** मा. महापौर मॅडम, याच्या पहीले एक पॉईंट आहे, आज स्थानिक पत्रकारांना गॅलरीत येण्यास मनाई केली आहे, त्यांना गॅलरीमध्ये यायचे आहे, परंतु त्यांना नाही म्हणून सांगितले आहे. फक्त ७० पत्रकारांना ओळखपत्र दिले आहेत, त्यांनाच महासभेच्या गॅलरीमध्ये बसण्यास परवानगी दिली आहे. जे स्थानिक पत्रकार आहेत, ते खुप वर्षापासून पत्रकार आहेत, तरी कृपया करून त्यांना गॅलरीमध्ये जाण्यास परवानगी देण्यात यावी. सर्व पत्रकारांना आदेश देण्यात यावेत.

**<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरीः—</u>** अचानक असे का होते? कोणाला आतमध्ये जाऊन देतात तर कोणाला जाऊन देत नाहीत. ही दादागिरी आहे का? की, कोणाची प्राव्हेट प्रॉपर्टी आहे.

**<u>सदस्य, श्री. प्रमोद टालेः—</u>** अतिशय महत्वाचा विषय असतांना, डी.पी. चा विषय असतांना, तुम्ही पत्रकारांना गॅलरीत जाण्यास बंदी कसे काय करतात?

**<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरीः—</u>** महापौर मॅडम, ही आपली प्रॉपर्टी आहे की, महापालिका ही कोणाची प्राव्हेट प्रॉपर्टी आहे का?

सदस्य, श्री. मनोज सयानी:— आमचे वरिष्ठ पत्रकार, श्री. नानक मंगलानी यांना गॅलरीत जाण्यास थांबवण्यात आले आणि सांगितले की, तुम्ही पत्रकार नाहीत. आमच्या लिस्टमध्ये तुम्ही पत्रकार म्हणून नोंद नाही आणि त्यांना खालीच थांबवून ठेवले आहे.

सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:— ही सरळ सरळ दादागिरी आहे, हुकुमशाही आहे, ही दादागिरी बंद झाली पाहीजे.

सदस्य, श्री. मनोज सयानी:— जनसंपर्क कार्यालयाकडून सांगितले जाते तेच पत्रकार आहेत, बाकीचे पत्रकार नाहीत का? जनसंपर्क कार्यालयाकडून स्थानिक पत्रकारांना जाणूनबुजून त्रास दिला जात आहे.

सदस्य, श्री. भारत राजवानी:— हा निर्णय कोणाचा आहे? महापौरांचा निर्णय आहे की, आयुक्त साहेबांचा निर्णय आहे.

महापौर तथा पिठासिन अधिकारी:— सचिव मॅडम, आपण अलाऊन्स करा की, जे पण पत्रकार असतील ते महासभेच्या गॅलरीतध्ये जाऊ शकतात आयुक्त साहेबांना आदेश देते की, संबधित विभागाची चौकशी करून खरोखर काय प्रॉब्लेम आहे, त्याचा अहवाल मला देण्यात यावा.

सदस्य, श्री. भगवान भालेराव:— हे सभागृह आपले आहे, मॅडम, यासाठी कोणाच्या आदेशाची गरज नाही. सगळयांना माहीत आहे, चौकशी कोण करते काय नाही?

सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:— महापौर मॅडम, आयुक्त साहेब पण महापालिकेची प्रायव्हेट प्रॉपर्टी समजतात आणि त्यांचे अधिकारी पण प्रायव्हेट प्रॉपर्टी समजतात, ज्याला पाहीजे त्याला येऊन दयायचे आणि जो नको पाहीजे त्याला येऊन दयायचे नाही. हा कोणाच्या घरचे राज्य नाही, कायदयानुसार चालायला पाहीजे. जे नियम आहेत, त्या नियमांचे पालन तर करा.

सदस्य, श्री. राजेश वानखेडे:— आयुक्त मॅडम, तुम्ही पत्रकारांना का बंदी केली ते स्पष्ट करावे.

महापालिका सचिव:— मा. पिठासिन अधिकारी यांनी आदेश दिले आहेत की, कृपया करून पत्रकारांना आतमध्ये येऊन दयावे. ते बाहेर उभे आहेत, त्यांना आतमध्ये येऊ दयावे.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u>** त्यांना येण्यास कोणी बंदी घातली आहे, त्या अधिका—याला सभागृहामध्ये आणा.

**<u>सदस्य, श्री. सुरेंद्र सावंत:—</u>** मा.महापौर मॅडम, मा. आयुक्त साहेब, पत्रकारांचा विषय निघाला आहे, म्हणून मी एक विषय सांगतो की, एक महीन्यापासून आपल्या महानगरपलिकेत जे स्थानिक पत्रकार आहेत, साप्ताहीक, दैनिक पत्रकार आहेत, ते आपले पेपर छापून महापालिकेच्या पक्ष कार्यालयात वाटत होते. परंतु मागील दोन महीन्यापासून ती पध्दत बंद करण्यात आलेली आहे. त्यांचे जे वर्तमानपत्र आहेत, ते वर्तमानपत्र अगोदर उप आयुक्तांच्या कार्यालयात आणून दयायचे आणि ते वर्तमानपत्र उप आयुक्त वाचायचे आणि त्यांना जर वाटले तर ते वाटायला परवानगी देतील. अशी जी एक नविन प्रथा पाडलेली आहे, ती एक प्रकारे पत्रकारांवर आणीबाणीच झालेली आहे. असे माझे बरेच पत्रकार मित्र आहेत, त्यांनी मला सांगितले की, पुर्वी आम्ही वर्तमानपत्र महापालिकेच्या पक्ष कार्यालयात स्वत:चा वाटत होतो. परंतु आता त्यांना पक्ष कार्यालयात वर्तमानपत्र वाटण्यास बंदी करण्यात आलेली आहे. जर ही बाब सत्य असेल तर आपण खुलासा करावा. अन्यथा हे योग्य नाही असे मला वाटते. तरी पत्रकारांना त्यांची जी वर्तमानपत्र आहेत, ती त्यांना पुन्हा पक्ष कार्यालयात वाटण्यास परवानगी दयावी, अशी मी नम्र विनंती करतो, धन्यवाद.

**<u>सदस्य, श्री. दिपक सिरवानी:—</u>** मा. महापौर, मा. आयुक्त महोदय, उल्हासनगरचे एक जेष्ठ संपादक, श्री. अशोक बोधा यांचा चार दिवसापुर्वी पहीले निधन झाले आहे. मी मा. महापौरांना विनंती करतो की, श्री. अशोक बोधा यांना श्रध्दांजली अर्पित करण्यात यावी, धन्यवाद.

**<u>महापालिका सचिव:—</u>** कुपया जेष्ठ पत्रकार/संपादक अशोक बोधा यांना श्रध्दांजली वाहण्यासाठी उभे राहावे.

---

सुचकाचे नाव :— श्री. दिपक सिरवानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

**<u>शोक प्रस्ताव</u>**

उल्हासनगरचे एक जेष्ठ संपादक, श्री. अशोक बोधा यांचे नुकतेच काही दिवसांपुर्वी निधन झाले आहे.

त्यांच्या कुटूंबियांचे दु:खात हे सभागृह सहभागी असुन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

महासभा ठराव क्र. ५६ अ — दिनांक:— २२/१२/२०१७

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्री. अशोक बोधा यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दु:खात सहभागी होऊन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी

विशेष महासभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव:—**विषय क्र. १ डी.पी.चा विषय आहे.....

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** मॅडम जरा थांबा, आमचे नगरसेवक सावंत साहेबांनी जो विषय उपस्थित केला,

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—** भगवान भालेराव साहेब, तुम्ही महिलांना शकु—शुक करून महीलांना संबोधीत करतात, ही खुप चुकीची बाब आहे. महीला आयुक्त आहेत, सचिव आहेत, शुक—शुक करणे खुप चुकीची बाब आहे. तुम्हांला माफी मागावी लागेल. असे वागणे बरोबर नाही,

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u>** तुम्हांला मराठी व्यवस्थित येत नाही, महाराष्ट्रामध्ये मराठी भाषा चालते, तुम्ही मराठी शिकून घ्या.

**<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—</u>** आमचा याच्यावर विरोध आहे. आमच्या आयुक्त महीला बसल्या आहेत, शुक—शुक ही कुठली भाषा आहे.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u>** सन्माननिय महापौर मॅडम, सावंत साहेबांनी....

**<u>महापौर तथा पिठासिन अधिकारी:—</u>** सन्माननिय भालेरावजी, श्री.प्रदिपरामचंदानी यांनी जे बोलेले ते बरोबर आहे.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u>** आपण ऐकले का?

**<u>महापौर तथा पिठासिन अधिकारी:—</u>** होय, मी ऐकले आहे.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u>** आपण ऐकले का? काहीच नाही मी त्यांना बोललो की, ओ मॅडम जरा थांबा. हे आहो, जाहो आमच्या मराठीत जास्त होते, आम्हांला माहीत नाही. सन्माननिय महापौर मॅडम, आमच्या सावंत साहेबांनी जो मुद्दा उपस्थित केला आहे. स्थानिक वर्तमान पत्रामध्ये उल्हासनगरच्या ठराविक बातम्या प्रसिध्द होतात. साप्ताहिकामध्ये शहरातल्या विविध भागातल्या बातम्या प्रकाशित होतात आणि अशी परिस्थिती आहे की, उल्हासनगरचे जे साप्ताहीक पेपर आहेत, मला जमणार नाही, माझी हिंदी कमजोर आहे.

**<u>सदस्य, श्री. दिपक सिरवानी:—</u>** तरी चालेल.

**<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—</u>** भालेराव साहब, हिंदीमध्ये बोला ना?

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u>**जे स्थानिक वर्तमानपत्र आहेत, साप्ताहीक आहेत, पाक्षिक आहेत, त्यांना दोन महीन्यापासून पत्रकार कक्षामध्ये बसण्यास मनाई केली आहे. सावंत साहेबांनी जो विषय काढला तो खुप चांगला आहे आणि जे स्थानिक पत्रकार आहेत, साप्ताही, दैनिक ते आपल्या शहरातील नाली आणि छोटे मोठे जे प्रॉब्लेम आहेत, ते तेच पत्रकार लिहीतात आणि नॅशनल पेपरमध्ये अशा बातम्या येत नाहीत.

या लोकांना पत्रकार कक्षामध्ये बसण्यास मनाई केली आहे, ते कोणाच्या आदेशाने केली आहे. त्याचा खुलासा करण्यास सांगा आणि सभागृहामध्ये जे पत्रकारीता करतात त्यांना सन्मान आहे, दैनिक पत्रकार वर्तमान पत्रामध्ये काम करतात आणि साप्ताहीक पत्रकार स्वत: संपादक असतात, तर त्यांना पण तिथे बसण्यासाठी जागा मिळाली पाहीजे आणि त्यांना पण न्याय मिळाला पाहीजे आणि आज जे झाले आहे, ते चुकीचे आहे. मी याची निंदा करतो आणि आपण आदेश दया की पत्रकार कक्षामध्ये सर्व पत्रकारांना बसण्यासाठी जागा मिळाली पाहीजे.

<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:–</u> मा. महापौर, आमचे श्री. सुरेंद्र सावंत साहेब आहेत, त्यांनी सांगितले आहे की, जे लोकल पेपर आहेत, पहीले स्थानिक पेपर येत होते, महापौर कार्यालय, उप महापौर कार्यालय,सभागृह नेता, विरोधी पक्ष नेता, सर्व गटनेते, सर्व सभापती कार्यालयांमध्ये जात होते. ते सर्व पेपर जनसंपर्क अधिकारी त्यांच्या कार्यालयामध्ये जमा करतात, ते वाचतात आणि त्यांच्या विरोधात बातमी असेल तर ते वाटायचे नाही. त्यांच्या विरोधात बातमी असेल तर वाटायचे नाहीत, असे नियम त्यांनी बनवले आहेत. हा कुठला कायदा आहे.

<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:–</u> खास करून दैनिक क्लीन टाईम्स येत होता, ते त्यावरच भडकले आहेत.

<u>सदस्य, श्री. प्रमोद टाले:–</u> महापौर मॅडम, जनसंपर्क अधिकारी यांना हजर करा ना? मॅडम ज्यांनी आदेश दिले आहेत, त्यांना इथे बोलावून त्यांचे काय म्हणणे आहे, ते समजून घ्या.

<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:–</u> ही लोकशाही आहे मॅडम, दैनिक वर्तमानपत्र हे लोकशाहीचे चौथे स्तंभ आहे आणि पत्रकारांनाच आतमध्ये येऊन दयायचे नाही तर ही हुकुमशाही झाली आणि आपल्या कार्यकाळामध्ये हुकुमशाही चालेल का?

<u>सदस्य, श्री. दिपक सिरवानी:–</u> आपण हिंदी चांगले बोललात, तुम्ही खोटे बोलतात, हिंदी भाषा चांगली बोलतात.

<u>सदस्य, श्री. सुरेंद्र सावंत:–</u> महापौर मॅडम, उप महापौर, आयुक्त मॅडम, जरा इकडे लक्ष दया मी काय बोलत आहे ते मागच्या दोन महीन्यापासून पत्रकार त्यांचे पेपर आमच्या कॅबिनमध्ये आणून देत होते, ते पत्रकार आता पेपर दयायचे बंद झाले आहेत आणि ते सर्व वृत्तपत्र जनसंपर्क कार्यालयात जमा होतात आणि जनसंपर्क कार्यालयाती कर्मचारी ते वृत्तपत्र वाचतात. त्यांना जर वाटले की, हे वृत्तपत्र व्यवस्थित आहे, तेव्हाच आमच्या ऑफिसमध्ये ते वृत्तपत्र येतात. अन्यथा महापालिकेच्या बाबतीत जर पेपमध्ये काही

टिका केली असेल, विरोधात बातमी असेल तर जनसंपर्क अधिकारी बोलतात की, दुस—या ऑफिसमध्ये वाटायचे नाही. अशी जी नविन पध्दत आपण चालू केली आहे, ती बिलकुल चुकीची आहे. लोकशाहीसाठी ते मारक आहे, अशी पध्दत न करता, जे वृत्तपत्र साप्ताहीक असतात, त्यांना परत जुन्या पध्दती प्रमाणे प्रत्येक पक्षाच्या कार्यालयात वाटण्याची परवानगी दयावी आणि त्या नंतर त्याचा खुलासा हवा असेल तर त्यांना परत दुस—या अंकात वृत्तपत्र छापण्यासाठी सांगावे. त्यामुळे तुमचे पण समाधान होईल आणि त्यांचे पण समाधान होईल आणि आमच्या सारख्या नगरसेवकांना या शहरामध्ये ज्या घटना, दुर्घटना घडतात, काही वाईट व्यवहार होतात आणि चांगले व्यवहार होतात, ते आम्हांला कळतील. तर ही पध्दत चालू करा, दोन महीन्यापासून पध्दत बंद आहे. आपल्या महापालिकेच्या कार्यालयामध्ये, पक्ष कार्यालयामध्ये पेपर देण्याचे काम बंद झाले आहे. हे पेपर दररोज अगोदर जनसंपर्क कार्यालयामध्ये आणून दयावे लागतात, त्या नंतर जनसंपर्क अधिकारी वाचतात, त्यांना वाटले तर ते वाटतात नाही तर नाही. मी पुन्हा पुन्हा सांगतो की, मला हिंदीमध्ये बोलता येत नाही, मी दोनंदा सांगत आहे, धन्यवाद.

<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—</u> महापौर महोदया, या बाबतीत आपण काही तरी पत्रक काढावे, गॅलरीमध्ये गॅलरीची संख्या किती आहे, पत्रकार किती असावेत आणि लोकप्रतिनिधीचे जे नातेवाई, जे बघणारे आहेत, काही एक्सफर्ट असतात काही बाहेरून येणारे पाहूणे असतात, ती जागा निश्चित करावी. आपण सर्व प्रशासनाच्या हातामध्ये देतो त्यामुळे हे सर्व घडते. त्यामुळे ते आपण निश्चित करावे आणि पुढच्या महासभेमध्ये ते सर्वांना कळावे. फस्ट कम फस्ट म्हणजे कोणाला बसवायचे आणि कोणाला बसवायचे नाही, हे आपण ठरवले पाहीजे. त्यामुळे पुढच्या महासभेमध्ये पत्रकार किती असतील, कुठले असतील आपण सगळेच नॅशनल असतील, साप्ताहीक असतील, मासिक असतील कुठले पत्रकार इथे बसतील त्याची एक लिस्ट सगळयांना कळू दया. म्हणजे अशा प्रकारचा गोंधळ होणार नाही, हे उगीचच चालले आहे आणि त्याच्यामुळे अपमान पण होतो आणि त्यामुळे अधिका—यांना नक्की कळत नाही आम्ही नेमके काय करायचे, जे करायचे ते करीत नाहीत आणि जे नाही करायचे तेही होते. त्यामुळे हे अधिकार आपले आहेत, आपण ही निश्चिती करावी.

<u>महापौर तथा पिठासिन अधिकारी:—</u> सन्माननिय सदस्य, आज पत्रकारांना गॅलरीमध्ये न येण्याचा जो आदेश दिला गेला, त्याची मी स्वत: चौकशी करेल आणि काही दिवसातच चौकशीचा रिझल्ट मी अपनाला देईल आणि गॅलरीमध्ये संख्या किती आहे, किती नाही, कोण बसायला पाहीजे, कोण बसायला नाही पाहीजे सभागृह नेता आणि उप महापौर आपसात बसून एक योजना बनवून निर्णय घेऊ.

<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—</u> मा. महापौर, उप महापौर....

<u>महापालिका सचिव:—</u> मी विषय वाचला आहे, विषय डी. पी. प्लॅानचा आहे.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** आजच्या विषयावर ही जी स्थगित सभा बोलवली आहे, मा. महापौर मॅडम आज ही मिटींग यासाठी स्थगित केली होती की, आपण सर्व पक्ष एकत्र बसून या डी.पी. प्लॅनमध्ये काय काय चुकीचे आहे? काय आडचणी आहेत? आणि या मुळे शहरामध्ये लोक त्रस्त आहेत, त्यांचे त्रास कमी केले जावे, ईपीचे १३७ विषय आहेत, सॅगशन मॉडिफिकेशनचे आहेत, त्यासाठी आपली मिटींग चालू आहे आणि विरोधी पक्षाबरोबर बैठक घेऊन या डी.पी. प्लॅनमध्ये अंतिम निर्णय घेण्यात येईल. त्यासाठी मा. महापौर मॅडम, मी आपल्याला निवेदन करतो की, २८ तारखेला ३.०० वाजे पर्यंत ही महासभा स्थगित करण्यात यावी.

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:—** तो पर्यंत आपण बसून नास्ता करू शकतात.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:—** ही महासभा स्थगित करण्यात येत आहे, नंतरची महासभा ही २८ डिसेंबर रोजी ३.०० वाजता ठेवण्यात येईल आणि दादा सतरामदास जेसवानी, मिना सोनेजी, किशोर वनवारींचा ईपी बाबत सचिव मॅडमला सोपविण्यात येत आहे.

---

सूचकाचे नांव :—श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नांव :— श्री. रमेश चव्हाण

**स्थगित प्रस्ताव**

दिनांक १६/१२/२०१७ रोजी दुपारी ३.०० वाजता सुरु केलेली सभा काही कारणास्तव स्थगित करण्यात आल्याने सदर सभा दिनांक २२/१२/२०१७ रोजी सांयकाळी ४.०० वाजता आयोजित करुन पुन्हा स्थगित करण्यांस प्रस्तावित.

महासभा ठराव क्र. ५६ ब दिनांक :
२२/१२/२०१७

ही महासभा वरील प्रस्ताव विचारात घेता दिनांक १६/१२/२०१७ रोजी त्यात दिनांक २२/१२/२०१७ रोजी आयोजित केलेल्या सभेचे कामकाज दिनांक २८/१२/२०१७ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत स्थगित करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर/पीठासीन अधिकारी

विशेष महासभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—</u> मा. महापौर मॅडम, मी सभागृहातील सर्व सदस्यांना निवेदन करतो की, आपापल्या वार्डचे ईपीमध्ये आणि एस.एम.मध्ये ज्यांना दुरूस्ती करायची आहे, तर एक लेखी पत्र सभागृह कार्यालयामध्ये जर दयाल तर आपण त्याच्यावर बसून चर्चा करू आणि दुरूस्त करण्याचा प्रयत्य करू.

<u>महापालिका सचिवः—</u> मला इथे तीन पत्र मा. महापौरांनी ठरावामध्ये टाकण्यासाठी दिले आहेत, ते मी सभागृह नेता यांच्याकडे देत आहे, कारण त्यांनी आता जसे सांगितले आहे. श्रीमती अंजली साळवे मॅडमनी आणि श्रीमती बागुल मॅडम यांनी सुध्दा पत्र दिले आहे, ते मी सभागृह नेता यांच्याकडे सुपुर्द करीत आहे. याच्यामध्ये जे काही ऑब्जेक्शन, सजेशन असतील ते.

<u>सदस्य,श्री.किशोर वनवारीः—</u> मॅडम जे काही सदस्यांनी दिले आहे, त्याचा उल्लेख पण इतिवृत्तात यायला पाहीजे.

<u>महापालिका सचिवः—</u> मी यासाठीच अलाऊन्स करून सांगितले आहे की, कोणी कोणी पत्र दिले आहे.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:–** ठराव जेव्हा होईल, तेव्हा या सर्व पत्रांची नोंद झाली पाहीजे.

**सदस्य,श्री.दिपक सिरवानी:–** मी आयुक्त साहेबांना पत्र दिल आहे, तेथून तो कलेक्ट करून घ्या.

**महापालिका सचिव:–** २८ तारखेला सायंकाळी ३.०० वाजे पर्यंत मा. महापौरांनी मिटींग स्थगित केली आहे. कृपया सर्वांनी राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर ४.४५ वाजता महापौर श्रीमती मिना कुमार आयलानी यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)

महापालिका

सचिव

उल्हासनगर

महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः—
२८/१२/२०१८

उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. २८/१२/२०१८ रोजीच्या विशेष महासभेचे इतिवृत्त.

## २—ब

उल्हासनगर महानगरपालिकेची विशेष महासभा शनिवार दिनांक १६/१२/२०१७ रोजी दुपारी ३.०० आयोजित केली होती. सदर सभेचे कामकाज स्थगित केल्याने सदर सभा शुक्रवार दिनांक २२/१२/२०१७ रोजी सांयकाळी ४.०० वाजता आयोजित करुन पुन्हा स्थगित करण्यांत आल्याने सदरची सभा गुरुवार दिनांक २८/१२/२०१७ रोजी दुपारी ३.०० वाजता आयोजित करण्यात आली. सदर सभेत उप—महापौर, श्री. जीवन इदनानी हे पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होते. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१. श्री. जीवन चंद्रभान इदनानी —— उप—महापौर

| | | | |
|---|---|---|---|
| २ | श्रीमती अर्चना गोकुळ करणकाळे | ३६ | श्रीमती ज्योत्स्ना सुरेश जाधव |
| ३ | श्रीमती जयश्री ज्ञानेश्वर पाटील | ३७ | श्रीमती ज्योती शामराव माने |
| ४ | श्रीमती ज्योती दिलीप गायकवाड | ३८ | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| ५ | श्री. हरेश परमानंद जग्यासी | ३९ | श्री. चंद्रशेखर केशव यादव |
| ६ | श्रीमती मिनाकौर अजितसिंग लबाना | ४० | श्रीमती मिताली राजेश चान्पूर |
| ७ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | ४१ | श्रीमती लिलाबाई लक्ष्मण आशान |
| ८ | श्रीमती आशा नाना बिराडे | ४२ | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे |
| ९ | श्री. रविंद्र दशरथ बागुल | ४३ | श्रीमती संगिता नितीन सपकाळे |
| १० | श्रीमती चरणजितकौर राजेंद्रसिंह भुल्लर | ४४ | श्रीमती शितल चंद्रकांत कदम |
| ११ | श्री. राजेंद्रसिंह विरसिंग भुल्लर | ४५ | श्रीमती वसुधा धनंजय बोडारे |
| १२ | श्री. स्वप्नील मिलींद बागुल | ४६ | श्री. धनंजय बाबुराव बोडारे |

| | | | |
|---|---|---|---|
| १३ | श्रीमती सुरेखा अहनुमंत आव्हाड | ४७ | श्रीमती दिप्ती नविन दुधानी |
| १४ | श्रीमती अंजना अंकुश म्हस्के | ४८ | श्रीमती कांचन अमर लुंड |
| १५ | श्री. अशोक बच्चुमल छाप्रु | ४९ | श्री. शंकर गोविंदराम लुंड |
| १६ | डॉ. प्रकाश घनश्यामदास नाथानी | ५० | श्रीमती सुनिता बाबुराव बगाडे |
| १७ | श्रीमती रेखा अशोक ठाकुर | ५१ | श्रीमती पुजाकौर श्यामसिंग लबाना |
| १८ | श्री. भगवान शंकर भालेराव | ५२ | श्री. भारत रामचंद्र राजवानी (गंगोत्री) |
| १९ | श्रीमती छाया सुजित चक्रवर्ती उर्फ अडसुळ | ५३ | श्री. सतरामदास पुतनदास जेसवानी |
| २० | श्रीमती ज्योती प्रशांत पाटील | ५४ | श्रीमती अंजली चंद्रकांत साळवे |
| २१ | श्रीमती चंद्रावती आयोध्याप्रसाद सिंग | ५५ | श्री. प्रमोद नामदेव टाले |
| २२ | श्री. राजेश नानिकराम वदारिया | ५६ | श्रीमती कविता सुधिर बागुल |
| २३ | श्रीमती डिम्पल नरेंद्र ठाकुर (कुमारी) | ५७ | श्री. किशोर नारायणदास वनवारी |
| २४ | श्रीमती दिपा नारायण पंजाबी | ५८ | श्रीमती मिना चंद्रगुप्त सोनेजी |
| २५ | श्री. अजित प्रभुनाथ गुप्ता | ५९ | श्रीमती मिनाक्षी रवी पाटील |
| २६ | श्रीमती पुष्पा नाना बागुल | ६० | श्रीमती कविता सुरेश गायकवाड |
| २७ | श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी | ६१ | श्री. आकाश परशुराम पाटील |
| २८ | श्रीमती शुभांगी मनोहर बेहनवाल | ६२ | श्री. विकास परशुराम पाटील |
| २९ | श्री. राजेंद्र शांताराम चौधरी | ६३ | श्री. मनोज दिलीकुमार सयानी |
| ३० | श्री. रवी किशनचंद जग्यासी | ६४ | श्री. प्रदिप अर्जुनदास रामचंदानी |
| ३१ | श्रीमती इंदिरा जमनादास उदासी | ६५ | श्री. सुरेंद्र बाळकृष्ण सावंत |
| ३२ | श्रीमती सविता प्रविण तोरणे (रगडे) | ६६ | श्री. अरूण लक्ष्मण आशान |
| ३३ | श्री. गजानन प्रल्हाद शेळके | ६७ | श्रीम. आशा जीवन इदनानी |
| ३४ | श्रीमती ज्योती प्रकाश बठिजा | | |

| | | | |
|---|---|---|---|
| ३५ | श्री. सुमित सागर सोनकांबळे | | |

तर

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१. महापौर––श्रीमती मिना कुमार आयलानी

व २. श्रीमती पुजा सचिन भोईर, ३. श्रीमती पंचम उमेश कालानी, ४. श्री. कलवंतसिंग गुरूदेव सोहता, ५. श्रीमती गिता लालचंद साधनानी ६. श्रीमती सरोजिनी टेकचंदानी, ७. श्रीमती जया प्रकाश माखिजा,८. श्री.महेश पहिलाजराय सुखरामनी, ९. श्रीमती अपेक्षा भगवान भालेराव, १०. श्रीमती शुभागीनी निकम, ११. श्रीमती. लक्ष्मी सुरेंद्र सिंग, १२. श्रीमती कविता लाल पंजाबी, १३ श्री. दिपक लक्ष्मणदास सिरवानी (साई), १४. श्रीमती ज्योती रमेश चैनानी, १५ श्री. राजेश देवेंद्र वानखेडे, १६ श्री. विजय चाहु पाटील, .

खालील अधिकारी सभेत उपस्थित होते.

१. श्री. संतोष देहेरकर, उप–आयुक्त, मुख्यालय
२. श्रीमती, प्राजक्ता मि. कुलकर्णी, प्र. महापालिका सचिव
३. श्री. मिलिंद सोनवणे, नगररचनाकार
४. श्री. अशोक जाधव, लेखा परिक्षक
५. श्री. राम जैसवार, शहर अभियंता
६. डॉ. राजा रिझवानी, प्र. वैद्यकीय आरोग्य अधिकारी
७. श्री. महेश शितलानी, उप अभियंता, साबांवि
८. श्री. कुमार जग्यासी, उप अभियंता, नगररचना विभाग
९. श्री. भगवान कुमावत, प्र. सहा. आयुक्त, मालमत्ता
१०.श्रीमती छाया डांगळे, प्र. सहा. आयुक्त, विधी
११.श्री. मनिष हिवरे, प्र. सहा. आयुक्त, साप्रवि
१२.श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी
१३.श्रीमती श्रध्दा सपकाळे, प्रोग्रामर
१४.श्री. बाळु नेटके, प्र. सुरक्षा अधिकारी
१५.श्री. यशवंत सगळे, प्र. वाहन व्यवस्थापक

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.

१. श्रीमती मनिषा महाजन

२. श्रीमती नर्गिस खान

३. श्री. अशोक रामरख्यानी

४. श्री. बाळु भांगरे

दुपारी ३.१० वाजता वंदे मातरम म्हणुन सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>**महापालिका सचिवः—**</u> मा. पिठासिन अधिकारी यांनी मला वंदेमातृरम म्हणायला सांगितले आहे, तरी कृपया वंदेमातृरमसाठी सर्वांनी उभे राहावे. ही दोनदा स्थगित झालेली सभा आहे, सभेमध्ये गणपुर्ती पण नाही. विषय डी.पी. प्लॅान बाबत आहे. गणपुर्ती नसल्याने सभा चालू शकतन नाही, कृपया लक्षात घ्यावे. आज गणपुर्तीची तशी आवश्कता नाही, सभा चालवू शकतात.

<u>**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरीः—**</u> सभा चालू करू शकतो.

<u>**महापालिका सचिवः—**</u> तुम्ही उल्हासनगरचा मंजूर विकास आराखडयामध्ये वगळण्यात आलेल्या क्षेत्रामध्ये आरक्षण बदलून पब्लिक युटीलिटीचे आरक्षण टाकण्यासाठी हरकती व सुचना देणे तसेच महासभा, तज्ञ समितीच्या सुचना नागरीकांनी दिलेल्या हरकती विचारात न घेतल्याने या संदर्भात चर्चा व विचार विनिमय करणे, विषय मी वाचला आहे.

<u>**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरीः—**</u> आयुक्त साहेब, उल्हासनगर शहराचा विकास आराखडा शासनाने मंजूर केला आहे. तो विकास आराखडा मला वाटत नाही की, महाराष्ट्रामध्ये कुठल्याही महानगरपालिकेमध्ये अशा प्रकारचा विकास आराखडा मंजूर केला नसेल. फक्त उल्हासनगरच्या बाबतीमध्ये एक वेगळया प्रकारे महाराष्ट्र शासनाने हा विकास आराखडा मंजूर केला आहे. ७५ टक्के एस.एम. मंजूर, २५ टक्के ईपी, ७५ टक्के मंजूर केला आहे, २५ टक्के बाकी आहे. अशी एका शहराची थट्टा उडवण्याचे काम राज्य सरकारच्या माध्यमातून किंवा हा डी.पी. प्लान बनवणारी जी सेप्ट कंपनी आहे. या कंपनीच्या माध्यमातून केला गेलेला आहे. या शहराचा विकास आराखडा बनवतांना कसे व्हायला पाहीजे, या विषयावर मागच्या महासभेला चार तास चर्चा झाली आणि चर्चा होत असतांना आपण मिटींग स्थगित केली आणि १६ तारखेची मिटींग २२ तारखेला आणि २२ तारखेची आज २८ तारखेला. या शहराच्या विकासा बाबत विचार करतांना वेळ घेतला पाहीजे पण किती वेळ घेतला पाहीजे हा पण प्रश्न आमच्या सर्व नगरसेवकांसमोर आहे. या शहराचा विकास आराखडा झाला पाहीजे, शहराचा विकास झाला पाहीजे. शहराचा विकास करणारा हा विकास आराखडा असेल तर शिवसेना त्या विकास आराखडयाला नक्कीच

सहकार्य करेल, मदत करेल, त्याच्या बाजूने उभी आहे. परंतु आज आपण शहरामध्ये बघितला असेल की, शहरामध्ये विकास आराखडा बनवल्या नंतर सर्व जनता भयभित झालेली आहे, घाबरलेली आहे, ते रस्त्यावर उतरलेले आहेत, लोक रस्त्यावर उतरून नगरसेवकांना प्रश्न विचारत आहेत. आमचे घर राहील की जाईल, आमचे घर वाचेल का तुटेल? अशा जनतेला आपण नगरसेवक या माध्यमातून मिसगाईड्स करतो, लोकांना फसवतो असे काही तर होत नाही ना? या बाबतीकडे पण आपण लक्ष दिले पाहीजे. त्याच बरोबर विकासाचा आराखडा मंजूर करीत असतांना, जेवढे महापालिकेच्या महापौरांनी व आयुक्तांनी गांर्भीयाने घेतले पाहीजे, तेवढे गांर्भीय घेतलेले आजच्या या सभेच्या माध्यमातून दिसत नाही. म्हणून आमचा शिवसेनेचा जो काही विकास आराखडा शासनाने मंजूर केलेला आहे. त्या मंजूर झालेल्या विकास आराखडयाला, जो विकास आराखडा मंजूर केला आहे, तो रद्द करा. अशी आमची सर्व विरोधी पक्षाच्या सदस्यांची मागणी आहे आणि तो रद्द केलाच पाहीजे, अशी हक्काची मागणी आजच्या या महासभेच्या माध्यमातून करतो. कारण या विकास आराखडयाच्या माध्यमातून जर लाखो लोक बेघर होणार असतील आणि ते रस्त्यावर येणार असतील तर त्यांच्या हिताचा प्रश्न आल्या नंतर त्या प्रश्नांकडे गार्भीरतेने महासभेने, महापौरांनी, महापालिकेच्या प्रशासनाने इथ बसलेल्या सर्व नगरसेवकांनी लक्ष दिले पाहीजे, अशी माझी भुमिका आहे, धन्यवाद.

या वेळी सदस्य, श्री. शेखर यादव, यांनी सभागृहामध्ये प्रवेश केला.

<u>सदस्य, श्री. भगवान भालेरावः—</u> सन्माननिय महापौर, आयुक्त साहेब, मला एक गोष्ट महापौर साहेब आपल्याला विचारायची आहे. आपण डी.पी. रद्द करण्या संदर्भात कोणी कायदेशिर बाजू इथे मांडणार आहेत का? तुमचे आयुक्त, श्री. देहेरकर साहेब, काही निर्णय घेऊ शकतात का? तुम्ही सांगा निर्णय घेऊ शकतात का?

<u>उप आयुक्त, श्री. संतोष देहेरकर, मा. आयुक्तांच्या स्थानी आसनस्थः—</u> तो निर्णय मला इथे घेता येणार नाही, मी आयुक्तांच्या वतीने आलो आहे.

<u>सदस्य, श्री. भगवान भालेरावः—</u> दुसरी गोष्ट अशी आहे की, सभागृह नेत्यांनी मागच्याच मिटींगमध्ये मला सांगितले होते की, डी.पी. प्लॉन बनवणारा जे धवल आहेत, त्यांना आज तुम्ही उपस्थित केले आहे का?

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:–** धवलच्या विषयी सन्माननिय सदस्य, भालेराव हे काल बोलले होते. तेव्हा मी त्यांना फोन केला, ते अहमदाबादला राहतात, त्यांनी सांगितले की, दोन–तीन दिवसाध्ये येईल. तुम्ही मिटींग पुढे ढकला किंवा तुम्हांला जो निर्णय घ्यायचा तो तुम्ही घ्या.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:–** मा. महापौर मॅडम, माझी तुम्हांला विनंती आहे की, सभागृहाचे मत किंवा बाहेर सन्माननिय सदस्यांचे मत, बाहेर सर्व जनतेचे मत उल्हासनगर शहरामध्ये अतिशय भावना तिव्र आहेत, त्या त्या भागामधून रिंगरोड जाणार आहे, कुठला भाग जाणार आहे, नगरसेवकांनाच माहीत नाही. डी.पी. बनवणा–यांनी कसे बनवला आहे? काय झाले कुठल्या एरियामधून जाणार आहे? ही सविस्तर चर्चा या सर्व गोंष्टीवर झाली पाहीजे. तर माझी एक विनंती आहे, आपण येणा–या ३ तारखेला, ४ तारखे पर्यंत मुदत आहे. ३ तारखे पर्यंत ही सभा स्थगित करावी आणि तीन तारखेला ही सभा घ्यावी. अशी माझी सभागृहाला आणि आपल्याला विनंती आहे.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:–** नाही नाही, असे आहे की, मा. महापौर, आमची अशी मागणी आहे की, हा डी.पी. प्लॉन रद्द झाला पाहीजे, तो रद्द करा त्यासाठी तुम्ही मतदान घ्या. मतदान घेणार असतील तर आमची सर्व शिवसेनेच्या लोकांची मागणी आहे की, हा डी.पी. प्लॉन रद्द झाला पाहीजे, हा डी.पी. प्लॉन लोकांना बेघर करणारा आहे.

**सदस्य, श्री. सुरेंद्र सावंत:–** आमचा सर्वांचा पाठिंबा आहे, मतदान झाले पाहीजे.

**सदस्य, श्री. रमेश चव्हाण:–** साहेब, हा विषय, डी.पी. चा एवढा गंभीर असतांना आयुक्त साहेब आणि महापौरांना सुध्दा याच्या विषयी काहीच वाटत नाही का? शहरातील लोक एवढे भयभीत झालेले आहेत आणि महापौरांना पण एवढे गांर्भीय नाही.

**सदस्या, श्रीम. राजश्री चौधरी:–** आयुक्त साहेब आणि महापौरांना या शहराचे काहीच पडले नाही, आज बाहेर एवढे मोर्चे आलेले असतांना, आयुक्त पण नाहीत आणि महापौर पण नाहीत. महासभा सारखी सारखी रद्द करणार आम्ही रिकामे आहोत का? हा डी.पी. प्लॉन आज रद्द झाला पाहीजे, याच्यावर मतदान घ्या. तुम्ही सक्षम नाहीत, आम्ही सारखे सारखे येणार का? आज मतदान घ्या आणि हा डी.पी. प्लॉन रद्द करा.

**सदस्य, श्री. शेखर यादव:–** सर्व लोक घाबरलेले आहेत आणि आयुक्त साहेब, नसतात, कधी मंत्रालयात जातात, कधी कुठे जातात. आज एवढा मोठा महामोर्चा असलेला आहे.

सदस्य, श्री. सुमित सोनकांबळे:— सन्माननिय महापौर साहेब, आयुक्त साहेब, एवढा मोठा गांर्भीयाचा प्रश्न आहे की, इथे गोरगरीब जनता आपण बघत आहेत की, उल्हासनगर महानगरपालिकेच्या बाहेर ते लोक उन्हामध्ये आलेले आहेत आणि एवढा गंभीर विषय असतांना अशा गंभीर विषयावर महापौर मॅडम आणि आयुक्त साहेब, जर इथे उपस्थित नसतील तर उल्हासनगर महानगरपालिकेत ही सगळयात मोठी नाचकलीची गोष्ट आहे आणि शिवसेनेच्या वतीने या गोष्टीचा आम्ही निषेध करतो आणि त्वरीत या ठिकाणी डी.पी. प्लॅनच्या विरोधात आताच्या आता मतदान झाले पाहीजे. मी सचिव मॅडमला विनंती करतो की, आपण याची या ठिकाणी पुर्तता करावी.  एवढा गांर्भीयाचा विषय आहे आणि सत्ताधारी पक्ष या ठिकाणी उपस्थित नाहीत. म्हणजे डी. पी. लॉनला ते विरोध करीत नाहीत, ते डी.पी. प्लॅनला समर्थन करतात असे आमच्या समोर निदर्शनास येत आहे.

या वेळी सदस्य, श्री. विकास पाटील यांनी सभागृहामध्ये प्रवेश केला.

सदस्य, श्री. शेखर यादव:— मा. महापौरजी, जेव्हा पासून डी.पी. प्लॅन आला आहे, त्या बाबतीत मा. आयुक्त साहेबानी मिटींगमध्ये खुलासा करायला पाहीजे_होता. आयुक्त साहेब, मंत्रालयात गेले आहेत, कधी कुठे गेले आहेत आणि मा. महापौर सुध्दा खुलासा करीत नाहीत. त्यासाठी आज शहरातील एवढा मोठा मोर्चा आलेला आहे, आपण खुलासा करावा आणि सभागृहाचे एक मत घ्या.

या वेळी सदस्य, श्री. धनंजय बोडारे यांनी सभागृहामध्ये प्रवेश केला.

सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:— मतदान घ्या.

सदस्य, श्री. प्रमोद टाले:— मा. महापौर, मा. आयुक्त साहेब, हा डी.पी. प्लॅन रद्द झाला पाहीजे, अशी संपुर्ण शहराची मागणी आहे. परंतु इदनानी साहेब, सन २०१३ मध्ये जेव्हा या आराखडयाच्या संदर्भात इथे चर्चा झालेली होती. त्या वेळेला आपणच त्याला विरोध केला होती की, डी.पी. प्लॅन रद्द झाला पाहीजे, अशी त्यावेळची तुमची मागणी होती. आजही संपुर्ण शहरामध्ये संपुर्ण लोकांमध्ये आज ही मागणी आहे की, हा संपुर्ण डी.पी. प्लॅन रद्द करून त्यांनी सुधारीत आराखडा तयार करावा, हे असे असतांनाही आज इथे महापौर नाहीत, आज इथे आयुक्त नाहीत आणि त्यामुळे माझी अशी विनंती आहे की, आजची ही सभा तहकुब करून ३ तारखेला ही सभा ठेवावी.

सदस्या, श्रीमती राजश्री चौधरी:— डी.पी. रद्द करा, रद्द करा.

सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:— मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, सभागृहाचे सदस्य....

सदस्य, श्री. शेखर यादव:— महापौर हाय हाय, महापौर हाय हाय, इदनानीजी आपण खुलासा करा, आज आपण मा. महापौरांच्या खुर्चीवर बसलेले आहेत आणि सन २०१३ मध्ये आपला विरोध होता.

सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:— मा. महापौरजी, मी सभागृहाच्या म्हणण्यानुसार सहमत आहे, परंतु प्रत्येक सदस्यांना या सभागृहामध्ये बोलण्याचा अधिकार आहे. यावर मतदान पण होईल, आणि आपल्याला वाटते तर रद्द पण करू. शहरातील लोकांना या डी.पी. मुळे नुकसान होणार आहे, तर त्या डी.पी. प्लॉनला रद्द करायला पाहीजे. पहीले सभागृहामध्ये चर्चा होईल, त्या नंतर आम्ही तुमच्या बरोबर उभे राहू

सदस्य, श्री. शेखर यादव:— आपले काय म्हणणे आहे, तुमचा या डी.पी. प्लॉनला विरोध नाही का? जमुनाजी दोन —तीन लाख लोक उध्वस्थ होणार आहेत. या बाबतीत आपण खुलासा करा.

सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:— प्रत्येक सदस्यांना सभागृहामध्ये बोलण्याचा अधिकार आहे आणि मला सभागृहामध्ये बोलायचे आहे. मा. महापौरजी, आपण मला बोलण्याची परवानगी दयावी. या डी.पी. प्लॉनमध्ये काय काय चुकीचे आहे, या डी.पी. प्लॉनमुळे कोण कोणत्या समस्या निर्माण होतील या बाबतीत सभागृहामध्ये मी माझे मत व्यक्त करू शकेल.

श्री. जीवन इदनानी, उप—महापौर तथा पीठासीन अधिकारी:— सभागृह नेत्यांना बोलू दया, सर्वांना बोलण्याचा अधिकार आहे.

सदस्य, श्री. धनंजय बोडारे:— सभागृह नेता सगळयांच्या शेवटी बोलतात.

सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:— पहीले ठराव होईल, नंतर सभागृह नेता बोलू शकतात.

श्री. जीवन इदनानी, उप—महापौर तथा पीठासीन अधिकारी:— त्यांना काही तरी बोलायचे आहे,तर बोलू दया.

सदस्य, श्री. शेखर यादव:— डी.पी. प्लॉन बाबत खुलासा करा.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** माझे असे म्हणणे आहे की, या सभागृहामध्ये जेवढे सदस्य आहेत, त्यांना डी.पी. च्या विषयावर बोलायचे आहे. काय काय समस्या आहेत, त्यांना पहीले बोलू दया, नंतर निर्णय घ्या. पहीले प्रत्येकाला बोलण्याचा अधिकार दया.

**सदस्य, श्री. शेखर यादव:—** सभागृह नेता, आपण बोला पहीले खुलासा करा. जनतेला आपला मॅसेज दया. गोरगरीब जनता उध्वस्त होत आहे, आता आपण जे बोलाल त्याचा लोकांना मॅसेज जायला पाहीजे.

**सदस्या, श्रीम. अंजली साळवे:—** मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, हा डी.पी. प्लॉन आल्या पासून शहरामध्ये लोकांच्या मनामध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे आणि लोक अतिशय अस्वस्त झाले आहेत. कारण लोकवस्तीवर आरक्षण आणि जिथे आरक्षण हवे तिथे आरक्षण टाकले गेले नाहीत आणि अतिशय विनाशकारी हा डी.पी. आलेला आहे. ज्या वेळेस आम्ही ऑब्जेक्शन, सजेशन टाकले होते, तेव्हा काहीच मान्य केले गेले नाहीत. त्यामुळे आता जे आम्ही ऑब्जेक्शन सजेशन टाकणार आहोत, सध्या स्थितीत हा डी. पी. रद्द करण्यात यावा अशी आमची मागणी आहे, धन्यवाद.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—** महापौर महोदया, १८ तारखेला एक मिटींग झाली आणि १६ तारखेला एक मिटींग झाली. जमुनाजी या डी.पी. प्लॉनवर पहीले जी चर्चा झाली, तेव्हा आपण प्रस्ताव पारीत करून, तेव्हा सिरीज ऑफ मिटींग झाली होती, या महासभेमध्ये सुधारणा झाली होती, त्याच्या नंतर शासनाकडे गेले, शासनाकडून चार वर्षा नंतर परत इथे आले. त्याच्या नंतर ही आपली तिसरी मिटींग आहे. तरी सुध्दा सभागृहातील लोकप्रतिनिधी कन्फ्युज राहत असतील आणि तीन मिटींगच्या नंतरही जर चर्चा करणार असतील तर शहरा बरोबर किती खेळल्यासारखे आहे. म्हणजे आपण माहीती ठेवत नाही की, शहरासाठी काय पाहीजे? त्यासाठी आपल्याला मिटींग रद्द करण्याची काय गरज आहे? आपण सभागृहामध्ये चर्चा केली आहे, सभागृहाच्या बाहेर पण चर्चा केली आहे. सभागृह नेता आणि मा. महापौरांकडे सुध्दा चर्चा झाली आहे. परंतु त्यामध्ये आऊटपुट काहीच निघत नाही. शहरातील नागरीकांमध्ये प्रचंड रोष आहे, आज जवळपास १० ते १५ हजार लोक रस्त्यावर खासकरून महीला या रणरणत्या उन्हामध्ये या डी.पी. ला विरोध करण्यासाठी रस्त्यावर उतरल्या होत्या. महापालिके समोर निवेदन दयायला आल्या होत्या. शासनाला उल्हासनगरच्या नागरीकांच्या भावना कळवणे आपली जबाबदारी आहे. ज्या कंपनीने चुका केल्या, त्या अधिका—यांनी चुका केल्या, महानगरपालिकेच्या अधिका—यांचा त्यामध्ये काही दोष नाही फक्त ते तिथे पोहचले नाहीत. मी या सभागृहामध्ये सर्व पक्षाच्या लोकप्रतिनिधींना विनंती करतो की, चर्चा भरपूर झालेली आहे. या ठिकाणी आम्ही फक्त लोकांना मुर्ख बनवत आहे. सॅगेशन मॉडिफिकेशनवर चर्चा करू शकत

नाही, डी. पी. प्लॅनवर आम्हांला प्रस्ताव पारीत करण्याचा अर्थच नाही. आम्ही चार सदस्यांनी या उल्हासनगरच्या नागरीकांमध्ये जो रोष आहे, त्या बाबतीत इथे चर्चा व्हावी असा विषय दिला होता. पण अजेंठावर विषय आला की, ईपीवर चर्चा करण्यासाठी हे जाणूनबुजून आहे. म्हणजे शासकिय अधिका—यांनी षडयंत्र रचून काही बिल्डरांना आपण पाठिंबा करत आहे असे मला वाटते. आम्ही विषय दिला होता की, चर्चा करणे म्हणजे आमचा अधिकार नाही, शासनाने विचारलेच नाही की, तुम्ही ठराव करून पाठवा. जे विचारेलेच नाही, त्यांचा अधिकार नाही, मग अधिकारच काय? फक्त एकच विनंती आहे की, मी सर्वांना विनंती करतो की, प्रामाणिकपणू विचार करणे गरजेचे आहे, हा विनाशाचा प्रश्न आहे. जर विकासाचा असेल तर ठराव पारीत करू, तुम्ही चर्चा करा नाही तर काय पण करा. हा जो डी.पी. प्लॅन आलेला आहे, तो व्यापा—यांना, शहरातील झोपडपट्टीवाल्यांना, बॅरेकवाल्यांना उद्ध्वस्थ करणारा आहे. एक ठराविक बिल्डर धार्जिना असल्यामुळे आम्ही रद्द करण्याचा ठराव देत आहोत. जे लोक या शहर विकासला रद्द करण्याच्या बाजूने असतील त्यांनी मतदान करावे.

*यावेळी सदस्य श्री. धनंजय बोडारे यांनी मा. पीठासीन अधिकारी यांच्या हातात ठराव दिला.*

<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—</u> सचिव मॅडम ठराव वाचून दाखवा.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—</u> मला सभागृहामध्ये या डेव्हलपमेंट प्लॅनच्या बाबतीत काही बोलायचे आहे.

<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—</u> यासाठी सर्वांनी बरोबर या आणि आपल्या भावना शासनाला कळवा, आपण इथे जे करणार आहेत……

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—</u> मा. आयुक्त साहेब, कृपया सभागृहाने आपण नगररचनाकारला सांगा की, या डेव्हलपमेंट प्लॅनमध्ये जे १३७ इपी आहे, ते काय आहे? १ पासून ते ३७ पर्यंत या सभागृहाला माहीती दया.

<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u> तसेच रिंगरोडच्या संदर्भात कुठल्या, कुठल्या भागातून रिंगरोड जाणार आहे, त्या रिंगरोड संदर्भातील माहीती आम्हांला पाहीजे. रिंगरोड कुठल्या, कुठल्या एरियातून जाणार आहे,

कुठल्या, कुठल्या झोपडपट्टया बाधित होणार आहेत. हे आम्हांला कळले पाहीजे, त्याच्या संदर्भातील माहीती दया.

<u>सदस्य, श्री. अरूण आशानः—</u> मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, आताच सभागृ नेता साहेबांनी सांगितले की, ईपीच्या विषयामध्ये १ पासून ते ३७ पर्यंत जो ईपी आहे ते समजावून सांगितले जावे. मी सभागृह नेता यांना समजावून सांगतो की, आपण सभा चालू होण्याच्या अगोदर सर्व सदस्यांना बोलण्याचा जो मान दिला आहे, त्यासाठी मी आपले आभार मानतो. आज इथे ईपीच्या बदल, डी.पी. च्या बदल चर्चा करण्यासाठी जे पण सदस्य उपस्थित आहेत आणि जे ए.डी.डी.पी. चे सदस्य उपस्थित आहेत. आज माझ्या प्रश्नांचे उत्तर देणार आहेत का? आज जो सभागृह नेता, आणि विरोधी पक्ष नेता यांनी ठराव दिला आहे, त्याचे पहीले वाचन करण्यात यावे. मा. सचिव मॅडम आपल्याला ठरावाची प्रत दिलेली आहे, सचिव मॅडम ठरावाची प्रत तुम्हांला मिळालेली आहे. कायदयामध्ये काय तरतुद आहे, ती आम्हांला समजावून सांगा. म्हणजे आम्हांला पुढे बोलता येईल.

या वेळी सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर व सदस्या, श्रीमती चरणजितकौर भुल्लर यांनी सभागृहामध्ये प्रवेश केला.

<u>श्री. जीवन इदनानी, उप—महापौर तथा पीठासीन अधिकारीः—</u> नगररचनाकार साहेब, आमच्या सभागृह नेत्यांनी सांगितल्या प्रमाणे.....

<u>सदस्य, श्री. अरूण आशानः—</u> महापौरजी आपण माझ्या प्रश्नांचे उत्तर दया. ईपी आणि डी.पी. बद्दलच चर्चा विचारत आहे, परंतु पहीले जो ठराव दिला आहे, त्या ठरावा बदल सचिव मॅडम आपण जरा खुलासा करावा.

<u>महापालिका सचिवः—</u> मा. महापौर, मा. आयुक्त साहेब, सर्व सन्माननिय सदस्य, कोणताही ठराव हा पिठासिन अधिकारी यांच्याहाती सुपुर्द करायचा आहे. इथे लिहीले आहे, की पिठासिन प्राधिका—यास प्रस्तावाची प्रत देणे तसेच मुळ सुचना किंवा प्रस्ताव स्वक्षरात मराठीमध्ये लिहीण्यात मुद्रीत करण्यातील व तो मांडणारी व्यक्ती अशी उक्त सुचना/प्रस्ताव वाचून दाखवील व तिची इच्छा असल्यास सुचना व भाषण करता येईल, उक्त सुचना व प्रस्ताव पिठासिन अधिका—याच्या स्वाधीन करता येईल आणि कोणताही पालिका सदस्य प्रस्तावास व सुचकास अनुमोदक देईल. तुम्ही ऑलरेडी प्रस्ताव देवूनच सभा मागविली आहे, तुमचा प्रस्ताव होता, तुम्ही ठराव दिला आहे आणि ठरावावर पण एक मत होत नाही, अशा

परिस्थितीत त्यांच्याकडूनही ठराव होईल आणि मतदान घेण्यात येईल. पण पिठासिन अधिकारी यांच्या आदेशा शिवाय सचिव काहीच करू शकत नाही. पिठासिन अधिकारी यांनीच ठराव वाचून दाखवायचे आहेत. पण इथे सचिव वाचतात. खरे तर नियमानुसार पिठासिन अधिकारी मतदान, ठराव घेतात सचिव फक्त त्यांच्या आदेशान्वये वाचून दाखवतील. त्यांनी मला आदेश दिले पाहीजेत. मतदानासाठी ठराव टाकतात.

सदस्य, श्री. अरूण आशान:— मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, मा. सचिव मॅडम, ठरावा बदल आपण या सभागृहाला समजावून सांगितले परंतु पिठासिन अधिकारी कुठल्या मुडमध्ये आहेत, माहीत नाही. ते ठरावाची प्रत देत नाहीत. परंतु त्यांनी माननिय, सन्माननिय नगररचनाकार विभागाचे जे नियम आहेत, शर्ती अटी आहेत, ते सांगण्या करीता सन्माननिय महोदयांना या व्यासपिठावर बोलवले आहे. सदरामध्ये माझे दोन तीन प्रश्न आहेत, त्या प्रश्नाची उत्तरे जर का आपण दिली, तर मला वाटते खरोखरच या प्लॉनला सुरूवात झाली आहे असे मी म्हणेन, आयुक्त साहेब, हा जो प्लॉन आहे, हा सन १९७४ नंतर १ जुलै, १९७४ मध्ये तो अंमलात आला हा प्लॉन ४० वर्षा नंतर या शहराला लागू केला. जर का हा प्लॉन यामध्ये जी तरतुद आहे, शासनाने आमची कशी दिशाभूल केली, यामध्ये प्लॉट नंबर डी दि डेव्हलपमेंट प्लॉन ऑफ सिटी उल्हासनगर सॅगेशन बाय गव्हर्नमेंट विथ मॉडिफिकेशन शो इन शेडयुल वन एक्सक्ल्युडेड दि पार्ट नंबर ऑफ ईपी—१२१ (३७) शल कम इन टूॅ फोर अफटर वन मन्थ फिराम दि डे एक महीन्या पर्यंत हा जो प्लॉन प्रसिध्द झाला तेव्हा तो अंमलात येण्यासाठी एक महीन्याची मुदत होती. ही गोष्ट खरी आहे की खोटी? बारोबर आहे ना? जर का एक महीन्याची मुदत होती तर हा प्लॉन शासनाकडून आल्या नंतर चार महीन्याच्या कालावधी नंतर या उल्हासनगरमध्ये आपण प्रसिध्द केला.

सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:— मा. महापौरजी, १ पासून ते ३७ पर्यंत सभागृहाला माहीती दया. ईपी काय आहे? त्याचा अर्थ काय आहे?

सदस्य, श्री. अरूण आशान:— सभागृहाला फसवण्याचा प्रयत्न करू नका?

सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:— हा डी.पी. क्रमांक १ आहे, जिथे शासनाची ५० एकर जमीन आहे. हा ईपी काय आहे? दोन नंबर कुठे आहे. त्याच्या विषयी माहीती दया. म्हणजे सभागृहाला माहीती होईल की, ईपी काय आहे?

सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:— ही महासभा स्थायी समितीच्या शिवसेनेच्या चार सदस्यांनी बोलावली आहे आणि या सभमध्ये ईपी, डी.पी. वर चर्चा करण्याचा विषय आहे का? काय विषय आहे, चर्चा करण्यासाठी सांगा.

सदस्य, श्री. राजेश वदारिया:— मा. पिठासिन अधिकारी, भाजपाच्या पण स्थायी समितीच्या चार सदस्यांनी विशेष महासभेची मागणी केली होती.

सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:— जेव्हा महासभेचा अजेंडा आमच्या जवळ आला तेव्हा काहीच उल्लेख नव्हता की, या सदस्यांनी मागणी केली आहे किंवा या पक्षाच्या सदस्यांनी मागणी केली आहे.

महापालिका सचिव:— अजेंडा कोणत्याही पक्षाच्या नावाने काढला जात नाही, ते तुमच्या स्थायी समितीच्या चार सदस्यांनी आणि इकडच्या चार सदस्यांनी अशी लेखी मागणी केल्यानुसार काढण्यात आला आहे.

सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:— तुम्ही मला हे सांगाल का पहीले कोणी पत्र दिले होते?

सदस्य, श्री. मनोज सयानी:— हा महासभेचा विषय आहे का? पहीले कोणी दिले आणि नंतर कोणी दिले? कोणत्या पक्षाचे आहे, त्यांचे नाही ही काय पध्दत आहे का? नाव कोणाचे आहे? पहीले कोणी दिले मी पहीले ते पहीले?

सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:— त्यांनी दिले तर आम्ही दयायचे ही तर इथे प्रथा आहे.

सदस्य, श्री. मनोज सयानी:— मा. महापौरजी खुप दिवसा नंतर नगररचनाकार उल्हासनगर महानगरपालिकेला मिळाले आहेत आणि हा डी.पी. चा गंभीर विषय आहे. यामध्ये भरपूर एस.एम. असतात, टेक्नीकल नगररचनाकार असले तरच याची माहीती आपल्याला मिळू शकते. आयुक्त साहेब, सुध्दा या संपुर्ण गोष्टींची माहीती देवू शकले नाहीत. आज नगररचनाकार आपल्या समोर आहेत, आम्हांला माहीती पाहीजे की, आज कल्याण—अंबरनाथ रोडमध्ये जो अलायमेंट डी.पी. मध्ये ठेवला आहे, तो काय आहे? आम्हांला याची पण माहीती पाहीजे की, कब्रस्थानची जागा ईपीमध्ये आणि एस.एम. मध्ये कुठे कुठे आहे? उल्हासनगरमध्ये ग्रीन झोन आणि प्ले ग्राऊंडचे आरक्षण किती टक्के आहे? आणि जमिन कब्रस्थानसाठी ठेवलेली आहे. नगररचनाकार यांनी टेक्नीकल माहीती देण्यात यावी.

सदस्य, श्री. धनंजय बोडारे:— मला वाटते की, संपुर्ण एक दिवस डी.पी. विषयी चर्चा झाली होती. जेव्हा प्रेजेंटेशन झाले होते, तेव्हा आयुक्तांनी मिटींग ठेवली होती. त्यामध्ये ईपी बदल अलायमेंट केले होते. तेव्हा

नगररचनाकार होते, श्री. कुमार जग्यासी होते, आयुक्त साहेब होते, महापौर होते, आणि ज्यांनी बनवला होता ते सेप्ट कंपनीचे लोक होते, त्या दिवशी प्रेझेंटेशन होते, त्या दिवशी पण संपुर्ण उल्हसनगर बघत होते. मला खुप दु:खाने सांगावसे वाटते की, हे लोकप्रतिनिधींना माहीत नाही. या टाऊन प्लॅनिंगमध्ये काय आहे? आणि डी.पी. मध्ये काय आहे? संपुर्ण जनतेला माहीत आहे. जनता रस्त्यावर उतरली आहे. कोणी मोटर सायकल रॅली काढत आहेत, कोणी काय काढत आहेत? आणि लोकप्रतिनिंधाना माहीत नाही, हे झोपेत सोंग घेण्याचा प्रकार आहे. म्हणजे त्या कंपनीने वेगळा प्रकार गेला, सरकारी अधिका—यांनी वेगळा प्रकार केला, आता इथे नविन काय तरी शिजत आहे, असे मला वाटते? त्यासाठी वेळ पाहीजे. बाकी शहराचे काही देणेघेणे नाही? मी पुन्हा एकदा विनंती करतो की, तो ठराव मी पारीत केला आहे, हा विकास आराखडा रद्द करण्यासाठी त्या बाजूने कोण आहेत?

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** ईपीच्या बाबतीत माहीती दया, जर तुम्हांला माहीती आहे तर आपण सांगा, ईपीमध्ये काय काय आहे? ९ नंबर ईपी काय आहे? ५० नंबरमध्ये काय आहे. सभागृहाला कोणाला माहीत आहे का? आपण संभागृहाला सांगा की, ईपी काय आहे. आज आपण शहराच्या फायदयासाठी बसलो आहे, डेव्हलपमेंट प्लॅन समजण्यासाठी बसलो नाही, ईपी १ पासून ते ३७ नंबर पर्यंत या सभागृहामध्ये चर्चा व्हायला पाहीजे.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—** आज पर्यंत काय केले? आज चर्चा करायची पहील्या दिवसापासून चालले आहे की, रद्द झाले पाहीजे.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** आजची सभा ७.०० वाजे पर्यंत चालली पाहीजे. मा. महापौरजी आजची ही सभा...

काही सदस्य, एकत्रित बोलत असल्यामुळे कोण काय बोलत होते ते समजून आले नाही.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—** सगळयांना माहीत आहे की, काय चालले आहे, आणि तुम्हांला माहीत नाही की, काय चालले आहे? सांगण्याचयी गरज नाही की, काय चालले आहे?

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** मा. महापौरजी कृपया संपुर्ण सभागृहाला.....

**सदस्य, श्री. अरूण आशान:—** मा. महापौरजी, ठरावावर चर्चा झाली पाहीजे. ठराव वाचून दाखवा.

**सदस्य, श्री. प्रमोद टाले:—** याच्यावर लवकरात लवकर काय निर्णय घ्यायचा ते सांगा.

**<u>सदस्य, श्री. अरूण आशानः—</u>** मा. महापौरजी, पहीले ठराव वाचून दाखवा.

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारेः—</u>** बाकी सर्व जनतेला माहीत आहे की, १६ तारखेची २२ ला आणि २८ ला काही लोक येणार होते. आपल्याकडे अजून चर्चा करण्यासाठी कोणी येणार आहेत का?

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेरावः—</u>** रिंगरोड कुठून जाणार आहे, त्याची पण चर्चा झाली पाहीजे.

**<u>सदस्य, श्री. शेखर यादव :—</u>** तीन तारखेची वाट का बघायला पाहीजे? वाट बघत आहेत का?

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—</u>** मा. महापौरजी, ७.०० वाजे पर्यंत सभागृहामध्ये चर्चा झाली पाहीजे आणि आजच्या आज ही मिटींग पुर्ण होईल, सदस्यांना ७.०० वाजे पर्यंत बोलण्याची परवानगी दिली पाहीजे.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेरावः—</u>** रिंगरोड कुठून जात आहे, आम्हांला माहीतच नाही, रिंगरोड सांगा. कोणकोणत्या झोपडपट्टीतून जाणार आहे. या रिंगरोड बाबत लोकांमध्ये सर्वात जास्त रोष आहे. रिंगरोड कोणकोणत्या झोपडपट्टीतून जाणर आहे, त्या विषयी आम्हांला सांगा.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—</u>** मी आपल्या मताशी सहमत आहे, सभागृहाला माहीती मिळाली पाहीजे. या शहराचे किती नुकसान होणार आहे, किती झोपडया जाणार आहेत? तेव्हाच आम्ही या डी.पी. वर निर्णय करू.

**<u>सदस्य, श्री. किशोर वनवारीः—</u>** मा. महापौरजी आज सभागृहामध्ेय डी.पी. चा जो विषय चालला आहे. मी मानतो की, श्री. बोडारे साहेब आहे, श्री.चौधरी साहेब आहेत, श्री. भगवान भालेराव गट नेता आहेत, ते दोन—दोन, तीन—तीन वेळा निवडून आले आहेत. परंतु नविन सदस्य सुध्दा इथे निवडून आलेले आहेत. तरी कृपया करून आज सभागृह नेता यांनी आश्वासन दिले आहे की, ही मिटींग आज ७.०० वाजे पर्यंत पुर्ण होईल. आपल्याला ईपीच्या बाबतीत, एस.एम. च्या बाबतीत भरपूर काही माहीती आहे, परंतु नविन सदस्य निवडून आलेले आहेत, त्यांना सुध्दा माहीती होणे आवश्यक आहे. मा. सभागृह नेता यांनी सांगितले आहे की,  सर्वांना बोलण्याचा अधिकार आहे, सगळयांना आपले विचार मांडायला दया. एस.एम. चा विषय वेगळा आहे, ईपीचा विषय वेगळा आहे, तर बोडारे साहेब, सांगत आहेत की, आपण कोणाची वाट बघत आहेत का? आता वाट बघण्याची गरजच नाही. मिटींग वेळेवरच पुर्ण होत आहे. मिटींग ७.०० च्या नंतर कधीच चालली नाही. परंतु काही सदस्यांनी अनेक वेळा ७.०० वाजे पर्यंत मिटींग चालवली आहे, तेव्हा

आम्ही शांततेत ऐकले आहे. तरी कृपया करून कोणाला आपले ॲपलीकेशन किंवा आपले विचार करण्याचा लोकशाहीमध्ये अधिकार आहे. नगररचनाकार साहेब, हजर झाले आहेत, त्यांचे आपण अभिनंदन करू की “जान बची तो लाखो पाये” आमचे भगवान भालेराव साहेबांचे म्हणणे आहे की, डी.पी. प्लॉन ज्या कंपनीने बनवले आहे, त्यांनी इथे उपस्थित राहयाला पाहीजे. जर आपल्यांना हे पाहीजे असेल तर ३ तारखे पर्यंत मिटींग स्थगित करा. जर पाहीजे नसेल तर मिटींग पुर्ण करा आणि नगररचनाकार यांना १३७ वर बोलण्यास परवानगी दया. ईपी वेगळा विषय आहे, एस.एम. वेगळा विषय आहे. एस.एम. तर आपण काहीच रद्द करू शकत नाही कारण तो आपल्या समोरच नाही. ईपी सुध्दा आपल्या समोर नाही आणि जर कोणाला ॲपलीकेशन करायचे असेल तर कोकण भवन येथे करा. हे तर आपण आपल्या शहरवासीयांसाठी करीत आहे, सर्वांना माहीती आहेत की, शहरवासीयांसाठी कोण काय काय करीत आहे. सर्वांना धन्यवाद आहे आणि कशासाठी करतात हे सर्वांना माहीत आहे. तर आज आमचे पालकमंत्री...

<u>सदस्य, श्री. शेखर यादवः—</u> वनवारीजी जरा ऐका आपण सांगत आहेत सभागृहामध्ये नविन लोक निवडून आले आहेत. इथे सात—सात वेळा लोक निवडून आले आहेत आणि आपण बोलतात की, ईपी माहीत नाही. ३ लाख लोक उद्ध्वस्त होणार आहेत. आम्ही लोक नविन निवडून आले आहेत आणि तुम्ही लोक सात—सात वेळा निवडून आले आहेत.

<u>सदस्य, श्री. किशोर वनवारीः—</u> ते मी बोललो नाही,

काही सदस्य, एकत्रित बोलत असल्यामुळे कोण काय बोलत होते ते समजून आले नाही.

<u>सदस्य, श्री. अरूण आशानः—</u> तीन वेळा मिटींग स्थगित झाली आहे, तरी आपल्याला ईपी, डी.पी. च्या विषयी माहीती नाही.

<u>सदस्या, श्रीम. राजश्री चौधरीः—</u> तुम्ही बोलतात की, डी.पी. आणि ईपीच्या बाबतीत माहीती नाही.

<u>सदस्य, श्री. किशोर वनवारीः—</u> आबानी काय सांगितले की, आपण ठेकेदारांना मदत करीत आहेत, मी तो विषय बोलत आहे. कोण कोणाला मदत करीत आहे, आपल्याला या विषयावर जायचे नाही.

**<u>सदस्य, श्री. अरूण आशानः–</u>** जो ठराव दिलेला आहे, त्याच्यावर चर्चा झाली पाहीजे.

**<u>सदस्य, श्री. किशोर वनवारीः–</u>** मा. पालकमंत्री आपले आहेत, संपुर्ण ठाणे जिल्हाचे पालनपोषण करणारे गार्डीयन मिनिस्टर आपले मा. पालकमंत्री आहेत, मा. खासदार साहेब पण आपले आहेत आणि मा. आमदार, किणीकर साहेब पण आपले आहेत. मा. आमदार ज्योती कालानी पण आपल्या आहेत, सगळे आपलेच आहेत, जसे आपल्याला पाहीजे तसेच होईल.

**<u>सदस्य, श्री. अरूण आशानः–</u>** त्यासाठी ठरावावर चर्चा होऊन, डी.पी. प्लॉन रद्द करा. मा. मुख्यमंत्री आणि मा. खासदार साहेब, आपलेच आहेत, ते डी.पी.वर चर्चा करतील आणि डी.पी. रद्द करतील. वनवारी साहेब, ऐका आम्ही पहीलेच वेळा महासभेमध्ये आलेलो आहे, आम्हांला पण माहीती पाहीजे की, . ...

**<u>सदस्य, श्री. भारत राजवानीः–</u>** ही मिटींग स्थगित करा आणि ३ तारखेला ठेवा.

**<u>सदस्य, श्री. किशोर वनवारीः–</u>** मा. महापौर साहेब, यांना सांगा की, मध्येच बोलू नका? अरूणजी आपण दहा वेळा बोला परंतु मी बोलत असतांना बोलू नका? मी एकच वेळा बालेल. तर माझी एक विनंती आहे की, आपण नगररचनाकार यांचे म्हणणे ऐकुण घेऊ आणि आपले जे नवनिर्वाचित नगरसेवक आहेत, पहील्याच वेळेस निवडून आलेले आहेत, कृपया करून त्यांना ऐकु दया, लोकशाहीचा गळा आवळू नका? प्रत्येकाला ऐकायचे आहेत आणि प्रत्येकाला चर्चा करण्याचा अधिकार आहे. तरी कृपया करून नगररचनाकार यांचे म्हणणे ऐकुण घ्या.

**<u>सदस्या, श्रीम. सुरेखा आव्हाडः–</u>** मा. महापौर, मा. आयुक्त साहेब, मी १६ तारखेच्या मिटींगमध्ये मागणी केली होती की, तर १६ तारखेच्या मिटींग नंतर आज पर्यंत या गोष्टींचा विचारच केला नाही. आज हा विषय आलाच कसा की, नविन सदस्यांना समजत नाही. तेव्हा त्या गोष्टीचा विचार का केला गेला नाही? त्याच्यावर तेव्हाच विचार व्हायला पाहीजे होता, आज लोकांच्या जीवनमरणाचा प्रश्न आहे. हजारो पब्लिक

रस्त्यावर आहे आणि आज तुम्ही सांगतात की, डी.पी. आणि ईपी समजावून सांगा. आता वेळ आहे का? याच्यावर फक्त चर्चाच करायची का? आम्ही इथे यायचे तुम्ही मिटींग कॅन्सल करायची आणि तुम्ही जायचे आम्ही लोकांना काय सांगायचे?

**सदस्य,श्री. प्रमोद टाले:—** मा. आयुक्त साहेब, मा. महापौरजी ही चर्चा चालू असतांना गेलया एक महीन्यापासून डी.पी. च्या संदर्भात वारंवार आपल्या मिटींग स्थगित होतात. परंतु हा विषय घेताना आज केंद्र सरकारमध्ये भाजपाची सत्ता आहे, महाराष्ट्रामध्ये भाजपाची सत्ता आहे, उल्हासनगरमध्ये भाजपाची सत्ता आहे आणि हे सर्व असतांना हा विनाशकारी डी.पी. यांचे पाप आहे, असे मला वाटते. हे पाप आमच्या सर्व उल्हासनगरच्या जनतेवर तुम्ही लादलेले आहे. मला वाटते सन २०१३ साली हे आज मा. महापौरांच्या खुर्चीवर बसलेले आहेत. श्री. जीवन इदनानी यांचे याबाबतीत एक स्टेटमेंट आहे. मी इतिवृत्त सांगतो, आपण चार वर्षा पुर्वी जे ओपन डेबिट केले होते, त्यामध्ये आपण स्पष्ट बोलेले आहे की, हा डी. पी. राज्याच्या सन २०१४ च्या निवडणूकीचा विचार करून केला गेला आहे. जनतेला लालच दाखवून भ्रमित केले जात आहे. हे आपले शब्द आहेत. याचे भांडाफोड व्हायला नको आहे, यासाठी चर्चा केली जात नाही. परंतु चर्चा होणे गरजेचे आहे. शहराची लोकसंख्या कमीत कमी ७ लाख आहे. डी. बनवण्यासाठी सरकारने ज्या ऐजेंन्सीला ठेका दिला आहे. नविन डी.पी. मध्ये खुप चुका आहेत. हे सरकारने मान्य केले आहे. नविन डी.पी. नुसार जे सनदधारक आहेत, तिथे विभिन्न आरक्षण दाखवले आहेत. जास्त करून जे भुखंड आहेत, तिथे आरक्षण दाखवले आहे. साहेब, हे आपले म्हणणे आहे. हे माझे म्हणणे नाही. त्याच बरोबर जो व्यवसायक्षेत्र आहेत, त्या व्यवसाय क्षेत्रामध्ये आरक्षण दाखवले आहे. त्यामध्ये व्यवसायिक उध्द्वस्त होऊ शकतात. १२० फुटच्या रिंगरोडची काय गरज आहे, त्याच्यामुळे जास्त हानी होणार आहे. हे आपले म्हणणे आहे. रहीवासी क्षेत्राच्या विषयी आपण विचार करायला पाहीजे. या डी.पी. ची अंमलबजावणी झाली नाही पाहीजे, असे आपले म्हणणे आहे. यावर संशोधन करणे गरजेचे आहे. आपला सन २०१३ चे स्टेटमेंट आहे, त्याच्या नंतर आज आपण या खुर्चीवर बसलेले आहेत. दोन—तीन महीन्यापासून संपुर्ण शहराचे लोक घाबरले आहेत. जर वस्त्या उद्ध्वस्त होत असतील तर असा डी.पी. रद्द करायला पाहीजे. रद्द होईल किंवा नाही हा आपली टेक्नीकल बाब आहे,मला माहीत नाही. परंतु आमची मागणी ही आहे की, तो रद्द व्हायला पाहीजे. संपुर्ण शहराचे लोक एवढे घाबरले आहेत की, आपल्या अधिका—यां पासून भयभित झाली आहे, नगरसेवकांपासून भयभित झाले आहेत. हे शहर चालवणारे यांच्या पासून संपुर्ण जनता भयभित झाले आहेत. तरी हा डी.पी. रद्द व्हायला पाहीजे, हा डी.पी. रद्द करण्याचा ठराव करायला पाहीजे. आज आपण महापौर म्हणून खुर्चीवर बसलेले आहेत, आपण शहराचे मुख्य आहेत. तर तुम्ही हा विचार करायला पाहीजे की, हा डी.पी. लवकरात लवकर रद्द व्हायला पाहीजे. त्याच्या नंतर या शहरातील जे लोक इथ पर्यंत येऊ शकत नाहीत, ते किती घाबरले आहेत, ते बघा आमचे एक मित्र

आहेत, श्री. प्रफुल केदारेजी, त्यांनी काही पंक्त्या लिहील्या आहेत. “अच्छे दिन आये रे भय्या, अच्छे दिन आये इस उल्हासनगरचे भाग्य खुल्ले अच्छे दिन आये, अंधेरी नगरी चौपट राजा दलितों का मज्जाक उडायरे जातीवादी नेता कुच.....

या वेळी सदस्या, श्रीमती अपेक्षा भालेराव यांनी सभागृहामध्ये प्रवेश केला.

सदस्य,श्री. मनोज सयानी:— ही कोणती मिटींग चालली आहे, इथे एक सदस्य बोलत आहेत, इथे मिटींग चालली आहे.

सदस्य,श्री. प्रमोद टाले:— अच्छे दिन आये, शहरामध्ये आज भाजपाची सत्ता असून सुध्दा बहुजन समाजाचे लोक भटकत आहे. आमच्या डोक्यावर विनाशकारी डी.पी. लादला आहे. एवढे मोठे पाप आमच्या डोक्यावर आपण देत आहेत. “अच्छ दिन आले, संपुर्ण शहराच्या लोकांचे अच्छे दिन आये है, कोणार्क कचरा उठा नही रहा है, निला पाणी काम लाये रे पुन बांधे चंदानी जान रस्ते बनाये रे अच्छे दिन आये रे भया अच्छे दिन आये रे, फिर भि इंजिनिअरद्वारा बिल बनाये ने भया, अवैध निर्माण तेजी मे रे भया, ठेकेदार मौजी मे, के.बी.रोडके आने में अक्सर लाखो खाये रे, अच्छे दिन आये रे भया, अच्छे दिन आये रे, विनाश का डी.पी. आये रे भया विनाश का आय, बिल्डर मनमुक्त कराये रे भया, बिल्डर मनमुक्त कराये , रिंगरूट झोपडे रो देंगे आप, रिंगरूट झोपडे रो देंगे आप, दफन भुमी मे खाओगे रे भया, दफन भुमी मे खाओगे, कलस्टर से निंद उडारे भया, अच्छे दिन आये रे भया, अच्छे दिन आये रे, पुना बांधे चंदानी जान रस्ता बना रे अच्छे दिन आये रे भया, अच्छे दिन आय रे”

सदस्य, श्री. किशोर वनवारी:— “अभी अच्छे नही सच्चे दिन आयगे”

सदस्या, श्रीम. कांचन लुंड:— मा. महापौर, मा. आयुक्त साहेब, सन्माननिय सदस्य, आज मी नगरपालिकेमध्ये येत होते, तेव्हा मी बघितले की काही काही ठिकाणी बाईक रॅली निघाली आहे, तर काही ठिकाणी मोर्चे निघाले होते, पब्लिक घाबरलेली आहे. लोकांना काहीच कळत नाही की, आपल्या जन्मभराच्या कमाईने बांधलेले घर तुटणार आहे. जर या डी.पी. मध्ये काही चुका असतील तर यामध्ये सगळयांनी मिळून सुधारणा करायला पाहीजेत. लोकांच्या जीवनाचा प्रश्न आहे, त्यावेळी ग्राउंड रियालिटी व डी.पी. मध्ये जमीन —असमानाचा फरक होता. एकझीसटींग ग्राउंड आणि गार्डनचे आरक्षण चेंज केले होते आणि रेसीडेन्सी झोनला ग्रीन झोनमध्ये टाकले होते. असेच आताच्या डि.पी. मध्ये दिसत आहे, ग्राउंड

रियालिटी व डी.पी. मध्ये जमीन –असमानाचा फरक आहे. एकझीसटींग ग्राउंड आणि गार्डनचे आरक्षण चेंज केले आहे आणि रेसीडेन्सी झोनला ग्रीन झोनमध्ये टाकले आहे. आपले शहर एक व्यापारी शहर म्हणून मानले जाते. अशा प्रकारे मा. सुप्रिमकोर्टाने डी.पी. ला रद्द करण्याचा आदेश दिला होता. तेव्हा उल्हासनगरच्या डी.पी. ला रद्द का केल नाही. मा. महापौरजी, इथे काही लोक सांगत आहेत की, शहरामध्ये डी.पी. आला आहे, आता काहीच होणार नाही. संपुर्ण शहराचे लक्ष या महासभेवर आणि आपल्यावर आहे, शहरवासी घाबरले आहेत आणि त्यांना आशा आहे की, लोक प्रतिनिधी असे निर्णय घेतील की, जे शहरहिताचे असेल. हे शहर व्यापारी शहर मानले जाते, १७ सेक्शन मोबाईल बाजार, उल्हासनगर ४ वा ५ चे मेन बाजार, गाऊन बाजार, जपानी बाजार त्यांचे जास्त नुकसान होणार आहे. आपण असे कोणतेच नियोजन केले नाही की, दुकानंदारांचे पुर्नवसन करू शकतो. आपण बघू शकतो की, के.बी. रोडच्या बाजूचे तोडले होते, ती लोक आज पण महानगरपालिकेमध्ये फाईली घेऊन फे–या मारत आहेत. आज पर्यंत त्यांना न्याय मिळत नाही. आम्ही डी.पी. च्या विरोधात नाही, आम्ही विकासाच्या विरोधात नाही, आम्ही डी.पी. मध्ये ज्या चुका केल्या आहेत, त्याच्या विरोधात आहेत. त्यामध्ये सुधारणा करण्यात यावी आणि लवकरात लवकर डी.पी. रद्द करण्यात यावा. हा डी.पी. ऑफिसमध्ये कॅबिनमध्ये बसून बनवलेला आहे, धन्यवाद.

<u>सदस्य,श्री. भगवान भालेराव:–</u> सन्माननिय महापौर, विशेष म्हणजे, डी.पी. च्या संदर्भात अजूनही लोकांच्या मनात संभ्रमाची भावना निर्माण आहे, सगळया नगरसेवकांना माझी विनंती आहे की, येणा–या ३ तारखेला पाहीजे ते १२.०० वाजता मिटींग बोलवा आणि संपुर्ण दिवसभर डी.पी. वर चर्चा असु दया, आणि ३ तारखेला मिटींग ठेवा अशी मी सभागृहाला विनंती करतो.

<u>**सदस्य,श्री. राजेंद्र चौधरी:–**</u> भगवान भालेराव यांनी सुचना केली आहे की, ३ तारखेला महासभा ठेवा परंतु त्या महासभेमध्ये या डी.पी. चा निर्णय झाला पाहीजे.

<u>**सदस्य,श्री. भगवान भालेराव:–**</u> सन्माननिय चौधरी साहेबांनी जो मुद्दा उपस्थित केला आहे, डी.पी. वर फायनल निर्णय झाला पाहीजे, डी.पी. रद्द झाला पाहीजे, अशी आमची आग्रहाची मागणी आहे.

<u>**सदस्य,श्री. प्रदिप रामचंदानी:–**</u> ३ तारखेला मा.आयुक्त आणि मा.महापौर उपस्थित असायला पाहीजेत.

<u>**सदस्य,श्री. भगवान भालेराव:–**</u> या डी.पी. संदर्भात धवलला बोलवले पाहीजेत आणि त्यांनी एक तास अगोदर माहीती सांगितली पाहीजेत.

सदस्य,श्री. प्रदिप रामचंदानी:— मा. आयुक्त पण ३ तारखेला असले पाहीजेत आणि धवल पण असले पाहीजेत.

सदस्य,श्री. धनंजय बोडारे:— मा. महापौर महोदय, आम्ही शहराच्या विकासासाठी सर्व त्याग करायला तयार आहेत, तिथे आपले मान, अभिमानाचा काहीच नाही. इथे लोकांचे कल्याण झाले पाहीजे, त्यासाठी लोकांनी आम्हांला निवडून दिलेले आहे. इथे ७८ नगरसेवक आणि ५ स्विकृत अशा ८३ लोकांनी एकत्र येऊन या शहराचा विचार करायचा, ते करत असतांना जर शहर उद्ध्वस्त होत असेल, त्यासाठी सत्ता पक्ष असेल, विरोधी पक्ष असेल, सत्ता पक्ष जर त्यासाठी समर्थन करीत असतील तर त्यांचा आम्ही विरोध करू. जर आज या ठिकाणी श्री. जमनादास पुरस्वानी, सभागृह नेता यांनी विनंती केली की, शहर विकासाचा आराखडा सध्या आलेला आहे, तो शहर विनाशाचा आहे. हे सर्वांनी सांगितले आहे आणि बाहेर पण सांगितले. वैयक्तिक, खाजगी पण बोलतात, इथे पण मान्य करतात. परंतु हा विकास आराखडा रद्द करण्यासाठी सर्वांनी मिळून ३ तारखेला एकत्रित आपण जे पण पक्ष आहेत, जे शहर हिताचे आहे, त्याचा ठराव आपण पारीत करू या. अशा प्रकारचे त्यांनी सांगितले आहे, मला वाटते सभागृह नेता यांना माझे समर्थन आहे.

सदस्य,श्री. जमनादास पुरस्वानी:— मा. महापौरजी, सभागृहाचे सर्व सदस्य, जेव्हा सन २०१३ मध्ये हा डेव्हलपमेंट प्लॅन आला होता. तेव्हा पण शहरामध्ये सर्वच विरोधात होते, त्यावेळी शिवसेना, भारतीय जनता पार्टी आणि सर्व पक्षानी काही दिवस विचारविनिमय करून या डेव्हलपमेंट प्लॅनमध्ये सुधारणा करून आपण पाठवला होता, आज जेव्हा सॅंगेसन होऊन हा डेव्हलपमेंट प्लॅन आला आहे, तरीही शहरामध्ये या डेव्हलपमेंट प्लॅनमुळे लोक त्रस्त आहेत. मी संपुर्ण सभागृहाला आश्वासन देतो की, आपण या डेव्हलपमेंट प्लॅनमध्ये अशी कोणतीच गोष्ट होऊन देणार नाही की, जो शहराच्या लोकांसाठी नुकसानकारक असेल, जसे बोडारे साहेबांनी सांगितले की, जसे आपण सन २०१४ मध्ये ठराव करून पाठवला होता, त्याच प्रकारे सर्व पक्ष मिळून इथे कोणतीही भारतीय जनता पार्टी नाही किंवा शिवसेना नाही, आपण सर्व या शहराचे प्रतिनिधी आहोत. या शहराला रिंगरोड पासून किंवा कोणत्याही मोठया रोड पासून जर नुकसान होत असेल, तर त्यासाठी आपण विचारविनिमय जरूर करू आणि ३ तारखेला या डेव्हलपमेंट प्लॅन बाबत जो निर्णय घेऊ तो सर्व मिळून करू. दोन मत या सभागृहामध्ये होणार नाहीत. भारतीय जनता पार्टी शिवसेनेच्या बरोबर आहे आणि दुस—या पक्षांबरोबर आहे. आपण कोणताही निर्णय एकटे घेणार नाहीत, आपण शहराच्या हितासाठी निवडून आलो आहे, जो पण निर्णय होईल तो शहर हितासाठी होईल. त्यासाठी आपल्याला

निवेदन करतो की, ३ तारखेला दुपरी १२.०० वाजता, दुपारचे जेवण पण इथेच होईल, संपुर्ण दिवसभर चर्चा चालेल.

<u>सदस्य,श्री. धनंजय बोडारेः—</u> आम्हांला जेवण नाही पाहीजे. शहराची जनता भुकेली आहे, रस्त्यावर उतरले आहेत.

<u>सदस्य,श्री. भगवान भालेरावः—</u> दुपारेचे १२.३० किंवा १.०० ची वेळ ठेवा.

<u>सदस्य,श्री. जमनादास पुरस्वानीः—</u> मा. आयुक्त साहेब, आपण एक पत्र काढा की, ज्या कंपनीने हा डेव्हलेपमेंट प्लॉन बनवला आहे, धवल आणि आपले नगररचना विभागाचे अधिकारी या सभागृहामध्ये उपस्थित राहयला पाहीजेत. खुप विचारविनियमय केल्या नंतर ही सभा ३ तारखे पर्यंत स्थगित करण्यात यावी.

<u>सदस्य,श्री. सुनिल सुर्वेः—</u> मा. महापौर एक मिनिट सगळेच बोलले आहेत, मला पण थोडे बोलायचे आहे. आता सभागृह नेता यांनी खुप चांगले सांगितले आहे की, मा. सभागृह नेताजी आपण चांगले बोललेत आज संपुर्ण सभागृह बघत आहे, सर्व पत्रकार बघत आहेत. नंतर असे बोलू नका की, मला वरतून फोन आला म्हणून आम्ही लोक वेगळा निर्णय घेत आहेत. यासाठी मी आपल्याला सांगत आहे की, आपण आश्वासन दिले आहे तर ते कायम ठेवा.

<u>सदस्य, किशोर वनवारीः—</u> मा. महापौरजी, सभा आता ३ तारखे पर्यंत स्थगित केली आहे. फक्त सदस्यांना...

<u>सदस्य,श्री. भगवान भालेरावः—</u> मी प्रस्ताव मांडला आहे, सन्माननिय महापौर साहेब, शिवसेनेने ठराव ठेवलेला आहे, तो ठराव तसाच ठेवा ३ तारखेला त्या ठरावावर विचारविनिमय होईल.

<u>सदस्य,श्री. किशोर वनवारीः—</u> मा. महापौरजी, सगळयांना नविन वर्षाच्या हार्दिक हार्दिक शुभेच्छा आणि डॉ. नाथानी यांचा जन्म दिवस आहे, आपल्या परवानगीनुसार त्यांना शाल, फुल अर्पण करतो.

**श्री. जीवन इदनानी, उप–महापौर तथा पीठासिन अधिकारी:–** सभागृहाची भावना लक्षात घेऊ, मी प्रशासनाला डायरेक्शन देतो की, ३ तारखेला १२.३० वाजता मा. आयुक्त साहेब, इथे उपस्थित असायला पाहीजेत आणि नगररचना विभागाचे सर्व पदाधिकारी सुध्दा उपस्थित राहयला पाहीजेत आणि त्याच बरोबर ज्या सेप्ट कंपनीने काम केले आहे, जे पण पदाधिकारी आहेत, श्री. जोशी, श्री. धवल यांनी सर्वांनी इथे उपस्थित राहयला पाहीजे. सभागृहाची भावना लक्षात ठेवावी आणि सर्वांनी उपस्थित राहणे अनिवार्य आहे. ही सभा ३ तारखेला दुपारी १२.३० वाजे पर्यंत स्थगित करण्यात येत आहे.

---

सूचकाचे नांव :–श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नांव :– श्री. रमेश चव्हाण

स्थगित प्रस्ताव

दिनांक १६/१२/२०१७ रोजी दुपारी ३.०० वाजता सुरु केलेली सभा काही कारणास्तव स्थगित करण्यात आल्याने सदर सभा दिनांक २२/१२/२०१७ रोजी सायंकाळी ४.०० वाजता पुन्हा स्थगित करण्यांत आल्याने सदर सभा दिनांक २८/१२/२०१७ रोजी सायंकाळी ४.०० वाजता आयोजित करुन पुन्हा स्थगित करण्यांस प्रस्तावित.

महासभा ठराव क्र. ५६ क — दिनांक : २८/१२/२०१७

ही महासभा वरील प्रस्ताव विचारात घेता दिनांक १६/१२/२०१७ रोजी त्यात दिनांक २२/१२/२०१७ व २८/१२/२०१७ रोजी आयोजित केलेल्या सभेचे कामकाज दिनांक ३/१/२०१८ रोजी दुपारी १२.३० वाजेपर्यंत स्थगित करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

<u>सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:—</u> मी श्री. किशोर वनवारी यांना धन्यवाद देतो की, त्यांनी नविन वर्षाची डायरी आपल्याला दिलेली आहे. सर्वांचे चांगले व्हावे, ओम साईनाथ.

<u>महापालिका सचिव :—</u> कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सांयकाळी ४.३० वाजता उपमहापौर तथा पीठासीन अधिकारी श्री. जीवन इदनानी यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)

महापालिका सचिव

उल्हासनगर

महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक:—
३/१/२०१८

उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि.३/१/२०१८ रोजीच्या विशेष महासभेचे इतिवृत्त.

२—क

उल्हासनगर महानगरपालिकेची विशेष महासभा शनिवार दिनांक १६/१२/२०१७ रोजी दुपारी ३.०० आयोजित केली होती. सदर सभेचे कामकाज स्थगित केल्याने सदर सभा शुक्रवार दिनांक २२/१२/२०१७ रोजी सांयकाळी ४.०० वाजता आयोजित करुन पुन्हा स्थगित करण्यांत आल्याने सदरची सभा गुरुवार दिनांक २८/१२/२०१७ रोजी दुपारी ३.०० वाजता आयोजित केली व पुन्हा स्थगित केली असल्याने सदरची सभा बुधवार दिनांक ३/१/२०१८ रोजी दुपारी १२.३० वाजता आयोजित करण्यात आली. सदर सभेत महापौर, श्रीमती मिना कुमार आयलानी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१. श्रीम. मिना कुमार आयलानी —— महापौर

२. श्री. जीवन चंद्रभान इदनानी —— उप—महापौर

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीमती अर्चना गोकुळ करणकाळे | ४१ | श्रीमती सविता प्रविण तोरणे (रगडे) |
| ४ | श्रीमती पुजा सचिन भोईर | ४२ | श्री. गजानन प्रल्हाद शेळगे |
| ५ | श्रीमती जयश्री ज्ञानेश्वर पाटील | ४३ | श्रीमती ज्योती प्रकाश (पिंटो) बठिजा |
| ६ | श्रीमती ज्योती दिलीप गायकवाड | ४४ | श्री. दिपक लक्ष्मणदास सिरवानी |
| ७ | श्री. हरेश परमानंद जग्यासी | ४५ | श्री. सुमित सागर सोनकांबळे |
| ८ | श्रीमती मिनाकौर अजितसिंग लबाना | ४६ | श्रीमती ज्योत्स्ना सुरेश जाधव |
| ९ | श्रीमती पंचम उमेश कालानी | ४७ | श्रीमती ज्योती शामराव माने |
| १० | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | ४८ | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| ११ | श्रीमती आशा नाना बिराडे | ४९ | श्री. चंद्रशेखर केशव यादव |
| १२ | श्रीमती चरणजितकौर राजेंद्रसिंह भुल्लर | ५० | श्रीमती मिताली राजेश चान्पूर |

| | | | |
|---|---|---|---|
| १३ | श्री. राजेंद्रसिंह विरसिंग भुल्लर | ५१ | श्रीमती लिलाबाई लक्ष्मण आशान |
| १४ | श्री. स्वप्नील मिलींद बागुल | ५२ | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे |
| १५ | श्रीमती सुरेखा हनुमंत आव्हाड | ५३ | श्रीमती संगिता नितीन सपकाळे |
| १६ | श्रीमती अंजना अंकुश म्हस्के | ५४ | श्रीमती शीतल चंद्रकांत कदम |
| १७ | श्री. अशोक बच्चुमल छाप्रु | ५५ | श्रीमती वसुधा धनंजय बोडारे |
| १८ | श्रीमती गीता लालचंद साधनानी | ५६ | श्री. धनंजय बाबुराव बोडारे |
| १९ | डॉ. प्रकाश घनश्यामदास नाथानी | ५७ | श्रीमती दिप्ती नविन दुधानी |
| २० | श्रीमती रेखा अशोक ठाकुर | ५८ | श्रीमती ज्योती रमेश चैनानी |
| २१ | श्रीमती सरोजिनी मुरलीधर टेकचंदानी | ५९ | श्रीमती कांचन अमर लुंड |
| २२ | श्रीमती जया प्रकाश माखिजा | ६० | श्री. शंकर गोविंदराम लुंड |
| २३ | श्रीमती अपेक्षा भगवान भालेराव | ६१ | श्रीमती सुनिता बाबुराव बगाडे |
| २४ | श्रीमती शुभांगीनी निकम | ६२ | श्री. भारत रामचंद राजवानी (गंगोत्री) |
| २५ | श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग | ६३ | श्री. सतरामदास पुतनदास जेसवानी |
| २६ | श्री. भगवान शंकर भालेराव | ६४ | श्रीमती अंजली चंद्रकांत साळवे |
| २७ | श्रीमती छाया सुजित चक्रवर्ती उर्फ अडसुळ | ६५ | श्री. प्रमोद नामदेव टाले |
| २८ | श्रीमती ज्योती प्रशांत पाटील | ६६ | श्रीमती कविता सुधिर बागुल |
| २९ | श्रीमती चंद्रावती आयोध्याप्रसाद सिंग | ६७ | श्री. किशोर नारायणदास वनवारी |
| ३० | श्री. राजेश नानिकराम वदारिया | ६८ | श्रीमती मिना चंद्रगुप्त सोनेजी |
| ३१ | श्रीमती डिम्पल नरेंद्र ठाकुर (कुमारी) | ६९ | श्री. विजय चाहु पाटील |
| ३२ | श्रीमती दिपा नारायण पंजाबी | ७० | कु. कविता सुरेश गायकवाड |
| ३३ | श्री. अजित प्रभुनाथ गुप्ता | ७१ | श्री. आकाश परशुराम पाटील |
| ३४ | श्रीमती पुष्पा नाना बागुल | ७२ | श्री. विकास परशुराम पाटील |

| | | | |
|---|---|---|---|
| ३५ | श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी | ७३ | श्री. मनोज दिलीपकुमार सयानी |
| ३६ | श्रीमती शुभांगी मनोहर बेहनवाल | ७४ | श्री. प्रदिप अर्जुनदास रामचंदानी |
| ३७ | श्री. राजेंद्र शांताराम चौधरी | ७५ | श्री.सुरेंद्र बाळकृष्ण सावंत |
| ३८ | श्री. रवी किशनचंद जग्यासी | ७६ | श्री. अरुण लक्ष्मण आशान |
| ३९ | श्रीमती इंदिरा जमनादास उदासी | ७७ | श्रीमती आशा जीवन इदनानी |
| ४० | श्रीमती कविता लाल पंजाबी | | |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१. श्री. रविंद्र दशरथ बागुल, २. श्री. कलवंतसिंग गुरुदेव सोहटा, ३. श्री. महेश पहिलराज सुखरामनी, ४. श्री. राजेश देवेंद्र वानखेडे, ५ श्रीमती मिनाक्षी रवी पाटील

खालील अधिकारी सभेत उपस्थित होते.

१. श्री. राजेंद्र निंबाळकर, आयुक्त
२. श्री. संतोष देहेरकर, उप–आयुक्त, मुख्यालय
३. डॉ. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी तथा प्र. महापालिका सचिव
४. श्री. मिलिंद सोनावणे ,नगररचनाकार
५. श्री. धवल, सेफ्ट कंपनी
६. श्री. बोरनाले, सेफ्ट कंपनी
७. श्री. संतोष जाधव, सहा. लेखा अधिकारी
८. श्री. अशोक जाधव, लेखा परिक्षक
९. श्री. राम जैसवार, शहर अभियंता
१०.डॉ. राजा रिझवानी, प्र. वैद्यकीय आरोग्य अधिकारी
११.श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा
१२.श्री. महेश शितलानी, उप अभियंता, साबांवि
१३.श्री. खरात, उप अभियंता, विद्युत
१४.श्री. वानखेडे, परिक्षक, लेखा विभाग
१५.श्री. भगवान कुमावत, प्र. सहा. आयुक्त, मालमत्ता
१६.श्री. नंदु समतानी, प्र. सहा. आयुक्त, एलबीटी
१७.श्रीमती छाया डांगळे, प्र. सहा. आयुक्त, विधी
१८.श्रीमती अलका पवार, प्र. सहा. आयुक्त
१९.श्री. मनिष हिवरे, प्र. सहा. आयुक्त, साप्रवि

२०.श्री. बाजीराव जाधव, प्र. सहा. आयुक्त
२१.श्री. भास्कर मिरपगारे, प्र. अग्निशमन अधिकारी
२२.श्री. विनोद केणे, प्र. स्वच्छता निरिक्षक
२३.श्रीमती श्रध्दा सपकाळे, प्रोग्रामर
२४.श्री. यशवंत सगळे, प्र. वाहन व्यवस्थापक
२५.श्री. राजा बुलानी, प्र. विधी विभाग प्रमुख
२६.श्री. संतोष लोणे, क. अभियंता

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.

१. श्रीमती मनिषा महाजन

२. श्रीमती नर्गिस खान

३. श्री. अशोक रामरख्यानी

४. श्री. बाळु भांगरे

दुपारी १२.४८ वाजता वंदे मातरम म्हणुन सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. १ :—** उल्हासनगर शहराच्या मंजुर विकास आराखडयामध्ये वगळण्यात आलेल्या क्षेत्रामध्ये आरक्षण बदलून पब्लिक युटीलीटीचे आरक्षण टाकण्यासाठी हरकती व सूचना घेणे तसेच महासभा, तज्ञसमितीच्या सूचना व नागरीकांनी दिलेल्या हरकती विचारात न घेतल्याने या संदर्भात चर्चा, विचार, विनिमय करणे.

---

<u>प्र.महापालिका सचिव, डॉ. युवराज भदाणे:—</u> मा. महापौरांच्या आदेशान्वये बोलत आहे.

<u>सदस्या श्रीमती सविता तोरणे:—</u>मा. महापौर, उप—महापौर, मा. आयुक्त साहेब, सन्माननिय सदस्य, सर्वप्रथम माझे वंदन त्या सावित्रीमाईला, ज्या आईच्या परिश्रमानंतर आज आम्ही येथे सभागृहामध्ये उभे राहुन समाजाचे प्रतिनिधीत्व करत आहोत. आपण सभागृहातील सर्व सदस्य महिला आणि मी येथे उभी आहे ते बाबासाहेबांनी लिहिलेल्या संविधानामुळे, सावित्रीबाईंनी दिलेल्या शिक्षणामुळे आणि त्या आईची आज जयंती आहे म्हणुन मी त्या आईला

वंदन करते आणि सर्व सदस्यांना सावित्रीमाईच्या जयंती निमित्त शुभेच्छा देते. सभागृहाला मी विनंती करते की, आपण सावित्री आईला अभिवादन करुन मग सभेला सुरुवात करावी, धन्यवाद।

<u>सदस्या श्रीमती अंजली साळवे:—</u>मा. महापौर महोदया, आज सावित्रीबाई फुलेंची जयंती आहे तर माझी अशी विनंती आहे की, सभागृहामध्ये फोटो आणुन त्यांना विनम्र अभिवादन करण्यात यावे.

<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:—</u>सावित्रीबाईंची जयंती साजरी केली नाही का आपण महापालिकेने?

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव:—</u>जयंती साजरी केली का सावित्रीबाईंची?

<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:—</u> ती माहिती सांगाना आम्हांला.

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव:—</u>मा. महापौर, उप—महापौर, १ जानेवारी भिमाकोरेगाव येथे जो दलित समाजाचा जो भ्याड हल्ला झाला संपुर्ण महाराष्ट्रातील मंत्री, मुख्यमंत्री माहेदयांनी त्या हल्याचा निषेध केला. त्या हल्यामध्ये शहिद झालेले एक जवान त्यांचा मृत्यु झाला तर मी सभागृहास विनंती करतो की त्यांना श्रध्दांजली देण्यात यावी.

<u>सदस्य श्री. प्रमोद टाले:—</u>मा. महापौरजी, त्याच वेळेस कमला मिलमध्ये १५ ते १६ लोक बळी गेले. ज्या कारणामुळे गेले ते कारण वेगळे आहे. त्याचे इंम्प्लीमेटेशन उल्हासनगरमध्ये व्हायला पाहिजे. त्यांना सुध्दा आपण श्रध्दांजली अर्पित करु या.

<u>प्र.महापालिका सचिव, डॉ. युवराज भदाणे:—</u>सन्माननिय सदस्यांनी दिलेली जी सूचना आहे त्या अनुषंगाने मा. महापौरांच्यावतीने विनंती आहे दोन मिनटे श्रध्दांजलीसाठी आपण उभे राहायचे.

---

सुचकाचे नाव :— श्री. दिपक सिरवानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

**<u>शोक प्रस्ताव</u>**

१ जानेवारी २०१८ रोजी भिमाकोरेगाव येथे भिमसैनिकांवर काही समाजकंटकाने हल्ला चढविला त्यामध्ये भ्याड हल्यात आंबेडकर अनुयायी श्री. राहुल मढेकर हे शहिद झाले आहे.

तसेच कमला मिलमध्ये १५ ते १६ लोकांचा मृत्यु झाला आहे.

त्यांच्या कुटूंबियांचे दु:खात हे सभागृह सहभागी असुन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

महासभा ठराव क्र. ५६ ड दिनांक:— ३/१/२०१८

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्री. राहुल मढेकर व कमला मिलमध्ये मृत्युमुखी पडलेले १५ ते १६ लोक यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दु:खात सहभागी होऊन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी

विशेष महासभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

सदस्या श्रीमती सविता तोरणे:—फुले शाहु आंबेडकरांच्या या विचारांना मानना—या पुरोगामी महाराष्ट्रात १ जानेवारी रोजी भिमाकोरगोव येथे भिमसैनिकावर काही समाजकंटकाने हल्ला चढविला. आंबेडकर अनुयायी श्री. राहुल मढेकर हा शहिद झाला. आणि अनेक आंबेडकर अनुयायी जखमी झाले या घटनेचे पुरोगामी महाराष्ट्राला गालबोट लागले गेले. त्यामुळे एक नगरसेविका म्हणुन मी या घटनेचा जाहिर निषेध करते. व सभागृहाला विनंती करते की आपण देखील या घटनेचा निषेध करावा. धन्यवाद।

**प्र.महापालिका सचिव, डॉ. युवराज भदाणे:—**सदस्या श्रीमती अंजल साळवे व श्रीमती सविता तोरणे यांनी ज्या सूचना केल्या त्यानुसार मी सभागृहाला एक सूचना देवु इच्छितो की उल्हासनगर महानगरपालिका प्रशासनाच्यावतीने आज ३ जानेवारी, २०१८ रोजी सावित्रबाई फुले यांची जयंती कार्यक्रम सकाळी ११.०० वाजता पार पाडला, मा. महापौर महोदया यांच्या हस्ते. तसेच श्रीमती साळवे महोदया आपण देखील आला होतात. आम्ही पुष्पांजली अर्पित करुनच बाहेर आलो होतो.

**सदस्य श्री. सुरेंद्र सावंत:—**मा. महापौर महोदया, या कार्यक्रमाची माहिती नगरसेवकांना का नाही दिली? सावित्रीबाई फुले यांची जयंती होती तर आज आम्हां नगरसेवकांना जर कळविले असते तर आम्ही सुध्दा जयंती साजरी करण्यासाठी आलो असतो. ही प्रशासनाची मोठी चुक आहे. तुम्ही गुपचुप गुपचुप स्थानिक काही नगरसेवक येतात व जयंती साजरी करतात हे खुप चुकीचे आहे. एवढया मोठया महान मातेची जयंती आपण गुपचुप साजरी केली आम्हांला निमंत्रण न देता. मी जाहिर निषेध करतोच करतो व माझा पक्षही करेल याबद्दल खात्री आहे. आपण असा कार्यक्रम असतांना सर्व नगरसेवकांना बोलावुन सावित्रीबाई जयंतीचा कार्यक्रम साजरी करावयास पाहिजे होता. जरी आपण ही चुक केली नसेल तरी या क्षणाला एका नगरसेविकेने आपणांस विनंती केली आहे की या सभागृहामध्ये सावित्रीबाईंचा फोटो लावुन आपण सर्वांनी जयंती साजरी करु या. तर आता ताबडतोब सावित्रीबाईंचा फोटो आणुन मा. महापौर, उप—महापौर, आयुक्त साहेब यांनी हार पुष्पगुच्छ आणुन जयंती साजरी करावी अशी मी विनंती करतो. धन्यवाद।

**सदस्या श्रीमती अर्चना करनकाळे:—**मा. महापौर महोदया, आपण सुध्दा एक महिला आहात, महिला नगरसेवका म्हणुन आम्ही त्यांच्यामुळेच आज येथे आहोत. तर सावित्रीबाई जयंती उत्साहाने साजरी केली पाहिजे होती. तसेच भिमाकोरेगाव येथे भिमसैनिकावर जो अन्याय झाला त्याचा मी निषेध करते नगरसेविका म्हणुन. तर आपण भिमाकोरेगावबद्दल व सावित्रीबाई फुले जयंतीबाबत आपण महापौर या नात्याने लक्ष दयावे.

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :—**यापुढे सर्व कार्यक्रम लक्षात ठेवुन मी श्री. भदाणे यांना जे आज लॉ ऑफिसर आहेत त्यांना मी आदेश देते की प्रत्येक नगरसेवकांना कोणताही महापालिकेचा कार्यक्रम असो सदस्यांना आमंत्रण दयावे. त्याचबरोबर डीपी प्लान विषयी आजची जी सभा ठेवली आहे, सभागृहातील सर्व सदस्य, आयुक्त महोदय, सर्व पदाधिकारी, गॅलरीत बसलेले सर्व पत्रकार......

यावेळी सदस्य श्री. भारत राजवानी यांनी सभागृहात प्रवेश केला.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:—**मा. महापौर महोदया, आपण बोलण्याआधी सदस्य बोलतील तर चांगले राहील.

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :—**मी सुरुवातीला थोडेच बोलेन जास्त वेळ नाही घेणार.सर्वांना बोलण्याची संधी प्राप्त होईल.

**प्र.महापालिका सचिव, डॉ. युवराज भदाणे:—**मा. महापौरांनी दिलेली जी सूचना आहे, माता सावित्रीबाई फुले यांच्या जयंती संदर्भात तर त्याबाबत आपण गोषवा—याद्वारे महासभेमध्ये सर्व सदस्यांना कळवितो. तर यावर्षाचा गोषवारा कालच सचिव कार्यालयाकडे परवा शासनाचा जीआर आला त्याअनुषंगाने मा. आयुक्त महोदयांच्या मान्यतेने कालच सचिव कार्यालयात, संबंधीत विभागात पाठविला आहे, तो येत्या महासभेत सर्व सदस्यांपुढे संपुर्ण महापुरुषांचा, थोरपुरुषांच्या कार्यक्रमाच्या जयंती आणि पुण्यतिथी कार्यक्रमाची सभा सूचना, गोषवारा येणार आहे, त्यावेळी निमंत्रणाबाबत सर्व सभागृह निर्णय घेवु शकते त्याप्रमाणेच हा विभाग पुढील कार्यवाही करेल. दुसरी गोष्ट म्हणजे आजचा महासभेचा जो विषय आहे, उल्हासनगर महानगरपालिका स्थायी समिती सदस्यांच्या लेखी मागणीवरुन विशेष महासभा दिनांक १६/१२/२०१७ रोजी दुपारी ३.०० आयोजित केली होती. सदर सभेचे कामकाज स्थगित केल्याने सदर सभा शुक्रवार दिनांक २२/१२/२०१७ रोजी सायंकाळी ४.०० वाजता आयोजित करुन पुन्हा स्थगित करण्यांत आल्याने सदरची सभा गुरुवार दिनांक २८/१२/२०१७ रोजी दुपारी ३.०० वाजता आयोजित केली व पुन्हा स्थगित केली असल्याने सदरची सभा बुधवार दिनांक ३/१/२०१८ रोजी दुपारी १२.३० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील सभागृहात खालील विशेष विषयावर विचारविनिमय करण्यासाठी बोलविण्यांत आलेली आहे.

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :—**सभागृहातील सर्व सदस्य, मी फक्त दोन शब्द बोलेन, सभागृहातील सर्व सदस्य, आयुक्त, सर्व पदाधिकारी, गॅलरीत बसलेले सर्व पत्रकार व पाहुणे मंडळी, आपणांस नविन वर्षाच्या शुभेच्छा. आज सावित्रीबाई फुले जयंती आहे त्याच्या सुध्दा आपणांस शुभेच्छा. आज या सभेत डेव्हलोपमेंट प्लानचा विषयी सभा ठेवली आहे, ही तीन वेळा स्थगित झाली आहे, सभागृहातील सर्व सदस्यांना मी सांगु इच्छिते की या डिपी विषयी जो निर्णय होईल तो सर्वसंमतीने होईल. हा डेव्हलोपमेंट प्लान २०१३ मध्ये आला होता. त्यामध्ये ब—याचशा चुका व त्रृटया होत्या त्यात आपण ब—याचशा सुधारणा करुन सर्वपक्षीय सदस्यांनी भाजपा, शिवसेना, आरपीआय, निर्दलीय कॉंग्रेस सर्वांनी मिळुन एक समिती बनविली होती. ज्या काही त्रृटी व चुका होत्या त्यात सुधारणा करुन आपण शासनाकडे पाठविले होते. परंतु २०१४ मध्ये आपण सेक्शन २८ मध्ये आपण तेथे पाठविले होते. शासनाकडे बसलेल्या अधिका—याने काही विचार न करता डीपीमध्ये त्याच गोष्टी परत टाकल्या. आता नुकतेच मी सेंच्युरी रेयॉन येथे सर्व्हे करण्यासाठी गेली होती. सेंच्युरी रेयॉनचा सर्व्हे केल्यानंतर त्यामध्ये एवढया चुका आहेत, जर तो डीपी लागु केला तर मला वाटते सेंच्युरी रेयॉन कंपनी बंद होवु शकते. आपणांस असे नको आहे, आपण म्हणजेच सर्वच पक्षाला असे वाटत नाही की त्या कंपनीचे एवढे मोठे नुकसान होवो. जर तसे झाले तर सेंच्युरी रेयॉन कंपनी बंद पडेल. त्यात काम करणारे आपले सर्व बंधु ज्यांचा परिवार त्यावर चालतो, तर ते बेरोजगार होवुन जातील व परिवार विस्कळीत होईल. सेंच्युरी रेयॉन कंपनी आपल्या उल्हासनगर शहराची शान आहे. तर आम्हां सर्वांना वाटते की त्यांना काही त्रास होवो, संपुर्ण उल्हासनगर त्यावर आधारीत आहे. तेथुन आपल्या महापालिकेस कर येतो. त्यामुळे आम्हांला असे वाटते की हा डीपी लागु झाला नाही पाहिजे. त्यानंतर येतो रिंग रोड जो १२० करायचा आहे.

सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:—महापौर महोदया, ही महासभा आहे सदस्यांना आपले मत मांडु दया. ही महासभा आहे आपणांस नंतर बोलण्याची संधी आहे.

सदस्य श्री. मनोज सयानी :— महापौरांना बोलु दया.

सस्य श्री. रमेश चव्हाण:—महापौर नंतर बोलु शकता.

सदस्य श्री. भगवान भालेराव:—हा कोणता हिशोब आहे, महापौर प्रथम बोलत आहेत.

सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी:—महापौरांना बोलण्याचा अधिकार आहे. लोकतंत्र म्हणत आहे आपण नंतर बोला.

सदस्य डॉ. प्रकाश नाथानी:—महापौर महोदया आपण बोलु शकता.

यावेळी सदस्यांच्या एकत्रित आवाजात कोण नेमके काय म्हणत होते ते समजुन येत नव्हते.

सदस्य डॉ. प्रकाश नाथानी :—महापौर महोदया आपण बोलु शकता. मा. महापौरजी, आपण रुलिंग देवु शकता.

सदस्य श्री. भगवान भालेराव :—सदस्य बोलल्यानंतर मग आपण बोलु शकता.

सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी:—महापौरांना बोलण्याचा अधिकार आहे.

सदस्य श्री. भगवान भालेराव :—महासभेत काय आपण आधी बोलणार काय?

सदस्य डॉ. प्रकाश नाथानी :—मा. महापौरजी, आपण बोलावे.

सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—विधी अधिकारी जरा कायदा सांगा. सॉरी, सचिव कायदा सांगा, प्रोटोकॉल सांगा. महासभा कशी चालवायची याचे शिक्षण दया.

सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:—रद्द करा रद्द करा, विकास आराखडा रद्द करा.

यावेळी डॉ. प्रकाश नाथानी हे व्यासपीठासमोरील मोकळया जागेत जमिनीवर बसले.

सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी:—आपण श्रेय घ्यायला पाहत आहात.

प्र.महापालिका सचिव, डॉ.युवराज भदाणे:—सन्माननिय सदस्य मा. महापौर आजच्या पीठासीन अधिकारी आहेत. सभाशास्त्राच्या नियमाप्रमाणे सभा कशी चालवावी याचा सर्वस्वी अधिकार मा. महापौर महोदयांना आहे.

यावेळी सर्व विरोधी पक्षाचे सदस्य आपल्या आसनाच्या ठिकाणी उभे राहिले आणि डीपी प्लान रद्द करा असे म्हणु लागले.

सदस्य श्री. दिपक सिरवानी:—बंद करा, बंद करा, टेलिव्हिजन बंद करा.

सदस्य श्री. भगवान भालेराव :—डीपी प्लान रद्द करा.

सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी:—राजकारण बंद करा.

सदस्य श्री. मनोज सयानी :—तुम्ही आणलेला प्लान आम्ही रद्द करु.

सदस्या श्रीमती वसुधा बोडारे, सदस्या श्रीमती राजश्री चौधरी, श्रीमती अंजली साळवे, श्रीमती कविता बागुल :—रद्द करा, रद्द करा, डीपी प्लान रद्द करा.

सदस्य श्री. भगवान भालेराव, सदस्य श्री. सुनिल सुर्वे, सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:— रद्द करा, रद्द करा, डीपी प्लान रद्द करा.

सदस्य डॉ. प्रकाश नाथानी :—बंद करा, बंद करा, राजकारण बंद करा.

सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :—बंद करा, आमचा ठराव वाचा.

**सदस्य श्री. मनोज सयानी :–**बंद करा, बंद करा, राजनिती बंद करा.

**सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी:–** ठराव वाचा, आमचा ठराव वाचा. राजकारण बंद करा, लोकांसाठी काम करा, लोकांसाठी काम करा. राजकारण बंद करा, राजकारण बंद करा, राजकारण बंद करा.

**सदस्य श्री. किशोर वनवारी :–**राजनिती बंद करा, बंद करा.

**प्र.महापालिका सचिव, डॉ. युवराज भदाणे:–** मा. महापौरांच्या आदेशान्वये ठराव वाचुन दाखवित आहे.

**सदस्य श्री. किशोर वनवारी :–**राजनिती बंद करा, बंद करा.

**सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :–**बंद करा, बंद करा, राजनिती बंद करा.

**प्र.महापालिका सचिव, डॉ. युवराज भदाणे:–** सन २०१४ मध्ये उल्हासनगर शहराचा विकास आराखडयामध्ये सुधारणा करुन आम्ही तज्ञ समितीच्या सह विचार विनिमय करुन महासभामध्ये सर्वसंमतीने उल्हासनगर शहर हित विकास आराखडा शासनाच्या मान्यतेसाठी पाठविला होता. परंतु महाराष्ट्र शासनाच्या अधिका–यांनी त्या प्रस्तावावर ध्यान पुर्वक विचार न करता एक चुकीचा आराखडा मंजूर केला आहे. यामध्ये अनेक बाबीविषयी विसंगती दिसून येत आहे.

तरी या महासभेमध्ये सदर प्रस्ताव पास करीत आहे कि आजच्या उल्हासनगर शहराचा मंजूर विकास आराखडा रद्द करावे व नविन विकास आराखडा जो शहर हितावह असेल असा तयार करण्यात यावा तोपर्यंत सन १९७४ सालचा विकास आराखडा आणि येणारे नविन विकास नियमावली शहरात लागु राहील.

सुचकाचे नाव श्रीमती पंचम कालानी, श्रीमती अर्चना करनकाळे, श्री. राजेश वदारिया व अनुमोदकाचे नाव श्री. दिपक सिरवानी, श्री. किशोर वनवारी, श्रीमती कविता लाल पंजाबी

**सदस्य श्री. किशोर वनवारी :–**पास, पास, पास....

सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी:—मतदान घ्या, मतदान घ्या, मतदान घ्या.

सदस्य श्री. किशोर वनवारी :—डेव्हलोपमेंट प्लान रद्द.

सदस्य श्री. रमेश चव्हाण :—ठरावावर मतदान घ्या.

प्र.महापालिका सचिव, डॉ. युवराज भदाणे:—हा ठराव मा. महापौरांनी स्विकारलेला आहे. सभागृहामध्ये मी वाचुन दाखविला आहे.

यावेळी सदस्यांच्या एकत्रित आवाजात कोण नेमके काय म्हणत होते हे समजून येत नव्हते.

यावेळी डॉ. प्रकाश नाथानी आपल्या आसनावर जावुन आसनस्थ झाले.

यावेळी सदस्या श्रीमती पंचम कालानी यांनी सभागृहात प्रवेश केला.

यावेळी सर्व विरोधपक्षवाले सदस्य आपल्या आसनाच्या ठिकाणी उभे राहिले आणि डीपी प्लान रद्द करा असे म्हणु लागले.

सदस्या श्रीमती अंजली साळवे, श्रीमती कविता बागुल:—रद्द करा, रद्द करा, बंद करा, बंद करा, डी.पी. प्लान रद्द करा.

सदस्य श्री. विजय पाटील :— डीपी प्लान रद्द, रद्द.

सदस्या श्रीमती राजश्री चौधरी:—मा. महापौर महोदया, डीपी प्लान रद्द करा.

सदस्य श्री. विजय पाटील:—डीपी प्लान रद्द व ठरावावर कोणाकोणाचे नाव आहे ते वाचुन दाखवा.

प्र.महापालिका सचिव, डॉ. युवराज भदाणे:—ठरावाच्या बाजुने असलेल्या सन्माननिय सदस्यांनी कृपया आपले हात वर करावेत.

सदस्य श्री. सतरामदास जेसवानी:—श्री. भदाणे साहेब, आपण काय बोलत आहात ते समजु तर दया.

प्र.महापालिका सचिव, डॉ. युवराज भदाणे:—सन्माननिय सदस्यांना विनंती आहे की, ठराव पुन्हा वाचुन दाखवितो पाहिजे तर.

सदस्य श्री. भगवान भालेराव :—सन्माननिय सचिव, सभाशास्त्र आम्हांला समजावता.

सदस्य श्री. मनोज सयानी :—ठराव वाचा आणि कोणा कोणाचीसही घेतली आहे ते सांगा.

सदस्य श्री. धनंजय बोडारे :—डीसी रुल वाचुन तर दाखवा, प्रस्ताव कुठला आला आहे तो वाचा ना.

प्र.महापालिका सचिव, डॉ. युवराज भदाणे:— सन २०१४ मध्ये उल्हासनगर शहराचा विकास आराखडयामध्ये सुधारणा करुन आम्ही तज्ञ समितीच्या सह विचार विनिमय करुन महासभामध्ये सर्वसंमतीने उल्हासनगर शहर हित विकास आराखडा शासनाच्या मान्यतेसाठी पाठविला होता. परंतु महाराष्ट्र शासनाच्या अधिका—यांनी त्या प्रस्तावावर ध्यान पुर्वक विचार न करता एक चुकीचा आराखडा मंजूर केला आहे. यामध्ये अनेक बाबीविषयी विसंगती दिसून येत आहे.

तरी या महासभेमध्ये सदर प्रस्ताव पास करीत आहे कि आजच्या उल्हासनगर शहराचा मंजूर विकास आराखडा रद्द करावे व नविन विकास आराखडा जो शहर हितावह असेल असा तयार करण्यात

यावा तोपर्यंत सन १९७४ सालचा विकास आराखडा आणि येणारे नविन विकास नियमावली शहरात लागु राहील.

सुचकाचे नाव श्रीमती पंचम कालानी, श्रीमती अर्चना करनकाळे, श्री. राजेश वदारिया व अनुमोदकाचे नाव श्री. दिपक सिरवानी, श्री. किशोर वनवारी, श्रीमती कविता लाल पंजाबी

सदस्य श्री. रमेश चव्हाण :—सचिव साहेब, अगोदर प्रस्ताव कुणाचा आला आहे?

सदस्य श्री. मनोज सयानी :—मा. महापौरजी, हा ठराव बहुमताने पारीत झाला आहे, हा ठराव वाचण्यात यावा व त्यावर स्वाक्षरी कोणाची आहे ते सांगावे.

सदस्य श्री. रमेश चव्हाण :— अगोदर प्रस्ताव कुणाचा आला आहे? तो आधी वाचा.

सदस्या श्रीमती राजश्री चौधरी :—सचिव साहेब, आम्ही दिलेला ठराव आहे तो आधी वाचा.

प्र.महापालिका सचिव, डॉ. युवराज भदाणे:—बहुमताने ठराव पारीत झाला आहे.

सदस्य श्री. विजय पाटील:—महापौरांच्या आदेशाने सचिवांनी बोलणे चालु ठेवावे.

सदस्य श्री. चंद्रशेखर यादव :—आम्ही जो ठराव दिला आहे तो प्रथम वाचुन दाखवावा.

सदस्या श्रीमती ज्योत्स्ना जाधव :—ठराव काय झाला तो वाचुन दाखवा एकदा.

सदस्य श्री. रमेश चव्हाण :—जो ठराव वाचुन दाखविला तो आम्हांला समजला नाही. शहरवाशियांना काय समजेल ठराव काय झाला ते.

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय :—** उल्हासनगर शहराच्या मंजुर विकास आराखडयामध्ये वगळण्यात आलेल्या क्षेत्रामध्य आरक्षण बदलून
पब्लिक युटीलीटीचे आरक्षण टाकण्यासाठी हरकती व सूचना घेणे तसेच महासभा, तज्ञसमितीच्या
सूचना व नागरीकांनी दिलेल्या हरकती विचारात न घेतल्याने या संदर्भात चर्चा, विचार, विनिमय
करणे.

## प्रस्ताव

उल्हासनगर शहराचा विकास आराखडा मंजूर करण्यात आला असून विकास आराखडया संदर्भात महासभा, तज्ञ समितीच्यासुचना व नागरीकांनी दिलेल्या हरकती यांचा कुठलाही विचार न करता मंजूर करण्यात आलेला आहे. सदरचा विकास आराखडा हा जनहिताचा नसून विनाशाचा असल्याने जनप्रक्षोभ होण्याची दाट शक्यता आहे. तरी विकास आराखडया संदर्भात चर्चा, विचार विनिमय करणेसाठी तातडीने विशेष महासभा आयोजित करण्यात यावी.

उल्हासनगर शहराचा प्रारुप विकास आराखडा गेल्या अनेक वर्षानंतर मंजूर होवून नागरीकांच्या माहितीसाठी महापालिकेच्या आवारात दिनांक ४/१२/२०१७ रोजी प्रसिध्दीसाठी ठेवण्यात आलेला आहे.

परंतू या प्रसिध्द करण्यात आलेल्या विकास आराखडयामध्ये (Exculded Portion) वगळण्यात आलेल्या क्षेत्रामध्ये आरक्षण बदलून पब्लिक युटीलीटीचे आरक्षणटाकण्यासाठी तरतूद केलेली आहे. तरी याबाबत सुचना व हरकती घेण्याकरीता तशी चर्चा महासभेमध्ये होण्याकरीता तशी तातडीची विशेष महासभा लवकरात लवकर लावण्यात यावी.

**महासभा ठराव क्र. :—** ५७ **दिनांक :३/१/२०१८**

सूचकाचे नांव : १) श्रीमती पंचम कालानी

२) श्रीमती अर्चना करनकाळे

३) श्री. राजेश वदारिया

अनुमोदकाचे नांव : १) श्री. दिपक सिरवानी

२) श्री. किशोर वनवारी

३) श्रीमती कविता लाल पंजाबी

ही महासभा सन २०१४ मध्ये उल्हासनगर शहराचा विकास आराखडयामध्ये सुधारणा करुन आम्ही तज्ञ समितीच्या सह विचार विनिमय करुन महासभामध्ये सर्वसंमतीने उल्हासनगर शहर हित विकास आराखडा शासनाच्या मान्यतेसाठी पाठविला होता. परंतु महाराष्ट्र शासनाच्या अधिका—यांनी त्या प्रस्तावावर ध्यान पुर्वक विचार न करता एक चुकीचा आराखडा मंजूर केला आहे. यामध्ये अनेक बाबीविषयी विसंगती दिसून येत आहे.

तरी या महासभेमध्ये सदर प्रस्ताव पास करीत आहे कि आजच्या उल्हासनगर शहराचा मंजूर विकास आराखडा रद्द करावे व नविन विकास आराखडा जो शहर हितावह असेल असा तयार करण्यात यावा तोपर्यंत सन १९७४ सालचा विकास आराखडा आणि येणारे नविन विकास नियमावली शहरात लागु राहील.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/— १)

२)

३)

अनुमोदकाची सही/— १)

२)

३)

<u>एकमताने</u>

महापौर/पीठासीन अधिकारी

विशेष महासभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिवः—</u> कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर दुपारी १.१२ वाजता महापौर श्रीमती मिना कुमार आयलानी यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(डॉ.युवराज भदाणे)

प्र. महापालिका सचिव

उल्हासनगर महानगरपालिका

१. श्रीम. मिना कुमार आयलानी —— महापौर

३. श्री. जीवन चंद्रभान इदनानी —— उप—महापौर

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीमती अर्चना गोकुळ करणकाळे | ४१ | श्री. दिपक लक्ष्मणदास सिरवानी (साई) |
| ४ | श्रीमती पुजा सचिन भोईर | ४२ | श्री. सुमित सागर सोनकांबळे |
| ५ | श्रीमती जयश्री ज्ञानेश्वर पाटील | ४३ | श्रीमती ज्योत्स्ना सुरेश जाधव |
| ६ | श्रीमती ज्योती दिलीप गायकवाड | ४४ | श्रीमती ज्योती शामराव माने |
| ७ | श्री. हरेश परमानंद जग्यासी | ४५ | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| ८ | श्रीमती मिनाकौर अजितसिंग लबाना | ४६ | श्री. चंद्रशेखर केशव यादव |
| ९ | श्रीमती पंचम उमेश कालानी | ४७ | श्रीमती मिताली राजेश चान्पूर |
| १० | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | ४८ | श्रीमती लिलाबाई लक्ष्मण आशान |
| ११ | श्रीमती आशा नाना बिराडे | ४९ | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे |
| १२ | श्री. रविंद्र दशरथ बागुल | ५० | श्रीमती संगिता नितीन सपकाळे |
| १३ | श्रीमती चरणजितकौर राजेंद्रसिंह भुल्लर | ५१ | श्रीमती शितल चंद्रकांत कदम |
| १४ | श्री. राजेंद्रसिंह विरसिंग भुल्लर | ५२ | श्रीमती वसुधा धनंजय बोडारे |
| १५ | श्री. स्वप्नील मिलींद बागुल | ५३ | श्री. धनंजय बाबुराव बोडारे |
| १६ | श्रीमती सुरेखा अहनुमंत आव्हाड | ५४ | श्रीमती दिप्ती नविन दुधानी |
| १७ | श्रीमती अंजना अंकुश म्हस्के | ५५ | श्रीमती ज्योती रमेश चैनानी |
| १८ | श्री. कलवंतसिंग गुरूदेव सोहता | ५६ | श्रीमती कांचन अमर लुंड |
| १९ | श्री. अशोक बच्चुमल छाप्रु | ५७ | श्री. शंकर गोविंदराम लुंड |
| २० | डॉ. प्रकाश घनश्यामदास नाथानी | ५८ | श्रीमती सुनिता बाबुराव बगाडे |
| २१ | श्रीमती रेखा अशोक ठाकुर | ५९ | श्रीमती पुजाकौर श्यामसिंग लबाना |
| २२ | श्रीमती सरोजिनी टेकचंदानी | ६० | श्री. भारत रामचंद्र राजवानी (गंगोत्री) |
| २३ | श्रीमती जया प्रकाश माखिजा | ६१ | श्री. सतरामदास पुतनदास जेसवानी |

| | | | |
|---|---|---|---|
| २४ | श्री. महेश पहिलराज सुखरामनी | ६२ | श्रीमती अंजली चंद्रकांत साळवे |
| २५ | श्रीमती शुभांगीनी निकम | ६३ | श्री. प्रमोद नामदेव टाले |
| २६ | श्री. भगवान शंकर भालेराव | ६४ | श्रीमती कविता सुधिर बागुल |
| २७ | श्रीमती छाया सुजित चक्रवर्ती उर्फ अडसुळ | ६५ | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| २८ | श्रीमती चंद्रावती आयोध्याप्रसाद सिंग | ६६ | श्री. किशोर नारायणदास वनवारी |
| २९ | श्री. राजेश नानिकराम वदारिया | ६७ | श्रीमती मिना चंद्रगुप्त सोनेजी |
| ३० | श्रीमती दिपा नारायण पंजाबी | ६८ | श्रीमती मिनाक्षी रवी पाटील |
| ३१ | श्री. अजित प्रभुनाथ गुप्ता | ६९ | श्री. विजय चाहु पाटील |
| ३२ | श्रीमती पुष्पा नाना बागुल | ७० | श्रीमती कविता सुरेश गायकवाड |
| ३३ | श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी | ७१ | श्री. आकाश परशुराम पाटील |
| ३४ | श्रीमती शुभांगी मनोहर बेहनवाल | ७२ | श्री. विकास परशुराम पाटील |
| ३५ | श्री. राजेंद्र शांताराम चौधरी | ७३ | श्री. मनोज दिलीकुमार सयानी |
| ३६ | श्रीमती इंदिरा जमनादास उदासी | ७४ | श्री. प्रदिप अर्जुनदास रामचंदानी |
| ३७ | श्रीमती कविता लाल पंजाबी | ७५ | श्री. सुरेश बाळकृष्ण सावंत |
| ३८ | श्रीमती सविता प्रविण तोरणे (रगडे) | | श्री. अरूण लक्ष्मण आशान |
| ३९ | श्री. गजानन प्रल्हाद शेळगे | ७६ | श्रीमती आशा जीवन इदनानी |
| ४० | श्रीमती ज्योती प्रकाश बठिजा | | |

तर

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१. श्रीमती गीता लालचंद साधनानी, २. श्रीमती अपेक्षा भगवान भालेराव, ३. श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग, ४. श्रीमती ज्योती प्रशांत पाटील, ५. श्रीमती डिम्पल नरेंद्र ठाकुर (कुमारी), ६. श्री. रवि किशनचंद जग्यासी, ७. श्रीमती आशा जीवन इदनानी .

खालील अधिकारी सभेत उपस्थित होते.

१७. श्री. राजेंद्र निंबाळकर, आयुक्त
१८. श्रीमती विजया कंठे, अतिरिक्त आयुक्त
१९. श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी, प्र. महापालिका सचिव
२०. श्री. राम जैसवार, शहर अभियंता
२१. श्री. संतोष देहेरकर, उप आयुक्त (मुख्यालय)
२२. श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी
२३. डॉ. राजा रिझवानी, प्र. वैद्यकिय आरोग्य अधिकारी
२४. श्री. कुमार जग्यासी, कनिष्ठ अभियंता